मराठीच्या प्रमाणभाषेचे स्वरूप

सुहासिनी लद्दू

मराठीच्या
प्रमाणभाषेचे
स्वरूप

The Nature of Standard Marathi

by

Continental Prakashan

Poona

for

The Maharashtra Universities Book-Production Board, under the Centrally Sponsored Scheme of Production of Books and Literature in regional languages at the University level, of the Government of India, in the Ministry of Education and Social Welfare (Department of Culture), New Delhi

मराठीच्या प्रमाणभाषेचे स्वरूप

सुहासिनी सुरेशचंद्र लद्दू

महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळासाठी
कॉन्टिनेन्टल प्रकाशन,
विजयानगर, पुणे ३०

३३०

लेखक : प्रा. सौ. सुहासिनी सुरेशचंद्र लद्दू, एम्. ए., पीएच्. डी.

प्रकाशक : महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळ,
म. गांधी रोड, नागपूर १० साठी
रत्नाकर अनंत कुलकर्णी, कॉन्टिनेन्टल प्रकाशन
विजयानगर, पुणे ३०

मुद्रक : य. गो. जोशी, आनंद मुद्रणालय
सदाशिव पेठ, पुणे ३०

प्रथमावृत्ती : जानेवारी १९८३

किंमत पंचवीस रुपये

वर्गीकरण

द्विबिंदु : न १५५ भ ८३

दशांश : ४९१.४६ लद्दू

330

Author : Late Prof. Smt. Suhasini Sureshachandra Laddu,
M. A., Ph. D.

Publishers : R. A. Kulkarni, Continental Prakashan
Vijayanagar, Poona 30
for Maharashtra Universities Book Production Board
Gandhi Road, Nagpur 10

Printers : Y. G. Joshi, Anand Mudranalay
Sadashiv Peth, Poona 30

First Edition : 1983

Price Rs. 25-00

ग्रंथनिर्मिति-योजनेविषयी थोडेसे

मातृभाषेतून दिलेले शिक्षण हे जास्त प्रभावी आणि उपयुक्त असते याविषयी आता दुमत होण्याचे कारण नाही. महाराष्ट्रातील महाविद्यालयीन शिक्षण घेणाऱ्यांची संख्या दरसाल वाढते आहे. शिक्षणाचा प्रसार स्वातंत्र्योत्तर काळात ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर झाला आहे. महाराष्ट्रातील दहा विद्यापीठांतील महाविद्यालयांची संख्या वाढली आहे. या विद्यापीठांतील बहुसंख्य विद्यार्थी मराठी माध्यमातून लिहिण्याच्या सवलतीचा उपयोग करून घेतात. काही विद्यापीठांनी मराठी माध्यमाचा अधिकृतपणे स्वीकारही केला आहे. थोडक्यात, प्रादेशिक माध्यामाच्या विकासाबरोबर प्रादेशिक ग्रंथांची निकड नितांतपणे भासू लागली आहे. प्रादेशिक भाषेतून ग्रंथनिर्मितीचे प्रमाण वाढले आहे. हे जरी खरे असले तरी आवश्यक त्या विषयावर अधिकारी आणि अनुभवी लेखकांकडून असे लिखाण फार अल्प प्रमाणात झाल्याचे आढळून येते. तसेच काही विषय ऐच्छिक स्वरूपाचे असतात. त्यांना विद्यार्थ्यांची संख्या कमी असल्यामुळे प्रकाशक अशा बिषयावरील पुस्तके काढण्यास धजावत नाहीत. याचा परिणाम त्या विषयाच्या विकासावर होतो.

प्रादेशिक भाषेचा माध्यम म्हणून वापर मोठ्या प्रमाणावर व्हावा व त्यासाठी आवश्यक साहित्य निर्माण व्हावे या उदात्त हेतूने प्रेरित होऊन केंद्रीय शिक्षण मंत्रालयाने सर्व राज्यांना या कार्यांसाठी भरपूर आर्थिक साहाय्य देऊ केले. प्रादेशिक भाषांतून सर्व विषयांसाठी पाठ्यपुस्तके तयार करण्यासाठी केंद्राच्या शिक्षण विभागाने एक स्थूल योजना तयार केली असून, त्या योजनेचा तपशील ठरवून ती अमलात आणण्याचे काम प्रत्येक राज्यातील शासन व विद्यापीठे यांजकडे सोपविले आहे.

महाराष्ट्र राज्याने या योजनेचा स्वीकार करून मराठी माध्यमातून ग्रंथनिर्मिती करण्याच्या उद्दिष्टाने एक स्वतंत्र व स्वायत्त मंडळ स्थापन करण्याचे ठरविले व त्या-नुसार १९ मार्च १८६९ रोजी महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळाची स्थापना झाली. या मंडळाच्या मध्यवर्ती समितीवर महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठांचे कुलगुरू, त्याचप्रमाणे केंद्रीय शिक्षण–विभाग, विद्यापीठ अनुदान मंडळ व महाराष्ट्र शासन शिक्षण–विभाग यांचे तसेच इंडियन इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजीचे एक प्रतिनिधी असे सभासद आहेत.

मध्यवती कार्यालयाची जबाबदारी नागपूर विद्यापीठाने उचलली. प्रत्येक

विद्यापीठाने काही विषयांची जबाबदारी उचलावी असे ठरवून विषयांची विभागणी करण्यात आली आणि या मंडळाच्या कार्याला प्रारंभ झाला.

प्रत्येक विषयासाठी एक विषयसमिती नेमण्यात आली. या विषयसमितीवर विद्यापीठातील त्या त्या विषयाच्या अभ्यासमंडळाच्या अध्यक्षाची अथवा विद्यापीठाने सुचविलेल्या प्रतिनिधींची सभासद म्हणून नियुक्ती करण्यात आली. यामुळे निरनिराळ्या विद्यापीठांतील अभ्यासक्रम, त्यांच्या गरजा यांचा साकल्याने विचार होणे सुलभ झाले. प्रत्येक विषयसमिती ह्या पाठपुस्तक निर्मितीच्या कार्यक्रमातील अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. विद्यापीठात व संलग्न महाविद्यालयांत काम करणारे प्राध्यापक व इतर तज्ज्ञ अनुभवी लेखक व ग्रंथनिर्मिती मंडळ या सर्वांना एकत्र जोडणारा तो महत्त्वाचा दुवा आहे. ग्रंथनिर्मिती मंडळीचे महत्त्वाचे कार्य या विषयसमितीच्या मार्फतच सुरू झाले आहे.

आपल्या विषयात सर्व विद्यापीठांत प्रचलित असलेल्या अभ्यासक्रमांचे परिशीलन करून संयुक्त अभ्यासक्रमाचा एक आराखडा करणे, योग्य लेखकांची निवड करणे,, लेखनासंबंधी त्यांना मार्गदर्शन करणे, लेखन मुदतीत पुरे करून घेणे, लेखन निर्दोष व्हावे म्हणून त्या विषयातील तज्ज्ञांची तपासणीसाठी शिफारस करणे इत्यादी महत्त्वाची कामे विषय समितीकडे सोपविली आहेत.

भाषाविज्ञान व व्याकरण या समितीचे निमंत्रक डॉ. वि. बा. प्रभुदेसाई, नागपूर विद्यापीठ हे असून डॉ. अ. रा. केळकर डेक्कन कॉलेज, पुणे, डॉ. यू. म. पठाण मराठवाडा विद्यापीठ, डॉ. निर्मलकुमार फडकुले, संगमेश्वर महाविद्यालय, सोलापूर, डॉ. श्री. न. गजेंद्रगडकर, मुंबई विद्यामीठ आणि डॉ. स. गं. मालशे एस्. एन्. डी. टी. महिला विद्यापीठ, मुंबई हे या समितीचे मान्यवर सदस्य आहेत.

सिद्ध झालेले ग्रंथ छापून घेऊन प्रकाशित करण्याची व्यवस्था, मंडळाने आता त्यासाठी एक स्वतंत्र प्रकाशनसमिती नेमून केलेली आहे.

कार्यकारी अध्यक्ष,
महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळ

निवेदन

महाराष्ट्र, ग्रंथोत्तेजक संस्थेतर्फे प्रबंध-स्पर्धा जाहीर केली गेली तेव्हा त्यासाठी दिलेल्या विषयांपैकी, 'मराठीच्या प्रमाणभाषेचे स्वरूप' या विषयाने माझें लक्ष वेधले. हा विषय माझ्या अभ्यासविषयाच्या क्षेत्रातील तर होताच परंतु त्यावर आजपर्यंत फारसे स्वतंत्र पाने लेखन झालेले नसल्याने स्वतंत्र विचारांना वाव देणाराही होता. शिवाय मराठी भाषेच्या सद्यःस्थितीसंबंधी आपली मते सुसंगतपणे प्रदर्शित करण्याची संधी या लेखनाने लाभणार असल्याने मी तो निवडला.

माणसाचे वारंवार अस्थिर होणारे मन आध्यात्मिक वाचनाने किंवा विविध प्रकारच्या वैचारिक शिकवणींची जसे स्थिर करता येते तशीच वारंवार परिवर्तने पावणारी भाषा तिला प्रमाणस्वरूप दिल्यास स्थिर करता येते, या विचाराने प्रेरित होऊन, भाषेच्या स्थिरीकरणासाठी आपल्याला शक्य होईल तो हातभार आपण लावावा ही लेखनामागची प्रेरणा व स्पर्धेच्या वातावरणाने दिलेली स्फूर्ती यांनी हा प्रबंध साकार केलेला आहे.

प्रबंधलेखनासाठी संदर्भ म्हणून लागणाऱ्या पुस्तकांची सोय ज्यांनी ज्यांनी केली त्यांची मी आभारी आहे. तसेच महाराष्ट्र ग्रंथोत्तेजक संस्थेने ही स्पर्धा आयोजित केल्याने मला आपले विचार मांडण्याची संधी मिळाली त्याबद्दल संस्थेच्या चालकांचीही मी आभारी आहे.

६, प्रोफेसर्स क्वार्टर्स,
पुणे विद्यापीठ, पुणे ७.
दि. ४-१२-१९७९

सौ. सुहासिनी लद्दू

लेखिकेच्या प्रस्तुत प्रबंधाला म. ग्रं. संस्थेचे प्रथम पारितोषिक मिळाल्यानंतर लेखिकेने तो म. वि. ग्रं. नि. मंडळाकडे प्रकाशनासाठी सादर केला. परंतु मध्यंतरी लेखिकेचे दि. १३ डिसेंबर १९८१ रोजी निधन झाले. मंडळाने प्रकाशनासाठी प्रबंध स्वीकारल्यानंतर कॉंटिनेंटल प्रकाशनाकडे पुढील कार्यवाहीसाठी तो सुपूर्द केला व त्यांनी त्याचे मुद्रणही त्वरेने सिद्ध केले. मुद्रणाचे कामी लेखिकेच्या वैयक्तिक लक्षा-अभावी म. वि. ग्रं. नि. मंडळ व कॉं. प्रकाशन यांनी घेतलेल्या काळजीबद्दल, विशेषतः मंडळाचे संचालक श्री. विलास अंधारे आणि कॉंटिनेंटलचे श्री. अनंतराव कुलकर्णी व श्री. अनिरुद्ध कुलकर्णी यांनी आत्मीयतेने घेतलेल्या परिश्रमांबद्दल, दिवंगत लेखिकेच्या वतीने पती या नात्याने मनःपूर्वक कृतज्ञता !

पुणे विद्यापीठ, पुणे ७
चंपाषष्ठी, दि. २१-१२-१९८२

सु. शा. लद्दू

अनुक्रमणिका

* * *

विषयोपन्यास

मराठीचे प्रमाण-भाषा-स्वरूप या विषयासंबंधी काही निश्चित मते मांडण्यापूर्वी, पहिल्या प्रकरणात, भाषा व भाषेचे शास्त्र या विषयातील, प्रमाणभाषेच्या संदर्भात विचारात घ्यावयाच्या मुद्द्यांची स्थूल रूपरेषा मांडली आहे. भाषा म्हणजे काय, प्रमाणभाषा व प्रमाणेतर भाषा यांतील फरक कोणते, भाषेचे कार्य कोणते, ते कार्य सिद्ध करण्याची साधने कशा स्वरूपाची आहेत, इत्यादी विषयांची सर्वसाधारण स्वरूपाची कल्पना मनामध्ये निश्चित केल्यावर, त्या पार्श्वभूमीवर मराठी भाषेच्या प्रमाणस्वरूपाचा अभ्यास करणे योग्य ठरेल.

भाषेचा समाज, इतिहास, भूगोल, राज्यशासन व व्याकरण यांच्याशी असणारा संबंध दाखवून तो पुढील प्रकरणांतून, केव्हा स्वतंत्रपणे तर केव्हा स्वतंत्रपणे न मांडता, लक्षात घेतलेला आहे.

भाषा ध्वनिरूप असली तरी ' मराठी ' या नावाने असलेल्या भाषेचे अस्तित्व कित्येक शतकांपासून लिपिबद्ध स्वरूपात सापडते. या लिपिबद्ध भाषेचा, म्हणजे मराठी वाङ्मयाचा, इतिहास दुसऱ्या प्रकरणात विचारात घेतला आहे. कालानुक्रमाने मराठीच्या प्रामाण्याची स्वरूपे ठरविण्यास त्याची काही मदत होते का ते पाहण्याचा या इतिहासशोधनाचा हेतू आहे.

भाषा जशी जशी समृद्ध होत जाते तशी तशी तात्त्विक दृष्टिकोनातून अभ्यासिली जाऊ लागते. हा भाषिक अभ्यास अनेक अंगांनी होऊ शकतो. भाषा कशी आहे, भाषा कशी असावी, भाषा जशी आहे तशी ती का आहे, भाषा कोणत्या नियमांनी लिहिली जावी वगैरे अनेक दृष्टींनी केला गेलेला विचार भाषिक अभ्यासातून आढळून येतो. तिसऱ्या प्रकरणात प्रमाणभाषेच्या अभ्यासास उपयुक्त होतील अशा, मराठीच्या भाषिक अभ्यासाच्या इतिहासाचा परामर्श घेतला आहे.

मराठीच्या प्रामाण्यसंबंधींचा प्रश्न आजच्या काळात शासनाच्या भाषाविषयक दृष्टिकोनातून कसा उपस्थित झाला, सन १९७९ मध्ये, साधारण एक वर्षभराच्या कालखंडात तो प्रामुख्याने कसा चर्चिला गेला, याविषयीचे विवेचन चौथ्या प्रकरणात केलेले आहे. त्यासाठी सन १९७९ मध्ये प्रसिद्ध झालेला, ' सकाळ ' व ' महाराष्ट्र टाइम्स ' या वर्तमानपत्रातील मजकूर प्रामुख्याने विचारात घेऊन, भाषेच्या वापराविषयी उपस्थित होणाऱ्या अनेक प्रश्नांची उत्तरे भाषिक दळणवळणाच्या संदर्भात कशी शोधता यतील हे पाहण्याचा प्रयत्न केला आहे.

पाचव्या, प्रमाणभाषेची वाटचाल, या प्रकरणात मराठीच्या भाषिक प्रतिष्ठितांचा मराठीच्या उगमकालापासून आढावा घेऊन साहित्य महामंडळाच्या नियमांनी लिहिली

जाणारी भाषा व त्या नियमांखेरीजच्या नियमांनी लिहिली जाणारी भाषा यांमधील भाषेच्या व्याकरणिक अंगातील साम्यभेदांची क्षेत्रे शोधून त्यांची तुलना केली आहे. शिवाय, काही नव्या व्याकरणांचा संदर्भ घेऊन, नंतर प्रमाणभाषेच्या व्याकरणात ज्यांचा विचार केला जावा अशा काही व्याकरणिक गोष्टींची नोंद केली आहे.

सहाव्या प्रकरणात, भाषा व व्याकरणे यांचा संबंध प्रथम सांगून नंतर सरकार-मान्य प्रमाण मराठीचे व्याकरण, वर्णनात्मक पद्धतीने, स्थूल रूपाने दिले आहे. त्यानंतर हल्लीच्या प्रतिष्ठितांच्या भाषेत असणाऱ्या, परंतु ज्यांना प्रमाण मानावे किंवा नाही असा विचार करणे आवश्यक वाटावे अशा स्वरूपाच्या, कोणत्या गोष्टी आहेत त्यांचा शोध घेऊन, त्यासंबंधीचा निर्णय करण्यापूर्वी नव्या प्रमाणभाषेचे स्वरूप ठरविण्यासाठी कोणती तत्त्वे लक्षात घ्यावी लागतील त्यांचे निर्देशन केले आहे; शिवाय भाषिक प्रतिष्ठितांकडून नव्या प्रमाणभाषेसंबंधीच्या कर्तव्यासंबंधीच्या अपेक्षा व्यक्त केल्या आहेत.

प्रबंधाच्या शेवटी विषयाचा समारोप करून संदर्भसाहित्याची यादी जोडलेली आहे.

१

भाषा व भाषेचे शास्त्र

१.१. प्रास्ताविक

१.१. (अ) भाषेचे अस्तित्व जाणवते :

'वाजते पण ऐकू येत नाही, ते काय ?' असे कोडे, अगदी लहान मुलांच्या 'कोडी घालण्याच्या विश्वात' नेहमी ऐकू येते. 'थंडी' असे त्याचे अपेक्षित उत्तर असते. 'थंडी वाजते पण ऐकू येत नाही' हे जसे थंडीबद्दल विधान केले जाते, तसेच भाषेबद्दल म्हणता येईल की, 'वापरली जाते पण दिसत नाही.' कोणत्याही वस्तूच्या वापरासाठी ती दिसली जाण्याची गरज असते, कारण जी वस्तू दिसतच नाही ती वापरावयाची कशी ? परंतु भाषा ही गोष्ट अशी आहे की जी वापरता येते पण पाहता येत नाही. अर्थात भाषेच्या बाबतीत ती पाहता येत नाही, असे म्हणणे मर्यादित अर्थाने खरे ठरेल, कारण भाषा ज्या अर्थी लिहिता येते त्या अर्थी ती पाहता आलीच पाहिजे. म्हणून 'भाषा' म्हणजे काय हे सांगताना आपण अडचणीतच येतो; कारण आपण जेव्हा भाषा वापरतो तेव्हा ती ऐकता येत नाही. आणि भाषेच्या अस्तित्वाला तर ती 'ऐकणे' ही क्रिया अत्यंत आवश्यक आहे. भाषा बोलली जाते आणि ऐकली जाते. भाषा लिहिली जाते आणि वाचली जाते, भाषा तोंडाने वाचली जाते तेव्हा ऐकली जाऊ शकते, भाषा हाताने लिहिली जाऊ शकते तेव्हा डोळयांनी वाचलीही जाऊ शकते. भाषा डोळयांनी वाचली जाऊ शकते तेव्हा कानांनी ऐकली जाऊ शकत नाही. यावरून असे दिसेल की भाषा वापरली जात असताना डोळे, कान, तोंड व लेखनकला या सर्वांचाच आवश्यकतेनुसार उपयोग होतो. असा उपयोग झाल्यानेच भाषेचे अस्तित्व जाणवते. शाळेत पुस्तकात शिकेपर्यंत किंवा नाक तोंड एकदम दाबून बंद केल्याने नाकात काहीतरी विशिष्ट भावना जाणवेपर्यंत हवेचे अस्तित्व जाणवतच नाही. हवा हलली की मग त्याला 'वारा' म्हटलें जाते व वाऱ्याच्या अस्तित्वाने हवेचे अस्तित्व जाणवते, नाहीतर हवेचे अस्तित्व कळून येत नाही. तसेच काहीसे भाषेचे आहे. भाषेच्या वापरामुळे भाषेचे अस्तित्व जाणवते, नाहीतर 'सुसंघटित समाजाला भाषा ही लागतेच' ही गोष्ट समजूनही येत नाही; किंवा 'भाषा म्हणजे काय' असा प्रश्नही मनात उद्‌भवत नाही; आणि जेव्हा 'भाषा म्हणजे काय' या प्रश्नाच्या शोधात आपण विचार करू लागतो तेव्हा आपल्याला सर्वस्वी अनपेक्षित अशा गोष्टींचे ज्ञान होऊ लागते किंवा कित्येक मनोरंजक गोष्टीही दिसून येऊ लागतात.

१.१. (ब) भाषेचे सादप्रतिसादात्मक अस्तित्व :

एखाद्या खाद्यपदार्थाच्या जवळून चाललेल्या चार दोन मुंग्यांना त्याचे अस्तित्व समजते. त्यांतली एक मुंगी दुसरीच्या जवळ जाते. दुसरी तिसरीच्या जवळ जाते. काही वेळाने पाहावे तर मुंग्यांची भली मोठी रांग त्या पदार्थाच्या जवळून येताजाताना दिसते. काही मुंग्या त्या पदार्थाच्या दिशेने येणाऱ्या व काही पदार्थाच्या विरुद्ध दिशेने जाणाऱ्या मुंग्यांच्या जगांत भाषेवाचून हे कसें शक्य होत असेल ?

झाडावर चार दोन साळुंक्या असतात. आपापल्या कामात त्या गर्क असतात. झाडाखालून एखादे मांजर दबकत जाताना त्यांतील एखादीला दिसते. ती विशिष्ट सुरात ओरडते. लगेच बाकीच्या ओरडू लागतात. काही वेळाने ही बडबड थांबते. पहिल्या साळुंकीच्या ओरडण्याला विशिष्ट अर्थ नसेल तर बाकीच्या साळुंक्यांनी प्रतिक्रिया कशावर दाखविली असणार ?

बाहेरून परका मनुष्य घरात येऊ पाहातो, कुत्रा जोरात भुंकतो. मालक बाहेर येतो. कुत्र्याला गप्प बसायला सांगतो. तो काही वेळ गुरगुरत बसतो. मालक पाहुण्याला घरात घेतो. कुत्र्याची गुरगुर थांबते. मालक व कुत्रा यातील संवाद पूर्ण झालेला असतो.

मुंग्यांच्या जगातील मानवी कानांना ऐकू न आलेली भाषा; साळुंक्यांच्या जगातील मानवी कानांनी ऐकलेली, मानवाला काहीशी समजलेली पण ज्यात मानव केवळ (साळुंक्यांना न दिसणारा) प्रेक्षक असलेली व साळुंक्यांशी संवाद साधत नसलेली अशी भाषा; आणि मानव व कुत्रा यांनी दोघांनीही बोललेली पण समान स्वरूप नसलेली भाषा, ही सर्व भाषेचीच भिन्न भिन्न स्वरूपे आहेत. त्या सर्व स्वरूपांचा, मानवी जीवनाच्या संदर्भात विचार करताना, वापर फारच थोड्या प्रमाणात होतो असे दिसून येईल.

एका माणसाचा दुसऱ्या माणसाशी संपर्क येतो तेव्हा भाषेचा वापर होण्याची शक्यता प्रामुख्याने निर्माण होत असते. मानवसमाज सुसंघटित होण्यासाठी त्या समाजातील सर्व माणसांची भाषा परस्परांना समजेल अशी असावी लागते. दोन माणसांमधील ही भाषा खाणाखुणा, इतर काही शारीरिक हालचाली इशारेदर्शक वस्तू, इत्यादींवर आधारलेली सुद्धा असू शकते.

कवी कालिदासाने आपल्या रघुवंशात अज-इंदुमती स्वयंवराचे वर्णन केले आहे. हातात वरमाला घेऊन इंदुमतीने स्वयंवर मंडपात प्रवेश केला त्या वेळी विविध राजांनी विविध शृंगारचेष्टा केल्या. कोणी कमलपुष्प दोन हातांत धरून फिरविले तर कोणी खांद्यावरून घसरून केयूररत्नांत अडकलेले वस्त्र ठाकठीक केले, तर कोणी पादपीठावर पायाने काहीतरी लिहिले. प्रत्येक राजाचा अभिप्राय ' शृंगार-सुख ' सूचित करावयाचा होता; परंतु इंदुमतीला मात्र तो ' कापुरुषा 'सारखा वाटला, राजांचा हेतू साध्य झाला नाही. याचे कारण त्या राजांनी आपला जो अभिप्राय सूचित केला तो त्याच अर्थाने

इंदुमतीने स्वीकारला नाही. एकाच प्रकारच्या शारीरिक हालचालीचे दोन भिन्न अर्थ निघू शकले म्हणून ती विशिष्ट राजा व इंदुमती यांच्यामध्ये संवाद साधू शकली नाही, राजांची भाषा इंदुमतीच्या भाषेपेक्षा भिन्न राहिली. एकाने व्यक्त केलेली भाषा दुसऱ्याला समजली तरच त्या दोन व्यक्तींमध्ये 'संवाद' साधला जातो किंवा त्या व्यक्तीने व्यक्त केलेल्या भावनेला, विचाराला, सादाला अपेक्षित किंवा प्रतिक्रियास्वरूप काहीतरी प्रतिसाद येऊ शकतो. या सादप्रतिसादासाठी काही उभयमान्य संकेतांची आवश्यकता असते. असे उभयमान्य संकेत म्हणजे एका प्रकारची 'भाषा'च होय.

काव्यप्रकाशाच्या १० व्या उल्लासात 'सूक्ष्म' अलंकाराचे उदाहरण दिलेले आहे – आपल्या प्रियकराला संकेतकाल जाणून घ्यायचा आहे हे लक्षात घेऊन, त्या तरुणीने हातातील लीलापद्म मिटले व कमळे ज्या वेळी मिटतात ती वेळ आपल्या भेटीसाठी सुचविली. प्रियकर-प्रेयसीमध्ये झालेला हा संवाद निःशब्द आहे. प्रियकराचे हास्य, डोळे पाहून, त्याचे मन ओळखून तिने उत्तर दिले आहे. या सर्व शारीरिक हालचालीत एक प्रकारचा साद-प्रतिसाद आहे.

अज-इंदुमती संवादात इंदुमतीने संकेतांचा वेगळा अर्थ काढल्याने संकेत करणाऱ्या राजाला अपेक्षित उत्तर मिळालेले नाही तर प्रियकर-प्रेयसी संवादात प्रियकराला, अभिप्रेत अर्थ त्याच्या संकेतातून प्रेयसीने जाणल्याने अपेक्षित उत्तर दिले आहे. कोणत्याही दोन व्यक्तींमधील संकेतांचे अर्थ समान असतील तेव्हाच त्या दोन व्यक्ती वैचारिक किंवा भावनिक संपर्क साधू शकतात. हे संकेत ज्या वेळी शारीरिक हालचालींनी दाखवून दिलेल्या खाणाखुणांवर आधारलेले असतील तेव्हा त्या व्यक्तींमधील भाषेला 'खाणाखुणांची भाषा' असे म्हणता येईल.

काही वेळा या खाणाखुणांच्या भाषेत दोन व्यक्तींच्यामध्ये आणखी तिसरी सहाय्यभूत वस्तू, मानवतेवर गोष्ट, मध्यस्थी करीत असते. गार्डाने हिरवा कंदिल दाखविला की गाडी चालू करावयाची व तांबडा असताना बंद ठेवायची ही गार्ड व ड्रायव्हर यांच्यामध्ये दिव्याच्या मदतीने झालेली भाषिक देवाणघेवाण होय. वाहने चालविणारांसाठी रस्त्यांवर केलेले बाण, वक्ररेषा इत्यादी खुणा म्हणजे दळणवळण खात्याने वाहनचालकांशी केलेला भाषिक व्यवहार होय. दैनंदिन जीवनात अशा तऱ्हेच्या अनेक भाषांशी मनुष्याचा संबंध येत असला तरी मनुष्याचे जीवन व्यापणारी, रूढ अर्थाने समजली जाणारी भाषा या सर्वांहून वेगळी असते.

१.१. (क) भाषा : समाजजीवनाचे प्रमुख अंग :

डोळ्यांना दिसणारी पण कानांना ऐकू न येणारी मुंग्यांच्या भाषेसारखी भाषा, कानांना ऐकू येणारी पण 'संवाद' साधीत नसलेली साळुंक्यांच्या भाषेसारखी भाषा, माणसांना समजणारी परंतु मनुष्य स्वतः वापरीत नसलेली कुत्र्यांसारख्या पाळीव प्राण्यांची भाषा यांची आवश्यकता सर्वसाधारण मनुष्याच्या जीवनात, तो समाजाचा

घटक म्हणून जगत असताना फारच अल्प असते. त्यापेक्षा जास्त शारीरिक हावभाव किंवा अंगविक्षेप यांनी व्यक्त होणाऱ्या भाषेची आवश्यकता असते; त्याहीपेक्षा जास्त लाल-हिरवे दिवे, विविध प्रकारचे झेंडे, विविध आकारांच्या किंवा रंगांच्या खुणा यांसारख्या माध्यमांतून सूचित केलेल्या 'इशारा' भाषेची असते पण या सर्व प्रकारच्या भाषा एकत्र केल्या तरीही त्यांनी माणसाचे समाजजीवन फारच थोड्या प्रमाणात व्यापले जाते. माणसाच्या समाजजीवनास कारणीभूत होणारा, समाज व माणूस यांच्या-मध्ये अतूट संबंध जोडणारा असा जो 'भाषा' या नावाचा घटक आहे तो वरील सर्व भाषांहून बराचसा भिन्न आहे. इशारा भाषेत किंवा हावभाव भाषेत माणसाच्या मनातील विचार किंवा भावना यांच्या अभिव्यक्तीचे कार्य मनुष्य बोलत असलेल्या भाषेच्या अभिव्यक्तीच्या कार्याप्रमाणे काहीसे असल्याने वरील विधानात 'बराचसा भिन्न घटक' अशी शब्दयोजना करावी लागते, नाहीतर केवळ 'भिन्न' शब्दाने कार्यभाग झाला असता. मानवसमाजाच्या समाजजीवनाच्या अस्तित्वासाठी, स्थैर्यासाठी व अभिवृद्धीसाठी त्या विशिष्ट समाजाच्या मानवांमध्ये परस्परसंबंधांबद्दलच्या निश्चित भूमिका, परस्पर अस्तित्वासंबंधीची सहनशीलता, यांसारख्या विविध मूलभूत घटक-तत्त्वांप्रमाणे 'भाषा' हे परस्परांत सामाजिक व्यवहार शक्य करणारे विनिमयाचे घटकभूत अंग आहे. भाषा या समाजाच्या अस्तित्वासाठी आवश्यक अशा, मूलभूत अंगाची व्याख्या करणे कठीण असले तरी तिचे स्वरूप सांगणे शक्य आहे. भाषा ही विशिष्ट समाजासाठी, विशिष्ट संकेतांवर आधारलेली, विशिष्ट ध्वनींनी बनलेली सामाजिक संस्था आहे. या संस्थेचे काही मूलभूत घटक असून त्या घटकांच्या जडणघडणीचे त्या विशिष्ट समाजाला मान्य असे विशिष्ट संकेत असतात. या विशिष्ट संकेततत्त्वांच्या आधारावर भाषेचे अस्तित्व व भाषेचा वापर अवलंबून असतो.

१.२. भाषेची काही वैशिष्ट्ये

१.२. (अ) जन्मसिद्ध नसूनही तशी वाटते :

दैनंदिन जीवनात भाषेचा वापर आपण इतका करीत असतो, पण क्षणभर थांबून 'भाषा' म्हणजे काय, याचा विचार करावा असे मनातच येत नाही. 'हसणे' म्हणजे काय, 'चालणे' म्हणजे काय किंवा 'रडणे' म्हणजे काय याचा जसा विचार केला जात नाही, तसाच 'बोलणे' किंवा 'भाषा' म्हणजे काय याचा विचार होत नाही. जन्मलेल्या मुलाला रडणे, हसणे इत्यादी क्रिया जशा प्राप्त होतात तशीच 'भाषा बोलणे' ही क्रिया सहजपणे हळूहळू प्राप्त होते असे आपणाला वाटते. परंतु मूल भाषा कशी शिकते याकडे बारकाईने पाहिल्यास 'भाषा जन्मतः प्राप्त होते' ही आपली कल्पना चुकीची आहे हे कळून येईल. समाजापासून अलिप्त ठेवल्या गेलेल्या किंवा भिन्न समाजात वाढवल्या गेलेल्या मुलाला त्याच्या समाजाची भाषा बोलता येणार नाही. मुलाला मुद्दाम शिकवले नाही तरी त्याच्या नैसर्गिक प्रेरणांनी ते यथायोग्य काळी चालू

शकते. आपल्या नैसर्गिक प्रेरणांमुळे मुलाला आवाज काढता आले तरी तेवढ्या आधारावर ते बोलायला शिकू शकणार नाही. त्याला त्याच्या समाजाची मदत न कळत मिळतच असते. अवलोकनासाठी व चुकीचा वापर दुरुस्त करण्यासाठी मूल समाजाचा आधार घेत असते. परंतु मूल किंवा त्याचा समाज ही गोष्ट जाणीवपूर्वक करीत नसल्याने मुलाने न कळत्या वयात भाषा शिकली की ती जन्मसिद्ध वाटते; मुलाला जसे चालायला येते तसेच त्याला बोलायला येते असे वाटते. भाषा म्हणजे केवळ तोंडाने विविध आवाज काढणे नव्हे; तसे असते तर विविध पशु-पक्ष्यांच्या समाजाप्रमाणे सर्व मानवसमाजाची भाषा एक आणि एकच राहिली असती.

१.२. (ब) भाषा – प्रयत्नसाध्य :

प्रथम मूल तोंडाने काही उच्चार करते व नंतर हळूहळू ते उच्चार व विविध वस्तू किंवा क्रिया यांची सांगड घालू लागते, त्याच वेळी आपले बोलणे दुसऱ्याला समजावे यासाठी धडपडत असते. त्याच्या स्वतःच्या गरजा भागविण्यासाठी त्याला हे प्रयत्न करावेच लागतात. समजा मुलाला पाणी हवे असेल, व ते मिळविण्यासाठी मूल तोंडाने जो उच्चार करीत असेल त्या उच्चाराच्या योगाने जर त्याला पाणी मिळाले नाही, तर दुसऱ्या व्यक्तीपर्यंत पोचून त्याला पाण्यापर्यंत ओढत नेणे, हाताने भांडे दाखविणे वगैरे प्रयत्नांच्या खाणाखुणा त्याला वापराव्या लागतात. अर्थातच स्वतःला पाणी पाहिजे असेल तर ' पाणी ' हा अर्थ व्यक्त करणारा, दुसऱ्याला कळेल असा उच्चार करणे शक्य होईपर्यंत मुलाला प्रयत्न सोडून चालणार नसते. याचाच अर्थ ' पाणी ' हा शब्द उच्चारता येणे ही पाणी प्राप्त करून घेण्यासाठींची त्याची ' गरज ' असते. जशा मुलाच्या गरजा वाढत जातात तशी तशी त्याची भाषेची कमाई वाढत जाते. मूल समाजात जितके अधिकाधिक वावरत जाते किंवा ज्या ज्या क्षेत्रात वावरत राहते तशी तशी भाषा अधिकाधिक जाणण्याची किंवा वापरण्याची त्याची गरज निर्माण होते, तसेच स्वतःच्या गरजेप्रमाणे त्याची भाषेची कमाई वाढत्या प्रमाणात असते. ज्या समाजात मूल जन्मले त्या समाजाचा ' घटक ' म्हणून जगण्यासाठी त्या समाजाची विशिष्ट तशी किमान आचारप्रणाली जशी मुलाला आत्मसात करावी लागते तशीच त्या समाजाची भाषाही आत्मसात करावी लागते. भाषा मुलाला फार लहान वयात शिकता येत असल्याने ती जन्मसिद्ध वाटते, तशीच ती नित्याच्या वापरामुळे मनुष्याच्या अवयवाप्रमाणे अंगभूतही होऊन बसते. भाषेच्या या वैशिष्ट्याचा उपयोग करून घेऊन नाना फडणीसांसारखे चतुर मुत्सद्दी तोतया सदाशिवराव शोधण्यासाठी झोपलेल्या पाहुण्यावर पाणी शिंपडून त्याच्या तोंडून बाहेर पडलेल्या पहिल्या उद्‌गारावर त्याचे तोतयेपण तपासून पाहू शकतात.

१.२. (क) भाषेला इतिहास असतो :

मूल आपली भाषा आपल्या समाजाकडून शिकत असते; त्या समाजाला ती भाषा

परंपरेने प्राप्त झालेली असते. भाषा ही एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे संक्रांत होत राहते. मानवी जीवनाच्या इतिहासात जेव्हा जेव्हा समाज 'बांधला' गेला तेव्हापासूनच आचारविचारादिकांच्या कित्येक तंतूंच्या बरोबरच तो भाषाविषयक संकेतांच्या तंतूंनी बांधला गेला आहे. त्या वेळेपासून समाज जसजसा उत्क्रांत होत गेला तसतसे भाषाविषयक संकेतांचे तंतूही दृढमूल झाले. प्रत्येक समाजाच्या संस्कृतीबरोबरच त्या समाजाची भाषाही गतिमान राहिली, मागील पिढीकडून पुढील पिढीकडे जात राहिली. समाजाच्या इतर अंगांत जसे अनेकविध बदल होत राहिले, तसेच समाजाच्या 'भाषा' या अंगातही होत राहिले. समाजाबरोबरच, म्हणजेच काळाच्या ओघाबरोबर भाषेलाही इतिहास प्राप्त झाला. हा इतिहास एकाच समाजाच्या भाषेच्या भिन्न अशा लिखित स्वरूपामुळे किंवा, दोन अथवा अधिक समाजाच्या भाषांच्या तुलनात्मक अभ्यासामुळे बराचसा स्पष्टपणे समजावून घेणे शक्य असते. अशा प्रकारच्या भाषाभ्यासामुळे समाजाच्या इतिहासातील अनेक गोष्टींवर प्रकाश पडू शकतो. तसेच एकाच समाजाच्या दोन भिन्न कालखंडांत वापरल्या जाणाऱ्या भाषेतील साम्य, विरोध, परिवर्तन इत्यादींच्या अभ्यासामुळे विशिष्ट भाषेचा इतिहास किंवा भाषांची परिवर्तनशीलता, भाषांचा तुलनात्मक अभ्यास, किंवा भिन्न भाषांचा वंशदृष्ट्या अभ्यास, यासारख्या विविध विषयांचा अभ्यास करणे शक्य होते.

१.२. (ड) भाषेची परिवर्तनशीलता :

समाजव्यवहाराचे, मानवाच्या हातातले साधन म्हणजे 'भाषा'. हे साधन त्याने कितीही काळजीपूर्वक वापरले तरी परिवर्तनशीलतेच्या निसर्गनियमापासून भाषा दूर राहू शकत नाही. वेदांसारख्या अपौरुषेय ग्रंथांच्या उच्चारांबाबत काटेकोर पालन केले असूनही वेदपठणाच्या पद्धतीनुसार ऐतरेय, शाकल, बाष्कल इत्यादी विविध शाखा अस्तित्वात आल्याच. 'ऋषि' हा त्या काळातील एक सर्वसाधारण शब्द आजच्या काळात 'ऋषि, ऋषी, रिषी, रिशी, रुशी, रुषी' वगैरे भिन्न प्रकारांनी उच्चारला जात असलेला आढळून येतो. किंवा 'ध्वजदंड', 'कालपक्ष' हे शब्द असे बदलतात की 'झेंडा' व 'काळोख' या शब्दांचे मूळ अनुक्रमे 'ध्वजदंड' व कालपक्ष'[1] आहे असे सांगितले तर विश्वास बसू नये, मुळातच भाषा ध्वनींनी बनलेली असते; व ध्वनी हे हवेत विरणारे असतात. त्यामुळे एकदा 'बोलला' गेलेला उच्चार दुसऱ्या वेळी जसाच्या तसा उच्चारला गेला की नाही हे तपासून पाहणे शक्य नसते. शिवाय उच्चारणात होणाऱ्या थोड्याशा बदलामुळे भाषिक व्यवहार अशक्य होणार नसला तर माणसाला काटेकोर राहण्याचे कारण पडत नाही. भाषेच्या या विशिष्ट लवचिकपणामुळेच भाषिक परिवर्तन घडत राहाते. 'तू काम करू नये हे चांगले' आणि 'तू काम करून ये हे चांगले' या

---

१. ध्वनिविचार–कालेलकर, पृ. ९७.

दोन वाक्यांच्या उच्चारणात साम्य राहिले तर अपेक्षित अर्थ व्यक्त होणार नाही, अशा वेळी मनुष्य काळजीपूर्वक उच्चार केल्याशिवाय राहणार नाही. परंतु 'मी जाणार आहे,' 'मी जाणाराए', किंवा 'मी जाणारे' यांपैकी काहीही बोलले तरी जर अभिप्रेत अर्थ व्यक्त होणार असेल तर वरील तिन्हीपैकी कोणतेही वाक्य उच्चारले जाईल व काटे-कोरपणे उच्चारण केले जाणार नाही. भाषा हे माणसाच्या हातातील साधन आहे, साधनाचा वापर ज्या साध्यासाठी करावयाचा ते साध्य प्राप्त करून घेण्यासाठी साधनाचा वापर काळजीपूर्वक न करता काम होणे जेव्हा शक्य असते तेव्हा साधनाच्या वापरात ढिलाई आपोआप येते. याचा परिणाम भाषेच्या जीवनावर खोलवर उठलेला दिसून येतो. आजची काही लहान मुले मराठी 'फ' चा उच्चार घर्षक स्वरूपाचा करताना आढळून येत आहेत, तर कित्येक प्रौढांच्या तोंडी 'फ' चे उच्चारण स्पष्ट आहे. या दोन प्रकारच्या उच्चारणामुळे 'फार' व 'फूल' यांसारख्या शब्दांच्या वापरात अर्थ-ग्रहणाच्या दृष्टीने गोंधळ आढळून येत नाही. परिणामतः 'फ' चा स्पष्ट उच्चार करणारी पिढी अस्तंगत झाल्यावर 'फ' चे उच्चारण सरसकट घर्षक अस्तित्वात येण्याची शक्यता नाकारताही येत नाही. अशा प्रकारचे उच्चारातले किंवा इतरही अनेक परिणाम भाषेच्या लवचिकपणामुळे दूरगामी होताना दिसतात. परंतु हे परिवर्तन इतके संथ व इतके न कळत होते की या परिवर्तनाची जाणीव बऱ्याच कालपर्यंत होऊही शकत नाही.

१.२. (इ) भाषेची स्थिरता :

लवचिकपणा हा जसा भाषेचा एक विशेष आहे तसाच स्थिरता किंवा चिवटपणा हाही विशेष गुण आहे. ती कोणा एका व्यक्तीच्या लहरीनुसार राबवली जात नसते, तर अनेक व्यक्तींच्या समान मान्यतेमुळे अस्तित्वात आलेली असते. या कारणाने भाषे-तील कोणताही नवीन बदल दृढमूल होईपर्यंत भाषा आपल्या सर्वसाधारण रूपाने वापरली जाताना दिसते. एके काळी लिखित भाषेत 'तिने काम केले' अशा रचनेला मान्यता होती. आज 'तिनं काम केलं', 'तिनी काम केलं' व 'तिने काम केलं' याही वाक्यरचना मान्यता मिळवण्याच्या स्थितीत दिसत आहेत. तरीही अनेक व्यक्तींशी संपर्क साधावयाचा असेल तर 'तिनें काम केलें' किंवा 'तिने काम केले' ही वाक्य-रचना अधिक मान्यता मिळवून जाते. अशा गोष्टींमागे भाषेचा चिवटपणा हे एक कारण असते. भाषेमध्ये दृढमूल झालेला 'वायसर' सारखा परभाषेतील 'अशुद्ध' शब्द बदलून त्याजागी त्या भाषेप्रमाणे असलेला मूळ 'शुद्ध' शब्द 'वॉशर' हा वापरावयाचे ठरविले तर स्टो-दुरुस्तीच्या दुकानात, दुरुस्तीचे काम करणाऱ्याला आपले म्हणणे कळविण्यात अडचण आल्यावाचून राहणार नाही. यामुळे इंग्रजी जाणणाऱ्या व्यक्तीला 'वायसर' हे 'वॉशर' या शब्दाचे अपभ्रष्ट रूप आहे हे कळले तरी तो अपभ्रष्टपणा दूर करता येत नाही, याला कारण भाषेचा विशिष्ट चिवटपणा. भाषेच्या अशा प्रकारच्या

चिवटपणाचे मूळ भाषेच्या प्रवाहपतितपणात अहे, ती अजाणता आत्मसात केली जाण्यात आहे, तसेच तिच्या ' साधनस्वरूप ' असण्यात आहे.

१.२. (फ) भाषा – ध्वनींनी बनलेली :

भाषेच्या स्वरूपाचा विचार करू लागल्यास ती ध्वनींनी बनलेली आहे असे दिसून येईल. हे ध्वनी म्हणजे विशिष्ट प्रकारची हवा. श्वासावाटे बाहेर पडणाऱ्या हवेला विशिष्ट आकार देऊन ती तोंडावाटे बाहेर टाकली की ध्वनींची निर्मिती होते. हवेला विशिष्ट आकार देऊन विशिष्ट पद्धतीने तोंडावाटे व जरूर पडल्यास थोडासा नाकाचा वापर करून बाहेर टाकल्याने निर्माण होणारे ध्वनी भाषासापेक्ष असतात. हे ध्वनी म्हणजे कर्णेन्द्रियांवर विशिष्ट प्रकारची संवेदना घडविणाऱ्या वायुलहरी.[१] अनेक प्रकारच्या वायुलहरी कर्णेन्द्रियांवर आघात करणाऱ्या असल्या तरी त्यांना भाषेच्या अंगभूत ध्वनिस्वरूप वायुलहरी असण्यासाठी, आपले मनोगत व्यक्त करण्याच्या हेतूने माणसाच्या तोंडातून बाहेर पडलेल्या ध्वनिलहरी असावे लागते. तसेच माणसाने तोंडाने बाहेर टाकलेल्या कोणत्याही प्रकारच्या ध्वनिलहरींच्या योगाने ' भाषा ' निर्माण होत नाही, अर्थातच ती ऐकलीही जात नाही. ज्याच्या कानांवर या ध्वनिलहरी येतील त्याला त्या आकलन व्हाव्या लागतात. ज्याला इंग्रजी येत नाही अशा व्यक्तीसमोर इंग्रजी बोलले गेले तर ध्वनींची जी निर्मिती होईल ती ऐकणाऱ्याच्या दृष्टीने ' भाषा ' नसते, तो केवळ गोंगाट असतो. दुसरा काही बोलत आहे या कल्पनेने ऐकणारा, ' तुमची भाषा मला समजत नाही ' असे म्हणू शकतो. मनुष्य समोर नसेल व त्या ध्वनिनिर्मितीत काही पद्धती जाणवत नसेल तर त्या ध्वनिनिर्मितीला, ती ऐकणारा ' न समजणारी भाषा ' असे म्हणण्याऐवजी ' गोंगाट ' म्हणण्याची शक्यता असते. ऐकणाऱ्याच्या दृष्टीने आकलना-अभावी तो गोंगाटच असतो. भाषेच्या ध्वनिस्वरूप असण्यामुळे भाषेला पकडून ठेवणे कठीण असते; तरीही हवेच्या माध्यमात न पकडता मनुष्याने प्रयत्नपूर्वक भाषेला पकडून ठेवल्याचे काही भाषांच्या बाबतीत आढळून येते.

१.२. (ग) भाषा – लिखित, नोंदलेली :

लेखनपद्धती अस्तित्वात आल्यानंतर पूर्वीच्या काळापासून भाषेला विशिष्ट प्रकारे व विशिष्ट प्रमाणात पकडून ठेवणे शक्य झाले आहे. लेखनपद्धतीच्या जोडीने आज विविध शास्त्रीय शोधांच्या साहाय्याने प्रचलित भाषा पकडून ठेवणे शक्य झाले आहे. टेपरेकॉर्डिंग, आकाशवाणीसाठी करण्यात येणारे किंवा फोनोग्रॅमसाठी करण्यात येणारे रेकॉर्डिंग वगैरेंची उदाहरणे, भाषा बंदिस्त करणारी साधने म्हणून देता येतील. लेखनपद्धतीमुळे भाषा डोळयांनी वाचावयाची, जाणावयाची असते, तर ' नोंद ' पद्धतीने बंदिस्त

---

१. ध्वनिविचार – कालेलकर, पृ. १०

केलेली भाषा पुन्हा ध्वनिलहरीत परावर्तित करून ऐकावयाची असते. लिखित भाषा ही भाषेचा चिवटपणा, स्थिरपणा वाढविण्यास मदत करतें तर नोंदलेली भाषा भाषेचे उच्चारण दाखवू शकते.

वास्तविक ' भाषा ' म्हणजे ' बोलली गेलेली ', परंतु जेथे 'बोलणे' पोचू शकत नाही किंवा जेथे बोलणे पकडून ठेवण्याची गरज निर्माण होते तेथे बोलली जाणाऱ्या, बोललेल्या किंवा बोलली जाऊ शकणाऱ्या भाषेला, तिच्या क्षणभंगुरत्वापासून वाचविण्यासाठी काही सुसंवाद राखणारे स्वरूप दिले जाते. हे रूप जेव्हा अक्षरांनी युक्त असते, जेव्हा डोळ्यांनी वाचावयाचे असते (आंधळ्यांसाठी योजलेल्या स्पर्शलिपीतील लेखनासारखे लेखन वगळता), तेव्हा ती लिखित भाषा होते. प्रत्यक्ष ध्वनीखेरीज ध्वनींचे कार्य करणारी, अक्षरांनी युक्त अशी, मूलतः श्रवणगम्य नसलेली अशी ही भाषा म्हणजे लिखित भाषा होय.

१.३. भाषा : दळणवळणाचे एक साधन

१.३. (अ) दळणवळणाला आवश्यक सहा गोष्टी :

मानवी जीवनात दळणवळणाला फार महत्त्व आहे. दळणवळणामध्ये विशिष्ट गती अभिप्रेत असते. एका बिंदूपासून एक गती चालू होते, ती दुसऱ्या गतीला प्रवृत्त करते. ही दुसरी गती तिसऱ्या गतीला प्रवृत्त करील किंवा आपल्या निर्मितिस्थानाशी परत येईल; किंवा एकाच वेळी एका गतीतून दुसरी एक गती निर्माण होऊन दुसरीकडे जाईल व मूळ गती स्वस्थानी येईल अशीही दुहेरी क्रिया होऊ शकेल.

एका आगगाडीचे दुसऱ्या स्टेशनकडे चालविले जाणे, तेथून गाडीचे काही डबे दुसऱ्या आगगाडीला जोडले जाणे, उरलेल्या डब्यांनिशी गाडी इच्छित ठिकाणी नेली जाणे आणि तेथून पूर्व-ठिकाणी आगगाडी परत आणली जाणे, हे सर्व आगगाडी या वाहनाचे मानवाने केलेले एक प्रकारचे दळणवळण होय.

एका व्यक्तीने काही संदेश विद्युतद्वारा पाठविणे, त्या संदेशाचे विद्युतद्वारा अथवा पत्राने संदेश देणाऱ्याला उत्तर येणे किंवा संदेश घेणाऱ्या व्यक्तीवर आलेल्या संदेशाचा परिणाम घडणे हेही एक प्रकारचे दळणवळणच.

कोणत्याही दळणवळणासाठी सहा गोष्टींची आवश्यकता असते :[1]

(१) खिळेपाट (A code)– दळणवळणासाठी विशिष्ट खुणांचे ' खिळे ' असावे लागतात. हे खिळे व त्यांनी व्यक्त करावयाचा अर्थ यातील संकेत सुविहित असायला पाहिजेत.

(२) सरणी (A channel)– दळणवळणासाठी वापरात आणावयाच्या

१. An Introduction to Descriptive Linguistics-Gleason; p. 267.

खिळयांचा उपयोग करून विशिष्ट अर्थ प्रसारित करण्यासाठी सुनिश्चित अशी ‘ सरणी ’ असावी लागते.

(३) खिळे-जोडणी-पद्धती (The Process of encoding)– खिळेपाटामधील खिळयांची निवड करून ते वापरण्याच्या ‘ सरणीने ’ त्यांची योग्य ती रचना करण्याची पद्धती उपलब्ध असावी लागते.

(४) खिळे जोडणीकार (An encoder)– खिळे जोडणी पद्धतीनुसार जोडणी करणारी व्यक्ती, यंत्र किंवा विशिष्ट युक्ती असावी लागते.

(५) खिळे तोडणी पद्धती (The process of encoding)–खिळे जोडणीकाराने दिलेला मजकूर समजण्यासाठी खिळे-तोडणी-पद्धती अस्तित्वात असावी लागते.

(६) खिळे तोडणीकार (A decoder)– खिळे जोडणीकाराने पाठविलेला मजकूर खिळे तोडणी पद्धतीनुसार सोडवून देणारी व्यक्ती, यंत्र किंवा युक्ती असावी लागते.

आपल्या मनात साकार झालेले चित्र रेखाचित्राद्वारे व्यक्त करावयाचे असेल तर, रेघांचे विविध आकार व त्या आकारातून व्यक्त होणारे चित्रकाराशी संबंधित असे अर्थ यांचा ‘ मूळ रेखापट ’ अस्तित्वात पाहिजे. या रेखापटातून कोणाची निवड व का याची माहिती देणारी ‘ सरणी ’ पाहिजे. या सरणीनुसार निवड केलेल्या रेखाघटकांचा वापर करण्याची पद्धती अस्तित्वात पाहिजे. त्या पद्धतीच्या ज्ञानाचा वापर करणारा चित्रकार पाहिजे. चित्रकाराने तयार केलेले चित्र रसिकाकडे पाठविले गेले पाहिजे. त्या रसिकाला रेषा व त्यांचे अर्थ आणि त्यांचा मेळ घालण्याची पद्धती यांचे ज्ञान पाहिजे व ते ज्ञान वापरून रसिकाने चित्र जाणले पाहिजे. या सर्व गोष्टी होतील तेव्हा एका रेखाचित्राचे दळणवळण झाले असे म्हणता येईल. चित्रकाराकडून रसिकाकडे चित्र गेले ही एक गती, रसिकाने ते जाणले ही दुसरी गती, रसिकाने त्या चित्रावरचा अभिप्राय चित्रकाराला दिला तर ती दुसऱ्या गतीतून निर्माण झालेली तिसरी गती, त्याने ते आणखी कोणाला पाहायला दिले तर तीही एक गतीच.

भाषेचे कार्य अशाच प्रकारच्या गती असणाऱ्या दळणवळणाचे आहे. एक व्यक्ती बोलते, दुसरी ते ऐकते व ऐकल्यावर ऐकणाऱ्या व्यक्तीची प्रतिक्रिया होते. या सर्व गोष्टी घडणे म्हणजे भाषेचे दळणवळण होय.

१.३ (ब) भाषेचे दळणवळण :

भाषेच्या माध्यमातून दोन व्यक्तींमध्ये जे दळणवळण चालते त्याला ‘ भाषिक दळणवळण ’ म्हणू. ‘ न मन्दोऽपि कारणाद्विना प्रवर्तते ’ या न्यायाप्रमाणे भाषिक दळणवळणही काही हेतूने होत असते. हा हेतू प्रामुख्याने आत्मप्रकटीकरण (Self-expression)[१]

---

१. मराठी भाषा, उद्‌गम आणि विकास–कुलकर्णी, पृ. २.

व आत्मनिवेदन (Self-communication) असा दुहेरी असतो. आपली नित्याची गरज भागविण्यासाठी दुसऱ्या माणसाशी संपर्क साधताना भाषा हे साधन जसें वापरले जाते तसेच ते स्वतःच्या भावनांचे किंवा विचारांचे प्रकटीकरण करण्यासाठीही वापरले जाते. शिवाय विचार करणे या क्रियेलाही भाषा मदत करीत असतेच[१]. आपल्या मनात आलेल्या भावना मनुष्य मोकळेपणाने व्यक्त करीत असतो, मग त्या स्वतःशी असोत, दुसऱ्याशी असोत, तोंडाने उच्चारलेल्या असोत किंवा अनुच्चारित असोत. स्वगत बोलण्याचा प्रकार अशाच एका मोकळ्या आत्मप्रकटीकरणातून आलेला असतो. आपले विचार किंवा भावना प्रकट अथवा अप्रकट स्वरूपात भाषेच्यामुळे विशिष्ट अस्तित्व घेत असतात.

१.३. (क) बोलभाषा, लिखित भाषा, खुणा भाषा – भाषिक दळणवळणाचे माध्यम :

भाषिक दळणवळण म्हणजे भाषेच्या माध्यमातून केलेला सामाजिक व्यवहार. भाषा ही ध्वनींची बनलेली असल्यानें भाषिक दळणवळण ध्वनींच्या स्वरूपात असणे ही गोष्ट उघड आहे. विशिष्ट ध्वनींचा विशिष्ट प्रणालीतून उपयोग करून स्वतःला अभिप्रेत गोष्ट सांगितली की भाषिक व्यवहार सुरू होतो. परंतु भाषिक दळणवळण फक्त ध्वनींच्या माध्यमाच्या मर्यादेत राहते असे नाही तर ध्वनी लिपिबद्ध करून लेखनाद्वारे हे दळणवळण फक्त साध्य करून घेता येते. भाषा जेव्हा लिपिबद्ध होते तेव्हा तिला ' लिखित भाषा ' असे म्हटले जाते, जेव्हा ती ध्वनींच्या उपयोगाने बोलली जाते तेव्हा तिला ' बोलभाषा ' म्हटले जाते, व विशिष्ट खुणांच्या वापराने दळणवळण झाल्यास ' खुणा भाषा ' वापरली गेली असे म्हणता येते.

लिखित भाषेमध्ये बोलभाषेतील ध्वनी व्यक्त करण्यासाठी ध्वनी व मुळाक्षर यांचे साहचर्य दाखविणारे संकेत असावे लागतात. या संकेतांना ' प्रामाण्य ' म्हणजे समाजातील प्रभावी व्यक्तींची मान्यता असावी लागते. हे संकेत जर परंपराप्राप्त असतील तर ते जसे असतील तसे स्वीकारावे लागतात. लिखित भाषा ही दळणवळणाचे साधन असल्याने दळणवळणाच्या गरजेनुसार मानवी स्वभावाच्या परिवर्तनशीलतेनुसार लिखित भाषेच्या संकेतात बदल पडू शकतात. हे बदल जर ' प्रामाण्य ' मिळवू शकले नाहीत तर ते लिखित भाषेत स्थिर होऊ शकत नाहीत.

बोलभाषेप्रमाणे लिखित भाषा ही परंपराप्राप्त असतेच असे नाही. बोलभाषा नसलेला समाज अस्तित्वात असणे शक्य नसले तरी लिखितभाषा नसलेला समाज अस्तित्वात असू शकतो. बोलभाषेच्या जीवनात भाषेच्या कोणत्यातरी कालखंडात तिला

१. Elements of General Linguistics–Martine (Palmer) p. 18.

लिपिबद्ध केलेले असते. लिखित भाषा हा बोलभाषेला कृत्रिमपणे बंदिस्त करण्याचा, भाषिक दळणवळणाचे क्षेत्र व कालखंड वाढविण्याचा उपाय आहे. ते मानवाने हेतुतः निर्माण केलेले साधन आहे. कोकणी[1] भाषेला स्वतःची लिपी नव्हती. ती रोमन लिपीत किंवा देवनागरी लिपीतही लिहिली गेली. कोकणी भाषेसाठी आजच्या काळात स्वतंत्र लिपी निर्माण करता येणे, ती वापरात आणणे सहज शक्य आहे. परंतु आज कोकणी समाजाची बोलभाषा कोकणी असून तिला स्वतःची लिखितभाषा नाही असे म्हणणे अगदीच चूक ठरू नये. ज्या भाषेची निर्मिती होऊन बराच कालखंड लोटलेला आहे, ज्या भाषेत बरीच वाङ्मयनिर्मिती झालेली आहे, ज्या भाषेचा 'भाषा' म्हणून अभ्यास झालेला आहे, अशा भाषेला स्वतःची लिपी बहुशः परंपराप्राप्त असते. संस्कृत-पासून प्राकृतद्वारा मराठी भाषेची निर्मिती झाल्याने संस्कृतच्या लिखित स्वरूपाची परंपरा प्राकृतद्वारा मराठीला लाभली. लिखित भाषेचा हा प्रवाह अविच्छिन्न राहिल्याने मराठी भाषेच्या निर्मितीबरोबरच मराठीची लिखित भाषा अस्तित्वात येणे अवघड झाले नाही किंवा कृत्रिम उपायांनी लिपी तयार करून ती मराठीसाठी वापरण्याची वेळ मराठी भाषिक समाजावर मराठीच्या जन्मकाळी आली नाही. कोकणी भाषिक समाजाला वाङ्मयीन परंपरेचा अविच्छिन्न धागा दाखविता आला तर, व कोकणी भाषिकांकडून लेखनासाठी देवनागरी लिपीचा स्वीकार केला गेलेला दाखविता आला तर मात्र कोकणीला देवनागरी लिपी परंपराप्राप्त होती असे विधान करता येईल.

मराठी भाषिक समाज बोलभाषा व लिखित भाषा यांच्या साहाय्याने भाषिक दळणवळण साध्य करून घेत असतो. या समाजातील काही व्यक्ती भिन्न संकेतांच्या साहाय्याने भाषिक व्यवहार साध्य करू शकतात. बॅण्डवादन पथकाच्या प्रमुखाच्या आपल्या पथकासाठी वापरात येणाऱ्या विविध हालचाली, शारीरिक कसरतींसाठी वापरात येणाऱ्या शिट्ट्या किंवा वेगवेगळ्या प्रकारचे झेंडे वगैरे गोष्टी विशिष्ट व्यक्तिसमूहात, विशिष्ट हेतूसाठी, मर्यादित क्षेत्रात खुणाभाषेचा वापर दाखवतात. खुणाभाषा हावभावयुक्त, आवाजयुक्त, जशी असू शकते तशीच ती लिखितही असू शकते. ज्याला आपण वापरलेले लेखनविषयक नियम माहीत असतील त्याच्याशीच खुणाभाषिक आपला व्यवहार करू शकेल. 'माझी शाळा' हे शब्द मा = १^1, झी = २^3, शा = ३^1, ळा = ४^1 या विशिष्ट संकेतांनी $१^1 २^3$ $३^1 ४^1$' असे लिहिता येतील. परंतु ज्याला या संकेतांचे ज्ञान नसेल त्याला ते वाचता येणार नाहीत. अर्थातच खुणाद्वारा 'माझी शाळा' हे शब्द काढू इच्छिणाऱ्या भाषिकाच्या दळणवळणाच्या व्यवहाराला मर्यादा राहातील. खुणाभाषेच्या व्यवहारात अशा प्रकारच्या मर्यादा असल्याने तो व्यवहार सर्व समाजासाठी होऊ शकत नसल्याने भाषिक दळणवळण हे बोलभाषा व लिखित भाषा यांच्याद्वारेच केले जाते असे

१. कोकणी भाषेला 'पोटभाषा' न मानता स्वतंत्र भाषा म्हणून 'सरकारी दर्जा' मिळाला असल्याने येथे कोकणीचा स्वतंत्र भाषा म्हणून उल्लेख केला आहे.

म्हणणे योग्य ठरते. खुणाभाषेचा अभ्यास हा भाषेच्या अभ्यासाचा अंतर्गत विषय होण्यापेक्षा स्वतंत्र अभ्यासाचा विषय होतो.

१.३. (ड) अभिव्यक्तीचे आकलन :

सामाजिक व्यवहारास प्रवृत्त करणारे भाषा हे साधन दैनंदिन जीवनात सतत वापरले जात असले तरी एकभाषिक समाजातील व्यक्तिव्यक्तींचे भाषेच्या अभिव्यक्तीचे आकलन भिन्न प्रमाणात असू शकते. या आकलनातील प्रमाणाच्या फरकामुळे एकाच भाषेची स्वरूपे व्यक्तिसापेक्ष भिन्न भिन्न असू शकतात.

कोणत्याही एकभाषिक समाजातील व्यक्ती जे बोलणे बोलत असतील त्या सर्व बोलण्याची बेरीज म्हणजे त्या समाजाची बोलभाषा. या समाजातील प्रभावी व्यक्तींनी मान्य केलेली, लेखनासाठी वापरात असलेली भाषा म्हणजे लिखित भाषा. एका विशिष्ट समाजाच्या भाषेची बोलभाषा किंवा लिखित भाषा जेव्हा वापरली जाते, तेव्हा व्यक्तिव्यक्तींतील विनिमयाचे वेळी होणाऱ्या अभिप्रायआकलनाच्या प्रमाणावरून भाषेची समाज किंवा भिन्न स्वरूपे आढळून येतात. ज्या दोन व्यक्तींच्या भाषेत परस्पर आकलनाचें प्रमाण सर्वांत जास्त, त्या दोघांच्या भाषेत साम्य जास्त, ज्या दोघांच्या भाषेत हे प्रमाण सर्वांत कमी असेल त्या दोघांच्या भाषेत फरक जास्त दिसून येतात. ज्यांच्या भाषेत जास्तीत जास्त साम्य असते अशा व्यक्तींच्या भाषांचा एक गट करता येतो. जेव्हा असा गट विशिष्ट नामाभिधानाने ओळखण्याइतका मोठा व वैशिष्टयपूर्ण असतो तेव्हा त्या गटातील भाषांच्या बेरजेला ‘ बोली ’ म्हणतात. व्यक्तिव्यक्तींच्या भाषातील साम्यभेदावरून असे गट पाडणे शक्य होते. रोहे या गावच्या कोळी माणसाने ‘ तू काय करतस ’ असे म्हटले तर त्याच गावच्या कोळी नसणाऱ्या माणसाला ‘ तू काय करतोस ’ असा अभिप्राय जाणून घ्यावा लागतो. उलट कोळी नसणाऱ्या माणसाने ‘ मी होडी पाहतो ’ असे उत्तर दिले तर कोळी मनुष्य ते उत्तर ‘ मी व्हरी पहातय् ’ असे जाणून घेऊ शकतो. कोळी व बिगर कोळी अशा रोहे येथील दोन व्यक्तींमध्ये वरील प्रकारे जाणून घेण्याची दुतर्फा वेळ येते तेव्हा, रोहे येथे मराठीची ‘ कोळी ’ ही एक बोली व ‘ रोहेकरी ’ ही दुसरी बोली बोलली जाते असे विधान करता येते. या, दोन्ही बोली बोलणाऱ्यांच्या भाषेमध्ये इतर ठिकाणी खूप साम्य असल्याने, ‘ बोली ’ वेगळ्या असल्या तरी रोहे येथील रहिवाशांत भाषिक दळणवळण सहज शक्य असतें.

बोलभाषेत व्यक्तिसापेक्ष साम्यभेदाची स्थळे ज्या प्रमाणात दिसून येतात त्यामानाने लिखित भाषेच्या व्यक्तिव्यक्तीच्या वापराच्या स्वरूपात साम्यभेदांची स्थळे पुष्कळ कमी प्रमाणात आढळून येतात. तरीही प्रांतपरत्वे किंवा लेखकाच्या व्यक्तिगत बोलीपरत्वेही लिखित भाषेतसुद्धा अशी साम्यभेदांची स्थळे सापडू शकतात.

जेव्हा दोन व्यक्तींत भाषिक आकलनाचे प्रमाण जवळजवळ संपूर्ण असते तेव्हा

त्या व्यक्ती एकच भाषा बोलत असतात, व जेव्हा हे प्रमाण जवळजवळ शून्य असते तेव्हा त्या व्यक्ती भिन्न भाषा वापरीत आहेत असे म्हणावे लागते.

१.४. भाषेतील विविधता :

'भाषा' या शब्दाची व्याप्ती संदर्भानुसार पुष्कळदा बदलती राहते. एका व्यक्तीची भाषा, एका प्रांताची भाषा, एका गटाची भाषा या अर्थामध्ये 'भाषा' हा शब्द जसा वापरला जातो तसाच तो सर्व समाजाची भाषा अशाही अर्थाने वापरला जातो. जितक्या व्यक्ती तितक्या भाषा व त्या सर्व व्यक्तींची मिळून एक भाषा, असा भाषा हा शब्द एका समाजातील व्यष्टीच्या स्तरावर व समष्टीच्या स्तरावर रूढ अर्थाने वापरला जातो. याला कारण सर्व स्तरांवरील भाषांमधील ध्वनी, अवयव, शब्द, वाक्य व या सर्वांची जोडणीची पद्धत यांमध्ये विशिष्ट साम्य असते व शिवाय व्यक्तिसापेक्ष वैशिष्टय शिल्लक राहते. यामुळेच भाषा एका साचेबंद पद्धतीने किंवा ठोकळेबाजपणाने वापरली न जाता व्यक्तिव्यक्तिनुसार विविध ढंगाने वापरली जाते; भाषा बहुरंगी बनते. भाषेतील ही विविधता भाषेच्या जडणघडणीच्या मूळ पद्धतीत फारशी राहत नसून भाषेच्या त्यामानाने बाह्य थरावर राहते. म्हणूनच 'भाषेतील विविधता' हा शब्दप्रयोग मर्यादित अर्थाने करणे योग्य असते. भारत हा सर्वांचा मिळून एक देश असला तरी प्रांताप्रांतांची वैशिष्टये त्यात दिसून आल्याने भारतातील विविधता हे विधान जसे भारताबद्दल करता येते, तसेच भाषेबद्दल विविधतेच्या संदर्भात करता येते.

एक-भाषिक समाजातील दोन व्यक्तींच्या भाषेत फरक पडण्याची अनेक कारणे आहेत, त्यांपैकी एक महत्त्वाचे कारण म्हणजे व्यक्तिव्यक्तींना असणारे शैक्षणिक संस्कार, शालेय, महाविद्यालयीन किंवा विश्वविद्यालयीन शिक्षण घेतलेल्या व्यक्तींची भाषा, या शिक्षणापासून वंचित झालेल्या म्हणजे अशिक्षित व्यक्तींच्या भाषेपेक्षा काहीशी निराळी असते. शिक्षित व्यक्तीच्या भाषिक गरजा अशिक्षित व्यक्तीपेक्षा जास्त असतात. शिवाय लेखनशुद्धीच्या विवेकाची त्यांना कमीअधिक प्रमाणात का होईना दखल घ्यावी लागलेली असते. शिक्षणामुळे त्यांच्या विचार करण्याच्या प्रवृत्तीला विशिष्ट वळण लावले गेलेले असते. एखाद्याची, स्वतःच्या जीवनविषयक अथवा त्याबाहेरच्या क्षेत्रात विचार करण्याची सवय शालेय किंवा महाविद्यालयीन शिक्षणावर पूर्णपणे अवलंबून नसली तरी शिक्षणाने विचार करता येण्याच्या क्रियेला नैसर्गिक व कृत्रिम संधी उपलब्ध होतात ही गोष्ट खरी आहे. विशिष्ट विचार करू शकणारे मन व न करू शकणारे मन यांतील फरक पुढील उदाहरणांनी स्पष्ट करता येईल. एका कोळी स्त्रीला प्रश्न केला गेला,[१] 'आई,

---

१. प्रस्तुत लेखिकेने कोळी भाषेच्या अभ्यासावरील प्रबंध विद्यापीठाला सादर करण्यासाठी कोळी भाषेचा नमुना गोळा केला होता त्या वेळचे हे तिला आलेले अनुभव आहेत.

भाकरी कशी करतात ते सांगा, ' तिचे उत्तर आले, ' त्यात काय, पीट घ्याचं, भाकरी करायच्या. ' भाकरी करण्यासारख्या साध्या गोष्टीसंबंधाने विस्ताराने काही सांगावे लागेल किंवा सांगता येते याची तिला कल्पना येऊ शकली नाही. अपेक्षित उत्तरे मिळवण्यासाठी तिला अनेक प्रश्न विचारावे लागले. दुसऱ्या एका कोळी अशिक्षिताला प्रश्न केला. ' मुलाला पोहायला शिकवायचे असेल तर कसे शिकवावे ? ' ' उत्तर आले ' पवायला काय शिकवायचं ? ते तर जलमताच तरतं. ' आपल्याला प्रश्न काय हेतूने विचारला गेला ते जाणण्याची, त्यासंबंधी तर्क करण्याची किंवा समजा, शिकवायची वेळ आली तर आपण कसे शिकवू, अशी काही कल्पना करण्याची विचारशक्ती त्याने वापरली नाही. तसा काही विचार त्याच्या मनाला स्पर्शूनही जाऊ शकला नाही; कारण जे सत्य नाही ते विवरणासाठी कल्पनेने मनात आणणे त्याला शक्य झाले नाही. शैक्षणिक संस्कारांमुळे, दैनंदिन जीवनात नित्याच्या व्यवहारासाठी जेवढी भाषा वापरली जाते त्यापेक्षा अधिक क्षेत्रातील भाषा वापरण्याची पात्रता निर्माण होत असते. यामुळे सुशिक्षित, अल्पशिक्षित किंवा अशिक्षित व्यक्तींच्या भाषांच्या स्वरूपात फरक पडू शकतो.

केवळ शैक्षणिक संस्काराने भाषा अधिक वापरली जाते असे नव्हे तर वैचारिक आविष्कारांच्या गरजेनुसारही भाषा जास्तीत जास्त वापरात आणली जाते. भाषेचा अभ्यास करताना ज्या वेळी बोलली जाणारी भाषा व लिहिली जाणारी भाषा अशी भाषेची भिन्न स्वरूपे आढळून येतात, त्या वेळी तो विचार व्यक्त करण्यासाठी 'बोलभाषा, बोली, गटभाषा, नोंदभाषा, लिखित भाषा ' वगैरे नवे शब्द तयार होऊन भाषेच्या व्यवहारात उतरू लागतात. आपल्याला जी विधाने मांडावयाची आहेत त्यासाठी आवश्यक ते साहित्य ' भाषा-भांडारातून ' घेतले जाऊन त्याचा वापर केला जातो. आवश्यक अशा भाषासाहित्याची स्वतःच्या भाषेत उणीव असेल तर प्रसंगी परभाषांतून शब्द आयात करूनही काम भागवले जाते. वैचारिक आविष्कार करणाऱ्या व्यक्ती आपले भाषिक सामर्थ्य, भाषेच्या सर्जनशीलतेचा फायदा घेऊन वाढवीत राहतात. आपल्या लेखनाद्वारे, संभाषणाद्वारे किंवा व्याख्यानातून या व्यक्ती समाजात नवनवीन संकल्पना पसरवीत राहतात. भाषेचे हे सामर्थ्य जसजसे वाढेल तसतशी भाषा समृद्ध होत जाते.

वैचारिक आविष्कारांच्या जोडीने भावनिक प्रकटीकरण भाषेला समृद्ध करीत असतें. एखाद्या कवीने स्वतःला अत्यंत योग्य वाटला म्हणून आपल्या कवितेंत 'झपूर्झा' किंवा ' हाला ' असा शब्द वापरला की त्या कवीचे विविध रसिक वाचक नकळत वा जाणीवपूर्वक तो शब्द इतरत्र वापरून पाहतात, त्यामुळे भाषेत शब्द रुजला जातो. सुख, दुःख, प्रेम, भीती, दया इत्यादी भावना मनुष्यमात्रात असतातच. पण त्यांना वाङ्मयाचे अलंकार चढवून काही व्यक्ती त्या भाषाप्रवाहात अलगद उतरवून देतात तर काही व्यक्ती भावना स्थूलरूपाने, त्याच त्याच शब्दांनी, जात्याचे खुंटाभोवती फिरावे तसे त्याच शब्दांच्या खुंटाभोवती गरगर फिरवीत राहतात. व्यक्तिव्यक्तीच्या भावनिक

आविष्काराच्या सामर्थ्यानुसार भाषा सकस किंवा दुबळी, सरस किंवा नीरस, समृद्ध किंवा तोकडी ठरत असते.

आपल्याला जे व्यक्त करावयाचे आहे ते आपल्या जीवनातील नित्याच्या गरजा भागविण्यासाठी असो, किंवा वैचारिक व भावनिक आविष्कारांसाठी असो, प्रत्येक व्यक्ती आपापल्या कुवतीप्रमाणे सूक्ष्म किंवा गडद छटांच्या भाषेचा वावर करीतच असते. या प्रत्येकाच्या गरजांची जेवढी भिन्नता तेवढी भाषेची बहुविधता.

गणितासारखे शास्त्रीय विषय भाषाबद्ध करताना किंवा कायदाविषयक विधाने करताना भाषेच्या काटेकोर वापराची गरज असते. अशा वेळी भाषेच्या वापरात थोडीशी ढिलाई झाली तर पोर्शियासारखी वकील 'a pound of flesh' च्या कबुलीचा 'a pound of flesh without blood' असा युक्तिवाद करून आपल्या अशिलाला वाचवू शकते. 'अपराध्याला फाशी द्यावे' अशा विधानाऐवजी 'मरेपर्यंत फाशी द्यावे' असे फाशीची शिक्षा देताना न्यायाधीशाला लिहावे लागते. आपण केलेल्या विधानांचा एक आणि एकच अर्थ होईल अशा प्रकारे भाषेचा वापर म्हणजे भाषेचा काटेकोर वापर. भाषेच्या लवचिकपणाचा फायदा घेऊन एकाच वाक्याने एकापेक्षा अधिक अर्थ सूचित करून भाषेला अलंकार जसे चढविले जातात, तसे भाषेवर पूर्ण ताबा नसल्याने व्यक्तीला म्हणायचे होते एक आणि दुसऱ्याने समजले भलतेच, अशीही परिस्थिती प्राप्त होते. मनुष्याला आपल्या भाषेचा वापर सहजपणाने किंवा जाणीवपूर्वक करता येतो. जशी गरज असेल, जशी ज्याची प्रवृत्ती असेल, किंवा जशी ज्याची भाषेची जाण असेल तशी व्यक्तिव्यक्तीकडून भाषा वापरली जात असते.

अनुभवांची समृद्धी, अनुभूतींची मर्यादा, वाङ्मयीन जवळीक यांच्या संदर्भात व्यक्तीची भाषादृष्ट्या समृद्धी होत असते. भिक्षुकाची सर्व शब्दसंपत्ती चर्मकाराला किंवा शेतकऱ्याची सर्व शब्दसंपत्ती शिक्षकाला माहीत नसण्याचा संभव असला तरी वरील सर्वजण परस्परांशी भाषिक संपर्क साधू शकतात. व्यक्तिव्यक्तीत भाषाविषयक संपर्क जेवढा जास्त तेवढी परस्परांच्या भाषेविषयी जाण जास्त. संपर्कामुळे हे ज्ञान आपोआप वाढत जाते. काही वेळा तर दुसऱ्या भाषिकांची वैशिष्ट्ये अजाणता आत्मसात केली जातात तसेच आपापल्या बोली वापरूनही व्यवस्थित भाषिक दळणवळण चालू असल्याची, वकील व त्याचा अशिक्षित अशील, शेतमालक व शेतमजूर, डॉक्टर व रोगी यातील संभाषणाप्रमाणे शक्यता असते. एकाच कुटुंबातील अशिक्षित व उच्च-शिक्षित व्यक्तींतही भाषिक दळणवळण व्यवस्थित चालू राहते ते परस्परांची भाषा समजली जाण्याच्या परिस्थितीमुळे व जेथे समजत नसेल तेथे समजावून घेण्याच्या परिस्थितीमुळे.

एक-भाषिक समाजाच्या भौगोलिक क्षेत्राचा विचार केला तरीही भाषेतील विविधता जाणवल्याशिवाय राहात नाही. ही विविधता फक्त शब्दांपुरती मर्यादित नसून भाषेच्या व्याकरणाच्या क्षेत्रात, उच्चारणांच्या क्षेत्रातही दिसून येते. साताऱ्याकडील

माणसे निरोप देताना, ' तुम्ही यावा ' म्हणतील, तर पुण्याकडील ' तुम्ही या ' म्हणतील. ' जावा, खावा, यावा ' इत्यादी ' वा 'कारान्त आज्ञार्थी अनेकवचनी रूपें पुण्यातील ' जा, खा, या ' या रूपांपेक्षा भौगोलिक अंतराने स्पष्ट दिसतात. ' हितं, तिथं ' अशा सांगलीतील लोकांच्या शब्दजोडीसाठी पुण्यात ' इथं, तिथं ' किंवा ' येथे, तेथे ' असे ऐकू येईल. मुंबईमध्ये ' रजा ' शब्द ज्या अर्थाने वापरतात त्यापेक्षा वेगळ्या अर्थाने पुण्याच्या भाषेत वापरला जातो. ' भाषा दर बारा कोसांवर बदलते ' असे जे विधान भाषेबाबत केले जाते ते पुष्कळदा खरे असल्याचे आढळून येते.

परंतु भाषा बदलते म्हणजे नेमके काय होते ? एकभाषिक समाजामध्ये वापरल्या जाणाऱ्या संपूर्ण भाषेपैकी काही आविष्कार एका गटात वापरले जातात तर त्याऐवजी दुसरे काही दुसऱ्या गटात वापरले जातात. या दोन आविष्कारांच्या फरकांच्या संदर्भात ' भाषा बदलते ', ' भाषा वेगळी असते ', ' भाषेत विविधता असते ', इत्यादी शब्द-प्रयोग केले जातात. अन्यथा भाषा ही सर्व समाजातील सर्व व्यक्तींच्या बोलण्याची बेरीज असताना भौगोलिक क्षेत्राच्या संदर्भात भाषा बदलते हे विधान कसे करता येईल ?

१.५. भाषेची एकात्मता :

एकभाषिक समाजातील दोन व्यक्तींच्या बोलण्यात साम्य व भेद यामध्ये कमी-अधिक अंतर असू शकते, याच समाजातील व्यक्ती वयाने कमीजास्त असल्याने दोन व्यक्तींमध्ये कालदृष्टया, राहण्याच्या ठिकाणातील अंतरामुळे भौगोलिक दृष्टया, भाषेच्या बाबतीत फरक कमीजास्त असू शकतो. व्यक्तीव्यक्तींतील संस्कार, शिक्षण, वाचन, बुद्धिमत्ता, अनुभव, कामधंदा, सामाजिक स्थान इत्यादी अनेक कारणांनी असणारी भिन्नता त्यांच्या भाषेतील फरक–विविधता दाखवीत असली तरी सर्व व्यक्ती एका समान सूत्राने बांधलेल्या असतात. ते समान सूत्र म्हणजे, आपल्या सर्वांची भाषा एकच आहे, ही त्यांची जाण, भावना अथवा वस्तुस्थिती. कोल्हापूरचा मनुष्य नागपूरला गेला असता तेथील माणसे मराठीच बोलतात. पण काहीशा वेगळ्या ढंगाने बोलतात असे समजतो, व त्या भाषेबद्दल बोलताना वर्णन करतो–नागपूरचे लोक म्हणतात, " माणूस ' मिळाला ' आणि दुकानात पान ' भेटले ' " किंवा घाटावरचा माणूस कोकणात गेला तर त्याला पहिल्याने खटकते ' अरे–जारे ' चे बोलणे. परंतु असे बोलणे खटकले तरी, पुण्याचा मनुष्य अहमदाबादला किंवा म्हैसूरला गेला तर तेथे त्याला भाषिक दळणवळण जितके कठीण जाते तितके कोकणात किंवा नागपूरला गेल्यावर कठीण जात नाही. बोलणे खटकले तरी परस्पर–विनिमय सहज होतो, परंतु कोठेतरी ' निराळेपण ' जाणवत राहते इतकेच. हे निराळेपण पुष्कळदा शब्दांच्या क्षेत्रात, व्याकरणाच्या एखाद्या क्षेत्रात किंवा उच्चारणपद्धतीतही असू शकते. या निराळेपणाचे प्रमाण भाषेचा एकूण विस्तार लक्षात घेतल्यास फारच अल्प असते. म्हणूनच त्या समाजातील माणसे एकच भाषा बोलतात असे विधान करता येते; किंवा सुसंघटित समाजास समाजातील व्यक्तींच्या

भाषेचे सारखेपण कारणीभूत असते असेही विधान करता येते. समाज एकसंघ राहण्यास त्याच्या धर्मकल्पना, नीतिनियम, हावभावांचे संकेत वगैरे सर्व महत्त्वाच्या क्षेत्रांतील दळणवळण सुलभ असणे जरुरीचे असते व भाषिक दळणवळण सुलभ राहण्यासाठी भाषिक एकात्मतेची तर गरज असते.

भाषिक एकात्मतेमुळे भावनिक जवळीक साधली जाते. दुसऱ्या व्यक्तीशी मातृभाषेतून संभाषण होऊ शकल्यास ती व्यक्ती सर्वांत जवळची वाटते, तर परभाषेतून संभाषण करावे लागल्यास ती व्यक्ती जरा दूरचीच वाटते, व राष्ट्रभाषेतून ते होऊ शकल्यास कमी जवळची पण कमी दूरची वाटते, असा अनुभव परप्रांती किंवा परदेशी राहणाऱ्यांना तर नेहमीच तीव्रतेने येत असतो. आपल्या दैनंदिन जीवनात स्वभाषेचा वापर सतत करीत असल्याने, भाषा व भाषेमुळे वाटणारी आपुलकी यातील नाते चटकन लक्षात येत नाही. ज्या दोन व्यक्तींच्या भाषेत जास्तीत जास्त साम्य असते त्यांच्यात सामाजिक जवळीक जास्तीत जास्त राहते.

'मनुष्य हा कळप करून राहणारा प्राणी आहे' असे माणसाबद्दल जे विधान केले जाते त्यामध्ये स्वतःचे स्वातंत्र्य समाजासाठी विसर्जित करण्याची माणसाची प्रमुख प्रवृत्ती अभिप्रेत असते. व्यक्ती म्हणून स्वतंत्र व्यक्तिमत्त्व राखूनही समाजाचे पारतंत्र्य त्याने स्वखुशीने अथवा गरजेपोटी स्वीकारलेले असते. भाषा ही समाजाची स्वायत्त संस्था असल्याने स्वतःच्या जन्माबरोबरच माणसाला ती प्राप्त होण्याची संधी उपलब्ध होते, या कारणाने भाषेतील एकात्मता साधली जाते. माणसाच्या आपले स्वतंत्रपण दाखविण्याच्या अभिलाषेतून भाषेत जशी विविधता येत असते तशीच समाजाचा घटक असण्याच्या माणसाच्या अगतिकतेतून भाषेची एकात्मता जपली जात असते. भाषेत विविधता आणणे किंवा भाषेची एकात्मता जपणे या गोष्टी माणसाला सर्वसाधारणपणे नकळत होत असतात.

आपण ज्याला 'मानतो' त्याने एखादी गोष्ट केली म्हणून आपण करावयाची, या अनुकरणप्रियतेच्या भावनेतून काहीशी विविधता निर्माण होत असली तरी बव्हंशी एकात्मताच साधली जाते. 'तो पक्षी मरला' असे म्हटले तर लोक हसतात हे कळताच मूल 'मरला' ऐवजी 'मेला' शब्द वापरून चुकीची दुरुस्ती करून टाकते. अशा प्रकारे बाकीची माणसे जसे बोलतात तसे बोलण्याच्या प्रयत्नातून, म्हणजेच एका विशिष्ट अनुकरणातून भाषिक एकात्मता साधली जाते. दैनंदिन गरजा भागविणारे, मनाची करमणूक करणारे, विचारांना प्रवृत्त करणारे किंवा वैचारिक गरजा भागविणारे, भावनांना प्रवृत्त करणारे किंवा भावनिक गरजा भागवणारे असे अनेक प्रकारचे भाषिक जीवन मनुष्य आपापल्या कुवतीनुसार जगत असतो व जरूर तेव्हा भाषेच्या अमाप, अविच्छिन्न अशा भांडारातून आपल्याला पाहिजे तशी भाषा आत्मसात करून आपले समाजनिगडित जीवन चालवीत असतो.

भाषेच्या एकात्मतेला व्यक्ती व समाज यांतील अतूट नाते जसे कारणीभूत असते

तसाच भाषेचा वाङ्मयीन संसार कारणीभूत असतो. कोणत्याही भाषेतील वाङ्मय दोन स्वरूपात उपलब्ध असते[१] – एक मुखोद्गत व दुसरे लिखित.[२] दोन्ही वाङ्मयप्रकार एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे संक्रांत होत असतात. या संक्रमणकाळात काळाच्या ओघात घडणारे परिणाम यांवरही होत राहतात. काही वाङ्मय नाहीसे होते, तर काही कालप्रवाहात बराच काळ टिकून राहते, तर काही वाङ्मय कोठतरी तग धरून राहते. नाहीशा झालेल्या वाङ्मयाचे पुढील काळात सापडणारे अवशेष त्याचे अस्तित्व मात्र सुचवितात, तग धरून राहिलेले वाङ्मय जीर्णोद्धाराचा लाभ झाल्यास नव्या जोमाने कालप्रवाहात काही कालखंडासाठी तरी महत्त्वाचे स्थान प्राप्त करून घेऊ शकते आणि टिकून राहिलेले वाङ्मय आपला सखोल ठसा उठवीत, निर्मितीच्या वेळेसारखा नसला तरी कालमानानुरूप एक प्रकारचा नवनवीन ताजेपणा व्यक्त करीत राहते. 'नवनवोन्मेष' हा जातिवंत वाङ्मयाचा खरा कस असतो. किंबहुना प्रतिभेची व्याख्या करताना 'नवनवोन्मेषशालिनी प्रज्ञा प्रतिभा मता' असे प्रतिभेबद्दल जे म्हटले जाते ते काल-प्रवाहात टिकून राहण्याच्या अभिजात वाङ्मयाच्या विशिष्ट गुणांमुळे होय असे म्हटले तर अयोग्य ठरू नये.

मुखोद्गत वाङ्मय मौखिक परंपरेने पुढील पिढीकडे जाते त्यावेळी एक तर ते जसेच्या तसे म्हणत आहोत असे समजून जरी पुढील पिढीने जतन केले तरी एकतर भाषेच्या नैसर्गिक परिवर्तनशीलतेमुळे ते बदललेले असते, किंवा त्यातील कित्येक भाग विस्मरणात गेलेला असतो, किंवा त्यात कोणत्यातरी कालखंडात नवीन भर सुद्धा पडलेली असते. मुखोद्गत वाङ्मयाची निर्मिती कितीही मोठ्या प्रमाणात झालेली असली तरी समाजाने ज्याची नोंद घेतली आहे असे वाङ्मय फार थोडे असते व जे असते त्याचे जतन झाले पाहिजे हीही जाणीव फार कमी प्रमाणात असते. भाषेची अनेक वैशिष्ट्ये या मुखोद्गत वाङ्मयात आढळतात, या दृष्टीने त्याचे महत्त्व जाणून मराठी मुखोद्गत वाङ्मय लिपिबद्ध स्वरूपात जपण्याचा प्रयत्न आज काही ठिकाणी आढळू लागला आहे.

वाङ्मय मुखोद्गत असो की लिखित, त्याचा समाजजीवनावर परिणाम होतच असतो. या वाङ्मयातून व्यक्त झालेले विचार अथवा भावना यांचा समाजाच्या जिवंत-पणाशी फार संबंध असतो. वाङ्मय शास्त्रीय किंवा ललित, दोन्ही प्रकारचे असते. ज्या भाषेतून हे वाङ्मय लिहिले जाते ती भाषा जेव्हा सर्व समाजाला जास्तीत जास्त प्रमाणात समजू शकेल अशी असते तेव्हा वाङ्मयांतील विचार किंवा भावनांचे प्रसारण जास्तीत जास्त प्रमाणात होण्याची शक्यता त्यात निर्माण होते. आपले आविष्कार सर्व समाजाला आकलन व्हावयाचे असतील तर भाषेचे कोणते रूप वापरले

१. हे विधान मर्यादित अर्थाने स्वीकारले पाहिजे हे उघड आहे.

२. General Linguistics-Robins, p. 369.

पाहिजे याची जाणीव लेखकाला ठेवावी लागते. ही जाणीव भाषेची एकात्मता राखण्यास कारणीभूत होते. कारण या ठिकाणी लेखकांची व्यक्ती म्हणून असणारी वैशिष्ट्ये किंवा समाजाच्या विशिष्ट गटाचे किंवा थराचें घटक म्हणून असणारी वैशिष्ट्ये जास्तीत जास्त लोपली जाऊन, सर्व समाजाशी विनिमय साधू शकणारी भाषा वापरली जाते व अनुकरणाची सवय असलेले मानवी मन अशा वाङ्मयप्रकाराच्या भाषेचे नकळत अनुकरण करीत राहाते. या अनुकरणाच्या प्रयत्नातून भाषिक एकात्मता वाढण्यास जसा उपयोग होतो तसा समाज एकसंध राहण्यासही होत असतो.

१.६. प्रमाणभाषा, प्रमाणबोली[1] :

एकभाषिक समाजातील व्यक्तीव्यक्तींच्या भाषेच्या स्वरूपांवरून भाषेतील विविधता व एकात्मता दिसून येतात. समाजाच्या भाषेतील जास्तीतजास्त एकात्मता राखणारी भाषा ती प्रमाणबोली व विविधता दाखविणारी भाषा ती बोली, अशा प्रकारे भाषेच्या वापराच्या स्वरूपानुसार व आकलनाच्या प्रकारानुसार भाषेच्या भिन्न स्वरूपांना भिन्न नावे दिली जातात.

१.६. (अ) प्रमाणभाषा :

एकभाषिक समाजातील सर्व व्यक्तींना बव्हंशी समजली जाणारी, समाजातील ' शिष्ट ' लोकांनी लेखनासाठी मान्य केलेली भाषा, ' प्रमाणभाषा ' म्हटली जाते. ज्या लेखनाला ' शुद्ध ' म्हटले जाते ते शिष्टमान्य लेखन ज्या भाषेसाठी केले जाते ती प्रमाणभाषा होय. या भाषेला ' शिष्टमान्य ' असेही म्हणता येईल. प्रमाणभाषेची शिष्टमान्यता ओळखण्यासाठी ज्यांना मान्य अशी ही भाषा असते ते ' शिष्टजन ' किंवा ' प्रतिष्ठित ' म्हणजे नक्की कोण हेही लक्षात घेणे आवश्यक असते. ज्यांच्या मान्यतेमुळे भाषेत विशिष्ट ' प्रामाण्य ' प्रस्थापित होते ते ' शिष्ट ' किंवा ' प्रतिष्ठित ' लोक विशिष्ट निकषांनी सर्वच वेळी ओळखता येतात असे नाही. समाजाच्या विशिष्ट कालखंडातील ' प्रतिष्ठित ' समजला गेलेला वर्ग दुसऱ्या कालखंडांत ' प्रतिष्ठित 'च समजला जाईल असे नाही. कालमानानुसार हे शिष्टत्वाचे किंवा प्रतिष्ठितत्वाचे क्षेत्र बदलू शकते. प्रमाण भाषा लिखित स्वरूपात असल्याने भाषेचा इतिहास प्रमाणभाषेच्या ऐतिहासिक अभ्यासातून साध्य होत असतो. याच अभ्यासातून कोणत्या कालखंडात कोणत्या वर्गाला ' प्रतिष्ठित ' समजले जात होते हे ओळखता येणे शक्य होते.

प्रमाणभाषा ही लिखित स्वरूपात असल्याने बोलभाषेचे क्षणभंगुरत्व या भाषेला नसते. ही सर्व समाजाला समजू शकणारी असल्याने या भाषेद्वारा होणारे विनिमयाचे

---

१. पहा- ' प्रमाणभाषा, पोटभाषा आणि बोलीभाषा '– सुहासिनी, लद्दू (मराठीचा भाषिक अभ्यास–संपा, कानडे– पृ. ३१ ते ५९.

क्षेत्र फार मोठे असते. छपाईच्या कलेमुळे तर आज प्रमाणभाषेच्या व्यवहाराचे क्षेत्र फार मोठे झाले आहे. प्रमाणभाषा ही समाजाच्या दैनंदिन, वैचारिक व भावनिक जीवनाचा लेखनाद्वारा आविष्कार दाखविणारी असते. खाजगी किंवा व्यक्तिगत जीवना-खेरीजच्या कोणत्याही सार्वजनिक किंवा घराबाहेरच्या जीवनात प्रमाणभाषा 'प्रतिष्ठा निदर्शक' असल्याने तिचा वापर करणे म्हणजे जणू स्वतःची 'प्रतिष्ठा' दाखविण्या-सारखे असल्याने औपचारिक प्रसंगात प्रमाण भाषेचा वापर अधिक होतो. कायदेकानू, सरकारी दप्तरे, यांसारख्या भाषेच्या काटकोर वापराची आवश्यकता असणाऱ्या ठिकाणी प्रमाणभाषा वापरली जाते. विविध वर्तमानपत्रे, मासिके, शास्त्रीय किंवा ललित वाङ्मय यासाठी प्रमाणभाषेचा वापर जास्त होतो. प्रमाण भाषेमध्ये भाषिक संपर्क सर्वाधिक प्रमाणात साधला जात असल्याने लेखकांनी आपल्या लेखनासाठी प्रमाणभाषेचा वापर करणे सोयीचे असते. प्रमाणभाषेला 'दर्जा'[1] असतो. हा 'दर्जा' तिच्या 'शिष्टमान्यते'-तून येतो ही कळत किंवा नकळत असलेली जाणीव प्रमाणभाषा वापरणारांना असते. प्रमाणभाषा ही लिहिली जाते व फारच क्वचित बोलली जाते.

प्रमाणभाषेच्या 'लिखित' स्वरूपात असण्यामुळे तिच्या अस्तित्वाची मर्यादा बोलल्या जाणाऱ्या भाषेपेक्षा अनंत पटीने मोठी असते. यामुळे प्रमाणभाषेकडून व्यक्त करण्याच्या आपल्या भावविचारांना म्हणजेच 'अर्थांना' ही खूप मोठा वाव असतो. स्मरणातून गेलेले, वापरातून कमी झालेले शब्द, शब्दरचना प्रमाणभाषेत टिकून असण्याची शक्यता खूप असते. कालबाह्य शब्दांना किंवा शब्दरचनांना लेखनात वापरून चालू भाषेत उतरवणे शक्य असते. श्रीमती दुर्गा भागवत यांनी आपल्या पुस्तकाला 'पैस' असे नाव देऊन कालबाह्य अशा 'पैस' शब्दाला जीवन दिले आहे असे म्हणता येईल. श्रीमती भागवत यांनी जर ते नाव दिले नसते तर आज जेवढ्या लोकांना 'पैस' शब्द माहीत झाला आहे तेवढ्यांना तो माहीत असण्याची शक्यता अस्तित्वात नसती असे म्हणता येईल. वाङ्मयामुळे अस्तित्वात असलेले व वर्तमान जीवनात वापरात नसलेले अनेक शब्द किंवा शब्दरचना भाषेच्या वापरात लेखकांच्या लेखनामुळे येऊ शकतात. नवनवीन गोष्टींचा शोध घेणाऱ्या लेखकवर्गाकडून किंवा संशोधकांकडून प्रमाण-भाषेचा वापर अधिकाधिक विस्ताराने होत असतो. या वापरामध्ये घेतल्या जाणाऱ्या व्यक्तिगत स्वातंत्र्यामुळे प्रमाणभाषेचे स्वरूप वरचेवर निश्चित करण्यासाठी किंवा स्थिर राखण्यासाठी विविध प्रकारे भाषा स्वरूपासंबंधीचे आपले मतप्रदर्शन करण्याची आवश्यकता प्रतिष्ठितांना (किंवा शिष्टांना) वाटू लागते. प्रमाणभाषेच्या स्वरूपासंबंधी अभ्यास केले जातात. ते स्वरूप स्पष्ट करणारी, शुद्ध शुद्ध दर्शविणारी छोटी मोठी भाषेच्या व्याकरणाची पुस्तके तयार केली जातात व भाषेच्या व्याकरणिक अंगांची चर्चा होऊन भाषेतील 'योग्यायोग्यता' वरचेवर तपासली जाते. प्रमाणभाषा हे साधन एक

१. भाषा : इतिहास आणि भूगोल–कालेलकर–पृ. ६८.

प्रकारे ' कृत्रिम ' असल्याने ते शिकावे लागते. स्वतःला भाषेचे स्वरूप समजण्यासाठी, स्वभाषिकाला किंवा परभाषिकाला भाषेचे स्वरूप शिकवण्यासाठी प्रमाणभाषेच्या व्याकरणांची आवश्यकता असते. या व्याकरणांमधून प्रमाणभाषेच्या स्वरूपाचे वर्णन केले जाते, त्याच्या साहाय्याने आपली बोली प्रमाणभाषेत ' परावर्तित ' करून घेण्याची कला साध्य करून घेता येते.

१.६. (ब) प्रमाणबोली :

संपूर्णपणे प्रमाणभाषेसारखी नसणारी परंतु बरीचशी तिच्यासारखी असणारी, शिष्ट किंवा प्रतिष्ठित लोकांकडून बोलली जाणारी जी भाषा ती प्रमाणबोली होय. प्रमाणबोली लिहिली जात नाही. प्रमाणभाषेच्या लेखनपद्धतीचे ज्याला ज्ञान आहे त्याला ही बोली लेखन स्वरूपात वापरता येईल. परंतु अशाप्रकारे लेखननिविष्ट केलेली ही बोली प्रमाणभाषा या नामाभिधानास पात्र ठरू शकणार नाही, कारण हे लेखन प्रमाण भाषेसाठी वापरल्या जाणाऱ्या शिष्टमान्य लेखनाप्रमाणे असेलच असे नाही. ' तिनं काम केलं ' हे वाक्य प्रमाणबोलीतील वाक्य असेल, पण ते केवळ लिहिले गेले आहे म्हणून प्रमाणाभाषेतील वाक्य ठरणार नाही, त्याऐवजी ' तिनें काम केलें ' किंवा ' तिने काम केले ' असेच लिहावे लागेल. जे बोलावयाचे ते केवळ लिपीच्या माध्यमाने लिहिले म्हणून शिष्टमान्य होत नाही, तर जे बोलावयाचे ते शिष्टमान्य पद्धतीने लिहिले तरच त्याला प्रमाणभाषेचे ' प्रामाण्य ' प्राप्त होते. यावरून हे लक्षात येईल की केवळ लिखित स्वरूपात प्रमाणबोली मांडली म्हणून ती प्रमाणभाषा होत नाही कारण ते लेखन ' शुद्ध ' किंवा ' प्रमाण ' असेलच असे नाही. अशा वेळी या लेखनाने ' प्रमाणबोली लिखित स्वरूपात मांडली किंवा लिहिली ' अशा प्रकारची विधाने करावी लागतील किंवा ही ' लिखित प्रमाणबोली ' आहे असे विधान करावे लागेल.

' बोली ' ही बोलण्यासाठी वापरली जाते. काही विशिष्ट प्रसंगांत ती लिहिली जाते तेव्हा लेखकाचा उद्देश विशिष्ट अनौपचारिकता किंवा विशिष्ट वास्तवता व्यक्त करण्याचा असतो. प्रमाणबोली ही एकभाषिक समाजातील सर्व व्यक्तींना जास्तीतजास्त प्रमाणात समजली जाणारी असते. यामध्ये प्रमाणभाषेइतका कृत्रिमपणा नसला तरी ती प्रमाणभाषेला अधिकाधिक जवळची असल्याने काहीसा कृत्रिमपणा यातही राहतोच. ' उगवत ' व ' मावळत ' या शब्दांऐवजी ' पूर्व ' व ' पश्चिम ' या शब्दांची निवड करण्यात असलेली मनोवृत्ती किंवा मनुष्याच्या संदर्भात ' मेला ' ऐवजी ' वारला ' म्हणण्याची प्रवृत्ती ही त्या काहीशा कृत्रिमपणाचे द्योतक आहे. प्रमाणभाषेच्या सहाय्याने व्यक्ती स्वतःचा भाषिक आविष्कार पूर्णपणे औपचारिक रीतीने करीत असते तशीच ती प्रमाणबोलीत तो बऱ्याचशा औपचारिकपणेच करीत असते. प्रमाणभाषेत नसलेला अनौपचारिकपणाचा अंश प्रमाणबोलीत काही प्रमाणात ठळकपणे आढळून येतो म्हणूनच प्रमाणभाषा व प्रमाणबोली ही भाषेची भिन्न स्वरूपे मानावी लागतात. आपली ' प्रतिष्ठा '

राखण्यासाठी किंवा दाखविण्यासाठी ‘ अप्रतिष्ठित ’ लोकांच्यापेक्षा काहीसे वेगळे व जाणीवपूर्वक, व्यक्ती जेव्हा बोलत असते तेव्हा ती प्रमाणबोलीचा वापर करीत असते. ‘ मला अगदी मेल्याहून मेल्यागत झालं ’ असे बोलणारी व्यक्ती समाजात ‘ प्रतिष्ठा ’ पावलेली असेल तर तिच्या व्यक्तिगत बोलीतील ‘ मेल्याहून मेल्यागत ’ या वाक्प्रयोगाला ‘ प्रतिष्ठा ’ लाभू शकते व प्रमाणबोलीतील ‘ मेल्यापेक्षा मेल्यासारखं ’ या वाक्प्रयोगाच्या तोडीची प्रतिष्ठाही त्या वाक्प्रयोगाला मानली जाऊ शकते; तो प्रमाणबोलीचा एक आविष्कार ठरू शकतो. परंतु हेंच वाक्य जर प्रमाणभाषेत लिहिलेल्या एखाद्या लेखनात समाविष्ट केले गेलेले असेल तर लेखकाने आपल्या विशिष्ट हेतूसाठी आपल्या किंवा दुसऱ्याच्या बोलीतील वाक्य लेखननिविष्ट केले आहे असे विधान करावे लागेल. प्रतिष्ठित व्यक्तींच्या प्रतिष्ठेमुळे त्यांच्या स्वतःच्या बोलीतील काही वाक्प्रयोगांचा अंतर्भाव वरील-प्रमाणे प्रमाणबोलीत जरी होऊ शकत असला तरी प्रमाणभाषेत या वैशिष्ट्यांना स्थान मिळणे तितके सहज ठरत नाही, कारण प्रमाणभाषेची परंपरा लेखनरूपाने बऱ्याच काल-खंडापासून अस्तित्वात आलेली असते.

१.६. (क) प्रमाणभाषेचे वाचन :

प्रमाणभाषा जशी लिहिली गेली आहे तशी वाचली गेली तर तिला ‘ प्रमाणभाषा वाचली गेलेली ’ असे म्हणता येईल. न्यायाधीशाने केलेले निकालपत्राचे वाचन, मंत्र्यांनी केलेले शपथ-वाचन, एखाद्या संस्थेच्या कार्यवाहाने केलेले आवाहन-वाचन इत्यादी प्रमाणभाषेच्या वाचनाची उदाहरणे देता येतील. प्रमाणभाषा बोलली जात नाही पण वाचली जाते. परंतु लिखित भाषेने व्यक्त केलेला अर्थ समर्थपणे किंवा पूर्णपणे श्रोत्यां-पर्यंत पोहोचवण्याच्या हेतूने अथवा विशिष्ट रसोत्कर्ष साधण्यासाठी वाचक जेव्हा प्रमाणभाषेने व्यक्त केलेल्या समूहात काही निश्चित स्वरूपाचे बदल करून वाचतो तेव्हा वाचक प्रमाणभाषेचे परिवर्तन प्रमाणबोलीत, अथवा प्रमाणबोली अधिक स्वतःची बोली अशा संमिश्र बोलीत, अजाणतेपणाने अथवा हेतुतः करीत असतो. डोळयांनी वाचत असतानाही वाचकाच्या मनाने लिखित भाषेशी संवाद साधणारी स्वतःची बोली वाचली जात असण्याची शक्यता पुष्कळदा अस्तित्वात आलेली असते. प्रमाणभाषेचे वाचन करताना वाचक ती भाषा स्वतःच्या बोलीत परावर्तित करून समजावून घेत असतो. वाचनाची अधिकाधिक सवय झाल्याने किंवा बोली व भाषा यांतील शास्त्रीय दृष्ट्या असणाऱ्या फरकाचे ज्ञान नसल्याने ही गोष्ट इतकी सहजपणे घडून जाते की वाचन-ग्रहण या नात्यातले एकाच वेळी अस्तित्वात असणारे दोन भाषांचे स्थान कळून येत नाही. याच कारणाने पुष्कळदा जसे लिहिलेले आहे तसेच्या तसे वाचायला स्वतःला किंवा दुसऱ्याला मुद्दाम जागरूक राहावे लागते. जसे लिहिलेले आहे तसेच्या तसे वाचले गेले म्हणजेच प्रमाणभाषेचे ‘ शुद्ध ’ किंवा ‘ योग्य ’ वाचन झाले असे म्हणता येईल. तसे न झाल्यास ते वाचन ‘ अशुद्ध, अयोग्य ’ परंतु हेतू स्पष्ट होत असेल तर त्या हेतुनुसार ’

भाववाही, रसवाही, परिणामकारक ' इत्यादी विशेषणांनी त्या वाचनाचे वर्णन करावे लागेल.

१.६. (ड) प्रमाणभाषा व प्रमाणबोली-अंतर :

प्रमाणभाषा व प्रमाणबोली यातील अंतर फार कमी असते. व्याकरणिक अंगात ते बऱ्याच अंशी निश्चित स्वरूपाचे असते. प्रमाणभाषेच्या उपलब्ध लेखनानुसार आपले लेखन राहावे याविषयीची एक प्रकारची जागरुकता, प्रमाणभाषेतील ग्रंथांचे वाचन–मनन, शालेय किंवा महाविद्यालयीन शिक्षण, विचारवंत व्यक्तींची व्याख्याने ऐकणे यांसारख्या कारणांनी हे अंतर कमीतकमी राहण्याची शक्यता असते. ' रेडिओ 'सारखी प्रक्षेपणाची साधने भाषेचा प्रसार फार मोठ्या क्षेत्रात व फार जलद गतीने आजकाल करीत असतात. त्यामुळे प्रमाणभाषा वाचलेल्या स्वरूपात किंवा प्रमाणबोली ऐकण्याची संधी सर्वसामान्य माणसांना पूर्वीपेक्षा जास्त प्रमाणात उपलब्ध झालेली आहे. प्रमाणभाषेत दडलेला ' दर्जेदारपणा ',' प्रतिष्ठितपणा ' किंवा ' शिष्टमान्यपणा ' यामुळे त्या भाषेचे अनुकरण कळत नकळत, स्वतःला प्रतिष्ठा प्राप्त करण्याच्या हेतूने किंवा अनुकरणप्रियतेच्या मनुष्य-स्वभावामुळे होत रहते. यामुळे प्रमाणभाषा व प्रमाणबोली यातील अंतर कमी होण्यास मदत होते. परंतु मनुष्य हा शेवटी जितका परतंत्र तितकाच स्वतंत्र वृत्तीचा असल्याने, त्याच्या त्या वृत्तीचे परिणाम अत्यल्प प्रमाणात का होईना, प्रमाणभाषा व प्रमाणबोली यांच्यावर दिसून येतातच.

१.७. बोलभाषा, पोटभाषा, प्रमाणेतर बोली :

भाषेची स्वरूपे दोन-एक बोलली गेलेली भाषा व दुसरे लिहिली गेलेली भाषा. भाषा जेव्हा बोलली जाते तेव्हा ती ' बोलभाषा ' असते. जेव्हा ती लिहिली जाते तेव्हा ती ' लिखितभाषा ' असते. भाषा जेव्हा शिष्टमान्य पद्धतीने लिहिली जाते तेव्हा ती ' प्रमाणभाषा ' असते; जेव्हा ती शिष्टमान्य पद्धतीने बोलली जाते तेव्हा ती 'प्रमाणबोली' असते. भाषा जेव्हा प्रमाणबोलीच्या स्वरूपापेक्षा भिन्न स्वरूपाने बोलली जाते तेव्हा ती ' प्रमाणेतर बोली ' असते. प्रमाणबोली किंवा प्रमाणेतर बोली जेव्हा एका व्यक्तीची असते तेव्हा ती व्यक्तिगत बोली असते.

१.७. (अ) बोली-गट :

व्यक्तिगत बोलींमध्ये दिसून येणाऱ्या परस्पर साम्यांच्या प्रमाणावरून बोली– गट होऊ शकतात. ज्या व्यक्तिगत बोलींच्या समूहात जास्तीत जास्त साम्य असते, ती परस्परांना समजली जाण्याच्या बाबतीत जास्तीत जास्त सहजता असते किंवा त्या विशिष्ट व्यक्तिसमूहांतील एका व्यक्तीला दुसऱ्या व्यक्तीचे बोलणे ' आपल्यासारखे ' वाटते तेव्हा त्या सर्व व्यक्तिगत बोलींचा मिळून एक गट बनवता येतो. असे अनेक बोली–गट एक-भाषिक समाजाच्या भाषेत दिसून येतात.

एका कुटुंबातील व्यक्तींच्या भाषिक व्यवहारांत परस्परांच्या बोलींच्या आकलनाचे प्रमाण घन [1] असते. त्या कुटुंबांतील सर्व व्यक्तींचा मिळून जो बोलीगट तयार होतो त्याला त्या विशिष्ट कुटुंबाची ' कुटुंब–बोली ' म्हणता येईल.

एकाच जातीच्या लोकांच्या अनेक कुटुंब बोलींमधील भाषिक व्यवहारात परस्परआकलनाचे प्रमाण, एकच कुटुंबबोली बोलणाऱ्या व्यक्तींच्या ' परस्पर आकलन घनतेपेक्षा ' थोडे कमी परंतु तरीही बरेचसे ' घन ' राहू शकते. अशा एका जातीच्या अनेक कुटुंबबोलींचा मिळून जो बोलीगट तयार होईल त्याला त्या विशिष्ट जातीची ' जाति-बोली ' असे म्हणता येईल.

एकाच प्रकारचा धंदा असणाऱ्या अनेक व्यक्तींच्या बोलीतील परस्पर विनिमयांमधील आकलनाचे प्रमाण जेव्हा घन असते तेव्हा त्या व्यक्तींच्या बोलींचा एक स्वतंत्र गट समजता येतो व त्याला त्या विशिष्ट धंद्यानुसार ' धंदाबोली ' असे नाव देता येतें.

अशा प्रकारे परस्परव्यवहाराच्या आकलनघनतेवर एकभाषिक समाजात भिन्न भिन्न बोलीगट तयार करता येतात. वास्तविक पाहता बोलींचा गट तयार करणे हे काहीसे कृत्रिमच असते. परंतु व्यक्तीव्यक्तींच्या भाषेतील विविधता व विशिष्ट असे आंशिक साम्य यांमुळे विविध गटांची ठळक वैशिष्टये नजरेत भरू शकतात व त्या विशिष्ट वैशिष्टयांनी युक्त भाषिक गट एकत्र करून त्यांना ' विशिष्ट गट बोली ' हे नाव देणे शक्य होते. ही नावे ' पुणेरी, सातारी ' अशी स्थानपरत्वे सुद्धा देता येतात. कोणत्याही भाषेचे गट-बोलीत विभाजन काहीसे कृत्रिम असून ते, ती बोली बोलणाऱ्या व्यक्तींचा समाजांतर्गत विशिष्ट गट दाखविण्यापुरते असते. बोलीगटांवरून विविध नामाभिधान केलेल्या गट बोलींमधील विभाजन परस्परभिन्न नसून परस्परांना आंतरछेद देणारे असते.

१.७. (ब) पोटभाषा :

भाषा ही जशी संग्राहक संज्ञा आहे तशीच पोटभाषा हीही एक संग्राहक संज्ञा आहे. त्या त्या संदर्भानुसार भाषा ही ' बोली ' असते, तीच ' प्रमाण-बोली ' असते किंवा शिष्टमान्य पद्धतीने लिखित स्वरूपात लिहिली गेली असता ती ' लिखितभाषा ' असते, तशीच ती ' गट-बोली ' ही असू शकते. विशिष्ट गटातील, व्यक्तिसमूहातील, शिष्टमान्य बोली म्हणजे गट-प्रमाण-बोली. अनेक गटप्रमाणबोलीतील वैशिष्टये जेव्हा समान असतात तेव्हा त्या गटप्रमाणबोलींना एकत्रित करून ' पोटभाषा ' ही संग्राहक संज्ञा देता येते.

---

१. घन (आकलनाचे प्रमाण) जास्तीत जास्त; विरल (आकलनाचे प्रमाण) कमीत कमी.

अनेक गटप्रमाणबोलींच्या तुलनेनंतर भाषेच्या व्याकरणिक अंगातील, शब्द-संपत्तीतील किंवा उच्चारणपद्धतीतील साम्यस्थळे ज्या गटप्रमाणबोलीत अधिक दिसून येतात अशा बोलींचा संग्रह म्हणजे पोटभाषा. पोटभाषा बोलली जाते म्हणजे विशिष्ट व्यक्तिसमूहातील त्या समूहापुरती मर्यादित अशी त्या समाजातील प्रतिष्ठितांची बोली बोलली जाते. ' कोळी ही मराठीची एक पोटभाषा आहे ' या विधानाचा अर्थ मराठी भाषिक समाजातील ' कोळी ' या जातीच्या विशिष्ट व्यक्तिसमूहाच्या प्रतिष्ठित लोकांची जी प्रमाणबोली आहे ती ' कोळी ' नावाने ओळखली जात आहे, असा करावा लागतो.

प्रमाणबोली म्हणजे एखाद्या समाजातील प्रतिष्ठित लोकांनी मान्य केलेली, प्रमाणभाषेला जास्तीत जास्त जवळची बोली. गटप्रमाणबोली म्हणजे एकभाषिक समाजांतर्गत विशिष्ट व्यक्तिसमूहातील प्रतिष्ठितांना मान्य अशी बोली. पोटभाषेसाठी गटप्रमाणबोलींचा विचार करावा लागतो. पोटभाषा किंवा गटप्रमाणबोली प्रमाणभाषेला जवळच्या असतीलच असे सांगता येत नाही.

१.७. (क) पोटभाषेचे लेखन :

पोटभाषेचे लेखन सहसा अनौपचारिक प्रसंगी केले जाते. घरगुती पत्रलेखनात ती बहुशः वापरली जाते. ज्याला लेखनकला अवगत आहे. परंतु, शिष्टमान्य लेखन-पद्धतीशी ज्याचा परिचय नाही अशा व्यक्तीचे लेखन म्हणजे पोटभाषेचे किंवा बोलीचे लेखन असते. अशा लेखनाद्वारे साधलेले संपर्काचे क्षेत्र बहुशः अत्यंत मर्यादित असते.

आपल्या ललितकलाकृतीत अनौपचारिकतेचा भाव निर्माण करणे, आपण रेखाटत असलेले चित्र हुबेहूब वठवणे, वाचकांशी आपले संबंध अधिक जवळिकीचे राखणे, आपल्या भावना जणू स्वगत बोलत आहेत अशा प्रकारे व्यक्त करणे, यांसारख्या अनेक हेतूं-मुळे पोटभाषा लिहिल्या जात असतात. पोटभाषेच्या वाङ्मयीन वापरामागे सर्व समाजाशी संपर्क राखण्याच्या उद्दिष्टापेक्षा आपल्या अगर विशिष्ट व्यक्तीच्या भाषेची वैशिष्ट्ये राखण्याची, त्यायोगे अनौपचारिकता दाखविण्याची, अगर ती बोली बोलणाऱ्यांशी जवळीक साधण्याची भावना अधिक जागरुक असते. समाजाच्या सर्वसाधारण घटका-पेक्षा स्वतःचे व्यक्तिमत्त्व विशिष्ट घटकाशी निगडित आहे हेही काहीवेळा पोटभाषांच्या-द्वारे व्यक्त होत असते. त्यामुळे पोटभाषेचा वापर वाङ्मयीन कलात्मक दृष्टीतून व व्यक्तिवैशिष्ट्यांच्या अभिव्यक्तीसाठी लेखनामधून केला जाताना दिसतो.

१.७. (ड) पोटभाषांचा अभ्यास :

पोटभाषा ह्या गटप्रमाणबोली दाखवीत असल्याने समाजाच्या विशिष्ट गटाच्या सामाजिक अभ्यासास पोटभाषांचा अभ्यास उपयोगी ठरतो. हा अभ्यास समाजाचा सांस्कृतिक, ऐतिहासिक वारसाही व्यक्त करतो. तुलनात्मक किंवा ऐतिहासिक भाषा-भ्यासासाठी पोटभाषांचा अभ्यास आवश्यक असतो. प्रमाणभाषेचे किंवा प्रमाणबोलीचे

' प्रामाण्य ' ठरविणाऱ्या ' प्रभावी ' किंवा ' प्रतिष्ठित ' व्यक्तींचा इतिहास शोधण्यास हा अभ्यास काही मार्गदर्शन करू शकतो. भाषाशास्त्रीय अभ्यासास या अभ्यासाने महत्त्वाचा हातभार लागतो, तर वाङ्मयीन अभ्यासास पोटभाषांचा अभ्यास पुष्कळदा अपरिहार्य असतो. पोटभाषा या प्रामुख्याने बोलभाषा असल्या तरी त्यांचा उपयोग विशिष्ट परिस्थितीत लेखनासाठी केला जात असल्याने एकभाषिक समाजाच्या भाषिक, सांस्कृतिक, ऐतिहासिक, भौगोलिक, राजकीय, धार्मिक वगैरे सर्वांगीण अभ्यासासाठी त्या समाजाच्या पोटभाषांचा अभ्यास अनेकप्रकारे महत्त्वपूर्ण मदत करणारा असतो.

१.७. (इ) प्रमाणभाषा व पोटभाषा :

प्रमाणभाषा लिखित वाङ्मयातून उपलब्ध असते. पोटभाषा लिखित वाङ्मयात उपलब्ध होईलच असे नाही. प्रमाणभाषेमुळे सर्व समाजाशी संपर्क साधला जातो कारण ती सर्व समाजाला बव्हंशी समजू शकणारी असते. पोटभाषेमुळे मर्यादित क्षेत्रात संपर्क साधता येतो, तिच्या आकलनाचे प्रमाण एखाद्या क्षेत्रात घन तर दुसऱ्या एखाद्या क्षेत्रात विरळ असू शकते. एकभाषिक समाजाच्या भौगोलिक क्षेत्रात सर्वांत जास्त अंतर असणाऱ्या दोन ठिकाणच्या व्यक्तींना प्रमाणभाषेने भाषिक व्यवहार ज्या प्रमाणात सहजपणे करता येतो, त्याप्रमाणात आपापल्या पोटभाषांद्वारे करता येत नाही. भाषेच्या जीवनात सामाजिक, राजकीय, धार्मिक किंवा वैचारिक परिवर्तने निर्माण झाल्याने एखाद्या भाषेचे प्रमाणभाषा हे स्थान नाहीसे होऊन, एखादी पोटभाषा ' राजमान्यत्व ' मिळवून ' प्रमाणभाषा ' या पदवीला पोचू शकते. बौद्ध धर्माच्या प्रचारासाठी जन-सामान्यांची पाली भाषा जेव्हा वापरली जाऊ लागली तेव्हा तिचे मर्यादित संपर्काचे क्षेत्र साधणारी असे स्वरूप नाहीसे होऊन, तिचे संपर्काचे क्षेत्र ' विस्तृत ' होऊन, तिला प्रतिष्ठा प्राप्त झाली. एका काळी पोटभाषा म्हणून मानली गेलेली ' कोंकणी ' भाषा साहित्य अकादमीच्या मान्यतेमुळे, स्वतःची लिपी नसताही ' राजमान्यत्व ' मिळवून बसली आहे. ती आता मराठीची पोटभाषा न राहता स्वतंत्र भाषा ठरली आहे. कोंकणीला मिळालेली ' प्रतिष्ठा ' महाराष्ट्र राज्यासाठी नसून मराठी भाषिक समाजा-पासून सुटलेल्या अगर स्वतःला सोडवू इच्छिणाऱ्या विशिष्ट भाषिक गटासाठी आहे. उद्याच्या काळात ' अहिराणी ' ही पोटभाषा बोलणाऱ्यांनी स्वतःला मराठी भाषिक समाजापासून वेगळे मानले व आपली भाषा मराठी नसून ' अहिराणी ' आहे असे ठरविले तर अहिराणीला प्रमाणभाषेचे स्थान मिळणारच नाही असे सांगता येत नाही. कोकणी भाषेच्या बाबतीत कोकणी समाजात घडलेली वैचारिक, राजकीय क्रान्ती कोकणी भाषेला प्रमाणभाषेचा दर्जा मिळवून देण्यास कारणीभूत ठरल्याने, जुन्या मराठी-पासून आज कोकणी व मराठी अशा दोन भाषा निर्माण झाल्या असे, किंवा कोकणी व मराठी या दोन्ही भाषा कोणत्यातरी समान भाषावंशातून उत्क्रांत झालेल्या भाषा आहेत असे, विधान करण्याची गरज निर्माण झाली आहे.

प्रमाणभाषा लिखित स्वरूपात वापरताना 'शुद्धाशुद्ध' विवेक करावा लागतो, पोटभाषा लिहिताना अशा शुद्धाशुद्ध विवेकाला शिष्टमान्य असे निकष असत नाहीत. प्रमाणभाषा हे मूलतः कृत्रिम साधन आहे, पोटभाषा हे तसे कृत्रिम साधन नाही.

प्रमाणभाषा व पोटभाषा यांमध्ये वरील स्वरूपाचे कित्येक फरक असले तरी त्या दोन्ही, एकभाषिक समाजाच्या भाषा या संस्थेच्या 'घटकभूत' असतात. त्या परस्परांशी सहकार्य करीत असून त्यात उच्चनीचत्वाचा फरक नसतो. व्यक्तीचा हेतू, तिची सवय, तिचा दर्जा, तिचे शिक्षण, आत्माविष्कार व आत्मनिवेदन करण्याची व्यक्ती-व्यक्तीची कुवत, बहुश्रुतता वगैरे अनेक गोष्टींवर, दळणवळणाचे साधन म्हणून प्रत्येक व्यक्ती आपापल्या भाषेचा वापर करीत असते. कोणती व्यक्ती आपली भाषा कशी वापरते यावरून त्या व्यक्तीचे समाजातील स्थान पुष्कळ वेळा कळून येऊ शकते.

१.८. भाषेचा अभ्यास व प्रमाणभाषा

१.८. (अ) भाषा व समाज :

भाषा व समाज यांचा संबंध अन्योन्याश्रयी असल्याने भाषेच्या सर्वांगीण अभ्यासात समाजाच्या अभ्यासाचाही अंतर्भाव होतो. प्रत्येक व्यक्तीचे जीवन काही विशिष्ट संस्थांच्या द्वारे चाललेले असते. व्यक्तीच्या सवयीप्रमाणे समाजालाही आपले जीवन चालविण्यासाठी काही सवयी असणे इष्ट असते. या सवयी दीर्घकालपर्यंत राहू शकतात किंवा राहतात, आणि त्यांनाच 'रूढी'[1] म्हटले जाते. भाषा हीही एक 'रूढी' च आहे. कालगतीला अनुसरून होणारे परिवर्तन ही समाजजीवनाच्या सर्व क्षेत्रांत घडणारी अपरिहार्य गोष्ट असल्याने समाजजीवनातील परस्परविनिमयाचे साधन असणाऱ्या भाषा या रूढीत परिवर्तन घडणेही अपरिहार्य ठरते. या परिवर्तनाची कारणे[2] अनेक असू शकतील. ती अंतर्गत, बहिर्गत, वैचारिक अथवा घटनात्मकही असतील. हे परिवर्तन द्रुतगतीने चालणारे असेल अथवा मंदगतीने चालणारे असेल. ते स्वाभाविकपणे, सावकाश आणि नकळत घडून येईल किंवा क्रान्तीच्या रूपात तडफदारपणेही घडवून आणता येईल परंतु ते अखंडपणे चाललेले असते एवढे निर्विवाद. समाजाच्या या परिवर्तनशीलतेचा परिणाम भाषेच्या स्वरूपावर होत राहतो. या परिवर्तनाचा अभ्यास करताना त्या त्या काळाच्या समाजजीवनाची दखल घेणे जरुरीचे असते. मराठी भाषेमध्ये उर्दू, पोर्तुगीज किंवा इंग्रजी शब्दांचा भरणा कसा झाला याचा अभ्यास करताना मराठी भाषिक समाजावर हुकुमत करणाऱ्या बहामनी, मोगल, पोर्तुगीज व इंग्रज राज्यकर्त्यांच्या कारकीर्दीचा अभ्यास केल्याशिवाय नीट उलगडा करणे शक्य होणार नाही. भाषेमध्ये समाजजीवनाचे प्रतिबिंब पडत असल्याने समाजाचा किंवा संस्कृतीचा अभ्यास करण्या-

१. भाषा आणि संस्कृति – कालेलकर – पृ. ६०.
२. भाषा आणि संस्कृति – कालेलकर – पृ. ६१.

साठी भाषेच्या अभ्यासाची नितान्त जरुरी असते. संस्कृतमधील ' दुहिता ' शब्दावरून तत्कालीन समाजात मुली धार काढीत असाव्यात असा तर्क करता येतो. ' व्रतबंध ' किंवा ' मौंजीबंधन ' यांसारख्या शब्दांवरून त्या काळच्या समाजातील विशिष्ट वयाच्या मुलांवर विशिष्ट संस्कार केला जात असावा असे विधान करता येते. भाषेमध्ये वापरले जाणारे विशिष्ट शब्द हे त्या काळच्या समाजाचे प्रतिबिंब दाखवतात. समाजाची जशी गरज असेल, तसे भाषेत नवनवीन शब्द येत असतात; मग ते शब्दसमूह स्वभाषेतील शब्दांना नवीन अर्थ प्राप्त होऊन आलेले असोत, परभाषेतील शब्दांना स्वतःच्या भाषेचा साज चढवून आलेले असोत, किंवा परभाषेतून जसेच्या तसे आलेले असोत. निव्वळ शब्दसमूहच नव्हे तर शब्दांच्या रचनादेखील आलेल्या दिसतात. बस पकडली. रिक्षा धरली इत्यादी प्रयोग इंग्रजीतून मराठीत सहजपणे आलेले आढळून येतील.

समाज व भाषा यांचे परस्परांना प्रतिबिंबित करणारे नाते असल्याने कोणत्याही एकाच्या अभ्यासास काही प्रमाणात तरी दुसऱ्याचा अभ्यास करणे अगत्याचे असते.

कोणत्याही भाषेच्या ' प्रमाणभाषेचे ' स्वरूप का व कसे ठरविले गेले याचा शोध घेताना हे भाषेचे प्रामाण्य ज्यांच्यामुळे ठरविले गेले त्या, समाजातील घटकभूत, प्रतिष्ठित, लोकांचा अभ्यास करणे जरुरीचे आहे. समाजातील काही लोकांना ' प्रतिष्ठा ' असते. ते जी भाषा वापरतात त्यावरून ' प्रमाणभाषा ' व ' प्रमाण बोली ' यांची स्वरूपे निश्चित होतात. ते ज्या प्रकारे लिहितील तशा प्रकारे लिहिणे व ते ज्याप्रकारे बोलतील त्या-प्रकारे बोलणे, ' शुद्ध ', ' अनुकरणीय ' किंवा ' दर्जेदार ' मानले जाऊ लागते. प्रमाण-भाषेच्या स्वरूपाचा अभ्यास करताना समाजाच्या या विशिष्ट गटाचा शोध घेतल्यास प्रमाणभाषेचे स्वरूप व कालानुरूप त्या भाषेत घडलेले बदल इत्यादी गोष्टींची कारण-परंपरा स्पष्ट होऊ शकते.

१.८. (ब) भाषा व इतिहास :

वर्तमानकाळात एखाद्या गोष्टीचे अस्तित्व असते तर भूतकाळात त्या गोष्टीचा इतिहास असतो. आज व काल या शब्दांनी व्यक्त होणाऱ्या मर्यादा सापेक्ष असल्या तरी ' आज ' च्या आधी ' काल ' असतो व नंतर ' उद्या ' येणार असतो. अभ्यासाच्या सोयीनुसार ' आज ' ची मर्यादा नक्की करून आजपासून, ज्ञात अशा कालखंडापर्यंत एखाद्या गोष्टीचे अस्तित्व शोधीत जाणे म्हणजे त्या गोष्टीच्या इतिहासाचा मागोवा घेणे. भाषेच्या ध्वनिरूपत्वामुळे ती क्षणजीवी असली तरी ती परंपरेने वापरात येत असल्याने तिला इतिहास असतो.

भाषेच्या आजच्या स्वरूपाचे वर्णन करताना त्यातील कित्येक गोष्टी केव्हा व कशा अस्तित्वात आल्या याचा तपास करण्यासाठी भाषेचा इतिहास पाहावा लागतो. मराठी भाषेला ' मराठी ' हे नाव कोणत्या काळी प्राप्त झाले हे देखील इतिहासाशिवाय शोधता येणार नाही.

ध्वनिरूपत्वामुळे भाषेला असणाऱ्या क्षणभंगुरतेने भाषेला इतिहास असूनही तो उपलब्ध असणे अवघड ठरते. शिवाय भाषा ही फार मोठ्या भौगोलिक क्षेत्रात बोलली जाणारी असल्याने तिचे संपूर्ण स्वरूप आकलन होणे व नंतर ते मांडून दाखवणे हेही अवघड. भाषेचा इतिहास जाणण्यास ध्वनिरूप भाषा उपलब्ध नसली तरी लिखित भाषा व परंपरागत मुखोद्‌गत वाङ्मयाच्या रूपाने अस्तित्वात आलेली भाषा उपलब्ध होऊ शकते.

काळाच्या ओघात जिचे वाङ्मय टिकून आहे अशी लिखित भाषा इतिहासदृष्टीने अभ्यासिताना ती तत्कालीन उच्चारणपद्धतीच्या संदर्भात जाणून घ्यावी लागते. परंपरागत मुखोद्‌गत वाङ्मय हे भाषेच्या स्वाभाविक परिवर्तनशीलतेमुळे आपल्या काळातील उच्चारण अंगाचे यथायोग्य दर्शन करू शकत नाही. परंतु दोन्ही प्रकारच्या वाङ्मयाच्या भाषिक अभ्यासातून भूतकाळातील भाषेच्या स्वरूपाचा अंदाज बांधणे काही प्रमाणात तरी शक्य होते.

मुखोद्‌गत व लिखित वाङ्मय उपलब्ध असूनही, वाङ्मयाच्या स्वाभाविक मर्यादांमुळे भाषेचे इतिहासगत स्वरूप सांगण्यात अपुरेपणा राहण्याची शक्यता असली तरीही त्या वाङ्मयाभ्यासाच्या मदतीने वर्तमानकालीन भाषेचा इतिहास सांगणे शक्य होते.

लेखकाचा समाजाशी असलेला संबंध, लेखकाचे सामाजिक स्थान आपल्या आविष्कारांना ‘अक्षर’ करण्यामागचा लेखकाचा हेतू हे लिखित भाषेतून शोधून घेतले तर, इतिहासकालीन लिखित वाङ्मय हे तत्कालीन प्रमाणभाषेत किंवा प्रमाणभाषेला जवळच्या भाषेत लिहिले गेले आहे किंवा नाही हे ओळखता येईल. समकालीन दोन लेखकांच्या वाङ्मयात आपापल्या बोलीची वैशिष्ट्ये जरी आलेली असली तरी त्यांच्या भाषांच्या तुलनात्मक अभ्यासाने साम्यस्थळे शोधून काढून तत्कालीन शिष्टमान्य किंवा प्रमाणभाषेचे स्वरूप काय होते हे विशद करता येईल.

एका ग्रंथाच्या अभ्यासाने भाषेचे एककालिक स्वरूप स्पष्ट करता येते. समकालीन अशा एकापेक्षा अधिक ग्रंथांच्या भाषिक परिशीलनाने, लेखकांची बोली वैशिष्ट्ये जशी शोधता येतात तशीच तत्कालीन प्रमाणभाषेचीही वैशिष्ट्ये सांगता येतात.

एका भाषेच्या ऐतिहासिक अभ्यासातून, भाषेच्या परिवर्तनशीलतेमुळे भाषेत ‘प्रामाण्या’संबंधी काही बदल पडले आहेत किंवा काय, पडले असल्यास ते कोणते आहेत, नवे प्रामाण्य प्रस्थापित होण्यास कारणे कोणती घडली, ती कारणे राजकीय, सामाजिक वगैरे कोणत्या स्वरूपाची होती, इत्यादी प्रकारचा मागोवा घेतल्यास वर्तमानकालीन भाषेच्या प्रामाण्यासंबंधीची काही निश्चित स्वरूपाची विधाने करण्यास काही दिशा मिळू शकेल.

भाषेच्या सर्वसाधारण अभ्यासात अशा प्रकारच्या एका भाषेच्या प्रामाण्याचा शोध घेणाऱ्या अभ्यासाने भाषेला प्रामाण्य मिळत असते की दिले जात असते, दिले जात असल्यास ते कोणत्या कारणांनी व कोणत्या निकषांनी दिले जाते, इत्यादींचा शास्त्रीय

अभ्यास करता येऊन वर्तमानकालातील भाषेच्या प्रामाण्याच्या बाबतीत काही विवाद्य गोष्टींना ' प्रमाण मानावे की नाही ' यासाठी ' परंपरागतता ' हा निकष मिळू शकेल. एखाद्या भाषेच्या प्रमाण स्वरूपाच्या प्रामाण्याचा अभ्यास करताना भाषेच्या इतिहासाचा अभ्यास उपयुक्त व मार्गदर्शकही होऊ शकतो, त्यादृष्टीने लिखित वा मुखोद्गत वाङ्मयाची परंपरा तपासणे हे भाषाभ्यासकाचे अशा वेळी आवश्यक काम ठरते.

१.८. (क) भाषा व भूगोल :

एखादी भाषा जेथे बोलली जाते ते भौगोलिक क्षेत्र या संदर्भात भाषा व भूगोल यांचा संबंध येतो. या क्षेत्राचे विशिष्ट स्वरूप काही वेळा भाषिक दळणवळणावर परिणाम करू शकते म्हणून भाषेच्या अभ्यासाच्या संदर्भात या भौगोलिक क्षेत्राचाही विचार करावा लागतो. उदाहरणार्थ, पूर्वीच्या काळी दळणवळणाची साधने वेगवान नसल्याने कोकणच्या व घाटावरच्या माणसांची भाषिक देवाणघेवाण हल्लीच्या मानाने कमी चालत असे, त्यामुळे त्या दोन्ही ठिकाणच्या व्यक्तींची आपापली भाषिक वैशिष्ट्ये अधिक काळ टिकून राहण्याची व कालांतराने परस्परांस आकलनास कठीण होण्याची शक्यता भाषाभ्यासकाने लक्षात घेणे जरुरीचे ठरते. उलट हल्लीच्या काळातील दळणवळणांची वेगवान साधने, मानवी जीवनातील यंत्रांचा वाढता वापर, वाढत्या प्रमाणातील उद्योगधंद्यांच्यामुळे परस्परसंपर्कांचे वाढते क्षेत्र यामुळे भाषिक दळणवळणाला मिळालेल्या गतीने प्रमाणभाषेच्या वापराची शक्यता अधिक वाढलेली आढळून येते.

मराठी ही महाराष्ट्राची राजभाषा असून सन १९७१ च्या शिरगणतीनुसार महाराष्ट्रात ३,८६,१६,८५७ इतके लोक व इतर राज्यांत ३६,३४,३५० इतके लोक मराठी भाषा बोलतात. मराठी भाषेच्या प्रमुख क्षेत्राच्या सीमा प्रांताजवळ तेलगु, कानडी या द्राविडी भाषा व गुजराथी, हिंदी या आर्यभाषा बोलणारे राहतात. याचा अर्थ सीमा प्रांतात राहणाऱ्या मराठी भाषिकाला वरील चार पैकी कोणती ना कोणती एक भाषा निदान समजण्यापुरती तरी येते. याचा परिणाम मराठीच्या भौगोलिक क्षेत्राच्या सीमेवर राहणाऱ्या लोकांच्या भाषेवर होणे अपरिहार्य असते. सीमाप्रांतातील लोकांच्या भाषेमध्ये मिसळल्या गेलेल्या इतर भाषांतील शब्द, व्याकरणिक अंगे किंवा उच्चारण इत्यादी भाषाविषयक अंगांपेक्षा मराठीच्या भौगोलिक क्षेत्राच्या मध्यवर्ती ठिकाणी असणाऱ्यांच्या भाषेत परभाषेच्या मिश्रणाची शक्यता कमी राहते. यामुळे दोन दोन ठिकाणी राहणाऱ्या, एकच भाषा बोलणाऱ्यांच्या फरकांच्या प्रमाणावरून एखाद्या ठिकाणची भाषा मराठीची पोटभाषा मानावी किंवा नाही याचा निर्णय करता येतो.

कोकण व देश या क्षेत्रातील मराठी भाषिकांच्या बोलण्यात जे फरक दिसतात त्याला सह्यपर्वताचे अस्तित्व, त्याच्या भाषिक दळणवळणाचा वेग कमी करण्यास कारणीभूत होण्याच्या शक्यतेने, कारणीभूत आहे असे म्हणता येईल.

कित्येक वेळा एकभाषिक समाजातील एक गट आपल्या मूळ ठिकाणापासून निघून दुसऱ्या एखाद्या भौगोलिक क्षेत्रात स्थिर होतो. तेथून त्याचा त्याच्या त्याच्या केंद्रस्थानाशी संपर्क राहिला तर त्या गटाची भाषा काळाच्या ओघात मूळ भाषेपेक्षा बदलण्याचे प्रमाण कमी राहू शकते, स्वतःची भाषा व केंद्रस्थानाची भाषा एकच आहे असे तो मानतो. स्वतःच्या भोवतालच्या भाषेचे परिणाम त्या भाषेवर होत राहिले तरी मूळच्या केंद्राच्या संपर्कामुळे अथवा प्रमाणभाषेच्या वाचनामुळे, शिक्षणामुळे, त्या गटांची भाषा आपल्या स्वतःच्या वैशिष्ट्यांनी युक्त अशी 'पोटभाषा', या स्वरूपात अस्तित्वात राहते. ग्वाल्हेर, बडोदे, इंदूर इत्यादी एका काळच्या संस्थानिकांच्या भौगोलिक क्षेत्रात मराठी बोलली जात असल्याचे आजही दिसून येते. त्यामागचे कारण, मराठी भाषिक समाजाचा एक गट आपल्या समाजापासून दूर जाऊन दुसऱ्या ठिकाणी स्थिर होण्यात आहे.

केंद्रस्थानापासून दूर जाणाऱ्या भाषिक गटाचा केंद्रस्थानाशी भाषिक संपर्क राहिला नाही तर काळाच्या ओघात भाषा इतकी बदलते की मूळ समाजाच्या लोकांशी भाषिक व्यवहार करण्याची वेळ आली तर परस्परआकलन कधी कधी शून्यही राहते. अशा वेळी मूळ समाजापासून दूर गेलेल्या लोकांची भाषा केंद्रस्थानीय लोकांपेक्षा वेगळी आहे असे मानावे लागते. इंडोयुरोपिअन भाषांचा इतिहास हे अशा प्रकारच्या घटनेस पुरेसे उदाहरण आहे. मराठी व इंग्रजी या भाषा एका समानस्रोतापासून निघूनही परस्परआकलनाचे प्रमाण त्यामध्ये शून्यच आहे.

एकाच भौगोलिक क्षेत्रातील भाषाभिन्नत्व किंवा भाषाभेद, दोन भौगोलिक क्षेत्रांतील भाषाभेद किंवा भाषासाम्य यांची मूळ कारणे निरनिराळी असू शकतात. भाषेच्या भौगोलिक क्षेत्राचा अभ्यास हा भाषेतील परिवर्तने शोधणे, भाषेचा इतिहास सांगणे, पोटभाषांचे गट पाडणे, विशिष्ट समाजाच्या जीवनातील भौगोलिक स्थित्यंतरासारख्या हालचाली समजावून घेणे अशा विविध हेतूंनी उपयुक्त असतो. विशिष्ट क्षेत्रातील भाषा 'प्रमाण' का मानली गेली, कोणती पोटभाषा प्रमाणभाषेपासून जास्त अंतर राखते हे जाणण्यासाठीसुद्धा भाषेच्या भूगोलाचा उपयोग होतो. पोटभाषा जशा भाषेच्या स्वरूपातील साम्यभेदांवरून ठरविल्या जातात तशाच त्या भौगोलिक क्षेत्रांवरूनही ओळखल्या जाऊ शकतात.

मराठीच्या प्रमाणभाषेच्या इतिहासात पुण्याची मराठी भाषा ही प्रमाण मानली गेली त्यामागील ऐतिहासिक, राजकीय व सामाजिक कारणांच्या जोडीने, ती मराठी भाषिक क्षेत्राच्या मध्यवर्ती स्थानात होती हीही गोष्ट दुर्लक्षून चालणार नाही. परभाषिक संपर्कापासून ती महाराष्ट्राच्या मध्यभागात असल्याने, जास्तीत जास्त दूर होती, म्हणूनच सीमाप्रांतातील मराठीवर होणाऱ्या भाषिक परिणामांपेक्षा या मराठीवर परभाषेचे परिणाम होण्याची शक्यता तुलनेने कमी होती हे उघड आहे.

१. ८. (ड) भाषा व (राज्य) शासन :

भाषेच्या जीवनावर राज्यकर्त्यांच्या जीवनाचा फार परिणाम होतो असे दिसून येते. मराठी भाषेच्या इतिहासात यादवकाल, बहामनीकाल, शिवकाल, पेशवेकाल, आंग्लकाल व सध्याचा स्वातंत्र्योत्तर काल असे ठळक टप्पे आपापल्या वैशिष्ट्यांनी युक्त असे दिसून येतात. स्वभाषी राज्यकर्ते, परभाषी राज्यकर्ते व प्रत्येकाचा भाषेच्या बाबतीतला विशिष्ट आग्रहीपणा यांचे परिणाम भाषेच्या सामान्य व्यवहारावर होत असतात. विशेषतः प्रमाणभाषेच्या स्वरूपात हे परिणाम जास्त स्पष्ट दिसतात. प्रमाण-भाषेच्या वापराचे क्षेत्र औपचारिक प्रसंगांसाठी व व्यापक क्षेत्रात संपर्क साधण्यासाठी समाविष्ट होत असल्याने राज्यकर्त्यांच्या आग्रहाची किंवा इच्छेची पहिली छाप शासनाशी संबंधित अशा भाषेच्या वापरात दिसून येते. पेशव्यांच्या काळात त्यांची सत्ता अ-मराठी प्रांतावर असली तरी त्यांनी तेथे मराठी भाषा लादण्याचा प्रयत्न केलेला दिसत नाही. परकीय राज्यकर्ते आपली भाषा शासनव्यवहारासाठी वापरतात तेव्हा जित समाजातील शासनाशी निगडित अशा गटाला त्यांची भाषा शिकल्यावाचून गत्यंतर राहात नाही. बहामनी कालात मराठी भाषेवर यावनी परिणाम झाले किंवा शिवकालात ' राज्य–व्यवहार कोश ' करून शासनात मराठी भाषा वापरण्याचा आग्रह शिवाजीने धरला या गोष्टी जित-जेते संबंधांतील भाषिक प्रभावांची उदाहरणे म्हणून दाखवता येतील. ब्रिटिश राज्यकर्त्यांनी शालेय शिक्षणाच्या उच्च, माध्यमिक व विश्वविद्यालयीन स्तरावर इंग्रजी माध्यम व इंग्रजी शिक्षण सक्तीचे केले. याचा परिणाम त्या वेळच्या विद्यार्थ्यांच्या भाषेवर, पर्यायाने तत्कालीन मराठीवर झाल्याशिवाय राहिला नाही. आज मराठीला राज्यभाषा म्हणून, हिंदीला राष्ट्रभाषा म्हणून व इंग्रजी ही संपर्कभाषा व ज्ञानभाषा असल्याने प्रतिष्ठा पावलेली म्हणून तिन्ही भाषांना महत्त्व प्राप्त झाले असले तरी, शासन व्यवहारात जोपर्यंत संपूर्ण मराठीत व्यवहार चालत नाही तोपर्यंत खऱ्या अर्थाने मराठी राज्यभाषा होऊ शकत नाही हे आजच्या घडीला स्पष्ट झालेले आहे. संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती झाल्यावर इतकी वर्षे होऊनही मराठीला योग्य ती प्रतिष्ठा न लाभल्याने शासनाला सन १९७९ हे वर्ष राज्यभाषा वर्ष म्हणून जाहीर करावे लागले. ही घटना दोन गोष्टी स्पष्ट करण्यास पुरेशी आहे. एक म्हणजे शासनाने घालवायची म्हटले तरी अनेक वर्षे सुप्रतिष्ठित झालेल्या भाषेची प्रतिष्ठा कमी करणे तितके सहज नसते, व दुसरी म्हणजे शासनाने ठरविल्यास काही कालावधीत का होईना, ते विशिष्ट भाषेला प्रतिष्ठा देऊ शकते. शासन व भाषा यांचे संबंध अशा प्रकारे परस्पराश्रयी असतात.

१.८. (ई) भाषा व व्याकरण :

भाषा अस्तित्वात येते तेव्हा ती तिच्या व्याकरणासहच असते. भाषा व व्याकरण यात एक आधी व एक मागून अशी परिस्थिती नसते. पण ज्या वेळी व्याकरणाची

जाणीवपूर्वक नोंद घेतली जाते तेव्हा 'भाषेचे व्याकरण' या शब्दात भाषेच्या स्थिती व गतीचे स्वरूप सांगितले जाते. भाषेचे व्याकरण लिहिण्यामागे जसे उद्देश असतील त्यानुसार भाषेचे विशिष्ट स्वरूप व्याकरणासाठी निवडले जाते. रूढ अर्थाने हे भाषेच्या शिष्टमान्य स्वरूपाचेच म्हणजे प्रमाणभाषेचे वर्णन करणारे असते. परभाषिकाला भाषा शिकविण्यासाठी व स्वभाषिकाला शिष्टमान्य भाषा समजावून देण्यासाठी व्याकरणांचा उपयोग केला जातो. भाषेचे स्वरूप व्याकरणाद्वारे मांडताना काटकसर, यथायोग्यता, सुस्पष्टता वगैरे अनेक निकष सांभाळणे अपेक्षित असते. लिखित भाषेचे किंवा बोल-भाषेचे जसे व्याकरण लिहिता येते तसेच विशिष्ट ऐतिहासिक कालखंडातील लिखित भाषा किंवा वर्तमानकालातील लिखित भाषा यांचेही व्याकरण केले जाऊ शकते. शाळाखात्याच्या उपयोगासाठी, परभाषिकांना शिकविण्यासाठी व स्वभाषिकांना प्रमाण-भाषेचे स्वरूप दाखविण्यासाठी लिहिली गेलेली व्याकरणे आदेशात्मक असतात. त्यांच्या योगाने शुद्ध-अशुद्ध, चूक-बरोबर, मान्य-अमान्य, शिष्ट-अशिष्ट असा भाषाविवेक ओळखण्याचे मार्गदर्शन होते. वरील प्रकारचा काही हेतू न ठेवता केवळ भाषेचे स्वरूप सांगणारी व्याकरणे वर्णनात्मक असतात. एखाद्या भाषेचे व्याकरण उपलब्ध असणे, नसणे किंवा एखाद्या भाषेच्या व्याकरणांची परंपरा उपलब्ध असणे, नसणे या गोष्टी त्या भाषेचे विशिष्ट सामाजिक महत्त्व व्यक्त करीत असतात. ज्या भाषेला व्याकरण परंपरा आहे ती भाषा तिच्या गतकाळात बराच कालखंड राजमान्यता पावलेली आहे असे समजण्यास हरकत नाही. कोणत्याही भाषेच्या प्रमाणभाषा स्वरूपांचा अभ्यास करताना त्या भाषेच्या व्याकरण-परंपरेचा निश्चितच उपयोग होतो. ज्या भाषेचे एककालिक व्याकरणच उपलब्ध आहे ती भाषा एकतर पोटभाषा असावी किंवा अत्यल्प काळासाठी काही महत्त्व पावलेली असावी असा तर्क करायला हरकत नाही.

व्याकरणावरून भाषेच्या उच्चारणाची व त्या उच्चारणांच्या अक्षरांशी असलेल्या संदर्भाची कल्पना येऊ शकते. भाषा बोलणे व भाषा लिहिणे या गोष्टी परस्परसुसंगत असल्या तरी त्या स्वतंत्रपणे शिकावयाच्या गोष्टी आहेत. भाषा जेव्हा बोलायला शिकली जाते तेव्हा ती जाणीवपूर्वक शिकण्याची बाब ठरते. नाहीतर वानगी–वांगी, मनी–मणी, वात–वाट यांसारखे फरक कसे मांडावे हे न कळल्याने आपल्याला जे व्यक्त करावयाचे आहे ते योग्य प्रकारे व्यक्त न होण्याची स्थिती निर्माण होते. प्रमाणभाषेच्या अभ्यासा-साठी तर लेखनाचा अभ्यास ही अत्यावश्यक बाब आहे. कारण प्रमाणभाषा ही मुख्यतः लिखित स्वरूपातच असते. लेखनाद्वारे एखादे वाक्य प्रश्न, उद्गार की विधान आहे हेही दाखवून द्यावे लागते. आपल्याला जे व्यक्त करावयाचे आहे ते कशा प्रकारे लिहिले असता योग्य किंवा अपेक्षित अर्थ सूचित करील यासाठी व्याकरणाचे ज्ञान उपयुक्त ठरते. 'सोयी, सवयी' यांसारखे शब्द 'सोई, सवई' असे लिहिल्यास फायदे किंवा तोटे काय होतील हे व्याकरणाच्या अभ्यासाने अशा प्रकारे सांगता येते की असे लिहिल्याने ते शब्द गवई, तिवई या शब्दांशी समान ठरतील व आपले अनेकवचन दाखवण्याचे कार्य

करू शकणार नाहीत. कोणत्या प्रयोगाला शुद्ध किंवा प्रमाण मानायचे हे ठरविण्यास त्या भाषेच्या शिष्टमान्य स्वरूपाचे व्याकरण निर्णायक ठरू शकते. कारण असे व्याकरण त्यात वर्णन केलेल्या प्रयोगांची शिष्टमान्यताच स्पष्ट करीत असते.

१.९. उपसंहार :

कोणत्याही भाषेच्या विविध स्वरूपातील प्रमाणभाषा व प्रमाणबोली यांच्या स्वरूपाचा विचार करण्यापूर्वी भाषाशास्त्रदृष्ट्या भाषेच्या अभ्यासाच्या विविध अंगांची जरूरी कशी असते तें आतापर्यंत आपण पाहिले, भाषाभ्यासासाठी संख्याशास्त्र, मानसशास्त्र, समाजशास्त्र, मुद्रणशास्त्र इत्यादी शास्त्रे, कायमोग्राफ, टेपरेकॉर्डरसारखी विविध उपकरणे उपयुक्त ठरत असतात. विशिष्ट भाषेचा अभ्यास करताना ती भाषा बोलणारे लोक, तिचे भौगोलिक क्षेत्र, समाजातील विविध परिवर्तने, शास्त्रीय शोधांमुळे टेलिफोन, रेडिओ, टेलिव्हिजन यांसारख्या ठिकाणी होणारे भाषेचे विविध प्रकारचे वापर, इत्यादी अनेक गोष्टींचा परामर्श घ्यावा लागतो. कोणत्याही भाषेला लागू पडणाऱ्या शास्त्राचा वापर विशिष्ट संदर्भात करून, त्यासाठी आपली पायाभूत गृहीते स्पष्ट करून घेऊन भाषा अभ्यासावी लागते. प्रमाणभाषेसारख्या, सर्व समाजाशी संपर्क राखणाऱ्या भाषाभेदाचा अभ्यास करताना तर वरील प्रकारचे भाषेशी संबंधित असे अनेकविध दृष्टिकोन असणे आवश्यक आहे.

* * *

२

मराठी साहित्याचा इतिहास

२.१. प्रास्ताविक :

एखाद्या नदीचा प्रवाह वर्षानुवर्षे वाहत राहावा तसे भाषेचे असते. निदान मराठी भाषेच्या बाबतीत तरी तसे घडले आहे. वास्तविक आजची मराठी म्हणजे एके काळची संस्कृतच. संस्कृत भाषा बदलत बदलत आजच्या स्वरूपाला आली आणि काळाच्या ओघात तिला केव्हा तरी, कोणाकडून तरी ' मराठी ' असे नामाभिधान झाले, तेच नाव आज-तागायत चालू राहिले आहे. कालगतीनुसार याच भाषेला पुन्हा कोणीतरी केव्हातरी नवे नामाभिधान देईपर्यंत चालू राहणार आहे, किंवा या भाषेला ' मृत भाषा ' असा शिक्का लागेपर्यंत चालू राहणार आहे.

भाषेच्या परिवर्तनशीलतेमुळे भाषेच्या प्रवाहाच्या विविध कालखंडांना त्यांच्या त्यांच्या वैशिष्टयांमुळे विविध नावे प्राप्त होऊ शकतात. मराठीलाही आज प्राचीन, आंग्लकालीन, अर्वाचीन इत्यादी विशेषणे लागू पडत आहेत. भाषेच्या सलग प्रवाहात असे कालखंड दाखविणे कृत्रिम असते. कारण ही विभागणी फूटपट्टीने मोजून कापलेल्या तुकडयांसारखी नसते तर इंद्रधनुष्याच्या सात रंगांचे वर्णन करण्यासारखी असते. कोणता रंग कोठे सुरू झाला याची काटेकोर रेषा दाखविता आली नाही तरी जेथे जो रंग ठळक असेल त्या ठळकपणाच्या प्रमाणात इंद्रधनुष्याचे सात रंग जसे सांगता येतात तसेच भाषेच्या जीवन-प्रवाहाचे कालखंड सांगता येतात.

भाषेच्या अस्तित्वाचे भिन्न कालांत खंड पाडताना वेगवेगळे निकष वापरता येणे शक्य असते. यासाठी आवश्यक अशी भाषा वाङ्मयीन पुराव्यानेच सिद्ध होणार असते. हे वाङ्मयीन पुरावे अंतर्गत, म्हणजे भाषेतील प्रत्यक्ष वाङ्मयाच्या स्वरूपांचे, व बाह्य, म्हणजे भाषेसंबंधी इतरत्र आलेल्या उल्लेखांचे असतात. या पुराव्यांचा वापर, भाषा अभ्यासताना त्यांच्या मर्यादा जाणून घेऊनच करावा लागतो. ' रिकामा न्हावी आणि कुडाला तुंबडया लावी ' ही आजच्या काळातील म्हण कदाचित ' रिकामा नावी (होडी चालविणारा नाविक) कुडाला (झोपडीची कुडाची भिंत) तुंबे (तराफ्याला खालच्या बाजूने लावायचे भोपळे) लावी, ' अशी असू शकेल अशी शंकाही मनात येत नाही. 'पुराणातली वांगी पुराणात' या म्हणीतील ' वांगी ' शब्द, लेखकाने 'वानगी (उदाहरण)

ऐवजी वांगी ' अशा प्रकाराने लिहिल्याने नंतरच्या काळात तसाच प्रसृत झाला असेल असे मनातही येत नाही. अशा प्रकारे भाषेच्या अभ्यासासाठी वापरावयाचे मुखोद्‌गत अथवा लिखित वाङ्मयाचे पुरावे त्यातील उणीवा लक्षात घेऊन वापरावे लागतात. हे पुरावे कसे वापरावे, त्यांच्या उणीवा कशा दूर कराव्या यासंबंधी आज Textual Criticism या नावाचे शास्त्रही उपलब्ध झाले आहे. या शास्त्राचा वापर करून संशोधित व संपादित केले गेलेले लिखित साहित्य हा भाषाभ्यासाचा खरा मूळ आधार. ते जेवढया प्रमाणात उपलब्ध असेल तेवढयाचाच उपयोग करून भाषाभ्यास करावा लागतो.

लिखित साहित्य हे भाषेच्या उच्चारणावर फारसा प्रकाश टाकू शकत नाही. ' लोकसत्ता ' वर्तमानपत्रात एकदा ' काँग्रेस ' हा शब्द ' कॉन्ग्रेस ' असा लिहिलेला आढळला. हे वर्तमानपत्र, समजा, योगायोगाने एखाद्याने लिखित भाषेचा पुरावा म्हणून वापरले तर त्या अभ्यासकाने ' कॉन्ग्रेस ' मधील ' न् 'चा उच्चार ' भानगड ' मधील ' न ' सारखा करावयाचा की ' भंगडमधील ङ् ' सारखा समजायचा ? वास्तविक ' न ' हा वर्ण इतरत्र दंत्य उच्चार दाखवितो. त्यामुळे ' काँग्रेस ' शब्द ' कॉन्ग्रेस ' (दन्त्य ' न् ' सह समजला जाण्याची शक्यता उद्याच्या काळात अधिक वाढते. तसेच ' वानगी ' मधील ' न 'चा अनुस्वार नको तेथे दिल्याने ' पुराणातली वांगी पुराणात ' ही म्हण शब्दघटकातून अर्थदृष्टया स्पष्ट करणे कठीण होऊ लागले ही गोष्ट लिखित वाङ्मयाच्या मर्यादा दाखविण्यास पुरेशी समर्पक आहे.

भाषेच्या स्वरूपातील बदलांवरून भाषेच्या प्रवाहाचे कालखंड पाडणे जसे शक्य असते तसेच या वैशिष्टयांच्या जोडीनें तत्कालीन समाजजीवनाचा अभ्यास करून कालखंड ठरविता येतात. वेदनिर्मितीच्या काळाच्या आधारावर वेदपूर्वकालीन भाषा, वैदिक भाषा, वेदोत्तर भाषा अशी संस्कृतची तीन कालखंडांत विभागणी करता येते किंवा संस्कृतचा व्याकरणकार पाणिनि याला मापन करून पाणिनिपूर्व, पाणिनीय व पाणिन्युत्तर संस्कृत असेही संस्कृतचे कालखंड पाडता येतात. मराठी भाषेचे कालखंड, राजवटींच्या आधारावर पाडून यादवकालीन, बहामनीकालीन, शिवकालीन, पेशवेकालीन, आंग्लकालीन अशी केलेली विभागणी सर्वश्रुत आहेच. मराठीच्या प्रमाणभाषेचा विचार करताना बदलत्या राजवटींमुळे बदलणाऱ्या समाजजीवनाचा मागोवा घेणे जसे जरुरीचे आहे तसेच इतर निकषही विचारात घेतले पाहिजेत. त्यात भारताचे भाषावार-प्रांतरचनेचे धोरण, मुद्रणकला इत्यादींचा समावेश होतो. उपलब्ध मराठी मुखोद्‌गत वाङ्मयाचा उपयोग प्रमाणभाषेचे स्वरूप ठरविण्यास त्याच्या कालाच्या अनिश्चिततेमुळे व ते प्रामुख्याने बोली भाषेतच असण्याची शक्यता असल्याने, फारसा होऊ शकणार नाही म्हणून प्रस्तुत अभ्यासात ते विचारांच्या कक्षेपासून दूर ठेवले आहे. तसेच लिखित वाङ्मयाचा प्रत्यक्ष परामर्श घेण्याऐवजी अनेक विद्वानांनी केलेल्या, वाङ्मयाच्या भाषिक

अभ्यासाचा येथे आधार घेतला आहे.[1]

२.२. मराठीचे लिखित वाङ्मय :

प्रमाणभाषेचे स्वरूप ठरविण्यास भाषेच्या संपर्काचे क्षेत्र हा महत्त्वाचा निकष असल्याने त्या निकषाद्वारे मराठीच्या लिखित वाङ्मयाचे प्रथम दोन विभागात येथे वर्गीकरण केले आहे : (१) कमी संपर्क साधणारे अमुद्रित वाङ्मय किंवा हस्तलिखिते व (२) अधिक संपर्क साधणारी मुद्रणलिखिते.

छापण्याच्या पद्धतीने लिखित ग्रंथांचा प्रसार होण्यास लागणारा वेळ व कष्ट यांच्याशी हाताने लिहिल्या गेलेल्या ग्रंथांच्या प्रसारासाठी लागणारा वेळ व कष्ट यांची तुलना केल्यास हस्तलिखितांचा प्रसार मुद्रणलिखितांपेक्षा कमी वेगाचा व कमी क्षेत्रात असणार हे उघड आहे. हस्तलिखित ग्रंथ देवळातून अथवा शिष्यपरिवारापुढे वाचले जाण्याची शक्यता असल्याने श्रवणसंपर्काच्या दृष्टीने अनेक व्यक्तींनी ऐकले असण्याची शक्यता जास्त असली तरी, म्हणजेच ग्रंथाचे श्रवण व पठण जास्त व्यक्तींसाठी एकाच वेळी होत असले तरी, ग्रंथ स्वतः वाचणारा वर्ग अर्थातच लहान राहणार. लेखकाने लिहिलेल्या ग्रंथाच्या प्रतींची संख्या जेवढी कमी तेवढा त्याचा वाचकवर्ग कमी असण्याची जितकी शक्यता तितकीच ग्रंथाची नक्कल तयार करण्याचे काम कष्टाचे असल्याने ग्रंथाची गुणवत्ता मोठी असण्याची शक्यताही जास्त. हे ग्रंथ शास्त्रीय व ललित वाङ्मयाच्या सदरात मोडणारे असू शकतात. त्यांच्या मागची प्रेरणा राजाज्ञा, गुर्वाज्ञा किंवा व्यक्तिगत तळमळही असू शकते. शासकीय दडपणाचे अपवाद वगळले तर ग्रंथावरील प्रेमाने, ग्रंथाचा वाचक किंवा पाठक व्हावे म्हणून, द्रव्यार्जनाच्या हेतूने किंवा ग्रंथ नकलून घेण्याच्या पुण्यकार्याच्या ओढीने त्या काळात ग्रंथांच्या प्रती तयार केल्या जाण्याची शक्यता जास्त होती. लेखक स्वतः ग्रंथ लिहीत असेल किंवा लेखनिकाकडून लिहवून घेत असेल. लेखनिकाकडून लिहून घेतलेला ग्रंथ लेखक स्वतः तपासून दुरुस्त करून देत असेलही किंवा नसेलही. हस्तलिखित वाङ्मयासंबंधी वरील प्रकारच्या अनेक गोष्टींबाबत बरेचसे तर्कावरच अवलंबून राहावे लागते.

हस्तलिखिताशी तुलना करता मुद्रणलिखिताच्या प्रसाराला ग्रंथांची अत्यल्प संख्या हे कारण आड येऊ शकत नाही. त्यांचा वाचकवर्ग मोठा असू शकतो. शिळाप्रेसपासून सध्याच्या फोटोप्रेसपर्यंतच्या मुद्रणकलेच्या विकासाबरोबरच मुद्रित ग्रंथांचा प्रसार वेगाने होत आहे. लेखकाने लिहून दिलेल्या ग्रंथाचे मुद्रित रूपांतर होईपर्यंत लेखकाची व मुद्रकाची इच्छा नसूनही मुद्रणात अनेक दोष राहू शकतात. परंतु भाषेच्या दृष्टीने मुद्रित ग्रंथांचा

१. यांत खालील पुस्तकांचा आधार जास्त प्रमाणात घेतलेला आहेः डॉ. प्र. न. जोशी यांचा मराठी वाङ्मयाचा विवेचक इतिहास, प्रा. श्री. रं. कुलकर्णी यांचे प्राचीन मराठी गद्य-प्रेरणा आणि परंपरा आणि डॉ. गं. ना. जोगळेकर यांचा प्रबंध.

अभ्यास करताना मुद्रणदोष ओळखणे, ते दूर करणे हे, हस्तलिखितातील पाठभेदाची निश्चिती करण्यापेक्षा निश्चितच कमी घोटाळ्याचे असते, ग्रंथमुद्रणाचा काळ तांत्रिक अडचणी निर्माण न झाल्यास हस्तलिखितांच्या मानाने खूप कमी असतो. एका ग्रंथांत आढळलेली चूक एकाच वेळेच्या सर्व प्रतींत आढळून येते. त्यामुळे पाठचिकित्सा करायला वेगवेगळ्या ग्रंथप्रतींचा उपयोग करण्याची आवश्यकता नसते. एकाच वेळच्या दोन हस्तलिखितांत पाठचिकित्सा करावयाची असेल तर त्या दोन्ही ग्रंथांचा उपयोग तर करावा लागतोच; पण शक्य असेल तर उपलब्ध अशा सर्व प्रतींचा आधार घ्यावा लागतो. हस्तलिखित असो वा मुद्रणलिखित असो, भाषेच्या अभ्यासासाठी ते, त्यातील उणिवा लक्षात घेऊनच वापरणे जरूर आहे.

२.३. हस्तलिखिते :

प्रस्तुत प्रबंधाच्या संदर्भात हा शब्द अमुद्रित ग्रंथ या अर्थाने वापरलेला असला तरी काही ठिकाणी त्याची व्याप्ती थोडीशी वाढवलेली आहे. प्रामुख्याने हस्तलिखित म्हणजे कमी संपर्क साधू शकणारे, अनेक आवृत्त्यांची शक्यता कमी असणारे असे वाङ्मय.

एका विशिष्ट काळाचे हस्तलिखित वाङ्मय आज संशोधनचिकित्सेच्या शास्त्राने पाठशुद्ध होऊन, पाठभेदांसह मुद्रित रूपात उपलब्ध होऊ शकत असले तरी येथे, त्याच्या भाषेचा अभ्यास अभिप्रेत नसून, त्या त्या काळची हस्तलिखिते त्या त्या काळच्या भाषेचे प्रतिनिधित्व कितपत करू शकतात या संदर्भात त्यांचा विचार करावयाचा असल्याने हस्तलिखिते हा शब्द विशिष्ट अर्थाने जाणावयाचा आहे. जे जे मुद्रणपद्धतीने लिहिले गेले नाही ते ते सर्व वाङ्मय, मग ते खरोखरच हाताने लिहिलेले असो किंवा ताम्रपट, शिलालेख इत्यादी कोरीव लेखांच्या स्वरूपाचे असो, ' हस्तलिखित 'च समजायचे आहे.

सन १५५६[1] मध्ये गोव्यात छापखाना सुरू झाला होता. शिवाजी महाराजांनी यासंबंधात काही प्रयत्न करून पाहिला होता. मराठी भाषेतला पण रोमन लिपीतला ' ख्रिस्त पुराण ' हा ग्रंथ इसवी सन १५१६ साली मुद्रित झाला होता. नाना फडणिसांनी चित्रशाळा व शिल्पशाळा काढली होती, तंजावरकडे सरफोजी राजे भोसले यांच्या प्रयत्नाने मराठी ग्रंथ छापावयास सुरुवात झाली होती, असे मुद्रणकलेसंबंधी उल्लेख आढळतात. पण या सर्व काळापर्यंत जे वाङ्मय छापून झाले त्याच्या प्रसाराच्या वेगाची शक्यता व यानंतरच्या काळात छापून झालेल्या वाङ्मयाच्या प्रसाराच्या वेगाची शक्यता यांतील अंतर लक्षात घेऊन इ. स. १८०५ मध्ये गोव्यात छापल्या गेलेल्या मराठी भाषेतील व देवनागरी लिपीतील ' सेंट मॅथ्यूचे गॉस्पेल ' या ग्रंथाच्या आधीचे ग्रंथ ती सारी ' हस्तलिखिते ' व नंतरची सारी ' मुद्रणलिखिते ' अशी मराठी वाङ्म-

१. मराठी वाङ्मयाचा विवेचक इतिहास, प्राचीन-जोशी, पृ. ५२८.

याची विभागणी केली आहे.

हस्तलिखित वाङ्मय प्रामुख्याने पद्य व काही प्रमाणात गद्य वाङ्मय प्रकारात आढळून येते. पद्य वाङ्मयाचे आधिक्य हे मुद्रणकलेच्या अभावामुळे झालेले असावे, कारण पाठांतरासाठी गद्य वाङ्मयापेक्षा पद्य वाङ्मय अधिक सोयीचे असते हे उघड आहे. तसेच पद्य वाङ्मयात गेयतेमुळे येणारी मनोरंजकता किंवा थोडक्यात अधिक आशय मांडण्याची ताकद यांसारख्या कारणांमुळे या कालखंडात पद्य वाङ्मयावर प्रामुख्याने भर दिलेला असावा. आजही कीर्तनकार आपले गद्यनिरूपण काही वेळा पद्याच्या सुरावलीत करताना आढळून येतात. किंवा गद्यापेक्षा भिन्न परंतु पद्याकडे झुकलेले गद्य वापरताना आढळतात. त्यावरून रंजकतेसाठी गद्यापेक्षा पद्याचा वापर त्या काळी अधिक प्रमाणात झाला असे म्हणणे अयोग्य ठरू नये.

२.३. (अ) (हस्तलिखित) गद्य वाङ्मय :

पद्य वाङ्मयाच्या तुलनेने गद्य वाङ्मयाचा विस्तार फार कमी प्रमाणात असला तरी या साहित्याची परंपरा स्पष्ट आढळून येते. ब्रिटिश सत्तेच्या आगमनापूर्वी महाराष्ट्रात अनेक स्थित्यंतरे झाली तरी जीवनमूल्यात आमूलाग्र बदल करण्याचे सामर्थ्य ब्रिटिश सत्तेइतके इस्लामी धर्मांत नव्हते. इस्लामधर्म आणि इस्लामी सत्ता कोणत्याच काळात विभक्त राहिलेले दिसत नाहीत. याचा परिणाम म्हणजे तत्कालीन मराठी समाजाला सत्तेच्या परकीयत्वाबरोबरच धार्मिक आक्रमणाची जाणीव सतत राहिली. यामुळे त्या काळाच्या स्वातंत्र्यासाठी धडपडणाऱ्या लोकांची ‘ धर्मरक्षणार्थ राज्यस्थापना ’ ही भावना तीव्र होती. याच भावनेच्या जोडीने स्वधर्मरक्षणाची तळमळ समाजातील विचारवंतांना लागून राहिली. परकी सत्तेचा विनाश व स्वधर्मरक्षण या दोन भावना त्या काळी विचारवंतांच्या मनात धगधगत होत्या; तसेच त्या काळातील व्यक्ती व समाज यांचे जीवन[1] या ना त्या परीने धर्मकल्पनांशी संबद्ध झालेले होते. राजकीय, सामाजिक, कौटुंबिक व वैयक्तिक अशा सर्वच कर्तव्यांचा आणि जबाबदारीचा समावेश त्या त्या संदर्भातील धर्मविषयक कल्पनांत करण्यात येत असे. ‘ कालपरिस्थितीनुसार पूर्वापार चालत आलेल्या धर्मविषयक निर्बंधांचा फेरविचार कोणत्याही समाजात आवश्यक असतो. असा विचार होईनासा झाला की परंपरा व पुरोगामी वृत्ती यांचा संघर्ष होतो. या संघर्षातून नवे पंथ, नव्या प्रवृत्ती उदयाला येतात. त्याचे पडसाद त्या त्या काळच्या साहित्यातून उमटत असतात. ’

मराठी भाषेच्या उदयाच्या कालखंडात धर्मविषयक व अन्य शास्त्रे संस्कृत भाषेत होती. कालांतराने लोकव्यवहाराची भाषा मराठी झाली तरी शास्त्रे संस्कृतातच राहिली. संस्कृत भाषेत जखडून राहिलेले हे ज्ञानभांडार संस्कृत न जाणणाऱ्या सामान्यजनांना खुले

१. प्राचीन मराठी गद्य, प्रेरणा आणि परंपरा – कुलकर्णी – पृ. ५.

करण्यासाठी प्रामुख्याने मराठी भाषेच्या ग्रंथरचनेस प्रारंभ झाला. शके ९६१ च्या सुमारास[1] श्रीपतिभट्टाने आपल्याच 'ज्योतिषरत्नमाला' या ग्रंथावर टीका लिहून, एकाच वेळी दोन्ही भाषांतून लेखन करून सुवर्णमध्य साधला. मराठी 'ज्योतिष-रत्नमाले'चे अनुकरण वैद्यकादी इतर शास्त्रीय ग्रंथांसाठी झाले. यानंतरच्या काळात जे मराठी साहित्य निर्माण झाले त्याचे श्री. श्री. रं. कुलकर्णी यांनी विविध प्रकार मांडले आहेत. (१) जनसामान्यात विद्येचा प्रसार व्हावा या हेतूने संस्कृत साहित्याच्या आधाराने निर्माण झालेले मराठी साहित्य - ज्यातून पुढे मराठी गद्याची पंडिती परंपरा निर्माण झाली; (२) लोककथात्मक साहित्याचा आधार घेऊन परिणामकारक धर्मप्रसार करण्याच्या हेतूने अस्तित्वात आलेले कथाप्रधान साहित्य; आणि (३) धर्मरक्षणाच्या प्रेरणेने पुराणोक्त धर्माचा प्रसार करणारे साहित्य किंवा बखर साहित्य. याशिवाय चौथा प्रकार म्हणजे तत्कालीन पत्रवाङ्मय.

२.३. (अ) १. पंडिती परंपरेचे वाङ्मय :

श्री. कुलकर्णी यांनी ज्याला पंडिती परंपरेचे गद्य म्हटले त्यात संस्कृत भाषेत पांडित्य संपादन करूनही संस्कृत भाषेतील ज्ञान टीकाभाष्यादिकांच्या रूपाने, किंवा स्वतःचे चिंतन, स्वतंत्र ग्रंथरचना करून गद्यप्रबंधांच्या द्वारे मराठीत निबद्ध करणाऱ्या लेखकांच्या वाङ्मयाचा समावेश केलेला दिसून येतो.

इतिहासाचार्य राजवाडे यांच्या संग्रहातील अप्रकाशित वैद्यक, वेदान्त, गणित, ज्योतिष, फल-ज्योतिष वगैरे अनेक विषयांतील ग्रंथांचा कालनिर्णय झालेला नाही, परंतु आज उपलब्ध झालेल्या बाकीच्या साहित्यात ज्योतिषरत्नमालेनंतर 'लीळाचरित्रा' पर्यंत (शके १२०६), ब्रह्मदत्ताने (शके १०१४) लिहिलेल्या 'करुणप्रकाण' या ग्रंथावरील मराठी टीका त्याचीच मानल्यास त्याखेरीज अन्य ग्रंथांची निर्मिती या काळात झालेली नाही. लीळाचरित्रानंतरचे महानुभावपंथीयांचे काही, जैनधर्मविषयक व ख्रिस्तीधर्मविषयक काही, हिंदुधर्मविषयक काही व आयुर्वेद, अश्वशास्त्र, नाट्यशास्त्र इत्यादी शास्त्रांवरील काही ग्रंथ आज उपलब्ध झालेले आहेत.

इसवी सनाच्या तेराव्या शतकात महानुभाव पंथाच्या प्रचाराला पद्धतशीर सुरुवात झाली. त्या पंथाची भाषा मराठी, उपदेशाचे माध्यम मराठी असल्याने श्रीचक्रधरांनी तत्कालीन रूढ भाषेला जणू पट्टाभिषेक केला. वैदिक परंपरेतील पंडितांना संस्कृतचा आशय फक्त मराठीत प्रकट करावयाचा होता तर महानुभावी पंथीयांना आपले तत्त्वज्ञान दार्शनिक सिद्धांतांच्या रूपाने मराठीत उतरवावयाचे होते. बरेच महानुभावी ग्रंथकार संस्कृतचे गाढे पंडित होते. वेदोक्त धर्म त्यांना अपरिचित नव्हता. श्रीचक्रधरोक्त धर्म त्यांना समाजापुढे मांडावयाचा होता ही गोष्ट भाषेच्या ग्रांथिक स्वरूपाच्या दृष्टीने

१. प्राचीन मराठी गद्य – प्रेरणा आणि परंपरा – कुलकर्णी – पृ. ९.

विचारात घेण्याजोगी आहे. राज्यव्यवहारात व लोकव्यवहारात इ. स. च्या १५ व्या शतकापासून फारसी भाषेचे वर्चस्व दृष्टोत्पत्तीस येत असले तरी गद्य ग्रंथकारांनी आपल्या भाषेचे स्वरूप फारसीच्या प्रभावापासून बरेचसे अलिप्त राखलेले दिसून येते. मराठीच्या आजच्या प्रमाणभाषेच्या स्वरूपाचा विचार करताना या कालखंडातील मराठी ग्रंथकारांची संस्कृतची जाण, फारसी भाषेपासून मराठीला अलिप्त ठेवण्याचा प्रयत्न, संस्कृत न जाणणाऱ्यांसाठी संस्कृतातील विद्या मराठीतून देण्याचा अट्टाहास लक्षात घेण्यासारखा आहे. तसेच याही काळात श्रीचक्रधरांनी मराठी हीच आपली भाषा आहे असे सांगूनही केशिराज व्यासांनी 'लीळाचरित्रातील' काही लीळांचे 'रत्नमाला स्तोत्र' या नावाने रूपांतर केले व आनेराज व्यासांनी मराठीत सांगितलेली 'अर्थ-निर्णय पद्धति' संस्कृत सूत्रांच्या रूपाने निबद्ध केली हीही गोष्ट लक्षात घेतली पाहिजे. याशिवाय काही महानुभावीयांनी पुढील काळात संस्कृत भाषेत आपल्या रचना केल्या आहेत. या सर्व गोष्टी विचारात घेता, संस्कृतची जाण, संस्कृती न जाणणाऱ्यांसाठी मराठीचा वापर, संस्कृतची प्रतिष्ठा, संस्कृतची सवय, संस्कृत भाषेचे अभिव्यक्तीचे सामर्थ्य इत्यादी गोष्टी त्या काळातील संस्कृत भाषा जाणणाऱ्यांना असणारा प्रतिष्ठितपणा दाखवून देण्यास पुरेशा आहेत.

२.३. (अ) २. कथाकथनपर वाङ्मय :

लिखित साहित्य अस्तित्वात येण्यापूर्वी कोणत्याही भाषेतील लोकगीते किंव लोककथा यांच्या स्वरूपात असलेल्या, परंपरागत आलेल्या साहित्याचे अस्तित्व आढळते. लिखित साहित्याचा आस्वाद घेण्यास असमर्थ असलेला समाज अशा साहित्याने स्वतःचे मनोरंजन करून घेत असतो, तसेच जीवनातील न उलगडणाऱ्या प्रश्नांचा गुंता सोडविण्या-साठी म्हणजेच धर्माधर्माचा किंवा कर्माकर्माचा निवाडा करण्यासाठीही अशा साहित्याचा आधार घेत असतो. मानवी मनाला असणारी अद्भुताची ओढ किंवा अकल्पित कल्पनांमध्ये रंगून जाण्याची वृत्ती अशा प्रकारच्या साहित्यनिर्मितीला कारणीभूत जशी होते, त्याच प्रकारे आपल्या धर्माच्या किंवा संप्रदायाच्या प्रसारासाठी मौखिक परंपरेने चालत आलेल्या लोककथांचा उपयोग होऊ शकतो. लोककथांचा समाजावर असणारा प्रभाव लक्षात घेऊनच विविध पंथीय लोक आपल्या मतांच्या मंडनासाठी किंवा खंडना-साठी कथांचा आधार घेतात, आपल्या सोयीनुसार त्यांवर जरूर ते संस्कारही करतात. वेदवाङ्मयात बीजरूपाने असलेल्या कथा, ब्राह्मणग्रंथातील आख्याने आणि अन्वाख्याने, भारताचे महाभारत करणारे निरनिराळ्या कथांचे ओघ, बौद्धांचे जातक वाङ्मय, जैनपुराणातील अनेक कथा आणि उपकथा अशाच संस्कारित कथांची उदाहरणे म्हणून देता येतील.[1]

१. प्राचीन मराठी गद्य – प्रेरणा आणि परंपरा – कुलकर्णी – पृ. ६९.

कथाकथनपर मराठी हस्तलिखितातील गद्य हे एक तर पंडिती परंपरेतून निर्माण झालेल्या किंवा पौराणिक परंपरेतून निर्माण झालेल्या साहित्याचे अंगभूत वाङ्मय आहे. मुद्रणलिखितांच्या काळातील कथावाङ्मयाचे सूत्र या वाङ्मयात सापडत असले तरी, केवळ कथात्मक असे स्वतंत्र वाङ्मय त्या काळात उपलब्ध नाही ही गोष्ट मराठीच्या प्रामाण्याचा शोध घेताना एक मोठीच उणीव राखणारी आहे. कारण त्यामुळे लोक-कथांमध्ये बोलीभाषेच्या स्वरूपाची लिखित भाषेच्या स्वरूपाशी तुलना करून लिखित भाषेचे प्रामाण्य त्या काळी कोणत्या आधारावर होते किंवा कोणत्या दिशेने होते याचा मागोवा घेणे शक्य होणार नाही.

२.३. (अ) ३. बखर साहित्य :

इतिहासविषयक सर्वच साहित्याचा आज बखर साहित्यात समावेश केला जातो. यांमध्ये ऐतिहासिक घटना, वार्ता, प्रसंगवर्णन, वंशावळी, राज्यकारभारविषयक उपदेश, चरित्रे इत्यादी विषयांवरील वाङ्मयाचा अंतर्भाव केला जातो. श्री. कुलकर्णी यांनी बखर साहित्याचे वर्गीकरण पुढील पाच प्रकारांत केले आहे : (१) चरित्रे-आख्यानपर, (२) प्रसंगवर्णनपर, (३) वार्तापत्रे, (४) उपदेशप्रधान व (५) सांप्रदायिक, भक्तिपर.

सांप्रदायिक किंवा भक्तिपर बखरीत विशिष्ट संप्रदायाची परंपरा, एखाद्या स्थानाचे महत्त्व, एखाद्या व्यक्तीचे महत्त्व, त्या त्या पंथाच्या आचारविचारांचे कथात्मक विवरण, साधुसंतांची चरित्रे आढळतात. उपदेशप्रधान बखरीत इतिहासपुराणोक्त राजनीतीचे विवरण किंवा विशिष्ट व्यक्तीला केलेला उपदेश आढळून येतो; प्रसंगी स्मृतिग्रंथांचाही आधार घेतला जातो. त्यामुळे या दोन्ही प्रकारच्या बखरींत संस्कृत–प्राकृतचे ज्ञान, मागील वैचारिक किंवा धार्मिक परंपरांचे दुवे जोडले गेलेले असल्याने, त्या त्या काळाच्या बखरींच्या भाषेत प्रतिबिंबित झालेले असणे जास्त शक्य आहे. तसेच कोणत्याही संप्रदायाची माहिती त्या संप्रदायात वापरल्या जाणाऱ्या विशिष्ट तांत्रिक भाषेशिवाय देता यणे कठीणच. देवता, देवी, माता व आई हे चारही शब्द माहीत असणारा आजचा मराठी भाषिक ते शब्द यज्ञदेवता, गंगामाता, दुर्गादेवी किंवा दुर्गामाता व आई जगदंबा अशा संदर्भात वापरील. ज्याला एकच ' देवी ' शब्द माहीत आहे तो कोणत्याही देवतेला सरसकट ' देवी ' म्हणेल. बहुश्रुतता किंवा वाचनाचा व्यासंग यामुळे समानार्थी वाटणाऱ्या शब्दातील विशिष्ट शब्दांची निवड अर्थाच्या भिन्न छटा दाखविण्यास व्यक्ती अजाणता किंवा जाणीवपूर्वक करीत असते. हे सर्व लक्षात घेता उपदेशप्रधान, सांप्रदायिक किंवा भक्तिपर बखरींचा लेखक हा त्या काळच्या प्रतिष्ठित वर्गाचा प्रतिनिधी असण्याची शक्यता अपेक्षित आहे. शिवाय त्या वाङ्मयाच्या स्वरूपावरून बखरींच्या लेखकाने संस्कृत –प्राकृत भाषांचे वाचन केलेले असावे, निदान श्रवण तरी केलेले असले पाहिजे असे अनुमान करायला हरकत नाही.

वार्तापत्रे लिहिणाऱ्या व्यक्तीचे लक्ष वर्तमानकाळावर जास्त केंद्रित झालेले असते. वार्ता समजावून सांगण्यापेक्षा त्या तातडीने रवाना करण्यावर अशा लेखकांचा भर दिसून येतो. या नैमित्तिक लेखनात भाषेपेक्षा आशयावर भर असणार, त्यामुळे त्या काळची सर्वसामान्य प्रतिष्ठित व्यक्ती ज्या प्रकारे बोलेल अथवा लिहील त्याप्रमाणे वार्तापत्रातील भाषा असावी असे वाटते. वार्तापत्रांपेक्षा प्रसंगपर साहित्यात शैली व साहित्यगुण अधिक दिसून येतात. याचा लेखक केवळ वार्ता कळविणारा नसून म्हणजेच तटस्थ नसून कोठे-तरी भावनिक जगाशी जोडला गेलेला असतो. त्यामुळे लेखकाची वैयक्तिक भाषाविषयक जाणकारी त्यात डोकावल्याशिवाय राहणार नाही. लेखक ज्या सामाजिक वर्गाचा असेल किंवा ज्या सामाजिक प्रतिष्ठेचा असेल त्याच्याशी सुसंगत अशी त्याची भाषा असणे अपेक्षित आहे. त्यामुळे वार्तापत्रातून तत्कालीन लोकव्यवहाराची भाषा लेखकाच्या दर्जा-नुसार समजणे शक्य आहे.

चरित्र व आख्यानपर बखरींच्या स्वरूपावरून बखरकारांना आपले लेखन पुराणोक्त धर्माच्या आधाराने करावयाचे होते हे स्पष्ट होते.[1] महाराष्ट्रधर्माचे रक्षण करण्याचे आवाहन महिकावतीच्या बखरींत आढळते, तेच ध्येय शिवछत्रपतींच्या स्वराज्यसंस्थापनेचे होते. धर्मरक्षणाचे ध्येय साध्य करण्यासाठी शिवछत्रपतींनी पुराणांतरीच्या राजेलोकांचा आदर्श आपल्यापुढे ठेवला होता हे चिटणिसांनी आपल्या बखरीत सांगितले आहे. धर्मरक्षणाची प्रेरणा बखर साहित्याच्या निर्मितीस कारणीभूत झाली व प्रत्यक्ष धर्मरक्षण झाल्यावर ते साक्षात परमेश्वरी अवतारामुळे झाले या भावनेने पुराणपुरुषांसारखे चरित्र बखरकारांनी त्या ऐतिहासिक पुरुषांचे गायिले. पुराणांच्या शेवटी जशी पुराणश्रवणाची फलश्रुती दिलेली आहे तशी फलश्रुती बखरींच्या शेवटी दिलेली आढळते. पुराणांच्या परिणामाप्रमाणेच अभिजात संस्कृत साहित्याचा ठसा देखील बखरीच्या भाषेत दिसून येतो.[2] 'गतप्राण जाहला', 'जन्मादारभ्य', 'हर्षायमान', 'उदित भाग्य' इत्यादी प्रकारचे शब्द त्यांनी सहजपणे वापरलेले आढळून येतात. बखरकारांनी फारसी शब्द मुळीच वापरले नाहीत असे नाही परंतु त्यांचे संस्कृतशी नाते लक्षणीय आहे.

२.३. (अ) ४. पत्रसाहित्य :

पत्रसाहित्य हे वाङ्मयीन मूल्ये असणारे किंवा नसणारे खाजगी स्वरूपाचे साहित्य आहे. हे मूलतः समाजासाठी लिहिले गेलेलें नसून वैयक्तिक कारणासाठी लिहिले गेलेले असले तरी भाषेच्या व समाजाच्या अभ्यासाच्या दृष्टीने याचे मोल फार आहे. या पत्रां-बाबत श्री. कुलकर्णी म्हणतात की,[3] राज्यकारभारविषयक पत्रे फारसीबहुल आहेत....

१. प्राचीन मराठी गद्य, प्रेरणा आणि परंपरा-कुलकर्णी-पृ. १०९.
२. प्राचीन मराठी गद्य, प्रेरणा आणि परंपरा-कुलकर्णी-पृ. १०९.
३. प्राचीन मराठी गद्य, प्रेरणा आणि परंपरा-कुलकर्णी-पृ. १४४.

एकच पत्रलेखक राजकारण लिहितो तेव्हा त्याची भाषा निराळया वळणाने धाव घेते. हाच लेखक जेव्हा खाजगी मजकूर लिहून कळवतो तेव्हा त्याच्या भाषेला थोडेफार संस्कृतप्राचुर्याचे वळण लागते.

व्यक्तिपरत्वे शैली आणि भाषा बदलत असते त्याचप्रमाणे कालपरत्वे त्यांच्यात परिवर्तन होत असले तरी स्थूलमानाने एकाच कालखंडातील भाषेच्या दोन स्वरूपांत फारसा फरक दिसून येत नाही. या पत्रसाहित्यातील भाषाभेदाचा अर्थ एवढाच दिसतो की दरबारी किंवा तत्सदृश पत्रव्यवहारात योजण्यात येणाऱ्या भाषेचा डौल यावनी शब्दांनी भारदस्त करण्याची प्रवत्ती असावी. परंतु तसा संबंध नसल्यास लेखकाच्या कुवतीनुसार किंवा सहजपणे येईल तशी फारसी अथवा संस्कृतप्रचुर अशा भाषेचा उपयोग होत असावा. अर्थात याला अपवाद गृहीत धरावे लागतातच. तसे नसते तर सोंधच्या सवाई रामचंद्र राजाने पहिल्या बाजीरावाला लिहिलेल्या पत्राला एखाद्या संस्कृत पंडिताच्या लेखाचे स्वरूप आले नसते.[1]

दळणवळणाची वेगवान साधने ज्या काळात नव्हती, पत्रलेखन हे ज्या काळात काही खास अशा कारणपरत्वे होत असे त्या काळात पत्र लिहिणारी व्यक्ती समाजातील काही विशिष्ट स्थान भूषविणारी, समाजाला मान्य अशा प्रतिष्ठित वर्गातली असली पाहिजे. ही व्यक्ती स्वतः पत्रलेखन करीत असेल किंवा मजकूर सांगून लिहून घेत असेल. दुसऱ्याने लिहिलेले पत्र ती व्यक्ती स्वतः वाचीत असेल किंवा लेखकाला वाचायला सांगत असेल. या प्रकारच्या घटनांच्या शक्यतेवरून असे दिसते की पत्रलेखक स्वतःच्या भाषेत पत्र पाठवीत असताना किंवा तत्कालीन गटप्रमाण बोलीत पत्र लिहीत असावा. पत्रलेखकाचे सामाजिक स्थान, त्याचे व्यावहारिक जीवन व त्याचे वाचनविषयक संस्कार दाखविण्यास, पत्रातील फारसी किंवा संस्कृतचा वापर पुरेसा मार्गदर्शक ठरू शकतो. श्री. कुलकर्णी यांनी केलेल्या पत्रसाहित्याच्या विवेचनावरून असे दिसून येते की त्या काळच्या प्रतिष्ठित व्यक्ती संस्कृत जाणणाऱ्या, किंवा संस्कृतमधील ग्रंथाचे संस्कृतज्ञ व्यक्तींनी केलेले मराठी विवरण, रूपांतर इत्यादी ऐकत असणाऱ्या तसेच फारसीची चांगली जाण असणाऱ्या असाव्यात. रोजच्या सवयीने त्यांच्या भाषेत शिरलेले फारसी शब्द या व्यक्ती वापरीत असल्या तरी संस्कृत भाषेचा वारसा मोठ्या प्रमाणात त्यांच्या भाषेत असला पाहिजे.

२. ३. (ब) (हस्तलिखित) पद्य वाङ्मय :

मराठीतील हस्तलिखित पद्यवाङ्मयाचा विस्तार फार मोठा आहे. हे पद्यवाङ्मय प्रामुख्याने धर्मपर असून याशिवाय सन १८०५ पर्यंतच्या काळात इतरही काही वाङ्मय

१. प्राचीन मराठी गद्य, प्रेरणा आणि परंपरा–कुलकर्णी–पृ. १४६.

उपलब्ध होते असे आढळून येते.[1] धर्मपर वाङ्मयाचा आशयाच्या दृष्टीने आढावा घेतला तर त्यात पुढील प्रकारचे वाङ्मय आढळून येते : (१) वैदिक अथवा परंपरागत धर्मविषयक, (२) महानुभाव संप्रदायाशी संबंधित, (३) जैन तत्त्वज्ञानपर, (४) मुसलमानांनी लिहिलेले व (५) खिस्ती धर्मपर वाङ्मय.

२. ३. (ब) (१) धर्मपर वाङ्मय :

(१) वैदिक अथवा परंपरागत धर्मविषयक वाङ्मय :

या वाङ्मयाचा आद्य ग्रंथकार म्हणून काही विद्वान मुकुंदराजाला मानतात तर काही विद्वान ज्ञानेश्वरांना मानतात. काहीही असले तरी उपलब्ध पद्यवाङ्मय इसवी सनाच्या तेराव्या शतकाच्या अखेरीपासून मुद्रणकला अस्तित्वात येईपर्यंतच्या कालखंडापर्यंत सातत्याने लिहिले गेलेले आढळून येते. या काव्यामध्ये ज्ञानेश्वर, नामदेव इत्यादी संतांनी केलेले लेखन प्रामुख्याने तत्त्वनिरूपण, अध्यात्मचर्चा, साक्षात्कारकथन यांसारख्या विषयांशी मर्यादित झालेले आढळून येते, परंतु नंतरच्या कालखंडात विशेषतः तुकाराम-रामदासांनंतरच्या काळात मराठी काव्यरचनेला एक नवा आविष्कार प्राप्त झाला. कथात्मक किंवा कथनात्मक कवितेला हळूहळू आकार येऊन वामनपंडित, नागेश, विठ्ठल, रघुनाथपंडित वगैरे कवी उदयाला आले. केवळ अध्यात्मतत्त्वे विशद करणाऱ्या रचनांपेक्षा या कवींनी राम-कृष्णांच्या कथा, संतचरित्रे इत्यादी लिहिण्यात रस घेतला व हे करताना आपला संस्कृत वाङ्मयाचा गाढा व्यासंग मोठ्या अधिकारवाणीने मराठी वाङ्मयात उतरवला.

हिंदुधर्मपर वाङ्मयात, संस्कृतमधील बंदिस्त ज्ञान समाजाला सहज उपलब्ध व्हावे म्हणून ज्ञानेश्वरादी संतांनी मराठी भाषेचे माध्यम स्वीकारले. भाषा मराठी असली तरी संस्कृतच्या ज्ञानवारशामुळे ती संस्कृतपासूनच फार दूर जाऊ शकली नाही. किंवा ज्याचा आदर करावा असे ज्ञान संस्कृतपासूनच मराठीत आले आहे या जाणिवेने तत्कालीन समाजात संस्कृतचा आदर कमी झाला नाही, उलट संस्कृतातील ज्ञान मराठीत आल्याने अपरिचित अशा संस्कृत शब्दांचा परिचय होऊन श्रोतृवर्गाची किंवा वाचकवर्गाची भाषासमृद्धीच झाली असली पाहिजे. तरीही काही प्रमाणात संस्कृत वाङ्मयापासून मराठीचा वाङ्मयप्रपंच काहीसा दूर सरकला. असे जरी झाले तरी तोच प्रवाह स्वराज्यातील पंडित कवींच्या काळात संस्कृताधिष्ठित झाला ही घटना स्वराज्यात संस्कृतचे महत्त्व वाढले गेल्याचे निदर्शनास आणणारी आहे असे म्हणता येईल. संस्कृत भाषेतून आलेले विचार व भावना यांचे प्रवाह पंडित कवींच्यामुळे मराठी रूपाने मराठीत राहिले नाहीत तर त्यांचे पुन्हा संस्कृतीकरण झाले असावे. संस्कृत जाणणाऱ्या वर्गाला सामाजिक प्रतिष्ठेची ठिकाणे उपलब्ध झाली असावीत. तसे झाले नसते तर पंडिती काव्यांना

१. मराठी वाङ्मयाचा विवेचक इतिहास, प्राचीन–जोशी–पृ. ३८६.

वाचकच मिळाला नसता व तशा प्रकारची काव्यरचनाही निर्माण झाली नसती. वाङ्मय व समाजाची अभिरुची यांचा परस्परांवर परिणाम होत असतोच. पंडिती काव्याची निर्मिती ज्या प्रमाणात झाली त्यावरून ते काव्य जाणणारा रसिक श्रोता त्या काळी उपलब्ध असावा हे म्हणणे उचितच आहे. याचाच पर्यायाने अर्थ असा की संस्कृतच्या अभ्यासकाला किंवा जाणकाराला प्रतिष्ठा लाभलेली असली पाहिजे.

(२) महानुभावी वाङ्मय :

महानुभावी पंथाची आद्य कवयित्री होण्याचा मान महदाईसा हिला मिळतो. या पंथाच्या वाङ्मयाच्या रचना सन १३३३ पर्यंत जास्त प्रमाणावर उपलब्ध आहेत. महानुभावी पंडित कवी संस्कृत जाणणारे व मराठीचा अभिमान बाळगणारे होते. आख्यानी थाटाचे श्रेष्ठ प्रकारचे काव्य या पंथाच्या आश्रयाने मराठीत सुरू झाले. या वाङ्मयात पंडिती वळणाच्या भाषेच्या जोडीने बोली भाषेचा वापरही आढळून येतो. मराठीचा आग्रह व अभिमान असूनही काही महानुभावी लेखकांनी संस्कृतमधून आपली वाङ्मयरचना केली ही घटना दोन गोष्टींवर प्रकाश पाडू शकेल. एक म्हणजे त्या काळी संस्कृत जाणणारा प्रतिष्ठित वर्गात गणला जात असावा व दुसरी म्हणजे संस्कृतमधील कित्येक शब्द व वाक्यरचनांशी, ज्यांच्यासाठी महानुभावी वाङ्मय लिहिले गेले त्यांचा परिचय असावा. वाङ्मयनिर्मितीचा कार्यकारणभाव लक्षात घेतला तर बाह्यतः अवैदिक भासणाऱ्या या पंथीयांना आपली तत्त्वे समाजात रुजविण्यासाठी संस्कृत तोंडावळयाच्या शब्दांना काढून टाकून दुसरे शब्द घालणे ही गोष्ट पंथाची प्रतिष्ठा टिकविणे किंवा पंथाला प्रतिष्ठा मिळविणे यांसाठी शक्य झाले नसावे, म्हणजेच हेही लोक, स्वेच्छेने किंवा पंथहिताच्या रक्षणाच्या धोरणाने असो, मराठी भाषेचा संस्कृतकडून मिळालेला वारसा दूर करू शकले नाहीत.

(३) जैन वाङ्मय :

साधारणपणे ज्ञानेश्वरी, लीळाचरित्र या रचनांच्या कालखंडापासून कमीअधिक प्रमाणात जैन कवींचे वाङ्मय उपलब्ध होताना आढळते. जैन धर्माचे सांगोपांग तत्त्वज्ञान, जैनधर्मीय श्रेष्ठ व्यक्तीचे गुणगान या वाङ्मयातून व्यक्त होते. जैन वाङ्मयाची सुरुवात मुळात लोकांना समजणाऱ्या भाषेतून, म्हणजे संस्कृतेतर भाषेतून झाली असली तरी अनेक जैनधर्मीयांचा संस्कृतचा व प्राकृतचा व्यासंग होता. जैनांनी काही ग्रंथ संस्कृतमध्ये लिहिलेले आहेत. जैन वाङ्मयाचे वाचन करणारा वर्ग मर्यादित असा मराठी समाज असल्याने जैन कवींनी वापरलेली भाषा त्या विशिष्ट समाजाला समजण्याजोगी, त्या समाजापुरती असावी असा तर्क करायला भरपूर वाव आहे. ती तत्कालीन प्रमाणभाषेसारखी असेलच असे नाही. ही भाषा गटप्रमाण बोली असण्याची शक्यता असल्याने समकालीन दोन ग्रंथांचा तुलनात्मक भाषाशास्त्रीय अभ्यास त्या

भाषेच्या स्वरूपाची निश्चिती करण्यास उपयोगी ठरेल.

(४) मुसलमानी कवींचे वाङ्मय :

महाराष्ट्रात मुसलमान राज्यकर्ते आल्यावर महाराष्ट्रातील तत्कालीन हिंदू व मुसलमान यांच्यात सांस्कृतिक देवाणघेवाण झाली. या मुसलमानांतील काही सूफी पंथाचे लोक कमी आग्रही बनले. त्यांनी हिंदुधर्माशी जवळीक साधण्याचे धोरण ठेवले. शिवाय काही मुसलमानांनी हिंदूंच्या धर्मग्रंथांचा सखोल अभ्यासही केला. बाह्य कर्मकांडाला कंटाळून त्याचा निषेध करण्याचे कार्य हिंदू संतांप्रमाणेच काही मुसलमान संतांनीही केले. या प्रयत्नासाठी मुसलमान कवींनी जे वाचन केले त्यात संस्कृत ग्रंथ व संस्कृतला अनुसरणाऱ्या मराठी ग्रंथांचाही समावेश असला पाहिजे. ' अंबरहुसेनी ' नावाची सन १६५३ मध्ये लिहिलेली भगवद्गीतेवरील टीका ही वरील तर्कास पुरेसा पुरावा ठरू शकेल. हिंदू लोकांशी जवळीक वाटणाऱ्या मुसलमान संतांनी हिंदू देवदेवतांचा, तत्त्वज्ञानाचा धिक्कार केलेला नाही. त्यांच्या ठिकाणी हिंदूंशी सामंजस्य राखण्याचा भाव असल्याने त्यांची भाषा मुसलमानी वळणाची असण्यापेक्षा तत्कालीन बोलीशी जवळची असण्याची शक्यता वाटते. परंतु ती तत्कालीन गट-प्रमाण बोलीला जवळची होती की नव्हती हे अभ्यासाशिवाय सद्यःस्थितीत निश्चित करणे कठीण आहे.

(५) ख्रिस्ती मिशनऱ्यांचे वाङ्मय :

ख्रिश्चन मिशनरी धर्मप्रसारासाठी युरोपीय व्यापारी लोकांच्या आधीपासून भारतात येत होते. काहींनी आपल्या कार्यासाठी बोलींचा व देशी भाषांचा अभ्यास केला. अशा धर्मप्रचारकांपैकी फादर स्टीफन्स याने कोकणी-मराठीचे व्याकरण रचले. सन १६४० मध्ये हे व्याकरण मुद्रित झाले.[१] याच स्टीफन्सने ' क्रिस्तपुराण ' हे रोमन लिपीमध्ये लिहिले. या पुराणाच्या अभ्यासावरून स्टीफन्सचा मराठी संतकवींच्या रचनांचा अभ्यास होता असे दिसते. ख्रिस्ती धर्मप्रसारकांचा मुख्य उद्देश धर्मप्रसाराचा, त्यासाठी त्यांनी त्या काळी निवडलेले क्षेत्र मर्यादित असणार हे लक्षात घेता मराठीच्या बोलींच्या तुलनात्मक अभ्यासासाठी या ख्रिस्ती धर्मग्रंथांचा उपयोग जितका होईल तितका मराठीचे प्रामाण्य ठरविणारे सूत्र शोधण्यासाठी होण्याजोगा नाही. तसेच फादर स्टीफन्सच्या पुराणावर असणारी संतकवींच्या वाङ्मयाची छाप लक्षणीय आहे. या परिशीलनाचे परिणाम त्याच्या स्वतःच्या वाङ्मयात उतरले या गोष्टीवरून संतकवींच्या भाषेचे व त्यात व्यक्त झालेल्या आशयाचे तत्कालीन समाजाला आकर्षण किती होते हे स्पष्ट होते. याचाच अर्थ या ग्रंथांसारखी भाषा स्वतःच्या ग्रंथांत वापरून स्वतःच्या धर्मप्रचारास प्रतिष्ठा मिळवून देण्याचा फादर स्टीफन्सचा हेतू नसेलच असे म्हणता येणार नाही.

१. या ग्रंथाचा समावेश, तो मुद्रित असूनही, सन १८०५ च्या आधीचा असल्याने ' हस्तलिखित ' ग्रंथात केला आहे.

या सर्व धर्मपर वाङ्मयांचा एकत्रित विचार करता एक गोष्ट दिसून येते की मराठी भाषेतील पहिल्याच श्रेष्ठ अशा ग्रंथनिर्मितीनंतर एकापाठोपाठ श्रेष्ठ दर्जाचे अनेक ग्रंथ निर्माण झाले असूनही सन १८०५ च्या सुमाराच्या कालखंडापर्यंत संस्कृत भाषेचे अध्ययन-अध्यापन पूर्णपणे नाहीसे झालेले दिसत नाही. शिवाय या काळातही संस्कृत भाषेत ग्रंथरचना झालेली आढळून येते. याचा अर्थ, मराठी भाषा विपुल प्रमाणात लोकव्यवहारासाठी व ग्रंथरचनेसाठी वापरली जात असली तरी तत्कालीन समाजातील विद्वानांचा संस्कृतचा व्यासंग सुटलेला नव्हता. श्री ज्ञानेश्वर शुद्धिपत्र आणण्यासाठी पैठण येथे गेले असता तेथील ब्राह्मणांनी संस्कृत धर्मग्रंथांत काही आधार शोधण्याचा प्रयत्न केला ही घटना तत्कालीन समाजजीवनातील संस्कृत धर्मग्रंथांचे महत्त्व तर दाखवतेच, पण संस्कृत ही धर्माधर्म विचार, न्यायदान इत्यादींसाठी ज्ञानभाषा होती, संस्कृत ग्रंथांतील विचारांचे प्रामाण्य समाजाकडून मानले जात होते या गोष्टी स्पष्ट करते. याचाच अर्थ, संस्कृत जाणणाऱ्या लोकांना प्रतिष्ठा होती, एका विशिष्ट क्षेत्रात समाजाचे धुरीणत्व हा वर्ग करीत होता. जो वर्ग संस्कृत भाषा जाणत नसे त्या वर्गाला धार्मिक जीवनाबाबत संस्कृत जाणणाऱ्या वर्गावर अवलंबून राहावे लागत असे. या परावलंबीपणामुळे परंपरागत आचारविचारांचे ज्ञान अ-संस्कृत वर्गाला दुर्लभ झालेले पाहूनच, समाजाची खरी गरज ओळखून, धर्माचे खरे स्वरूप स्पष्ट व्हावे म्हणून ज्ञानेश्वरादी संतांनी मराठीतून धर्मपर ग्रंथरचना केली. याचा परिणाम म्हणून संस्कृत भाषेचा प्रभाव उत्तरोत्तर कमी होत गेला तरी तो पूर्णपणे नामशेष होऊ शकला नाही. संस्कृत भाषेतील ग्रंथविपुलता, परप्रांतामध्ये संस्कृत भाषेद्वारा वैचारिक देवाणघेवाण करण्याची शक्यता, संस्कृत भाषेतील अभिव्यक्तीचे सामर्थ्य व धार्मिक आचारांना संस्कृत ग्रंथांचे प्रामाण्य इत्यादी कारणांमुळे संस्कृतची प्रतिष्ठा कायमच राहिली. परंपरागत आचरणामुळे संस्कृतग्रंथप्रणीत धर्मामध्ये कर्मठपणाचा दोष आला तरी संस्कृत वाङ्मयातील नवनवोन्मेषशालीनता, विपुलता, अर्थघनता, अभिव्यक्तीची लवचिकता व विशेषतः त्यात व्यक्त झालेल्या जीवनमूल्यांची प्रत्यक्ष जीवनाच्या कसोटीवर शेकडो वेळा घासूनही उजळ राहिलेली शाश्वतता कोणत्याही काळातील समाजाला मार्गदर्शक व प्रेरक ठरली, त्यामुळे संस्कृतची शतकानुशतकांची प्रतिष्ठा, कधी कमी तर कधी जास्त प्रमाणात, टिकूनच राहिली. अतिविशाल असा कालखंड या भाषेने पाहिला असल्याने विविध तत्त्वज्ञानांसाठी जशी या भाषेची कास धरली गेली तसेच त्या तत्त्वज्ञानावर प्रहार करणारे अनेक धर्मपंथही निर्माण झाले. तरीही संस्कृतची प्रतिष्ठा कमी झाली नाही याचे प्रमुख कारण म्हणजे धार्मिक वाङ्मयाखेरीज इतर अनेक क्षेत्रांत लिहिले गेलेले या भाषेतील शास्त्रीय व ललित वाङ्मय होय.

२.३. (ब) (ii) इतर वाङ्मय :

हस्तलिखितांच्या काळात धर्मपर वाङ्मय प्रामुख्याने लिहिले गेले असले तरी इतरही काही वाङ्मय उपलब्ध होते असे आढळून येते. ज्या काळात मोरोपंत, वामन-

पंडित इत्यादिकांच्या काव्याची निर्मिती झाली त्याच काळात पूर्वपरंपरेने चालत आलेले अलौकिक विषय सोडून देऊन लौकिक विषयांत काहींनी रचना केली, त्यामध्ये विविध पोवाडे व लावण्या यांचा समावेश होतो. पोवाड्यांची परंपरा जुनी असावी पण ते प्रथमतः शिवाजीच्या काळात सापडतात. मराठी शाहिरांनी पोवाड्यात जसे युद्धाचे वर्णन केले तसेच त्यांनी वीरपुरुषांनाही काव्याचा विषय बनवले. याच शाहिरांनी शृंगाराची गाणी गायिली ती लावणीच्या माध्यमातून. मानवी भावभावनांची, शृंगारवृत्तीची, प्रणयाच्या विविध तऱ्हांची अनेक सुंदर चित्रे शाहिरांनी लावणी गाताना रंगवली. लावणी प्रामुख्याने शृंगारिक असली तरी मूळची ती अध्यात्म व वेदान्त सांगणारी असल्याचे समजले जाते. कलगीवाले प्रकृतीच्या वा शक्तीच्या बाजूचे तर तुरेवाले पुरुषाच्या वा शिवाच्या बाजूचे मानले जातात. लावण्या व पोवाडे हे समाजमनावर असणाऱ्या परंपरागत धार्मिक विचारांच्या प्रभावापासून दूर होते असे म्हणता येणार नाही. शाहिरांचा संपर्क समाजातल्या सर्व थरांतील व्यक्तींशी साधला जाणार असल्याने समाजातील अनेक व्यक्तींना सहज समजली जाणारी भाषा वापरली जाणे शक्य आहे. त्यामुळे या भाषेत तत्कालीन प्रमाणभाषेपेक्षा त्या त्या ठिकाणच्या बोलीचा प्रभाव असण जास्त शक्य आहे. आजच्या प्रमाणभाषेच्या मागील परंपरेचा शोध घेताना शाहिरी वाङ्मयाचा उपयोग होण्यासारखा आहे. या वाङ्मयाशी धर्मपर वाङ्मयाची तुलना करून समाजमान्य अशा मराठी भाषेचा त्या त्या कालानुसार मागोवा घेणे शक्य आहे.

२.३. (क) हस्तलिखितांच्या काळातील प्रतिष्ठित वर्ग व त्याची भाषा :

मराठीच्या निर्मितीपासून छापण्याची कला अस्तित्वात येण्याच्या काळापर्यंतच्या हस्तलिखित वाङ्मयाचा साकल्याने अभ्यास केला असता, तत्कालीन भाषेचे प्रामाण्य शोधताना पुढील काही गोष्टी आढळून येतात.

ज्ञान व विद्या यांचे भांडार संस्कृत वाङ्मयात उपलब्ध असून त्याची विपुलता प्राकृत व अपभ्रंश या भाषांत उतरली नसल्याने यथार्थ ज्ञानप्राप्तीसाठी संस्कृत भाषेचा अभ्यास आवश्यक होता. हा अभ्यास करणारा जो वर्ग समाजात होता त्या वर्गावर वैचारिक जीवनासाठी संस्कृत न जाणणारा बहुजनसमाज अवलंबून होता. त्यामुळे संस्कृतचे ज्ञान असणाऱ्याला प्रतिष्ठा प्राप्त झालेली होती. तसेच, कालगतीमुळे तत्कालीन बोलीं-पेक्षा संस्कृत भाषा ही समजण्याच्या दृष्टीने फार दूरची राहिल्याने, सर्वसामान्य समाजा-साठी संस्कृतमधील ज्ञानगंगा मराठीत आणणे आवश्यक आहे ही गोष्ट संस्कृतच्या अनेक अभ्यासकांनी लक्षात घेतली व आग्रहाने अंमलातही आणली. तरीही संस्कृतमधील अध्यात्मपर ज्ञान मराठीत जितके आणले गेले तितके ज्ञान इतर विद्याक्षेत्रांच्या वाङ्मय-विश्वात आले नाही. त्यामुळे न्यायदान, धर्माधर्मविचार यांसारख्या अनेक गोष्टींसाठी पुन्हा संस्कृतच्या जाणकारांवर अवलंबून राहावे लागले. त्याचा परिणाम म्हणून संस्कृत-प्राचुर्य नसलेल्या बोलीभाषेचा वापर सामान्य दैनंदिन जीवनासाठी, अत्यंत मर्यादित

क्षेत्रात राहिला.

परप्रांतांशी वैचारिक देवाणघेवाणीसाठी संस्कृत भाषा ही इतर कोणत्याही भाषेपेक्षा सुलभ ठरली गेली. काशीच्या पंडितांशी पैठणच्या पंडितांचे वादविवाद मराठी हिंदीसारख्या बोलीभाषांऐवजी संस्कृतातून चालत. यावरून संस्कृत ही विद्वानांची संपर्क-भाषा म्हणून वापरात होती, हे स्पष्ट होते.

प्राचीन मराठी भाषा धार्मिक अंगाने जितकी समृद्ध झाली तितकी इतर–शास्त्रीय किंवा ललित–वाङ्मयाने समृद्ध झाली नाही. याला कारण त्या काळच्या मराठी भाषिक प्रांतावरील बदलत्या राजवटी. भाषेच्या सर्वांगीण विकासाला स्थिर राजवटींची आवश्य-कता असते. परधर्म व परचक्र यांचे आक्रमण थोपविण्यास धार्मिक विचारांवर भर द्यावा लागला; शौर्य, वीर्य, व्यक्तित्व इत्यादी धर्मप्रेमाने जागे करावे लागले व त्याच्याच साहाय्याने अस्मिता जोपासावी लागली, याचा परिणाम म्हणून एका मर्यादित क्षेत्रात भाषा जोपासली गेली व बाकीच्या क्षेत्रांतील वाङ्मयविकास त्यामानाने उपेक्षित राहिला.

इंग्रजी राजवटीत शिक्षणाची जशी व्यवस्था होती तशी त्या काळात व्यवस्था नसल्याने शिक्षण हे कुलपरंपरेने किंवा खाजगी रीतीने शिक्षक नेमून दिले जात होते. याचा परिणाम म्हणून आपल्या जातिव्यवस्थेबाहेरचे शिक्षण घेण्याची त्या समाजात फारशी सोय उपलब्ध नव्हती. स्वतःचा बहुश्रुतपणा जबाबदारीने किंवा खाजगीरीत्या शिक्षण घेऊन मिळवावा लागत होता. याचा परिणाम म्हणून अनेक विषयांची किमान जाण असणाऱ्या व्यक्ती समाजात कमी प्रमाणात राहिल्या, तसेच व्यासंगी किंवा सखोल ज्ञान असणाऱ्या व्यक्ती त्या मानाने एकांगी राहिल्या. यामुळे विशिष्ट प्रकारचे शिक्षण स्वतः कष्ट घेऊन मिळवण्याची सोय सहजसाध्य नसल्याने त्यासाठी दुसऱ्यावर अवलंबिण्याची प्रवृत्ती अधिक वाढली, याच सवयींतून संस्कृत न जाणणाऱ्या वर्गावर संस्कृत जाणणाऱ्या वर्गाला विसंबिण्याची व संस्कृत जाणणाऱ्या वर्गाने अ–संस्कृतावर आपली अधिकारवाणी वापरण्याची परिस्थिती निर्माण झाली.

स्वराज्यप्रेमामुळे मराठीवरचा लोभ वाढला व संस्कृतचा कायम राहिला, तरी मुसलमानी आक्रमणामुळे दैनंदिन व्यवहाराची भाषा, राजकारणाची भाषा, व वाङ्मयाची भाषा या भिन्न भिन्न राहिल्या. यावनी भाषेचे आक्रमण राजकारणाच्या माध्यमातून सामान्यांपर्यंत घुसले; संस्कृत भाषेचे आक्रमण पंडिती काव्यातून मराठी वाङ्मयात उतरले; संस्कृत भाषेच्या ' सुश्लिष्ट 'तेच्या गुणधर्मामुळे ते आक्रमण अधिक समाजमान्य, समाजप्रिय ठरले. शिवाजी महाराजांनी राज्यकारभारात मराठीचा दर्जा वाढविताना संस्कृतचे महत्त्व पुन्हा जोपासले गेले. या सर्व कालखंडात मराठी भाषेला बहुजनसमाजाची भाषा म्हणून नैसर्गिक महत्त्वाचे स्थान व मराठीत ज्ञानप्रसार होऊ लागून ज्ञानभाषेचे स्थान प्राप्त होत असताना परचक्रामुळे भाषेच्या स्वरूपावर जे आक्रमण झाले ते हटवून मराठीला पुन्हा खास दर्जा मिळवून देण्याच्या प्रयत्नात संस्कृत भाषेचा प्रभाव मराठीवर पडला. यावर पुन्हा परचक्र, पुन्हा मराठी भाषा दूषित, पुन्हा मराठीच्या ' मराठीपणा-

साठी ' संस्कृतची कास असा मराठीचा जीवनप्रवाह मुद्रित वाङ्मयाच्या कालखंडापर्यंत चालू राहिला.

मराठी भाषेचा स्वाभाविक रंग राज्यकर्त्यांच्या भाषेनुसार, धर्मरक्षणाच्या गरजेनुसार, परिस्थितीच्या आवश्यकतेनुसार, राज्यकर्त्यांच्या आग्रहानुसार बदलता राहिला. दळणवळणाची वेगवान साधने त्या काळी उपलब्ध नसल्याने दूर अंतरावरील परस्पर संपर्कांसाठी संस्कृतची जाण आवश्यक ठरली. वीरपुरुषांना धर्मसंरक्षणामुळे समाजात जसे प्रतिष्ठेचे स्थान राहिले तसे प्रतिष्ठेचे स्थान संस्कृत जाणणाऱ्या विद्वानांना, मराठी भाषेची उभारणी संस्कृतच्या पायावर झाली असल्याने मिळाले. या विद्वानांचा संस्कृत भाषेवरील अधिकार त्यांच्या मराठी भाषेतील लेखनातून आपोआप उतरत राहिला. कळत-न कळत तद्‌भव शब्दांऐवजी तत्सम शब्दांचा वापर भाषेत होत राहिला. पंडिती वाङ्मयरचनेच्या काळात तर संस्कृतचा मराठीतील हा पुनःप्रवेश अधिक स्पष्टपणे घडून आला.

तत्कालीन समाजात तीन प्रकारच्या लोकांना प्रतिष्ठा दिसते. एक राजकारणाशी संबंधित, दुसरे तलवारबहाद्दर व तिसरे धर्मकारणी. यांपैकी राजकारणाशी संबंधित व तलवारबहाद्दर लोक संस्कृतज्ञ होतेच असे नाही. ज नव्हते ते आपला कारभार बहुशः संस्कृतशी जवळीक असणाऱ्यांकडून चालवीत असत. जे धर्मकारणी होते ते एकतर स्वतः संस्कृत जाणणारे होते किंवा संस्कृत जाणणाऱ्यांच्या संपर्कात होते. या सर्व कारणांमुळे असे म्हणता येईल की तत्कालीन समाजातील प्रतिष्ठित वर्ग एक तर स्वतः संस्कृत जाणणारा होता, नाही तर संस्कृत जाणणाऱ्यांच्या जवळच्या संपर्कात होता. त्यामुळे या लोकांच्या बोलण्यात संस्कृत भाषेचा प्रभाव अधिक होता असे म्हणता येईल. हा प्रभाव ' प्रतिष्ठा ' दाखवणे, मिळवणे या ओढीतून आला असेल, न कळत आला असेल किंवा काही अभिव्यक्ती मराठीतून करण्यास मराठी भाषा अपुरी ठरल्याने आला असेल. परंतु तत्कालीन प्रतिष्ठित वर्गाचे मराठी संस्कृत भाषेच्या जाणकारीच्या पायावर उभे होते असे अनुमान करणे या कालखंडातील समाजजीवनाचा व भाषेचा एकत्रित विचार करता योग्य दिसते.

२.४. मुद्रणलिखिते :

इसवी सनाच्या सोळाव्या शतकात प्रयोगावस्थेत नुकतीच सुरू झालेली मुद्रणकला इ. स. १८०५ नंतर जसजशी भरभराटीला आली तसतसें वाङ्मयनिर्मितीमधील विविध प्रयोग व वाङ्मय प्रसाराचा वेग या दोन्ही गोष्टी, यंत्रयुगामुळे बदलत्या समाजजीवनाबरोबर, वाढत्या राहिल्या. वाचकांच्या अभिरुचीचे लेखकांवर व लेखकांचे वाचकांवर होणारे परिणाम, लेखनामुळे समाजात प्रसृत होणाऱ्या अगणित विचारधारा, उपेक्षित अशा समाजजीवनाच्या अनेक अंगांना लेखनाने केलेले स्पर्श, इत्यादी प्रकारच्या अनेक कारणांनी मराठी भाषेतील वाङ्मयलेखनाचे विषय बदलते राहिले.

अनेक क्षेत्रांना गवसणी घालणारे ठरले. भाषेतील परिवर्तनशीलतेची नोंदही व्याकरण व व्याकरणविषयक लेखनात घेतली गेली. समाजातील बदलत्या प्रतिष्ठित वर्गांमुळे प्रतिष्ठितांच्या भाषेच्या स्वरूपातही बदल पडत राहिले. या सर्व घटनांचा अभ्यास समाजजीवनाच्या संदर्भात योग्य प्रकारे करण्यासाठी, मुद्रित वाङ्मयाचे वाङ्मयाच्या गद्यपद्यादी प्रकारावरून वर्गीकरण न करता, पुढील कालखंड पाडले आहेत.[1]

(अ) सन १८०५ ते १८५० — बीजारोपण काल,
(ब) सन १८५० ते १८७४ — आरोह काल,
(क) सन १८७४ ते १९४७ — विस्तार काल,
(ड) सन १९४७ ते १९७८ — संकीर्ण काल.

२.४. (अ) बीजारोपण काल :

सन १८७५ नंतर झालेल्या मुद्रणकलेच्या प्रसाराचा परिणाम प्रामुख्याने ग्रंथरचनेच्या विविधतेत दिसून येतो. धर्मपरतेमुळे एकसुरी झालेले वाङ्मय जीवनाच्या विविध क्षेत्रांना व्यापू लागण्याचे प्रमुख कारण म्हणजे पेशवाईचा अस्त व ब्रिटिश सत्तेचा उदय हे होय. लोकांच्या धर्मभावना न दुखवता इंग्रजांनी वेगवेगळ्या सुधारणा केल्या,[2] मिशनऱ्यांना शिक्षणप्रसारासाठी उत्तेजन दिले, व्यापाराच्या वाढीसाठी दळणवळणाच्या सुलभ सोयी उपलब्ध करून दिल्या, यामुळे विचारवंतांना समाजजीवनाकडे पाहण्याची नवी दिशा जशी मिळाली तशीच नवी आव्हानेही मिळाली. एलफिन्स्टन या विद्याप्रेमी प्रशासकाने पुण्यात कॉलेज काढले व मुंबईत 'दि नेटिव्ह स्कूल बुक अँड स्कूल सोसायटी' नावाची संस्था स्थापन केली. यानंतर ज्या संस्था स्थापन झाल्या व शाळा चालविल्या गेल्या त्यासाठी जे लेखन झाले त्यामुळे मराठी भाषेला विशिष्ट आकार येत गेला. हा लेखकवर्ग संस्कृतचा जाणकार किंवा संस्कृतची किमान तोंडओळख असणारा असल्याने या पुस्तकातील भाषा आधीच्या कालखंडातील प्रतिष्ठितांच्या, संस्कृतशी नाते जपणाऱ्या भाषेच्या तोंडावळ्याचीच होती.

मुसलमानांच्या आक्रमणाने समाजजीवनावर जरी अनेक आघात झाले तरी संस्कृतच्या जाणकाराची प्रतिष्ठा गेली नाही. फारसीच्या अभ्यासाची पद्धतशीर सोय किंवा सक्ती या राज्यकर्त्यांच्या कालखंडात आढळत नाही. त्यामुळे खाजगीरीत्या जे शिक्षण झाले ते ज्याच्या त्याच्या भाषेतून झाले, धर्मविषयक प्रमुख ज्ञानभांडारामुळे संस्कृतची प्रतिष्ठा राहिली व भौतिक शास्त्रात प्रगती करणारे ज्ञान त्या मानाने जोपासले गेले नाही. याउलट इंग्रज राजवटीत भौतिक शास्त्रांच्या ज्ञानाची ओळख करून

१. हे कालखंड गणिती पद्धतीने नाहीत हे सुचविण्यासाठी सन १८५०, १८७४ व १९४७ हे दोन दोन वेळा वापरलेले आहेत.

२. मराठी वाङ्मयाचा विवेचक इतिहास, अर्वाचीन–जोशी–पृ. ७.

देण्याचे कार्य शाळाखात्याने चालविल्यामुळे ते सर्वसामान्य समाजासाठीसुद्धा शक्यतेच्या कक्षेत राहिले.

ख्रिस्ती मिशनऱ्यांनी धर्मप्रसारार्थ मराठी भाषा शिकून ' मराठी ' राबविण्याचे धोरण आखले. मराठी समाजाशी जवळीक साधण्यासाठी मराठीतून आपले ग्रंथ लिहिले, मराठी भाषा शिकण्यासाठी मराठीची व्याकरणे, कोशग्रंथ तयार केले, 'अडाणी धर्मातून चांगल्या धर्मात नेण्यासाठी' अनेक पुस्तके लिहिली, तशीच स्वतःचा छापखाना, वृत्तपत्रे-मासिकेही चालू केली. याचा परिणाम हिंदू विचारवंतांवर दोन प्रकारे झाला. काही थोडे स्वतः ख्रिस्ती होऊन त्यांनी धर्मप्रसारास व वाङ्मयनिर्मितीस हातभार लावला; तर कित्येकांनी ख्रिस्ती मिशनऱ्यांना उत्तर देण्यासाठी व हिंदुधर्माचे श्रेष्ठत्व सिद्ध करण्यासाठी नियतकालिके चालविली, पुस्तके लिहिली, या प्रवृत्तीतून हिंदुधर्माच्या कर्मकांडाचा पाठपुरावा करणारा एक वर्ग तयार झाला तर त्या कर्मकांडातील दोष दाखवून हिंदुधर्माच्या तत्त्वज्ञानाचा पुरस्कार करणारा एक वर्ग तयार झाला.

या काळात नवीनच चालू झालेल्या मासिकांमुळे सामाजिक, राजकीय, धार्मिक जागृतीस आधार मिळाला, तसेच परलोकात उपयोगी पडणाऱ्या वेदान्तशास्त्रापेक्षा व्यवहारोपयोगी शास्त्रे व विद्या यांची ओळख समाजाला करून दिली गेली. या सर्वांच्या वाचकवर्गाचे दोन प्रकार तयार झाले. पहिल्या वर्गात, निरक्षर परंतु वाचून दाखविलेले ऐकण्याची इच्छा असलेले; साक्षर व जिज्ञासू ; नवविचारांकडे आकृष्ट झालेले; परंपरागततेला दिले गेलेले धक्के पसंत असणारे किंवा नसणारे अशा अनेक लोकांचा समावेश होतो. दुसरा वर्ग, नवविचारांचे आव्हान योग्यायोग्यतेच्या निकषाने पेलू शकणारा, स्वतः विद्वान किंवा सुजाण अशा विचारवंतांचा होता.

ख्रिस्ती मिशनऱ्यांचे काम व्यासंगी, सुजाण वर्गापेक्षा, पीडित, अजाण वर्गात अधिक यशस्वी होण्याची शक्यता होती. या वर्गाला समजेल अशी भाषा त्यांनी प्रामुख्याने वापरल्याने त्यात शिष्ट-अशिष्ट मराठीचे संमिश्रण आढळून येते. इंग्रजी भाषेच्या प्रभावाने संस्कृत भाषेची ' संगत ' मात्र, या काळात सुटण्याची पहिली अवस्था निर्माण झाली. ज्या लोकांनी ग्रंथलेखन केले ते त्यांच्या गटप्रमाण बोलीतून केले. त्यामुळे मराठीच्या प्रमाण स्वरूपाची निश्चित मार्गाने वाटचाल सुरू झाली. भाषा सर्वांना समजणारी असावी ही प्रक्रिया एका बाजूला, व पुरेशी समजत नसलेली भाषा वरचेवर वाचनात येऊन समजू लागण्याची प्रक्रिया दुसऱ्या बाजूला अस्तित्वात आली. या दोन प्रक्रियांच्या संमिश्रणातून मराठीचे जे शिष्टमान्य स्वरूप, मुद्रितवाङ्मयामुळे, सामान्यजनांच्या समोर आले त्या योगाने इंग्रजी व संस्कृत जाणणाऱ्या, आणि केवळ संस्कृत जाणणाऱ्या क्वचित केवळ इंग्रजी जाणणाऱ्या परंतु मराठीचा व्यासंग असणाऱ्या, भाषाकोविदांकडून मराठी भाषेच्या पुढील काळातील प्रमाणस्वरूपाचे जणू काही बीजारोपणच झाले.

२.४. (ब) आरोह काळ :

हिंदुधर्माच्या कर्मकांडावर आघात करणाऱ्या चळवळीचे एक स्वरूप म्हणून या

काळात प्रार्थनासमाज, सत्यशोधक समाज इत्यादींची स्थापना जशी झाली तसेच हिंदू धर्माकडे केवळ सनातनी दृष्टीने पाहण्यापेक्षा अधिक वैचारिक दृष्टीने पाहणारे अनेक विद्वानही उदयाला आले. या विचारवंतांच्या जोडीने विश्वविद्यालयीन शिक्षण घेणारी, पदवीपर्यंतचे अभ्यासक्रम पूर्ण करणारी विचारवंतांची एक पिढीच समाजात तयार झाली. इंग्रजी भाषेच्या माध्यमातून शिक्षण घेतलेल्या या लोकात हिंदुधर्माभिमानी होते, हिंदुधर्मातील उणिवा दाखविणारे इंग्रजी विद्येचे स्वागत करणारे किंवा ख्रिस्ती धर्माचे गुणगान करणारेही होते. या सर्व लोकांतील लेखकवर्गाने आपापल्या मगदुराप्रमाणे लेखन केले. शिवाय मुद्रणकलेच्या प्रसारामुळे आत्तापर्यंत हस्तलिखित स्वरूपात सांभाळले गेलेले पोथ्या, पुराणे, माहात्म्ये, आरत्या, स्तोत्रे, जुने धार्मिक ग्रंथ इत्यादी पुस्तकांच्या रूपाने उपलब्ध होऊ लागले. याचा परिणाम म्हणून एक विशिष्ट वाचकवर्ग तयार झाला. त्याला मुद्रित स्वरूपात प्राचीन सांप्रदायिक वाङ्मय, ख्रिस्ती मताचे वाङ्मय, विशिष्ट धर्मजीवनाच्या वाङ्मयातील विचारांना विरोध दर्शविणारे वाङ्मय व धर्मजीवनाच्या क्षेत्राबाहेरील वाङ्मय असे वाङ्मयाचे विविध स्वरूप उपलब्ध होऊ लागले. या वाङ्मयात, या काळात लिहिलेले मराठी गद्य इंग्रजीच्या प्रभावामुळे इंग्रजीच्या वळणावर गेले; साधी, सोपी सुटसुटीत वाक्यरचना व काहीसे ओबडधोबड लेखन या गद्यात आले.[1] रसायन, पदार्थविज्ञान, भूमिती वगैरे विषयांना जरी जुनी भारतीय परंपरा असली तरी त्या विषयांसंबंधीचे ज्ञान युरोपीय भौतिक विषयांच्या आधारावर उभे राहिले.

गद्यवाङ्मयाच्या विकासाच्या जोडीने या कालखंडातील पद्यवाङ्मयाचाही विकास झाला. प्राचीन कवितेचा पारमार्थिक व धार्मिक विषयांचा प्रवाह पुढे चालूच राहिला. या प्रकारच्या काव्याखेरीज इंग्रजी भाषेतील काव्यरचना भाषांतरित रूपाने किंवा रूपांतरित स्वरूपाने लिहिल्या गेल्या. ऐतिहासिक काव्यविषयाबरोबरच देशस्थिती, सृष्टि-वर्णन, चरित्रवर्णनपर काव्येंही लिहिली गेली. स्वतंत्र काव्यरचनेची प्रेरणा बहुशः इंग्रजीच्या कवितेच्या वळणावर गेली.

सन १८४३ मध्ये विष्णू अमृत भावे यांच्या ‘सीतास्वयंवर’ या नाटकाच्या सांगली येथील प्रयोगाने, ज्याची परंपरा पुढे विकसित झाली अशी मराठी रंगभूमी उदयाला आली. यानंतर इचलकरंजीकर नाटक मंडळीही पौराणिक नाटकांचे प्रयोग करू लागली. हळूहळू नाटकाचे देखील पुस्तक होऊ शकते याची जाणीव नाटक-कारांना झाली. तसेच मासिकातूनही क्रमशः नाटके प्रसिद्ध केली जाऊ लागली. पौराणिक नाटकाच्याशिवाय इंग्रजी रंगभूमीच्या अनुकरणामुळे अपौराणिक नाट्यप्रयोग होऊ लागले. याशिवाय संस्कृत नाटकांची भाषांतरे व रूपांतरे आणि शेक्सपीअरच्या इंग्रजी नाटकांचे अनुवाद मराठीत आले. तत्कालीन समाजातील सनातनी व सुधारक

१. मराठी वाङ्मयाचा विवेचक इतिहास, अर्वाचीन–जोशी, पृ. ३३.

यांच्या संघर्षातून काही सामाजिक नाटके लिहिली गेली तशीच काही कल्पनाप्रधान किंवा ऐतिहासिक नाटकेही रचली गेली.

सन १८६१ मधील हळबे यांच्या 'मुक्तामाला'[1] या कादंबरीपासून मराठीत अद्‌भुतरम्य शृंगारविलास असणाऱ्या, बहुशः आनंदपर्यवसायी कादंबऱ्यांचा विकास झाला. यांची भाषा बोजड संस्कृतमिश्रित असूनही शाब्दिक कसरतींची अनावर हौस लेखकांना होती.[1] वरील कादंबऱ्यांच्या जोडीने ऐतिहासिक पुरुषांभोवतीच्या कथांनी समृद्ध किंवा सामाजिक विषयांवरच्या कादंबऱ्या लिहिल्या गेल्या. तसेच विविध मासिके व वृत्तपत्रे यांतून अनेक कथाही प्रसिद्ध होत राहिल्या.

मुद्रणलिखितांच्या पहिल्या कालखंडात बीजारोपण झालेल्या मराठीच्या प्रमाण स्वरूपाचा वापर या कालखंडातील शास्त्रीय विवेचनपर ग्रंथ, धार्मिक तत्त्वज्ञानपर ग्रंथ, चर्चात्मक लेख, निबंध, काव्ये, नाटके, कादंबऱ्या, कथा व वर्तमानपत्रीय लेखन इत्यादी विविध प्रकारच्या वाङ्मयातून मुबलक प्रमाणात झाला. या काळातही इंग्रजी भाषेचा लेखक वर्गात प्रभाव असला तरी संस्कृत भाषेचा नातेसंबंध फारसा तुटलेला राहिला नाही. संस्कृत भाषेपासून दूर जाण्याची प्रक्रिया जरी चालू राहिली तरी लेखकांना असलेला पूर्वीचा संस्कृतचा व्यासंग त्यांच्या लेखनांतून उमटत राहिला. त्याचा परिणाम पंडिती वळणाच्या भाषेत जसा झाला तसाच धर्मग्रंथांचा वाचकवर्ग वाढल्याने संस्कृतचा वारसा घेऊन आलेली मराठी वाचली जात राहण्यात झाला. एकीकडे संस्कृत भाषेचे दडपण कमी होऊ लागले तरी दुसरीकडे संस्कृत भाषेची जाण किंवा तत्सम शब्दांची जाण वाढती राहिली. किंबहुना, असेही म्हणता येईल की या संस्कृत जाणणाऱ्या किंवा धर्मग्रंथांचे वाचन करणाऱ्या वाचकवर्गाच्या बळावरच अनेक क्षेत्रांतील लेखकांनी मराठी भाषा सर्व अंगांनी जोपासली. यामुळे मराठीच्या प्रमाणस्वरूपाला विशिष्ट असा आकार प्राप्त झाला किंवा तिचे विशिष्ट स्वरूप शिष्टमान्य स्वरूपात वापरले जाऊ लागले.

२.४. (क) विस्तारकाल :

सन १८७४ मध्ये इंग्रजी राज्य ही 'ईश्वरी योजना' असल्याच्या कल्पनेला पहिला धक्का विष्णुशास्त्री चिपळूणकर यांच्या निबंधमालेने दिला. स्वदेश, स्वभाषा व स्वधर्म या क्षेत्रांत एका नव्या युगाचा आरंभ निबंधमालेने जसा केला तसेच मराठी भाषेतील निबंध या प्रकाराला डौलदार व भारदस्त वळणही दिले. आपल्या अनेक निबंधांतून मराठी भाषेची स्थिती, तिच्या अभिवृद्धीचा प्रयत्न व मराठी भाषेचे सामर्थ्य याचा प्रत्यय वाचकांना दिला.[2] निबंधमालेपासून स्फूर्ती घेऊन अवघ्या महाराष्ट्रात वृत्तपत्रे, साप्ताहिके व मासिके यांद्वारा एक नवचैतन्याचे वारे सुरू झाले. महाराष्ट्राच्या

१. मराठी वाङ्मयाचा विवेचक इतिहास, अर्वाचीन-जोशी, पृ. ३१८.

२. मराठी वाङ्मयाचा विवेचक इतिहास, अर्वाचीन-जोशी पृ. ४८.

राजकीय व सामाजिक जीवनास वळण देऊन असंख्य लोकांना कार्यप्रवृत्त करणारी वृत्तपत्रे येथून पुढच्या काळात निघाली.

काळ बदलला तरी प्राचीन कवितेचा पारमार्थिक व धार्मिक समृद्धीचा वारसा अजूनही चालू राहिला. संस्कृत रचनेप्रमाणे भक्तिपर अशा स्फुटरचनाही मराठीत केल्या गेल्या. यांखेरीज प्राचीन पंडिती काव्याची परंपरा अनेक कवींनी जोपासली. संस्कृतच्या वाङ्मयाचा व भाषेचा पगडा या सर्वांच्या वाङ्मयावर असणे अर्थातच अपरिहार्य आहे. इंग्रजीचे ज्ञान असणाऱ्या पंडितांनी इंग्रजी काव्याची भाषांतरे मराठीत आणली. अनेक ऐतिहासिक विषय, सृष्टिवर्णने, साध्यासुध्या माणसाचे भावविश्व यांना मराठीच्या काव्यात स्थान मिळू लागले. सन १९२० नंतर कविता ही वैयक्तिक वाचनाची बाब न राहता समाजात वाचली जाण्याचा प्रघात पडू लागला. सन १९२३ मध्ये रविकिरण मंडळाची स्थापना झाली. कवितेवर साधकबाधक टीका होऊ लागल्या. विडंबन काव्ये, शिशुगीते, जानपदगीते, गद्यगीते, नाट्यकाव्ये, भावगीते वगैरे स्वरूपात कविता लिहिली जाऊ लागली आणि दुसऱ्या युद्धानंतर कवितेने आणखी एक नवे वळण घेतले.

इंग्रजी व संस्कृत नाटकांची भाषांतरे, रूपांतरे होऊन सुरू झालेली मराठीची वाटचाल नव्या नव्या पद्धतींनी पुढे जाऊ लागली. संगीत नाटकांच्या नव्या परंपरेच्या जोडीने अनेक राजकीय, पौराणिक, धार्मिक व सामाजिक नाटके रंगभूमीवर आणली गेली. याच कालखंडात बोलपट निघू लागल्याने प्रेक्षक वर्गाला एक नवी करमणूक मिळाली. तासन्तास चालणाऱ्या संगीत नाटकांपेक्षा दोनतीन तास चालणाऱ्या करमणुकीचे आकर्षण वाटू लागले. याचा परिणाम लहान लहान नाटके किंवा नाटिका लिहिल्या जाण्यात झाला. नाटकांसाठी इब्सेनचे तंत्र वापरले. नव्या प्रकारची नेपथ्यरचना, पार्श्वसंगीताचा उपयोग, अभिनयाची नैसर्गिक रीत, नाट्यप्रयोगातील रेखीवता व वास्तवता यांच्यासारख्या गोष्टी नव्या तंत्रात अवलंबिल्या गेल्या.

वृत्तपत्रांमधील प्रसारामुळे कथनलेखनाला वाव मिळाला असला तरी कथा लोकप्रिय करण्याचे कार्य ‘ करमणूक ’ या साप्ताहिकाने केले. मनोरंजक कथांच्या जोडीला हेतुप्रधान व संस्कारप्रधान कथाही मराठीत आल्या. सन १९२० मधील दिवाकर कृष्ण यांच्या कथांमुळे या कथांना एक निराळे वळण मिळाले. केवळ प्रसंगनिष्ठ, घटनाबोधक व रहस्यकारक कथांऐवजी सूक्ष्म भावनेस प्राधान्य, वेधक भाषा, सुटी व लहान लहान वाक्यें इत्यादींनी कथांना नवा आकार दिला गेला. त्याचा फायदा पुढील कथाकारांनी भरपूर घेतला. पाश्चात्य व भारतीय भाषांचे ज्ञान या कथाकारांना उपयोगाला आले.

चिपळूणकरांच्या निबंधमालेत ‘ विनोदमहाख्यायिका ’ या नावाचे एक चुरचुरीत व विनोदी प्रसंगांचे सदर येत असे. या प्रकारचे लेखन, श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांच्याकडून स्फूर्ती घेऊन, पुढील काळात पुष्कळ झाले. तसेच काही प्रवासवर्णनें, शब्दचित्रे, व्यक्तिचित्रे, ललित निबंध, पत्रात्मक साहित्य इत्यादी प्रकारचे विविध वाङ्मयप्रकार या कालखंडात हाताळले गेले.

या कालखंडातील वाङ्मयावरून दिसून येणारे समाजजीवन पाहता एक प्रकारच्या वैचारिक क्रांतीने भरलेला हा कालखंड दिसतो. स्वराज्यासाठी झगडणारा वर्ग, इंग्रजांची इमानेइतबारे चाकरी करून सुखवस्तू जीवन जागणारा वर्ग, पारतंत्र्य व स्वातंत्र्य यांतील फरकही कळू न शकणारा वर्ग, इंग्रजी शाळेतील शिक्षणामुळे स्वतःला सुधारक म्हणवणारा वर्ग असे वेगवेगळे वर्ग या कालखंडात दिसून येतात. दैनंदिन जीवनात शिक्षणाचा संबंध बऱ्याच प्रमाणात उत्तम चाकरी मिळविण्यापुरता असे. विचारवंतांचा संस्कृत व इंग्रजी किंवा फक्त इंग्रजी भाषेचा व्यासंग मोठा असे. जीवन जगण्यासाठी निढळाचा घाम गाळण्याचे प्रमाण यंत्रयुगाच्या वाढीनें जसजसे कमी होऊ लागले तसतसे सामान्य माणसाचे जीवनविषयक दृष्टिकोन बदलत राहिले. नेत्यांच्या संस्कृतीचे अनुकरण व हिंदुधर्माची निंदा म्हणजे सुधारकीपणा असे विचार वाढत जाऊन पारंपरिक कर्मठपणा बोथट होण्याच्या मार्गाला लागला. प्रत्येक गोष्टीसाठी जबरदस्त भावनिक निष्ठा बाळगण्याची प्रवृत्ती कमी झाल्याने समाजात तत्त्वांसाठी झगडण्याची इच्छा नसणारा एक वर्ग निर्माण झाला. त्याचबरोबर दुसऱ्या टोकाने संस्कृत व संस्कृती जपणाराही वर्ग तयार झाला. या दोन्ही वर्गांची जी रस्सीखेच सुरू झाली ती हिंदु-धर्माभिमान्यांनी हिंदुधर्मातील कित्येक जाचक रूढी आज सोडून दिल्या असल्या तरी अजूनही संपलेली दिसत नाही. या काळातील अनेक गोष्टींचे जे परिणाम झाले त्यात भाषेच्या दृष्टीने आपल्या बोलण्यात इंग्रजी शब्दांचा भरणा करणे म्हणजे प्रतिष्ठित-पणाचे लक्षण समजले जाऊ लागले. जो हेतुतः अथवा इंग्रजी ज्ञानाचे अभावी असा शब्दभरणा करणार नाही तो कमी प्रतिष्ठेचा समजला जाऊ लागला, किंवा सनातनी म्हणून हिणवला जाऊ लागला. जातीजमातीतील तेढ भाषेच्या दृष्टीने अशी विकोपाला गेली की जी भाषा ब्राह्मण बोलतात ती कमी दर्जाची मानली गेली पाहिजे व ब्राह्मणे-तरांची भाषाच श्रेष्ठ मानली गेली पाहिजे, या पुढील काळात जोपासल्या गेलेल्या भाषिक वादविषयक प्रवृत्तींचे बीजारोपण या काळात झाले. संस्कृत भाषा जाणणारे लोक बहुतांशी ब्राह्मण असल्याने सुशिक्षित अब्राह्मणांनी संस्कृत भाषेविषयी एक प्रकारचा आकस धरला तर पुराणोक्त धर्मशास्त्रांचा आधार असलेल्या संस्कृतबद्दल अशिक्षित वर्गाने आदरभाव ठेवला.

मराठी भाषा विविध वाङ्मयप्रकारांतून वापरली जात असताना नाटक, कथा, कादंबरी यांसारख्या वाङ्मयप्रकारांत बोली भाषेतील अनेक शब्दप्रयोग व वाक्प्रयोग लेखनाच्या भाषेत स्थिरावले. फारसी भाषेतून आक्रमण झालेले अनेक शब्द आतापर्यंत रुळून ' मराठी ' बनलेच होते परंतु आता मराठीने इंग्रजीचे आक्रमण स्वीकारले. हे आक्रमण वैचारिक लेखनातून मराठीत आलेच पण मराठीच्या व्याकरणिक अंगांवरही त्याचा प्रभाव पडला. इंग्रजी धर्तीवर व्याकरणे लिहिली गेली. संस्कृतचा व्यासंग असणाऱ्या ज्या पंडितांना ही आक्रमणे पसंत पडली नाहीत त्यांनी त्याविषयी आपले अनेक लेख प्रसिद्ध केले. परंतु त्यांचा म्हणावा तसा प्रभाव भाषेच्या स्वरूपावर पडला

नाही. मुंबई मराठी ग्रंथालय, महाराष्ट्र साहित्य परिषद यांच्यासारख्या संस्था स्थापन होऊन जशा वाढीला लागल्या तसे टीकात्मक वाङ्मय अधिक प्रमाणात उपलब्ध होऊ लागले, मराठीच्या व्याकरणिक अंगांच्या चर्चा होऊ लागल्या. या कालखंडाच्या उत्तरार्धात संस्कृत जाणणाऱ्यांची संख्या कमी कमी होऊ लागली व इंग्रजी भाषेच्या प्रभावाखालील वर्ग भरमसाट वेगाने वाढीला लागला.

२.४. (ड) संकीर्ण काल :

दुसऱ्या महायुद्धानंतर मराठी माणसाचे समाजजीवन, विशेषतः वाङ्मय वाचन व लेखन या दृष्टीतून, आमूलाग्र बदलले. या काळात यंत्रयुगाचा विकास झाल्याने जी प्रवृत्ती बदलली त्यात निबंध हा वाङ्मय प्रकार, जो चिपळूणकरांपासून अनेक लेखकांनी जोपासला होता त्याचा प्रवाह क्षीण होत चालला. निबंध लेखकांच्या तत्त्वचिंतन,[1] शैली, जिव्हाळा, द्रष्टेपणा, इत्यादी गुणांना उतरती कळा लागली. आत्मनिवेदन व आत्मप्रकटीकरण करणाऱ्या स्वैर विचारात्मक निबंधाची मागल्या कालखंडात सुरू झालेली शाखा अधिकाधिक बहरत गेली. औपचारिक भाषेपेक्षा अनौपचारिक भाषा ज्यात वापरली जाते अशा या निबंधांचा परिणाम मराठीच्या भाषा स्वरूपावर निश्चितपणे झाला.

कवितांच्या बाबतीत जुन्या परंपरा, जुनी रूपके किंवा जुन्या निष्ठा यांना फारसे स्थान राहिले नाही. महायुद्धामुळे झालेल्या प्रचंड विनाशाचा परिणाम म्हणून झालेली सांस्कृतिक मूल्यांची घसरगुंडी,[2] युद्धसाहित्याच्या निर्मितीमुळे जीवनाला आलेला यांत्रिकपणा, औद्योगिक क्रांतीमुळे वाढलेली शहरे, या साऱ्यांचा परिणाम मराठी कवितेवर झाला. यातून नवकाव्याची निर्मिती झाली. भाबडी भावविवशता जाऊन अर्थगर्भ वैचारिकता मराठी कवितेला आली. ग्राम्यता, अश्लीलता, अपरिचित रूपके, चमत्कारिक प्रतिमा, परभाषेतील शब्द इत्यादी वैशिष्ट्यांनी विकसित अशी कविता या काळांत दुर्बोधही झाली. कमीत कमी शब्दांतील, मुक्त छंदातील कविता गेयही राहिली नाही, पण अर्थसत्तेचें अर्थघनतेमुळे विचारसंपन्न मात्र झाली. परंतु या काळातही काही कवींनी सुबोध, सुश्लीष्ट काव्यरचना केलेल्या आहेत. आतापर्यंत काही अपवाद वगळता मराठी कविता ही उच्चवर्णीयांमध्ये वाचली जात होती. त्यांच्यासाठी लिहिली जात होती, परंतु समाजाच्या सर्व थरात शिक्षणाचा प्रसार झाल्यावर आतापर्यंत मूक असलेल्या समाजाच्या विशिष्ट थरांचे प्रक्षोभ घेऊन कविता नवे रूप घेऊ लागली. असे झाले तरी ईश्वर, गुरू, आत्मचिंतन, वेदान्तनिरूपण, वीरपुरुषांची गीते, स्फूर्तिगीते इत्यादींनी कविता सर्वस्वी वंचित राहिली नाही. अध्यात्माची परंपरागत धारा कवितेतून पुढे सरकत राहिलीच. या सर्वांच्या जोडीला चित्रपटनिर्मिती व तमाशांना मिळालेली प्रतिष्ठा यामुळे गण, गौळणी, लावण्या

---

१. मराठी वाङ्मयाचा विवेचक इतिहास, अर्वाचीन–जोशी, पृ. ९०.

२. मराठी वाङ्मयाचा विवेचक इतिहास, अर्वाचीन–जोशी, पृ. २३६.

पोवाडे, गीते इत्यादींचा पसाराही फार मोठा वाढला. समाजाच्या सर्व थरापर्यंत चित्रपट पोचत असल्याने अशिक्षित व्यक्तींच्या वापरातील शब्द जसे या चित्रपट–तमाशासाठीच्या काव्यात आले तसेच सुशिक्षित वर्गाची भाषा अशिक्षित व्यक्तीच्या कानांवर अधिक प्रमाणात पडू लागली.

मराठी नाटकांनी आधीच्या कालखंडात ऐतिहासिक, पौराणिक, सामाजिक अशा विविध क्षेत्रांतील जे विषय उचलले ते अलीकडच्या काळातही हाताळले जात आहेत. सन १९४७ च्या पूर्वीचे नाटककार याही कालखंडात आपले नाटकाचे विषय नवीन ढंगाने हाताळत राहिले. अजूनही अनेक भाषांतरित किंवा रूपांतरित नाटके रंगभूमीवर येत आहेत. शिक्षणापासून बराच काळ वंचित राहिलेल्या समाजाला शिक्षण मिळू लागल्याने त्यांची अस्मिता जागी होऊन नाटकातून दृग्गोचर होत आहे. या काळात अनेक परभाषांची जाण वाढण्याची संधी उपलब्ध झाल्याने व बोली भाषांचे खरेखुरे किंवा कृत्रिम प्रेम वाढल्याने त्याचा परिणाम नाटकाच्या भाषेवर होताना दिसून येत आहे.

सन १९२० नंतर फडके, खांडेकर इत्यादी कथाकारांनी जे कथाविश्व निर्माण केले त्याच्यावरही दुसऱ्या महायुद्धाचे परिणाम झाल्याशिवाय राहिले नाहीत. सहज ध्यानात येणारी बालबोध कथा केव्हाच मागे पडली असून भोवतालच्या जीवनात दिसणाऱ्या बजबजपुरी, लोभ, [illegible] संघर्ष, क्षुद्रत्वाचा उद्रेक, ढोंगीपणा, स्वार्थ इत्यादींनी निर्माण होणाऱ्या विसंगतीचे अर्थ लावण्याचे प्रयत्न कथेतून सुरू झाले आहेत. कथानकाच्या बंधनांतून सुटणारी, माणसाच्या मनाच्या अंतर्भागाचा ठाव घेणारी कथा या कालखंडात निर्माण होत आहे. पण त्याचबरोबर जुन्या परंपरेची, सांस्कृतिक मूल्ये जपणारी, रंगरूपाने नवी वाटणारी संस्कारसंपन्न कथाही तितकीच रसिकतेने वाचली जात आहे. भल्याबुऱ्या माणसांचे वास्तव किंवा भडक चित्रण करतानाही मानवी मूल्यांवर अढळ निष्ठा राखणाऱ्या कथाही लिहिल्या जात आहेत. सन १९६० च्या सुमारास मराठी कथेने आणखी एक वळण घेतले. विविध वासना, नैराश्य, यांत्रिकता, विफलता, विकृत मनोवृत्ती, अर्थशून्यत्व यांचा शोध कथांच्या माध्यमातून होत राहिला व आत्मकेंद्रित माणसाचे चित्रण त्यामधून केले जात राहिले.

कथा, कादंबरी, कविता, निबंध, नाटके, प्रवासवर्णने, लघुनिबंध, शब्दचित्रे, पत्रात्मक साहित्य वगैरे अनेकविध वाङ्मयप्रकार, या कालखंडात, नवीन जीवनमूल्यांच्या पार्श्वभूमीवर संवादी किंवा विसंवादी सुरांनी रेखाटले जात आहेत.

दुसऱ्या महायुद्धाने बदललेल्या समाजजीवनाचा व स्वातंत्र्यप्राप्तीचा मराठी भाषेच्या आविष्कारावर फार परिणाम झालेला दिसून येतो. हिंदू धर्मग्रंथाचे संस्कृतातून वाचन किंवा श्रवण जवळजवळ नाहीसे होत आले आहे. इंग्रजी वाङ्मय व इंग्रजी पद्धतीचे आचारविचार असणे या प्रतिष्ठितपणाच्या लक्षणात काही प्रमाणात बदल होत आहे. संस्कृत किंवा इंग्रजी जाणणाऱ्या व उच्चविद्या–विभूषित व्यक्तीकडून प्रतिष्ठितपणा या कालखंडात दुसऱ्याच व्यक्तींकडे हळूहळू जाताना दिसत आहे. समाजात

व्यासंगी व्यक्तींना मान असला तरी त्याचे प्रमाण राजकारणी प्रतिष्ठित किंवा आर्थिक दृष्टया प्रतिष्ठितांपेक्षा निश्चितपणे कमी होत आहे. स्वातंत्र्योत्तर काळात मराठीला राजभाषा म्हणून मान मिळाला तरी ती खऱ्या अर्थाने अजूनही फारशी वापरात आणली जात नाही. ही वस्तुस्थिती बदलण्याच्या प्रयत्नात मराठी भाषेच्या वास्तव-स्वरूपाची चिकित्सा करण्याऐवजी जातीजमाती, व्यक्तिगत अभिनिवेश, राजकारण, स्वार्थ, संधिसाधूपणा यांसारख्या अनेक गोष्टी मराठीची हेळसांड करण्यास कारणीभूत होत आहेत. ललितवाङ्मयाच्या कक्षेत पूर्वी न आलेल्या शब्दांना किंवा विषयांना आकाशवाणी, चित्रपट, ललितवाङ्मय व दूरदर्शनसारख्या माध्यमातून वाव मिळत असल्याने प्रतिष्ठित व अप्रतिष्ठितांचे शब्द, सुशिक्षित–अशिक्षितांचे शब्द यात एक प्रकारची सरमिसळ झाली आहे. तसेच मराठीच्या प्रमाणस्वरूपाच्या चर्चेत 'खास मराठी' असा शब्दप्रयोग वारंवार आढळत आहे. यातील 'खास' हा मूळचा फारसी शब्द, नेमकी कोणती मराठी दाखवतो हे उलगडत नाही. 'खाशांची' मराठी तर नव्हे असा आभास निर्माण होत असला तरी भाषेची परंपरा सुटली की 'खासे' पण कोठे शोधावयाचे हा आजच्या मराठीच्या सर्वांगीण विकासाबाबत मूलभूत प्रश्न उपस्थित झालेला आहे.

२.५. प्रामाण्याचा आढावा :

भाषा लिहिली जाते तेव्हा तिचे संपर्काचे क्षेत्र मोठे असावे किंवा बोललेल्या, बोलायच्या शब्दांना 'अक्षरत्व' यावे हा हेतू असतो. वैयक्तिक जीवनात भाषा लिहिली जाते तेव्हा ती कशा प्रकारे लिहिली जाते हा अभ्यासाचा वेगळा विषय होऊ शकत असला तरी वाङ्मयीन दळणवळण व अधिक संपर्काचे मोठे क्षेत्र साधणे आणि भाषेमध्ये प्रकट केलेल्या भावना व विचार यांना ध्वनिरूपाच्या स्वरूपाहून वेगळ्या 'अक्षर' स्वरूपात पकडून ठेवणे हा प्रयत्न भाषेच्या लेखनाने केला जातो. अशा हेतुपुरस्सर लेखनासाठी वापरले जाणारे भाषेचे स्वरूप सर्व समाजाला समजण्याजोगे असावे लागते. व्यक्तिगत अभिनिवेश सोडले तर मोठ्या संपर्कासाठी पोटभाषेचा किंवा प्रमाणभाषेचा वापर केला जातो. पोटभाषेपेक्षा प्रमाणभाषेने संपर्काचे अधिकच विस्तृत क्षेत्र व्यापता येते. प्रमाणभाषा ज्या प्रतिष्ठितांना मान्य अशी भाषा असते ते प्रतिष्ठित बदलत्या समाजजीवनात बदलते राहतात. त्याचा परिणाम भाषेच्या स्वरूपावर काही प्रमाणात का होईना, झाल्याशिवाय राहात नाही.

मराठीच्या हस्तलिखित वाङ्मयाच्या कालखंडात दैनंदिन व्यवहारात संस्कृतच्या वारशाने आलेली व जरूर तेथे संस्कृतचे शब्दभांडार वापरणारी भाषा, आणि राजकारणात फारसीप्रमुख अशा स्वरूपाची भाषा वापरली जाताना आढळते. राजकारणाशी जेवढ्या प्रमाणात संपर्क असेल तेवढ्या प्रमाणात फारसीमय मराठीला व इतरत्र संस्कृतमय मराठीला प्रामाण्य आढळते. या प्रत्येक क्षेत्रात, दळणवळणाची साधने वेगवान

नसल्याने लेखन हे प्रामुख्याने पोटभाषांतून झालेले आहे, असे म्हणणे योग्य होईल.

मराठी भाषेच्या दुसऱ्या कालखंडात संस्कृतचा प्रभाव असणारी, इंग्रजी जाणणाऱ्या लोकांकडून वापरली जाणारी, फारसी शब्दांना ' शुद्धीकृत ' करून ' मराठी ' समजले जात असलेली मराठी प्रमाण पावलेली आढळते.

यानंतरच्या कालखंडात संस्कृत भाषेचा प्रभाव उत्तरोत्तर कमी होऊन, मराठीच्या फारसीमयतेची जाणीव लोपली गेलेली मराठी प्रामाण्य मिळवीत राहिली तरी, वाङ्मयनिर्मितीचे स्रोत अजूनही संस्कृत वाङ्मयातून घेतले गेल्याने मराठी भाषेचे संस्कृतचे नातें पूर्ण लोपलेले आढळत नाही. अभिव्यक्तीसाठी जेथे मराठी शब्दभांडार तोकडे पडेल तेथे अजूनही संस्कृत शब्द वापरण्याची प्रवृत्ती आढळत राहिल्याने मराठी संस्कृतमय नसली तरी संस्कृतनिष्ठ राहिलेली आढळते. स्वदेश, स्वभाषा व स्वधर्म यांच्या अभिमानामुळे अनेक संस्कृत शब्द ' मराठी ' पण घेऊन मराठीत शिरलेले आढळतात.

मराठी भाषेच्या सन १९४७ नंतरच्या कालखंडातील मराठी हळूहळू एक नवे वळण घेताना आढळत आहे. त्यात आवश्यक तेथे संस्कृत किंवा इंग्रजी शब्द, स्वतःची बोली व इतर भाषातील आवक आणि उत्तरोत्तर व्याकरणशुद्धतेबद्दलचा आकस यांचे एक नवेच मिश्रण मराठीच्या स्वरूपात दिसून येत आहे. या मराठीचा अभ्यास करताना मराठीतील संस्कृत शब्द, खास मराठी शब्द, इंग्रजी शब्द व इतर भाषांतील शब्द म्हणजे नेमके काय याची व्याख्या निश्चित करण्याची गरज निर्माण झाली आहे. बहुजन समाजाला समजणारी तरीही प्रतिष्ठितांची म्हणजे एका मर्यादित वर्गाची अशी भाषा मुळात अस्तित्वात असते काय याचा शोध भाषेच्या वर्तनाच्या दृष्टीतून घेतला जाणे आवश्यक झाले आहे. आजच्या वाङ्मयातून वापरले जाणारे मराठी, व्याकरणाच्या निकषांनी मान्य केलेले मराठी, प्रतिष्ठितांनी औपचारिक प्रसंगी बोलावयाचे मराठी या मराठीच्या तीन स्वरूपात परस्पर संवाद साधला जात नसून सन १९११ साली दामले यांनी मराठी भाषेसाठी जे नियमनाचे कार्य केले तसे कार्य कोणीतरी एका व्यक्तीने किंवा सामूहिकरीत्या हाती घेण्याची वेळ आली आहे असे म्हटले तर ते वावगे ठरू नये.

समाजजीवन बदलत राहिल्याने संस्कृत जाणणाऱ्यांकडून इंग्रजी जाणणाऱ्याकडे झुकलेला प्रतिष्ठितपणाचा काटा आजच्या काळात निश्चित स्वरूपाचे मार्गदर्शन करीत असल्याचे वाङ्मयातून दिसून येत नसल्याने, ' प्रतिष्ठितांची परंपरा ' आजच्या मराठीला आकार देण्यात लोप पावली आहे काय हा प्रश्न उपस्थित करण्यापूर्वी व्याकरणाच्या क्षेत्रात मराठीच्या प्रामाण्याची स्थिती काय आहे हे तपासून पाहाणे आवश्यक आहे.

* * *

३
मराठीच्या भाषिक अभ्यासाचा इतिहास

३.१. प्रास्ताविक :

मराठीचे प्रमाणभाषेचे स्वरूप ठरविण्यासाठी भाषेची वाङ्मयीन परंपरा पाहिल्या-नंतर भाषाविषयक अभ्यासाच्या इतिहासामधून त्या त्या काळातील प्रामाण्य विषयक माहिती कोणती हाती लागते ते पाहाणे आवश्यक आहे. सन १८०५ पर्यंत मराठी वाङ्मय बरेचसे धार्मिक व ललित स्वरूपाचे असून शास्त्रीय विषयांचा ऊहापोह करणारे वाङ्मय उपलब्ध दिसत नाही. ज्ञानाची भाषा म्हणून एक तर संस्कृत भाषा शिकली जात होती किंवा संस्कृत न जाणणारे लोक आपले ज्ञान परंपरागत पद्धतीने स्वतःच्या घरातून मिळवीत असत. त्यामुळे व्यक्ती आपापल्या व्यवसायात परंपरागत ज्ञानाने अथवा त्यातील पारंगत व्यक्तीकडून गुरुशिष्य नात्याने ज्ञान आत्मसात करीत असे. याचा एक परिणाम म्हणून परंपरा जरी जतन केली जात असे तरी प्रत्येकाचे ज्ञान विशिष्ट क्षेत्रात मर्यादित राहात असे. वैद्यकीय ग्रंथांची तोंडओळखही गणितकाराला नसे किंवा वेदांताची ओळख कायदेपंडितांना नसे. त्यामुळे व्यक्ती आपापल्या क्षेत्रात पारंगत असल्या तरी दुसऱ्या विषयाचे ज्ञान सहजपणे प्राप्त करून घेण्याच्या शक्यता त्या काळात कमी उपलब्ध होत्या. शिवाय हे ज्ञान हस्तलिखितात लिहिलेले असल्याने संपर्काचे क्षेत्र किंवा प्रसाराचे क्षेत्रही मर्यादित राहात असे. इंग्रजी अमदानीत शाळाखाते सुरू झाले व मुद्रणकला प्रगत होऊ लागली. याचा परिणाम प्रामुख्याने दोन प्रकारांनी घडला. एक, सर्व समाजाला ज्ञानाची दारे उघडली गेली व दुसरा, ललित वाङ्मयाच्या जोडीने शास्त्रीय वाङ्मयाच्या निर्मितीला अधिक मोठे क्षेत्र उपलब्ध झाले.

ललितेतर वाङ्मयासाठी प्रामुख्याने व शाळांमधून शिकविण्याकरिता मराठीची क्रमिक पुस्तके तयार करण्यासाठी जी भाषा वापरली गेली तिचे स्वरूप इंग्रजी अमदा-नीच्या सुरुवातीच्या काळात काही निश्चित आकार घेऊ लागले. त्या लेखनासाठी शास्त्री, पंडित वगैरे इंग्रजी जाणणाऱ्या लेखकांनी आपली भाषा म्हणजे गट प्रमाण बोली किंवा पोटभाषा वापरली. परंतु सन १८३६ मध्ये दादोबा पांडुरंग तर्खडकर यांनी मराठीचे जे व्याकरण लिहिले त्यायोगाने तत्कालीन भिन्न भिन्न व्यक्तिगत किंवा गट प्रमाण बोलींना त्यांच्या लिखित स्वरूपाच्या वापरासंबंधी निश्चित दिशा मिळाली; त्यामुळे लेखनाच्या भाषेचे म्हणजे तत्कालीन प्रमाण भाषेचे स्वरूप सिद्ध झाले, स्पष्ट झाले. त्यानंतरच्या काळात शिक्षणाच्या वाढत्या प्रसाराबरोबर या व्याकरणाने दाखविलेला

मराठीच्या प्रमाणभाषेचा वापर लेखनासाठी मासिके, वृत्तपत्रे, पुस्तके इत्यादिकांकडून झाला. भाषेच्या परिवर्तनशीलतेचे पडसाद त्या वेळच्या वेगवेगळ्या भाषाविषयक लिखाणांतून उमटत राहिले, तसेच भाषेच्या अभ्यासाकडे तत्कालीन विद्वानांचे लक्ष वेधले गेले. याच वेळी इंग्रजी भाषेच्या अभ्यासामुळे युरोपीय देशात चाललेल्या भाषाविषयक अभ्यासाचा महाराष्ट्रीय विद्वानांना वाढता परिचय झाला. इंग्रजी भाषेच्या अभ्यासकांनी केलेल्या अभ्यासाचा वाढता परिचय राहिला. इंग्रज राज्यकर्त्यांची राजकारणासाठी, मिशनरी लोकांची धर्मप्रसारासाठी व एतद्देशीय लोकांची राज्यकारभारातील महत्त्वाची स्थाने प्राप्त करून घेण्यासाठी इंग्रजी व मराठी या दोन्ही भाषांच्या अभ्यासाची गरज निर्माण झाली. यामुळे, आणि शाळाखात्याची निर्मिती, इंग्रजी भाषा जाणणाऱ्यांना उत्तरोत्तर मिळणारी प्रतिष्ठा, संस्कृतच्या जाणकारांची समाजाच्या दृष्टीने उत्तरोत्तर कमी होणारी गरज या सर्वांमुळेही, मराठी भाषेला विशिष्ट आकार मिळून तो शिष्टसंमत असण्याची किंवा मराठीला असलेला आकार शिष्टसंमतपणे मांडण्याची जी गरज निर्माण झाली ती सन १८३६ मधील दादोबांच्या व्याकरणाने जरी बरीचशी पूर्ण केली तरी तत्कालीन समाजातील अनेक विचारवंतांना दादोबांच्या व्याकरणाने समाधान वाटले नाही, त्यामुळे भाषेच्या प्रमाणस्वरूपाविषयी उलटसुलट चर्चा होतच राहिल्या.

प्रमाणभाषेच्या विशिष्ट गरजेबरोबरच भाषेच्या विविध अंगांच्या अभ्यासाला या काळात चालना मिळाली. यात मराठी भाषेचे कोश, मराठी, संस्कृत भाषांचा तौलनिक व ऐतिहासिक अभ्यास, भाषेच्या व्युत्पत्तीसंबंधी विचार इत्यादी विषयांचा समावेश, मराठीच्या व्याकरणविषयक अभ्यासाच्या जोडीने होतो.

प्रमाण भाषेच्या स्वरूपाचा अभ्यास करताना, शब्दांचा विचार भाषाभ्यासात अत्यंत महत्त्वाचा असला तरी, कोशांचा उपयोग फारसा होण्यासारखा नसल्याने तो येथे विचारात घेतलेला नाही. कोशामध्ये ' प्रमाण शब्दांचा ' जसा अंतर्भाव असतो तसाच विविध बोलीतील ' अ-प्रमाण ' शब्दांचाही असू शकतो. भाषेच्या ' प्रामाण्याचे ' स्वरूप विशिष्ट शब्दांच्या वापरात असले तरी, त्यापेक्षा जास्त भाषेचे शिष्टमान्य असे ' व्याकरणिक अंग ' जपण्यात ते आहे. अप्रमाण शब्दांचा वापर ' शुद्ध ' प्रकारे केला तर भाषेचा फार तर ' दर्जा ' जाईल, पण अप्रमाण व्याकरणिक प्रयोगांच्या वापराने भाषा ' प्रमाण ' तर राहू शकत नाहीच पण ' शुद्ध ' ही राहत नाही, म्हणून येथे कोशांच्या इतिहासात न शिरता भाषाविषयक अभ्यासांचा मागोवा, व्याकरणे व व्याकरणेतर अभ्यास या दोन क्षेत्रात, प्रमाणभाषेचे स्वरूप शोधण्याची मर्यादा लक्षात घेऊन घेतलेला आहे.

३.२. व्याकरणे :

३.२.१. भाषास्थित व भाषांगभूत व्याकरण :

भाषेचा उपयोग सामाजिक दळणवळणासाठी, परस्पर विनिमयासाठी असल्याने

भाषा वापरताना ती दुसऱ्याला समजेल अशाच प्रकारे वापरण्याची जबाबदारी बोलणाऱ्यावर असते. त्यामुळे प्रत्येकजण आपोआपच भाषेच्या समाजमान्य अशा स्थिती व गति यानुसार भाषा वापरीत असतो. याचाच अर्थ असा की प्रत्येक व्यक्ती आपले बोलणे दुसऱ्याला समजेल अशा प्रकारे जेव्हा बोलत असते तेव्हा ती व्याकरण–शुद्ध किंवा व्याकरणानुसारच बोलत असते. व्याकरणाशिवाय भाषा नाही व भाषेशिवाय व्याकरण नाही, असा व्याकरण व भाषा यांमध्ये वस्त्राची वीण व वस्त्र यातील संबंधासारखा अविभाज्य संबंध असतो. असे असूनही भाषेचे एक अंग म्हणून व्याकरणाचा जेव्हा अभ्यास होताना आढळतो तेव्हा, प्रत्येक व्यक्ती बोलताना वापरीत असलेल्या व्याकरणाचा व भाषिक अभ्यासाचे एक अंग म्हणून मांडून दाखविलेल्या व्याकरणाचा कोणता निश्चित संबंध असतो याचा प्रथम शोध घेतला पाहिजे.

आपली भाषा बोलत असताना वापरात येणाऱ्या व्याकरणाची जाणीव त्या व्यक्तीला नसते. ज्या योगाने भाषिक व्यवहार साध्य होईल असे बोलणे म्हणजे 'बरोबर' किंवा 'अर्थवाही' बोलणे. अनवधानामुळे क्वचित व्याकरणाचा चुकीचा वापर बोलताना होऊ शकतो, परंतु मनाच्या स्थिर अवस्थेत व्यक्ती जेव्हा बोलते तेव्हा ती व्याकरणाला धरूनच बोलत असते. या व्याकरणाला 'अजाणतेपणीचे' किंवा 'भाषास्थित' व्याकरण म्हणू एक असताना 'झाड' म्हणावयाचे व 'अनेक असताना 'झाडं' किंवा 'झाडे' म्हणावयाचे हे लक्षात घेणाऱ्या व्यक्तीला 'झाड' शब्दाला लिंग, वचन इत्यादी उपाधी किंवा नाम, सर्वनाम. इत्यादींपैकी एखादी जात असू शकते याचे ज्ञान असतेच असे नाही; आणि असले तरीही नित्याच्या बोलण्यात त्या ज्ञानाचा जाणीवपूर्वक वापर होतो असेही नाही. त्यामुळे भाषेतील 'स्थित' व्याकरण त्याच्या हातून अजाणतेपणाने, भाषिक व्यवहारप्राप्तीच्या निकषावर वापरले जाते.

भाषेमध्ये 'स्थित' असलेल्या व्याकरणाकडे त्रयस्थ बुद्धीने पाहून 'सवयी'चा कौल न लावता, 'समाजमान्यतेचा' किंवा 'भाषिक व्यवहारक्षमतेचा' निकष लावून भाषेच्या, वस्त्र व त्याची वीण या भाषा–व्याकरण नात्यात असलेल्या, व्याकरणाचा 'शोध' घेऊन जे व्याकरण जाणले जाते त्या व्याकरणाला 'जाणतेपणीचे' किंवा 'भाषांगभूत' व्याकरण म्हणून रूढ अर्थाने व्याकरण शब्द जेव्हा वापरला जातो तेव्हा तो 'भाषांगभूत व्याकरण' ह्या अर्थी असतो. येथून पुढे 'व्याकरण' असा निर्देश 'भाषांगभूत व्याकरण' या अर्थाने वापरला जाईल.

३.२. (२) व्याकरणाचे उद्देश :

व्याकरण म्हणजे (वि + आ + करण) सुटे सुटे करणे. रुढ अर्थाने व्याकरण म्हणजे केवळ घटकांची सुटे सुटे करण्याची प्रक्रिया नसून त्याशिवाय त्या घटकांचे सुसूत्रीकरण करून मुळावर हुकूम फेरमांडणी करण्यासाठी आवश्यक ते निर्देशन करण्याची प्रक्रियाही अंतर्भूत असते. व्याकरणकर्त्याला इच्छित अशा कोणत्यातरी मर्यादेपर्यंत

भाषेचे शब्द, ध्वनी, इत्यादी अंगभूत अवयव सुटे सुटे केले जातात व त्या अवयवांची फेरजुळणी[१] कशी करावी हे सर्व सांगितले जाते. भाषेची मांडणी व जोडणी स्पष्ट करण्याचे व्याकरणकाराचे काही उद्देश असतात. यांपैकी एक उद्देश–आपली भाषा किंवा व्याकरणासाठी निवडलेली विशिष्ट भाषा तिच्या स्वरूपाच्या दृष्टीने कशी आहे ते सांगणे म्हणजेच ' वर्णनात्मक ' उद्देश असून दुसरा उद्देश ' आदेशात्मक ' असतो. व्याकरणाने वर्णन केलेली भाषेची मोडणी जशी असे तशा प्रकारे वापरली जाणारी भाषा ती ' शुद्ध ',' योग्य ',' बरोबर ' किंवा ' प्रमाण ' भाषा व तसे नसणारी ती ' अशुद्ध, ' ' अयोग्य ',' चूक ' किंवा ' अप्रमाण ' भाषा होय, असे मांडणे म्हणजे व्याकरणाचा ' आदेशात्मक ' उद्देश. वर्णनात्मक व्याकरणाचे व आदेशात्मक व्याकरणांचे स्वतंत्र कार्य असते. अगदी क्वचित वेळी वर्णनात्मक व्याकरणे 'आदेशात्मक कार्य' किंवा आदेशात्मक व्याकरणे ' वर्णनात्मक कार्य ' करू शकतात. एखाद्या बोलीचे वर्णनात्मक व्याकरण उपलब्ध असेल व ती बोली उत्तम प्रकारे बोलता न येणाऱ्याला कोठे वापरावयाची असेल तर तिच्या वर्णनात्मक व्याकरणाच्या आधारे ती बोली न येणारी व्यक्ती अपेक्षित बोली वापरू शकेल. असे झाल्यास वर्णनात्मक व्याकरणाचा आदेशात्मक उपयोग झाला असे म्हणता येईल. या उलट, आदेशात्मक व्याकरणामध्ये दिलेली भाषेची मोडणी प्रमाण-भाषेच्या वर्णनासाठी जेव्हा वापरली जाते तेव्हा आदेशात्मक व्याकरणाचा उपयोग ' वर्णनात्मक ' कार्यासाठी झाला असे म्हणता येईल.

मराठीच्या प्रमाणभाषेच्या स्वरूपाचा विचार करताना प्रमाण भाषेच्या उपलब्ध वर्णनात्मक व्याकरणाचा उपयोग होऊ शकत असला तरी प्रामुख्याने आदेशात्मक व्याकरणांचा विचार करणे जरुरीचे आहे.[२] आदेशात्मक व्याकरणे, भाषेचे उच्चारणक्षेत्र किंवा वाक्यरचनेचे क्षेत्र कसे वापरले असता शिष्टमान्य ठरेल इत्यादी गोष्टी प्रत्यक्षा-प्रत्यक्षपणे दाखवीत असतात. भाषेचा पसारा, तिचे नियम, उपनियम किंवा अपवाद यांनी एवढा गुंतागुंतीचा असतो की व्याकरणाच्या मर्यादेत सर्व नियम, उपनियम किंवा अपवाद बसविणे व्याकरणाला कठीण जाते. व्याकरणात संघटितपणे लागू पडणारे नियम दिले जाऊन शब्दांच्या वापराची दिशा दाखविली जाते. त्या नियमांच्या चाकोरीत थोड्या फार फरकाने जे शब्द बसू शकतात त्यांचे उपनियम व त्या चाकोरीत अजिबात न बसणारे अपवाद दिले जातात. व्याकरण हे भाषेतील सर्व शब्दांच्या ध्वनी व वाक्य

१. फेरजुळणी सर्वच वेळी स्पष्ट स्वरूपात मांडली जाते असे नाही. परंतु प्रथम-पुरुषी, एकवचनी कर्ता असताना क्रियापद प्रथमपुरुषी एकवचनी असते असे सांगणे ही एक प्रकारे फेरजुळणी दाखविण्याचीच प्रक्रिया होय.

२. मराठीत वर्णनात्मक व्याकरणे फार थोडी उपलब्ध आहेत. जी आहेत ती प्रामुख्याने प्रमाण बोलीची आहेत. ' सरकारमान्य प्रमाणभाषा ' या मराठीच्या स्वरूपाची वर्णनात्मक व्याकरणे जवळजवळ उपलब्धच नाहीत असे म्हणण्यास हरकत नाही.

या दोन्ही क्षेत्रातील हालचाली दाखविणारे, भाषेचा संपूर्ण अभ्यास मांडणारे नसून भाषेतील शब्दांच्या प्रमुख गति त्यांच्या मर्यादांसह विशद करणारे असते.

३.२. (३) आदेशात्मक व्याकरणे :

आदेशात्मक व्याकरणे शुद्धाशुद्धतेचा विवेक करणारी किंवा शुद्धाशुद्धतेचा निर्देश करणारी असली तरी या योग्यायोग्यतेसंबंधी फार प्राचीन काळी पतंजलीने आपल्या महाभाष्यात मांडलेले विचार आजही लक्षणीय आहेत. त्याला पडलेला प्रश्न असा : व्याकरणात फक्त शुद्ध किंवा बरोबर शब्दांचा परामर्श घेतला गेला तर त्याचा अर्थ असा मानावयाचा का की ज्याचा परामर्श घेतला गेला नाही ते शब्द अशुद्ध किंवा चूक आहेत म्हणून, अथवा व्याकरणात फक्त अशुद्ध, चूक किंवा अप-शब्द दाखवून दिले तर त्याचा अर्थ असा घ्यावयाचा का की व्याकरणात न दिलेले शब्द 'शुद्ध' आहेत म्हणून ?[1] पतंजलीने आपल्यापुरता प्रश्न कसाही सोडविला असला तरी त्या वेळच्या व्याकरणकाराची व आजच्या व्याकरणकाराची अडचण यात फारसा फरक पडलेला नाही. चूक किंवा बरोबर, शुद्ध किंवा अशुद्ध, योग्य किंवा अयोग्य प्रयोग ठरविणे याला काही ना काही निकष असावा लागतो. एका विशिष्ट निकषाने योग्य ठरलेला शब्दप्रयोग दुसऱ्या निकषाने अयोग्य ठरू शकतो. 'तुम्ही सावकाश जावा' या वाक्य रचनेतील 'जावा' हा शब्दप्रयोग सातारा भागात शिष्टमान्य असला तरी पुण्यातील शिष्टांना 'तुम्ही सावककाश जावे' ही रचना मान्य ठरेल. जळगावकडील शिष्टजन 'तुम्ही आलेत, मला फार आनंद वाटला' असे म्हणतील. मुंबईतील प्रतिष्ठित व्यक्तीला 'आलेत' या शब्दप्रयोगाऐवजी 'आलात' हा शब्दप्रयोग अधिक मान्य होईल. यावरून ज्याला व्याकरणदृष्टया शुद्ध ठरवायचे त्यासाठी ज्यांना मान्य असे शब्द शुद्ध ठरतात त्या शिष्ट किंवा प्रतिष्ठित लोकांची व्याख्या प्रथम करणे आवश्यक राहते. हे प्रतिष्ठितांसंबंधीचे निकष सर्व ठिकाणी स्पष्ट मांडलेले असतात असे नाही. पतंजलीने आपल्या व्याकरणासाठी शिष्टजनांची निश्चित अशी व्याख्या केलेली आहे.[2] आदर्श पर्वताच्या पूर्वेला, कालम जंगलाच्या पश्चिमेला, हिमालयाच्या दक्षिणेला, विंध्य पर्वताच्या उत्तरेला असणाऱ्या आर्यावर्तात अपरिग्रहवृत्तीने राहणारे, ज्ञानाच्या कोणत्या तरी भाषेत उच्च ज्ञान संपादन केलेले ब्राह्मण म्हणजे शिष्टजन, या शिष्टजनांना संमत असलेली संस्कृत भाषा ती पतंजलीच्या दृष्टीने शुद्ध संस्कृत भाषा व त्यांना असंमत संस्कृत भाषा ती अशुद्ध संस्कृत भाषा, पतंजलीने भाषेच्या शुद्धत्वासाठी एक निश्चित वर्ग 'प्रमाण', 'शिष्ट', किंवा 'प्रतिष्ठित' मानला होता तसा, मराठी भाषेची व्याकरणे प्रथम लिहिली गेली तेव्हा कोणता मानला गेला याचे स्पष्ट उल्लेख फारसे सापडत

१. 'ब्रह्मविद्या' नियतकालिक, माधव देशपांडे, पृ. ९७.
२. 'ब्रह्मविद्या' नियतकालिक, माधव देशपांडे, पृ. १००.

नाहीत. तत्कालीन वाङ्मयात वापरली गेलेली भाषा, ते वाङ्मय लिहिणाऱ्या लेखकांचा सामाजिक दर्जा व त्या काळची उपलब्ध व्याकरणे यांच्या साहाय्याने, भाषेसाठी आदर्श-भूत झालेला समाजातील प्रतिष्ठित वर्ग शोधून काढता येईल. परंतु हे काम अल्पावधीत होणारे नाही. मात्र व्याकरणात वर्णिलेली भाषा कोणती आहे, व्याकरणाची मांडणी कशा प्रकारची आहे इत्यादी अभ्यासातून वेगवेगळ्या काळातील मराठीच्या 'प्रामाण्यां'च्या दृष्टिकोनातून परामर्श घेणे शक्य होईल.

३.२. (४) मराठीची व्याकरणे :

आपला आशय लिखित स्वरूपात मांडण्याचे साधन म्हणजे लिखितभाषा. ही वापरताना पाळावयाचे नियम सांगणारे साधन म्हणजे लेखनविषयक नियम किंवा शुद्ध-लेखनाचे नियम. या नियमांचा अंतर्भाव करून भाषेची मोडणी-जोडणी सांगणारे साधन म्हणजे व्याकरण. व्याकरणात लेखनविषयक नियम, पुष्कळदा गर्भित स्वरूपातही सापडतात. उदाहरणार्थ, तृतीयेचा प्रत्यय 'नें' असा दिला की लेखनात तो सानुस्वार वापरावयाचा हे उघड होते. किंवा 'आहे' चे प्रथमपुरुषी कर्ता असतानाचे रूप 'आहें' असे दिले तर वाक्यातील प्रथमपुरुषी कर्त्याशी 'आहे' चा सुसंवादी वापर 'आहें' असे रूप सुचवतो. एकभाषिक समाजातील सर्व व्यक्तींना समजण्याजोगी परंतु शिष्टमान्य स्वरूपात लिखित भाषा जेव्हा वापरली जाते तेव्हा ती प्रमाणभाषा असते. आदेशात्मक व्याकरणे सामान्यतः प्रमाणभाषेची असतात. प्रमाणभाषा मूलतः कृत्रिम स्वरूपाची असल्याने ती सामान्यपणे सर्वांनाच शिकावयाची असते. प्रमाणभाषा लिहिणारे शिष्टजन बहुधा प्रमाणबोली बोलत असल्याने, आपल्या बोलीपेक्षा वेगळी परंतु लेखनासाठी मान्य केलेली रूपे प्रमाणबोली बोलणारांना कृत्रिमपणेच वापरावयाची असतात. किंबहुना काही विशिष्ट हेतूनेच त्यांनी ही कृत्रिमता लेखनासाठी मान्य केलेली असते, 'नाव' हा शब्द 'नामन्' या संस्कृत शब्दापासून आलेला असल्याने 'नाव' असा अनुस्वारयुक्त लिहिला पाहिजे असे मानणारी, एका विशिष्ट काळच्या मराठीचे प्रामाण्य दाखवणारी व्यक्ती स्वतः बोलताना अनुनासिक उच्चाररहित 'नाव' असे वापरण्याची शक्यता असते. 'नांव' असे लिहिणे व्युत्पत्तीच्या निकषाने व 'नाव – नौका' याच्याशी विरोध दर्शविणारे म्हणून, प्रमाण ठरविले जाणे, म्हणजे बोलीपेक्षा लेखनातील भेद स्वीकारणे, बोली व लेखन यांतील विसंगती स्वीकारणे, म्हणजेच कृत्रिमता स्वीकारणे होय. ही कृत्रिमता व्याकरणे जेव्हा स्पष्ट करतात तेव्हा ती व्याकरणे आदेशात्मक असतात. त्यामुळे अशा व्याकरणांवरून व तत्कालीन लिखित वाङ्मयावरून त्या त्या काळच्या प्रमाणभाषेचे स्वरूप ठरवणे शक्य होते. वाङ्मयाच्या धावत्या आढाव्याने समाजातील वेगवेगळ्या काळातील प्रतिष्ठितांचा मागोवा घेणे जसे शक्य होते तसेच व्याकरणांचा आढावा घेतल्याने प्रमाणभाषेच्या स्वरूपासंबंधीच्या प्रामाण्यांचा इतिहास शोधणे शक्य होते.

मराठी व्याकरणांची परंपरा महानुभावीय काळापर्यंत पोचते, भीष्माचार्य पंडित यांनी 'पंचवार्तिक' नावाचे व्याकरण, आपल्या धार्मिक वाङ्मयाच्या अध्ययनाकरिता लिहिले. त्याचा काल इ. स. चे १४ वे शतक मानला जातो.[१] याशिवाय आनेराज व्यास यांचे 'द्वात्रिंशलक्षण रत्नाकर' व भास्करभट्ट बोरीकर यांचे 'महाराष्ट्र भाषाभ्यास' किंवा 'सुभाष्य' या नावाची व्याकरणे रचली गेली होती असे उल्लेख आहेत. त्यानंतरच्या काळात 'व्याकर्ण' नावाचा एक ग्रंथ समर्थ रामदासांचे शिष्य गिरिधर-स्वामी यांनी रचला. सन १८२७ च्या सुमारास लिहिले गेलेले 'महाराष्ट्र प्रयोग चंद्रिका' हे मराठीचे व्याकरण आणखी काही हस्तलिखितांसह श्री. अर्जुनवाडकर यांनी संशोधन करून सन १९७० साली छापून उपलब्ध करून दिलेले आहे. सन १८०५ पर्यंतच्या काळापर्यंत मराठी व्याकरणांची परंपरा काहीशा खंडित स्वरूपात का होईना, उपलब्ध असली तरी सन १८०५ नंतरच्या काळात जी व्याकरणे लिहिली गेली त्यांच्या रचनेशी ती संबद्ध झालेली आढळत नाहीत. यावरून असे म्हणता येईल की मराठी भाषेची निर्मिती झाल्यानंतर त्या भाषेची व्याकरणे जरी रचली गेली तरी त्यांचा 'पायाभूत' व्याकरण म्हणून पुढच्या व्याकरणकारांना उपयोग झाला नाही किंवा तसा काही झाला असल्यास त्याबाबतचे उल्लेख अजून तरी उपलब्ध नाहीत. त्याच-बरोबर असेही विधान करता येईल की ही व्याकरणे मर्यादित वापरासाठी असल्याने एका अर्थी ती काहीशी उपेक्षितच राहिली. सन १५४९ ते १६१९ या काळात होऊन गेलेल्या फादर स्टीफन्सने एक कोंकणी-मराठीचे व्याकरण रचले होते. हे व्याकरण कोंकणी मराठीचे असल्याने तत्कालीन प्रमाणभाषेचे स्वरूप दाखविण्यास अनुपयुक्त असून कोकणी या पोटभाषेचे अथवा गटप्रमाणबोलीचे स्वरूप दाखविण्यास उपयोगी आहे. तसेच श्री. अर्जुनवाडकर यांनी संपादित केलेले, संस्कृतातून सूत्रे व मराठीतून विवरण असलेले, श्री. वेंकटमाधवांचे व्याकरण मराठीचे समग्र विवरण करणारें नाही.[२] शिवाय त्यात तंजावरी बोलीचे विशेष किती, प्रामादिक भाग किती याचा निर्णय तपशील-वार अभ्यासाशिवाय देता येणार नाही, यामुळे प्रमाणभाषेच्या स्वरूपाच्या अभ्यासास ते उपयुक्त ठरणारे नाही.[३]

सन. १८०५ मध्ये कॅरी या इंग्रजाने वैद्यनाथ शर्मांच्या साहाय्याने 'A Grammar of the Mahratta Language' हे व्याकरण, मराठी भाषिक प्रदेशात नेमाव-याच्या अधिकाऱ्यांना मराठी यावे या राजकीय हेतूने तयार केले. या व्याकरणाच्या भाषेवर, श्री. वैद्यनाथ शर्मा हे नागपूरकडेच असल्याने, नागपूर भागातील बोलीची छाप

१. मराठी व्याकरण – गोविलकर पृ. २.
२. महाराष्ट्र प्रयोग चंद्रिका–अर्जुनवाडकर पृ. ६.
३. ,, ,, ,, ,, पृ. ९..

आहे.[1] कॅरीचे व्याकरण अत्यंत अपुरे व चुकांनी भरलेले आहे असे म्हणून व इंग्रजी व्याकरणाचा आदर्श नजरेसमोर ठेवून सन १८२६ मध्ये महंमद इब्राहिम मखना यांनी 'A Grammar of the Maratha Language' रचले.[2] ही दोन्ही व्याकरणे इंग्रजी भाषेतून लिहिली गेली आहेत. यानंतर रे. स्टीव्हन्सन यांनी सन १८३३ मध्ये 'The Principles of Marathee Grammar' या[3] नावाचे एक व्याकरण रचले. त्यावेळी रे. स्टीव्हन्सन यांनी परशुरामपंत गोडबोले, दाजीशास्त्री शुक्ल व दादोबा पांडुरंग यांच्याशी चर्चा केली होती. या ग्रंथाला सरकारचा आश्रयही मिळाला होता. सन १८३९ मध्ये 'The Grammar of Mahrathee Language' हे बॅलेन्टाईनचे व १८५४ मध्ये 'The Grammar of the Marathi Language' हे रे. बर्गेसचे व्याकरण प्रसिद्ध झाले. ही दोन्ही व्याकरणे ईस्ट इंडिया कॉलेजच्या उपयोगासाठी लिहिली गेली. वरील सर्व व्याकरणे इंग्रज लोकांनी इंग्रजी भाषिकांना मराठी भाषा शिकता यावी यासाठी लिहिलेली आहेत. या व्याकरणांच्या जोडीला मराठी लोकांनी इंग्रज लोकांसाठी जी व्याकरणे लिहिली ती बेल्लर्स व आस्खेडकर यांचे मराठीचे व्याकरण (१८६८), नवलकरांचे 'The Students' Marathi Grammar' (१८८०) व खेरांचे 'The Higher Marathi Grammar' ही व्याकरणे होत.[4] वरील सर्व व्याकरणांचा उद्देश परकीयांना मराठी भाषा शिकवण्याचा असून व्याकरणे इंग्रजीमधून लिहिली गेल्याने एक प्रकारे इंग्रजीभाषेद्वारा मराठीकडे यात पाहिले गेलेले आहे. त्यामुळे व्याकरणासाठी इंग्रजीशी मराठीचे मिळते-जुळते करून घेण्याचा बराचसा दृष्टिकोण राहिला. परिणामी ही व्याकरणे पुष्कळशी इंग्रजीच्या धर्तीवर गेलेली आढळून येतात.

इंग्रज अधिकाऱ्यांना मराठी समजावे या राजकीय हेतूसाठी इंग्रजी भाषेच्या माध्यमातून मराठीची व्याकरणे जशी तयार केली गेली तशीच काही व्याकरणे शाळा खात्याच्या उपयोगासाठी रचली गेली. पाश्चात्त्य ज्ञान उपलब्ध करून देण्यासाठी व एतद्देशीय लोकांद्वारे आपला राज्यकारभार सुरळित चालवावा यासाठी ब्रिटिश सरकारने ज्या शाळा काढल्या, त्या शाळांमधून ज्या देशी भाषेतून हे ज्ञान द्यावयाचे त्या देशी भाषेचा शाळेत व्याकरणशुद्ध अभ्यास व्हावा म्हणून, 'हैदशाळा मंडळी' या संस्थेमार्फत मराठीला आवश्यक असलेले शालेय व्याकरण जॉर्ज जॉर्वेसने जगन्नाथ शास्त्री क्रमवंत, बाळशास्त्री घगवे व गंगाधरशास्त्री फडके या पंडितांकडून लिहवून घेतले. शास्त्री-पंडितांनी मराठीतून मुख्यतः मराठी भाषिकांसाठी लिहिलेले सन १८२४ साली तयार

१. महाराष्ट्र प्रयोग चंद्रिका-अर्जुनवाडकर पृ. ४.
२. मराठी व्याकरण-गोविलकर, पृ. २
३. मराठी वाङ्मयाचा विवेचक इतिहास, अर्वाचीन-जोशी, पृ. ४८८.
४. खेरांच्या व्याकरणाची दुसरी आवृत्ती, सन १८९९ ची उपलब्ध आहे.

झालेले हे पहिले व्याकरण आहे. हे सन १८५४ मध्ये छापले गेले. याही व्याकरणातील शब्दांच्या जातींच्या विवेचनावरील इंग्रजीचा परिणाम लक्षात घेण्याजोगा आहे. या व्याकरणाच्या काळाच्या सुमारास रामशास्त्री जन्हवेकर यांनी प्रश्नोत्तर स्वरूपात मराठीचे व्याकरण लिहिले. सन १८३६ मध्ये गंगाधरशास्त्री फडके यांनी आपले 'महाराष्ट्र भाषेचे व्याकरण' प्रसिद्ध केले. मराठी भाषेतील हे पहिले मुद्रित व्याकरण होय. सन १८३६ मध्येच जांभेकरांनी मुलांसाठी संवादात्मक स्वरूपाचे 'बालक व्याकरण' लिहिले. मराठी भाषा विविध रूपे धारण करीत आहे ही जाणीव व्यक्त करून फडके यांनी, पुणे प्रांतीची भाषा प्रमुख धरून आपण मराठीबद्दलचे नियम देत आहोत असे स्पष्ट विधान केले आहे. मराठीच्या विविधतेची जाणीव ठेवूनही, भाषेच्या विविधतेतून एकता शोधावी, तिचे निश्चित असे एक रूप असावे, एकाच रूपाचा आदर्श लोकांसमोर ठेवावा[1] म्हणून सन १९३६ मध्ये दादोबा पांडुरंग तर्खडकर यांनी 'मराठी भाषचे व्याकरण' लिहिले. हे व्याकरण लिहिताना दादोबांनी आपल्या संस्कृत व इंग्रजी या भाषांच्या ज्ञानाचा उपयोग केला. सन १८५० पर्यंत फडके यांच्या व्याकरणाच्या चार आवृत्त्या निघाल्या तर दादोबांच्या व्याकरणाच्या दोन आवृत्त्या निघाल्या. त्यानंतरच्या काळात दादोबांच्या व्याकरणाच्या अनेक आवृत्त्या निघाल्या. या प्रत्येक आवृत्तींत दादोबांनी नवीन वैचारिक भर घातली आहे.

प्रमाणभाषेच्या इतिहासात दादोबांच्या व्याकरणाचे महत्त्वाचे स्थान आहे. हे स्थान दादोबांच्या व्याकरणामागे असणाऱ्या उद्देशामुळे प्राप्त झाले आहे. तत्कालीन शिष्टजन जी भिन्न रूपे बोलण्यात व लेखनात वापरीत असत त्यांपैकी काहींना दादोबांनी आपल्या व्याकरणात स्थान दिले, व्याकरणशुद्ध मानले, म्हणजेच शिष्टमान्य असे काही भाषाप्रयोग दादोबांनी अमान्य किंवा अप्रमाण ठरविले. यामुळे आदेशात्मक व्याकरणाचा पाया या व्याकरणाकडून घातला गेला. शिष्टमान्य परंतु ज्यांना दादोबांनी मान्यता दिली नाही अशा प्रयोगांना 'अप्रामाण्य' लाभल्याने त्यांच्या वापराचे क्षेत्र फक्त खाजगी वापरात, म्हणजे खाजगी लेखनात व प्रमाणबोलीत राहिले. या व्याकरणामुळे मराठीला जे वळण लाभले ते 'दर्पण, प्रभाकर' वगैरेसारख्या नियतकालिकांतील दादोबा-मान्य मराठीमुळे निश्चित स्वरूप घेत गेले. मात्र हेही व्याकरण आधीच्या इंग्रजी ठसा असलेल्या व्याकरणांच्या परंपरेतच राहिले. सन १८५८ मध्ये श्री. गंगाधर रामचंद्र टिळक यांनी 'स्वभाषा शिकल्याने परभाषा शिकण्यास उपयोग होतो' या कल्पनेने एक 'लघुव्याकरण' प्रसिद्ध केले, परंतु त्याच सुमारास दादोबांनी आपले 'लघुव्याकरण' प्रसिद्ध केल्याने श्री. टिळक यांच्या व्याकरणाचा फारसा प्रसार होऊ शकला नाही.

---

१. मराठी व्याकरण – गोविलकर, पृ. ४.

सन १८६३ मध्ये दक्षिणा प्राईज कमिटीच्या वतीने,[१] 'इंग्रजीच्या धर्तीवर अर्वाचीन शैलीमध्ये, भाषेतील बदलांचे नियमबद्ध प्रतिबिंब ज्यामध्ये उमटू शकेल असे, भाषेची उत्पत्ती सांगणारे, शब्दांच्या प्रकृतिप्रत्ययांचे विवेचन करणारे, जुन्या नव्या पंथांचीही जाणीव ठेवणारे' असे व्याकरण लिहिल्यास बक्षीस देण्यात येईल असे जाहीर केले गेले. या जाहिरातीला अनुसरून श्री. कृष्णशास्त्री गोडबोले यांनी व्याकरण लिहून सन १८६७ मध्ये प्रसिद्ध केले. या व्याकरणामध्ये, संस्कृत व प्राकृत भाषांशी असलेला मराठीचा संबंध, शब्दविचार, वाक्यविचार व पद्यविचार यांचे विवेचन केलेले आहे. या व्याकरणातील विशिष्ट ऐतिहासिक दृष्टी शाळेतील विद्यार्थ्यांपेक्षा ट्रेनिंग कॉलेजच्या विद्यार्थ्यांना अधिक उपयोगी पडली. परंतु दादोबांचे सन १८६५ मधील लघुव्याकरण मात्र शालेय विद्यार्थ्यांना उपयोगाचे ठरले.

यानंतरच्या काळात सन १८८७ मध्ये त्या वेळचे शिक्षणाधिकारी चॅटफिल्ड यांच्या सांगण्यावरून रावजी सदाशिवशास्त्री गोडबोले यांनी 'मराठी भाषेचे मध्यम व्याकरण' तयार केले, ते सन १८९७ मध्ये प्रसिद्ध झाले, त्यापूर्वी म्हणजे सन १८८९ मध्ये जोशी यांचे 'प्रौढबोध मराठी व्याकरण' प्रसिद्ध झाले. 'व्याकरण हे भाडेचिठ्ठी-सारखे असल्याने भाडेचिठ्ठी जशी वेळोवेळी बदलून घ्यावी लागते तसेच काही काळा-नंतर बदललेल्या भाषेचे व्याकरणसुद्धा भिन्न होते'[२] अशी त्यांची व्याकरणाबद्दल दृष्टी असल्याने त्यांच्या प्रत्येक नव्या आवृत्तींत आवश्यकतेनुसार रा. भि. जोशी बदल करीत राहिले. आपल्या चौथ्या आवृत्तीच्या प्रस्तावनेत ते म्हणतात– 'मराठीत माझ्या पुस्तकाच्या पूर्वी झालेली व्याकरणे, चिपळूणकर व गुंजीकर यांचे व्याकरणावरील निबंध आणि इंग्रजी भाषेची सर्व मुख्य मुख्य व्याकरणे हे ग्रंथ तपासून प्रस्तुतचे व्याकरण तयार केले आहे.' आपल्या व्याकरणात इतर सर्व व्याकरणांच्या मानाने इंग्रजी पद्धतीचे अनुकरण फार कमी आहे असे त्यांनी स्वतः म्हटले आहे. दादोबांच्या व्याकरणाने मराठीस शास्त्रीय वळण लागून व्यवस्थितपणा आला या दृष्टीने त्यांची योग्यता मोठी आहे हे मान्य करूनही श्री. जोशी यांनी, दादोबांनी आपले व्याकरण हे केवळ इंग्रजी व्याकरणाचे पद्धतीवर लिहिले आहे, त्यात विभक्तीची व क्रियापदाची रूपे यांची व्यवस्था इंग्रजीच्या धोरणावर केली आहे यामुळे घोटाळ्याचे प्रकारही पुष्कळ झाले आहेत, असे स्पष्टपणे म्हटले आहे. श्री. जोशी यांनी उपपत्ती व पदसिद्धी यांसाठी संस्कृत भाषेच्या व्याकरणाचा उपयोग करावयाचा आणि व्याकरणाची ग्रंथरचना व इतर निरनिराळ्या प्रकारची मांडणी इंग्रजीच्या धर्तीने करावयाची असा संस्कृत व इंग्रजी भाषांच्या व्याकरणांचा मराठीसाठी समन्वय साधला आहे. तसेच 'या व्याक-रणाच्या साहाय्याने व्याकरण चालविता येणार नाही अशी वाक्यरचना खचित सांगता

१. मराठी व्याकरण – गोविलकर, पृ. ६.
२. मराठी व्याकरण – गोविलकर, पृ. ७.

येणार नाही. ' अशी त्यांनी ग्वाही दिलेली आहे.

श्री. जोशी यांच्या व्याकरणानंतर वागळे, भिडे, ओक, पाणंदीकर, गो. जि. केळकर, सोहनी इत्यादींची लहानसहान व्याकरणे प्रसिद्ध झाली. यानंतर सन १९११ मध्ये मो. के. दामले यांचे ' शास्त्रीय मराठी व्याकरण ' हा जवळ जवळ एक हजार पृष्ठांचा ग्रंथ प्रसिद्ध झाला. या व्याकरणात तर्कशुद्ध विचाराला प्राधान्य दिले गेले आहे. व्याकरणात वर्णन करावयाच्या प्रत्येक घटकाबद्दल अगोदरच्या व्याकरणकारांची मते ऐतिहासिक दृष्टीने तपासून त्यांचे खंडन किंवा मंडन करून दामले यांनी आपले एक निश्चित मत मांडले आहे. या मताच्या रूपाने, मराठी व्याकरणाचे स्वतः निश्चित केलेले रूप त्यांनी मांडले. दामले यांनी आपल्या व्याकरणाने मराठी भाषेची जी व्यवस्था मोडून दाखविली ती जवळजवळ सध्याच्या काळापर्यंत ' मान्य ' अशी व्यवस्था राहिली.

श्री. दादोबा यांच्याबद्दल दामले यांनी पुढील उद्‌गार काढले आहेत –[1] दादोबांनीच या शास्त्रास मूर्त स्वरूप देऊन त्यास नीटनेटकेपणा, सौंदर्य, उज्ज्वलता व पूर्णता आणण्याचे कामी आपल्या आयुष्यभर मेहनत केल्यामुळे तेच मराठी व्याकरणाचे प्रवर्तक होत. आपल्या व्याकरणाच्या ' उपक्रमात ' आपल्या आधीच्या व्याकरणकारांनी मराठी भाषेच्या अभ्यासात कोणती मोलाची भर टाकली याचा सुमारे पंचाहत्तर वर्षांचा अत्यंत धावता आढावा घेतला असून, दादोबा, चिपळूणकर, गोडबोले हे व्याकरणविषयातील आपले वृद्ध आप्त असून आपण तत्स्कंधस्थित एक बालक आहों, ' असे स्वतःसंबंधी म्हटले आहे. त्यांच्या मते व्याकरणशास्त्राची व्याख्या, ' भाषेचा व्यवहार किंवा उपयोग कोणत्या नियमांस धरून होतो हे ज्या शास्त्रात सांगितलेले असते ते शास्त्र '[2] अशी असून या नियमांच्या साहाय्याने अपरिचित मनुष्यास भाषेचा उपयोग कसा करावा हे समजते, असे ते म्हणतात. व्याकरण हे बोलण्याच्या अथवा लिहिण्याच्या कामी मार्गदर्शक असल्याने व्याकरणास दामले यांनी ' कला ' असे म्हटले आहे. व्याकरण भाषेवरच अवलंबून असले पाहिजे, त्याचे भाषेस बंधन चालणार नाही, असे जरी खरे असले तरी, व्याकरणाचे मार्गदर्शकत्व अंशतः कबूल केल्याने भाषेचे कल्याणच होते[3] असे त्यांचे निश्चित मत असून व्याकरणाशिवाय भाषेची प्रगती कुंठित होते असेही त्यांना वाटते. भाषाभेद जेव्हा सहज दिसण्याइतका उत्कट होतो तेव्हाच त्या भाषेच्या व्याकरणातही म्हणण्यासारखा बदल होत असतो, म्हणून भाषेच्या सूक्ष्म रूपांतरास नसते महत्त्व देऊन व्याकरणाचे रूपांतर करण्याची किंवा मानण्याची जरुरी नाही असे विधान करून शिष्ट व नागरिक लोकांच्याच भाषेचे स्वरूप सर्वमान्य असते व तेच व्याकरणदृष्ट्या महत्त्वाचे होय असे दामले यांनी म्हटले आहे. त्या शिष्ट व

१. शास्त्रीय मराठी व्याकरण – दामले–करंदीकर प्रत, १९६५, उपक्रम, पृ. १
२. शास्त्रीय मराठी व्याकरण – दामले–करंदीकर प्रत, १९६५, उपक्रम, पृ. ३
३. शास्त्रीय मराठी व्याकरण – दामले–करंदीकर प्रत, १९६५, उपक्रम, पृ. ६

नागरिक भाषास्वरूपाचेच व्याकरणशास्त्र बहुधा उदयास येते म्हणून कालांतराने शिष्ट भाषेत जसजसा फरक होत जातो तसतसे तिचे व्याकरण बदलत जाते अशी भाषापरिवर्तनाबद्दलची आपली जाणीव स्पष्टपणे व्यक्त करून या व्याकरणात प्रचलित शिष्ट मराठी भाषेच्या गद्य स्वरूपाकडेच मुख्यत्वेकरून आपण लक्ष दिले आहे, आवश्यकतेनुसार स्पष्टीकरणासाठी प्राचीन स्वरूपाचा व पद्याचा उपयोग केला आहे असे सांगून पुन्हा एकदा 'या व्याकरणाने प्रचलित शिष्ट गद्याचेच प्राधान्याने विवेचन करण्यात येणार आहे' असे विधान करून 'शिष्टांच्या गद्य भाषेचे' व्याकरण-विषय होण्याच्या वस्तुस्थितीकडे लक्ष वेधले आहे. आपल्या ग्रंथाच्या उपक्रमात दामले म्हणतात, 'एकछत्री राज्य, देशी भाषांचा अभ्यास, वर्तमानपत्रे, मासिक पुस्तके व ग्रंथ ह्यांचा मुद्रणकलेच्या साह्याने होणारा प्रसार आणि प्रवास साधनांच्या सुलभतेने घडणारे प्रांताप्रांतातील वाढते दळणवळण या योगाने मराठी भाषेची पूर्वीची चंचल व विस्कळित स्थिती दिवसेंदिवस लयास जात असून प्रांतिक उपभाषांच्या एकीकरणास सुरुवात होऊन गेली आहे. ह्यामुळे हल्ली मराठी भाषेस बरेच स्थैर्य आले आहे म्हणून दादोबादिकांनी गाजवलेली नियामक सत्ता किंवा मार्गदर्शकता सोडून देऊन वैयाकरणाची प्रयोगशरणवृत्तीच अशा स्थितीत धारण करण्यास सुरुवात करणे चांगले असे वाटून तिच्याच धोरणाने या ग्रंथाची अथपासून इतिपर्यंत रचना केली आहे.' मराठीच्या प्रमाणभाषेचा विचार करताना दामले यांची, दादोबांची नियामकता व मार्गदर्शकता, भाषेची परिवर्तनशीलता, उपभाषांच्या एकीकरणाची शक्यता, शिष्ट व नागरिक यांच्या गद्याच्या विवेचनाची अनिवार्यता, व्याकरण शास्त्राने देता येणारी मार्गदर्शकता व वैयाकरणाची प्रयोगशरणता इत्यादींबद्दलची विधाने काळजीपूर्वक लक्षात घेण्याजोगी आहेत.

श्री. दामले यांच्या व्याकरणानंतर श्री. राजवाडे यांनी श्री ज्ञानेश्वरीच्या मराठीचे व्याकरण लिहिले परंतु ते राजवाडे यांच्या काळातील मराठीचे स्वरूप दाखवणारे नसल्याने दामले-राजवाडे यांच्या काळात तत्कालीन मराठीचे स्वरूप सांगणारे 'शास्त्रीय मराठी व्याकरणा' शिवाय दुसरे व्याकरण झालेच नाही असे म्हणणे योग्य ठरणार आहे. दामले यांच्या व्याकरणावर आधारलेली काही व्याकरणे शालेय उद्देशाने निघाली. त्यांपैकी मो. स. मोने यांचे व्याकरण लोकप्रिय झाले. सन १९३३ मध्ये ग. ह. केळकर यांनी आपले 'मराठी व्याकरणाची मूलतत्त्वे' हे व्याकरण प्रसिद्ध केले. त्यात काही वादग्रस्त मुद्द्यांवर साधकबाधक चर्चा करून श्री. केळकरांनी स्वतःच्या मताचे प्रतिपादन केले आहे. सन १९५१ मध्ये म. प. सबनीस यांनी 'आधुनिक मराठीचे उच्चतर व्याकरण' लिहिले, त्यात शास्त्रदृष्टया मराठी व्याकरणाची पुनर्रचना करण्याचा थोडासा प्रयत्न केला गेलेला आहे.

अगदी अलीकडच्या काळात इंग्रजी भाषेतून मराठी शिकणाऱ्यांसाठी मिसेस् लॅम्बर्ट यांचे 'Marathi Language Course' व प्रा. साऊथवर्थ-कवडी यांचे 'Spoken Marathi' (१९६५) ही दोन पुस्तके, तसेच हिंदी भाषिकांना मराठी

शिकण्यासाठी हिंदीतून न. चिं. जोगळेकर यांचे 'मराठीका वर्णनात्मक व्याकरण' (१९४९) व श्री. साठे यांचे 'हिंदी-मराठी स्वयंशिक्षक' ही पुस्तकें लिहिली गेली आहेत. विसाव्या शतकाच्या सुरुवातीपासून वरील व्याकरणांच्या कालखंडापर्यंत मराठी भाषा परभाषिकांना शिकविण्यासाठी परकीय भाषेतून मराठीत व्याकरणे लिहिली गेल्याची नोंद आढळत नाही.

प्रा. अरविंद मंगरुळकर यांनी सन १९६४ मध्ये 'मराठी व्याकरणाचा पुनर्विचार' हे पुस्तक प्रसिद्ध केले. त्यात भाषेच्या परिवर्तनामुळे व भाषाभ्यासाच्या आधुनिक विकसित तंत्रामुळे मराठी भाषेच्या पुनर्विचाराची गरज कोठे कोठे निर्माण झाली आहे त्याची काही क्षेत्रांतील ठळक रूपरेषा व काही क्षेत्रांतील बाह्य रूपरेषा दाखवून दिलेली आहे. मराठी भाषेची जडणघडण वर्णनात्मक स्वरूपात मांडली आहे. आधुनिक भाषाशास्त्र विषयक अभ्यासाचा जसजसा विकास होत गेला तसतसे मराठीच्या व्याकरणाच्या पुनर्विचाराबद्दल विविध लेखांच्या रूपाने विविध भाषाभ्यासकांचे मतप्रदर्शन केले जात आहे. अनेक मराठी बोलींची वर्णनात्मक व्याकरणे आज प्रबंधांच्या रूपाने उपलब्ध होत आहेत, परंतु दादोबा किंवा दामले यांनी मराठीच्या प्रमाणस्वरूपाचा आपापल्या काळात जसा विचार केला तसा विचार करून आधुनिक व्याकरणशास्त्राचा उपयोग करून जास्तीत जास्त विस्तृत असे मराठीच्या आजच्या प्रमाणभाषेचे 'शास्त्रीय' व्याकरण आज उपलब्ध नाही ही गोष्ट खरी आहे.

३.२. (५) व्याकरणांचा आढावा :

मराठीच्या व्याकरणांच्या लेखनाची सुरुवात इंग्रजी जाणणाऱ्या मराठी भाषिकांकडून किंवा मराठी न जाणणाऱ्या इंग्रजी भाषिकांकडून प्रामुख्याने झाली. या व्याकरणकारांचे उद्दिष्ट समाजव्यवहारासाठी मराठी भाषा शिकण्यास किंवा शिकविण्यास उपयुक्त होईल अशी भाषेची मांडणी करण्याचे होते. ज्या वेळी परभाषा शिकली जाते त्या वेळी स्वभाषेच्या व्याकरणाशी तिची तुलना करून शक्य तितके तिला स्वभाषेच्या व्याकरणाशी मिळती-जुळती करून घेण्याचा प्रयत्न होणे स्वाभाविक असते. नामांची व्याकरणाच्या दृष्टीने सामान्यनाम व पदार्थवाचक नाम अशी विभागणी करणे मराठीला आवश्यक नसले तरी इंग्रजी भाषिक, मराठी शिकताना आपल्या मनाशी अशी विभागणी कळत न कळत करून जातो, कारण त्याला तसे शिकणे सोपे जाते. शब्दयोगी अव्यये वास्तविक प्रत्ययांसारखी वापरली जात असताना इंग्रजीतील prepositions शी त्यांचे अर्थदृष्ट्या समान वर्तन पाहिले की इंग्रजी भाषिक त्यांची वर्गवारी prepositions मध्ये करतो. उलट मराठी भाषिक इंग्रजी शिकविताना – 'मुळे, पर्यंत सारखे शब्द तुमच्या prepositions सारखे आहेत' असेही विधान करण्याची शक्यता असते. या शैक्षणिक गरजेमुळे किंवा सुलभतेमुळे भाषा शिकण्याच्या किंवा शिकविण्याच्या हेतूने जेव्हा व्याकरणे लिहिली जातात तेव्हा भाषेच्या वास्तव अशा व्याकरणाकडे काहीसे लेखकांचे

दुर्लक्ष होणे सर्वथा शक्य असते. याच गरजेपोटी मराठी भाषेच्या व्याकरणांची परंपरा लक्षात घेण्याची जबाबदारी व्याकरणाचे 'शिक्षक–लेखक' करीत नाहीत कारण त्यांचे उद्दिष्ट भाषेचे व्याकरण करण्याचे नसून ज्या साधनाने भाषा सुलभपणे शिकवता येईल ते साधन निर्माण करण्याचे असते.[१] या साधनाद्वारे मान्य भाषा सुखकरपणे कशी शिकवता येईल हा 'शिक्षक-वैयाकरणांचा दृष्टिकोन राहतो. या दृष्टीने विचार करता इंग्रजी भाषिकांना भाषिक व्यवहारात उपयुक्त होईल अशा स्वरूपाची मराठी शिकवायची असा सन १८०५ च्या सुमाराच्या लेखकांचा उद्देश असल्याने त्यांनी मराठी व्याकरणांची परंपरा लक्षात घेतली नसावी. शिवाय, एक भाषा म्हणून मराठीच्या अभ्यासाची तत्कालीन समाजात एक तर परंपरा नसावी किंवा शाळाखात्यांसारख्या अध्यापनाच्या सुसूत्र व्यवस्थेअभावी मराठी भाषा 'भाषा' म्हणून शिकवलीच जात नसावी. मराठी भाषेचा 'ज्ञानभाषा' म्हणून उपयोग नसल्याने, व ती वाङ्मय लेखनाची भाषा असताना गटप्रमाण बोलींना दळणवळणाच्या वेगवान साधनांअभावी वाव नसल्याने, जसा संस्कृतच्या व्याकरणांचा सखोल अभ्यास झाला तसा मराठीचा अभ्यास करण्याची गरज, संस्कृतची प्रतिष्ठा मराठीला न लाभल्याने, कदाचित निर्माण झाली नसावी किंवा काळाच्या उदरात ही साधनसामग्री नष्ट झाली असावी.

घटना कोणतीही असो, मराठी भाषेच्या व्याकरणांच्या बाबतीत मराठी व्याकरणांची परंपरा वापरात आणली गेली नाही हे खरे. शाळाखात्याच्या स्थापनेमुळे विद्याप्रसारासाठी, मिशनरी लोकांना धर्मप्रसारासाठी व इंग्रज राज्यकर्त्यांना राज्यकारभारासाठी जेव्हा मराठी भाषा वापरण्याची विशिष्ट गरज निर्माण झाली तेव्हा मराठी भाषेचा एका मर्यादित क्षेत्रात, एक भाषा म्हणून व्याकरणिक अभ्यास केला गेला. हाती असलेल्या साधनाद्वारे म्हणजेच उपलब्ध इंग्रजीची किंवा संस्कृतची व्याकरणे यांच्या आधाराने मराठीची व्याकरणे रचली गेली. इंग्रजीत 'my, our' सारखी षष्ठी-निदर्शक रूपे आहेत. संस्कृतात षष्ठी विभक्ती आहे म्हणून मराठीत षष्ठी विभक्ती मानणे, द्वितीया व चतुर्थीला एकच प्रत्यय आहेत असे म्हणणे हाही इंग्रजी व संस्कृत या व्याकरणाच्या पूर्वज्ञानाचा परिणाम आहे असे म्हणण्यास हरकत नाही. जेथे मराठीला इंग्रजीची चौकट लावणे शक्य झाले तेथे ती लावली, जेथे ते शक्य झाले नाही तेथे संस्कृत व्याकरणाची चौकट वापरली गेली, जेथे दोन्ही शक्य झाले नाही तेथे विविध चर्चा घडून येऊन व्याकरणात स्वीकारावी लागणारी विशिष्ट अगतिकता स्वीकारली गेली किंवा विशिष्ट खुलासा मान्य नाही पण दुसरा सुचविता येत नाही अशीही परिस्थिती निर्माण झाली. मराठीच्या व्याकरणाची सुसूत्र परंपरा उपलब्ध नसल्याने व

१. प्रस्तुत लेखिकेने अ–मराठी भाषिकांकरता मराठी शिकविण्यासाठी तयार केलेल्या पाठांच्या 'Beginning Marathi, Part I' या पुस्तिकेत particles चा अंतर्भाव सोयीसाठी Adverbs मध्ये केलेला आहे.

व्याकरणामागे विशिष्ट शैक्षणिक उद्देश असल्याने मराठीच्या व्याकरणांची १८०५ सनाच्या सुमाराच्या काळात वरीलप्रमाणे परिस्थिती झाली.

त्या काळात विशिष्ट भाषेला सरसकट 'प्रमाण' मानले गेले नसल्याने सुरुवातीच्या काळातील व्याकरणे बहुशः गटप्रमाणबोलींची लेखनासाठी वापरल्या जाणाऱ्या स्वरूपाची व्याकरणे ठरली. मराठी भाषेला व्याकरणांची मोठी परंपरा नसली तरी श्रेष्ठ अशी वाङ्मयीन परंपरा होती, त्याच कारणाने विशिष्ट लेखनपद्धती होती. भाषेच्या ज्या स्वरूपाचे हे लेखन होते त्यावर आधारून सुरुवातीची जी व्याकरणे झाली त्यांच्या व्याकरणकाराला विशिष्ट बोली अथवा लिखित भाषा व्याकरणासाठी निवडण्याचे स्वातंत्र्य राहिले. यामुळेच या विविधतेला निश्चित स्वरूप देण्याची गरज दादोबांना वाटली. त्यांनी व्याकरणामध्ये, शिष्ट, नागरिक किंवा विद्वानांच्या भाषांचा समन्वय साधणारे मराठी भाषेचे एक स्वरूप निश्चित केले. हे पहिले मराठीच्या 'प्रमाणभाषेचे' व्याकरण, किंवा असेही म्हणता येईल की या व्याकरणामुळे मराठी भाषेबाबत दादोबांना मान्य ते प्रमाण व त्यांना अमान्य ते अप्रमाण असा 'प्रमाण–अप्रमाण' विचार प्रथम वापरला जाऊ लागला. दादोबांनी विशिष्ट स्वरूपाला प्रामाण्य देऊन मराठीची पहिली कृत्रिम भाषा उपलब्ध करून दिली. ती कृत्रिमता अनेक शिष्ट जनांना 'मान्य' ठरू न शकणे स्वाभाविक होते. त्यामुळे सन १८३६ मधील दादोबांच्या व्याकरणावर अनेक उलटसुलट मतप्रदर्शने झाली. त्या सर्व मतांचा समन्वय साधून दामले यांनी मराठीच्या प्रामाण्याचा दुसरा निकष आपल्या 'शास्त्रीय मराठी व्याकरणाने' सन १९११ त मराठी भाषेला दिला. हा निकष बराच काळपर्यंत समाजाने मानला. सन १९३३ मध्ये ग. ह. केळकर व सन १९५१ मध्ये सबनीस यांनी आपल्या व्याकरणाद्वारे स्वतःला पटणारा मराठीच्या व्याकरणविषयक विचार मांडला तरीही सर्वसाधारणपणे दामले यांच्या व्याकरणास सर्वमान्यता राहिली.

मात्र या काळापर्यंत मराठीच्या व्याकरणामागचे प्रमुख 'शैक्षणिक' उद्दिष्ट कमी होऊन मराठी भाषेच्या अभ्यासकांचे मराठीच्या वास्तव्य स्वरूपाकडे काही प्रमाणात का होईना लक्ष जाऊ लागले. विद्यालयीन व महाविद्यालयीन गरजेशिवाय मराठी भाषा 'भाषा' म्हणून अभ्यासिली जाऊ लागली. सन १९४० च्या सुमारास कृ. पां. कुलकर्णी यांचे 'मराठी भाषा-उद्गम व विकास', झुल ब्लोकच्या पुस्तकाचे प्रा. वा. गो. परांजपे यांनी भाषांतरित केलेले 'मराठी भाषेचा विकास', प्रा. शं. गो. तुळपुळे यांचे 'यादवकालीन मराठी भाषा' इत्यादी मराठीचा ऐतिहासिक व तौलनिक अभ्यास दर्शविणारी पुस्तके प्रसिद्ध झाली. त्यामुळें मराठीचा अभ्यास केवळ शैक्षणिक उद्दिष्टांपासून बराच दूर जाऊ शकला. त्याच सुमाराला मराठी भाषेच्या अभ्यासाला वर्णनात्मक भाषाभ्यास पद्धतीचा एक नवीन दृष्टिकोन मिळाला. त्याचे एक पर्यवसान श्री. अरविंद मंगरुळकर यांच्या 'मराठी व्याकरणाचा पुनर्विचार' या पुस्तकात सन १९६४ मध्ये व्यक्त झाले, तसेच अनेक अभ्यासकांचे या नव्या वर्णनात्मक दृष्टीतून मराठी भाषा-

विषयक लेखही प्रसिद्ध होऊ लागले. या सर्व घटनांमुळे मराठीच्या ऐतिहासिक, तौलनिक व वर्णनात्मक भाषाभ्यासाला चालना मिळाली. त्यातच चालू काळात राज्यस्तरावर राज्यभाषा म्हणून मराठीच्या वापराचा वेग वाढविण्यासाठी जे उपाय अंमलात आले त्यातून व आतापर्यंतच्या काळात दामले यांचे व्याकरण वर्तमानकालीन प्रमाण बोलीशी जास्त अंतर राखू लागल्याने मराठी भाषेच्या जीवनात ' प्रामाण्यांच्या ' दृष्टिकोनातून विचार करण्याची एक नवी गरज निर्माण झाली.

३.३. मराठीचा व्याकरणांखेरीजचा भाषिक अभ्यास :

मराठी भाषेचा अभ्यास व्याकरणातून जो व्यक्त झाला त्याचा उपयोग प्रमाण-भाषेचे स्वरूप ठरविताना जितका अत्यावश्यक आहे तितका ऐतिहासिक किंवा तौलनिक अभ्यास आवश्यक नसला तरी तो उपयुक्त आहे हे खरेच. परंतु त्याशिवाय मराठीच्या प्रमाणभाषेचे स्वरूप ठरविताच येणार नाही अशी परिस्थिती नसल्याने, त्या अभ्यासाची उपयुक्तता पटूनही येथे काहीसा दूर सारला आहे. या अभ्यासाखेरीजच्या, मराठी भाषेच्या व्याकरणाशी व लेखनपद्धतीशी संबंधित अशा, विचारांचा मात्र येथे परामर्श घेतला आहे.

आगरकरांच्या ' वाक्यमीमांसा ' या पुस्तकाने वाक्यपृथक्करणाच्या विषयाला बरीच चालना मिळाली. त्या काळी इंग्रजी व्याकरणांच्या प्रभावामुळे मराठी व्याकरणात ' वाक्य पृथक्करण ' हा विषय आधीच अभ्यासिला जात होता. आजही नवीन वर्णनात्मक पद्धतीने अभ्यास करताना भाषाभ्यासात वाक्यरचनेचा अंतर्भाव होतोच. दामले, जोशी यांच्यासारख्यांनी वाक्य हा व्याकरणाचा विषय मानला आहे. त्यांच्या दृष्टीने ' प्रयोग-विचारात आपली दृष्टी कर्ता, कर्म व क्रियापद इतक्याच पदांवर असते, ' यांच्या व्यति-रिक्त इतर पदांचा संबंध समजून देण्याचा प्रयत्न वाक्यशास्त्र करते. वास्तविक वाक्य-शास्त्रामध्ये अर्थाकडे अधिक लक्ष दिलेले असते. केवळ इतर पदांचा संबंध लक्षात घेणे एवढेच कार्य वाक्यशास्त्र करते असे नाही. वाक्यमीमांसेची चर्चा प्रथमतः कृष्णशास्त्री गोडबोले यांनी आपल्या व्याकरणात केली पण वाक्यमीमांसा पद्धतशीरपणे मांडण्याचे कार्य आगरकरांनी केले. वाक्यमीमांसा हा विषय तर्कशास्त्र व व्याकरणशास्त्र यांच्याशी निगडित आहे. मराठीच्या प्रामाण्यांचा विचार करताना व्याकरणदृष्ट्या ज्याला वाक्य म्हणता येईल अशा वाक्यांचा अभ्यास पुरेसा असल्याने येथे वाक्यमीमांसाविषयक अभ्यास विचारात घेण्याची आवश्यकता भासत नाही. मराठी वाक्यांच्या रचनेचा अभ्यास मराठी व्याकरणांच्या कक्षेत व्याकरणकारांनी चर्चिला असल्याने मराठीचे प्रामाण्य दर्शविणाऱ्या व्याकरणविषयक अभ्यासात तो आपोआपच समाविष्ट होणार असल्याने त्यांची वेगळी चर्चा येथे केलेली नाही. शिवाय भाषेचे प्रामाण्य ठरविताना व्याकरणविषयक अंगाचा वेगळा अभ्यास करण्याचा प्रस्तुत (निबंधात) विचार नसून प्रामाण्याचे निकष शोधण्याचा प्रयत्न असल्याने वाक्यविचार हा दूरान्वयाचा

समजला आहे.

व्याकरण पुस्तकांच्या बाहेर चर्चिले गेलेले विषय ते ' व्याकरणेतर ' विषय या अर्थाने व्याकरणेतर निबंधांचा व लेखनविषयक चर्चांचा अभ्यास मराठीच्या प्रमाणभाषेच्या वेळोवेळी बदलणाऱ्या स्वरूपाचा मागोवा घेण्यासाठी उपयुक्त ठरतो कारण मराठी भाषेचा अभ्यास विविध व्याकरणांच्या रूपाने जसा जसा विचारवंतांसमोर आला, तशा तशा त्यांच्याशी संलग्न अशा विविध विषयांवरील प्रतिक्रिया, चर्चा, निबंधरूपाने प्रसिद्ध होऊ लागल्या. या निबंधांतून तत्कालीन भाषेसंबंधीची विचारवंतांची विविध मते, व्याकरणिक अंगाबद्दलची विशिष्ट मतप्रणाली, भाषेसंबंधीचे विविध दृष्टिकोन इत्यादींची कल्पना येऊ शकते. या निबंधांचा एकत्रित विचार व शुद्धलेखनविषयक मतमतांतरांचा विचार स्वतंत्रपणे करणे प्रमाणभाषेच्या स्वरूपाच्या अभ्यासात इष्ट आहे.

३. ३. (१) व्याकरणेतर निबंध :

व्याकरणेतर निबंधांत कृष्णशास्त्री चिपळूणकर यांनी ' शालापत्रक ' या मासिकातून जे भाषाविषयक लिखाण केले त्याचा समावेश प्रथम केला पाहिजे, ' कोणतीही भाषा भिन्न स्तरांवरून भिन्न प्रकारांनी बोलली जाते. तिच्यात एकसारखेपणा कुठेही, कधीही असत नाही. भाषेच्या बाबतीत ती कशी असावी हा प्रश्नच उपस्थित होत नाही. ती कशी आहे ते पाहणे एवढेच व्याकरणकारांचे काम आहे. मराठी भाषेचे व्याकरण म्हटले म्हणजे त्यात त्या भाषेच्या सर्व प्रकारांचे प्रतिपादन पाहिजे. अमुक एक प्रकार अडाणीपणाचा आहे किंवा अशुद्ध आहे म्हणून त्याचा अव्हेर करणे युक्तीच्या दृष्टीने ठीक दिसत नाही. भाषा विद्वानांनी विचार करून व सयुक्तिक भाषण कोणते व अयुक्तिक कोणते असे ठरवून केली आहे असे नाही. [1] अशा प्रकारची मते कृष्णशास्त्री चिपळूणकरांची आहेत. श्री. विष्णुशास्त्री चिपळूणकरांनी आपल्या निबंधात, बायकापोरांपर्यंत पोचलेले इस्टेट, रजिस्टर यांसारखे इंग्रजी शब्द आपण स्वीकारले पाहिजेत, परभाषेऐवजी शक्य तेथे संस्कृत शब्द वापरले पाहिजेत, परंतु ते मराठीचे सौंदर्य बिघडवणारे बोजड, भाषांतरित शब्द असू नयेत; भाषेच्या उच्चारातील परिवर्तनाप्रमाणे लेखनातील परिवर्तनाला सिद्ध राहिले पाहिजे, अशा आशयाची विधाने स्पष्ट मांडून आपला भाषाविषयक उदार दृष्टिकोन दाखवून दिला आहे.

' मराठीत परभाषेतून शब्द घेणे ' या आपल्या निबंधात श्री. रा. भि. जोशी [2] यांनी आपले विचार व्यक्त केले आहेत– ' सध्या सर्वत्र नवीन विचार, नवीन शास्त्रे व नवीन शोध यामुळे नवीन शब्दांची गरज भासत आहे. त्यामुळे परभाषेतून शब्द घेण्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. संस्कृतमधून शब्द घेणे म्हणजे परभाषेतून शब्द घेणे नव्हे.

१. मराठीतील भाषिक विचारांची वाटचाल–जोगळेकर, पृ. ३४.
२. मराठीतील भाषिक विचारांची वाटचाल–जोगळेकर, पृ. ३१५.

मराठीमध्ये परकी शब्द येऊ द्यायचा नाही असे करून चालणार नाही. कारण स्पंज, रबर, तोफ यांसारख्या शब्दांना संस्कृत शब्द सापडणे शक्य नाही. परकी विचाराबरोबर परकी शब्दही येतो व तो रूढ होतो. पास, नापास, पेपर इत्यादी शब्द घालवून देण्याचा प्रयत्न करण्यात हंशील नाही. पारिभाषिक शब्द संस्कृत असावेत कारण हिंदुस्थानातील सर्व देशभाषांत पारिभाषिक शब्द सारखेच असणे योग्य म्हणून ते संस्कृतमधून घ्यावेत. '

वरील प्रकारचे मराठीचा भाषाविषयक व्याकरणेतर अभ्यास दर्शविणारे अनेक लेख प्रसिद्ध झाले आहेत. त्यात लेखनासाठी मराठी वापरताना तिचे स्वरूप कसे असावे, तिची विशिष्टकाळी स्थिती कशी होती यासंबंधातील लेख बरेच आहेत. मराठीवरील फारसी, इंग्रजी व संस्कृत या भाषांच्या आक्रमणाची चिंता, त्यांपैकी मराठीशी जुळवून घ्यावयाचा भाग कोणता व मराठीतून घालवून देण्याजोगा भाग कोणता याविषयींच्या चर्चा मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहेत. संस्कृत – प्राकृत परंपरेने मराठीची निर्मिती झाल्याने काहींना संस्कृतला परभाषेचे स्थान देणे मान्य नाही, परंपरा विसरल्यास मराठीच्या भाषिक वैशिष्ट्यांचा उलगडा करणे मुष्कील होईल असे काहींचे म्हणणे आहे.

मराठीच्या प्रमाणस्वरूपाचा विचार करताना सन १८०५ नंतरच्या काळातील भाषिक अभ्यासात संस्कृत व फारसीपेक्षाही इंग्रजीच्या आक्रमणाचा धोका तत्कालीन लोकांना अधिकाधिक जाणवत होता असे दिसून येते. फारसीची उत्तरोत्तर विस्मृती, संस्कृतची मर्यादित स्मृती व इंग्रजीचा वाढता दबाव यांची त्या काळची भीती आजही अस्तित्वात असलेली दिसून येते.

३.३. (२) शुद्धलेखन :

भाषा जोपर्यंत फक्त बोलली जात होती तोपर्यंत ती कितीही बदलली तरी अभ्यासाचा विषय होण्याची शक्यता नव्हती: कारण भाषा बोलणारा किंवा पाठांतर करणारा लोकव्यवहाराच्या निकषावर आपोआपच निश्चित रस्त्याने जात होता. मौखिक परंपरेने पाठ केलेल्या वेदांच्या संरक्षकाला वेदातील ' ज्ञ ' आपण काही वेगळ्या प्रकारे म्हणत आहोत याची जाणीवच नव्हती; उलट जसा परंपराप्राप्त ' ज्ञ ' उच्चारला जात असे अगदी तसाच आपण म्हणत आहोत याच समजुतीवर तो पूर्वी होता व अजूनही आहे. परंतु आजच्या भाषाभ्यासकाला उत्तर भारतातील ' ज्ञ ' चा उच्चार ' ग् + ञ् ' असा ऐकू येतो व महाराष्ट्रात ' द् + न् + य् ' असा जेव्हा ऐकू येतो तेव्हा मात्र मूळ उच्चार या दोन्हींपैकी कोणत्यातरी भाषा उच्चारासारखा किंवा दोन्हींशी काही साम्य दाखवणारा व काही फरक दाखवणारा असा एखादा वेगळाच उच्चार असला पाहिजे असा तर्क केल्याशिवाय ' ज्ञ ' च्या ग + ञ् किंवा ' द् + न् + य् ' या उच्चारभिन्नतेची मीमांसा सांगता येणार नाही. भाषा ज्या वेळी पहिल्यांदा लिहिली गेली तेव्हापासूनच भाषेचे उच्चारण व लेखन या दोन अंगांमधील परस्पर नाते सिद्ध करण्याची जरूरी भासू लागली. मराठी भाषेला परंपराप्राप्त लिपी लाभलेली होती व संस्कृत ते मराठी असा

भाषाप्रवाह संस्कृतच्या एका विशिष्ट कालखंडापासून अस्तित्वात असल्याने, मराठी भाषा आपल्या लिपीसह जन्माला आली असे म्हणणे अगदीच अशास्त्रीय किंवा अतिशयोक्त ठरणार नाही.

भाषा ध्वनिरूप असल्याने क्षणजीवी असते. तिला अक्षरत्व देण्यासाठी भाषेचे लेखन सुरू झाले. हे लेखन उत्क्रांत होत होत सध्यांच्या अवयवलेखन पद्धतीशीं स्थिरावले. मराठीची लेखनपद्धती एका ध्वनीला एक स्वतंत्र वर्ण असणारी रोमन लिपी पद्धती-सारखी नसून एका स्वराला एक वर्ण स्वरमिश्रित व्यंजनाला – व्यंजनाचा वर्ण अधिक स्वरवर्ण अशा मिश्र वर्णांनी युक्त आहे. मिश्रवर्णात एकापेक्षा अधिक व्यंजनवर्ण व एक स्वरवर्ण अशीही रचना आढळते. याच कारणाने मराठीची लेखनपद्धती वरीचशी 'अवयवाधिष्ठित' आहे. काही अपवाद वगळता व्यंजन हे स्वराशिवाय लिहिले जात नाही. प्रतिष्ठितांना किंवा शिष्टजनांना मान्य किंवा प्रमाण अशा लेखनपद्धतीने भाषा लिहिणे म्हणजे शुद्धलेखनाचा अवलंब करणे होय. शुद्धलेखनातील बदल हे भाषेच्या मान्य स्वरूपातील बदल दाखवीत असतात. या दृष्टीने मराठीच्या प्रमाणभाषेच्या चर्चेत शुद्धलेखनविषयक विचाराला महत्त्वाचे स्थान द्यावे लागते.

कानांनी ग्रहण करावयाची भाषा डोळ्यांनी ग्रहण करावयाच्या स्वरूपात मांडणे म्हणजे भाषा लिहिणे. भाषा जेव्हा कानांना ऐकण्याची शक्यता नसते तेव्हा तिच्या वाचनाची गरज निर्माण होते. तसेच ती जेव्हा तोंडाने बोलण्याची शक्यता नसते तेव्हा तिच्या वाचनाची गरज निर्माण होते. भाषेचे अल्पजीवित्व व वरील प्रकारच्या भाषिक दळणवळणातील उणिवा यातून लेखनाची जी गरज निर्माण झाली त्यातूनच अशी जबाबदारी येऊन पडते की एखादे वाक्य बोलले गेले असता जसे ऐकू आले असते व त्यामुळे जी प्रतिक्रिया निर्माण झाली असती तीच प्रतिक्रिया लिखित स्वरूपातील त्या वाक्याने निर्माण झाली पाहिजे. म्हणजेच लेखनात बोलण्याच्या भाषेच्या सर्व घटकांची प्रतीके असली पाहिजेत. लेखनातील घटकांनी दाखवलेल्या उच्चारणाचा सुसंवाद बोलण्याच्या भाषेच्या उच्चारणाशी राखला गेला पाहिजे. यासाठी लिखित भाषेचे संकेतही बोलल्या जाणाऱ्या भाषेच्या संकेतांप्रमाणे शिष्टमान्य असायला पाहिजेत.

लेखन व उच्चारण यांचा उत्कृष्ट मेळ साधावयाचा असेल तर वर्णलेखन[1] पद्धती उपयुक्त ठरते. वर्णलेखनावरून त्या भाषेतील विशिष्ट नियमबद्धता माहीत झाल्यास ध्वनिलेखन[2] करणे शक्य होते. ध्वनिलेखनात बारकावे खूप असल्याने चिन्हांची संख्या जास्त होते. शिवाय दैनंदिन समाजव्यवहाराला या बारकाव्यांची काही आवश्यकता

१. वर्ण म्हणजे भाषेंतील ध्वनिकुल दाखविणारे लेखनातील चिन्ह. – 'मराठीची ध्वनिकुले', – लहू– 'मनोरा' मासिक १९७७.

२. ध्वनि म्हणजे भाषेच्या उच्चारणअंगातील लहानात लहान, महत्त्वाचा भेद-दर्शक घटक. पहा – 'मराठीची ध्वनिकुलें'– लहू – 'मनोरा' मासिक १९७८.

नसते. त्यामुळे वर्णलेखनपद्धतीनेच झालेले भाषेचे लेखन भाषिक व्यवहारास पुरेसे उपयुक्त ठरते. शिवाय सरावाने वर्णलेखनावरून ध्वनीचे योग्य उच्चारण सहज होते. संस्कृत भाषेची लेखनपद्धती वर्णानुसारी, प्रत्येक वर्णाला स्वतंत्र चिन्ह, अशी असल्याने आदर्श लेखनपद्धती होती. परंतु संस्कृतपासून पुढे निर्माण झालेल्या भाषांनी ती तशी आदर्श लेखनपद्धती राहू शकली नाही. 'च' हा एकच वर्ण मराठीत दन्त्य व तालव्य अशा दोन ध्वनिकुलांसाठी वापरात राहिला तर इंग्रजीच्या परिणामामुळे मराठीत 'bat' मधील 'a' या वर्णाने सूचित केलेल्या उच्चारासाठी 'अॅ' व 'ball' मधील 'a' या वर्णाने सूचित केलेल्या उच्चारासाठी 'ऑ' अशा नवीन वर्णांची मराठीच्या वर्णमालेत भर पडली. मराठी अकारान्त शब्द क्वचित व्यंजनान्त व क्वचित स्वरान्त उच्चार दाखवीत आहेत. या प्रकारच्या मराठीच्या लेखनपद्धतीत दिसून येणाऱ्या बदलांच्या नोंदीचे कारण लक्षात घेतले पाहिजे. मराठी भाषा जशी जशी उत्क्रान्त झाली तशी तशी ती संस्कृतच्या लिपीने लेखनात वापरली गेली. परंपरेने भाषा जशी प्राप्त होते तशीच भाषेची लिपीही प्राप्त होऊ शकते; फरक एवढाच की भाषा आपोआप टिकते किंवा बदलते, भाषेच्या मानाने लिपी अधिक टिकविली जाते. भाषेतील एखाद्या वर्णाचा, अक्षराचा उच्चार बदलतो पण लिपीने त्याची नोंद घेतली जाते असे नाही, तर उलट मूळचा संकेत बदलून तो वर्ण किंवा ते अक्षर नवा उच्चार दाखवू लागते, उदाहरणार्थ 'ष' या वर्णाचा उच्चार कित्येकांच्या भाषेत बदललेला असला तरी लेखन तेच आहे. काही वेळा एकच वर्ण दोन किंवा दोनपेक्षा अधिक उच्चार दाखवू लागतो (उदा०, च्, छ्,....) म्हणजेच त्या वर्णाचे त्याच्या उच्चाराशी असणारे संकेत एकापेक्षा अधिक होतात. भाषेतील उच्चारांचा बदल अशा प्रकारे लेखन आत्मसात करून घेत असल्याने भाषेच्या परिवर्तनशीलतेपेक्षा लेखनाची परिवर्तनशीलता कमी राहते.

भाषा बोलण्यात कृत्रिमपणा जेवढा असू शकतो त्या मानाने लेखनपद्धतीत जास्त कृत्रिमपणा असल्याने लेखनातील बदल कृत्रिमपणाने घडवून आणता येतात. उदाहरणार्थ, सरकारी आदेशाने मराठी लेखनातील अनुस्वार एका मर्यादित क्षेत्रात विशिष्ट नियमांनी राखले गेले व काढूनही टाकले गेले. भाषा बोलताना असा कृत्रिमपणा फार कमी प्रमाणात आणता येतो. पती जिवंत असलेल्या स्त्रीला श्रीमती हे विशेषण बोलताना लावणे हे अशा कृत्रिमपणाचे उदाहरण देता येईल. औपचारिक प्रसंगी बोलताना भाषेत असा कृत्रिमपणा आलेला आढळू शकतो, पण लेखन हे भाषेशी सुसंवाद राखणारे साधन मुळातच कृत्रिम असल्याने तेथे विशिष्ट परिस्थितीत परंपरेला बगल देणे जास्त शक्य असते, मात्र जोपर्यंत असे कृत्रिम कारण घडत नाही तोपर्यंत लिखित भाषा, बोलभाषेशी सुसंवाद राखीत, बोलभाषेच्या परिवर्तनशीलतेच्या प्रमाणात आपल्या आपल्या मार्गाने बरीचशी स्थिर राहूनही बदलत असतेच.

लिखित भाषा हे समाजव्यवहाराचे महत्त्वाचे साधन आहे. आपल्या विचारांची,

भावनांची अभिव्यक्ती करणे हे लेखनाने साध्य असे समाजव्यवहाराचे एक कार्य आहे. ही अभिव्यक्ती जास्तीत जास्त स्पष्टपणे मांडणे हे उत्तम लेखनपद्धतीचे कार्य असते. वाचायला शिकणे म्हणजे लिखित वर्णांचे उच्चारांनी व पर्यायाने अर्थाशी साहचर्य जाणणे. ' गवत ' हा उच्चारलेला शब्द व ' गवत ' हा लिखित शब्द, या दोन्ही शब्दांचा आशय एकच आहे हे समजणे म्हणजे वाचता येणे. लेखनपद्धतीमुळे उच्चारित भाषा, लिखित भाषा व आशय यांचा मेळ साधला जातो. संस्कृत ' ब्रह्मन ' शब्द मराठीत ' ब्रह्म ' असा उच्चारला जातो, तरी ' ब्रह्म ' असाच लिहिला जातो; किंवा तो ' ब्रह्म ' अशाच प्रकारे लिहा असे सांगितले जाते. मात्र मध्येच ' ब्रह्म ' असे लेखन केले गेले तर एक पक्ष ते बरोबरही ठरवतो. परिणामी ' ब्रह्म ' हा संस्कृतातून मराठीत आलेला शब्द ' ब्रह्म ' असा संस्कृत उच्चाराप्रमाणे किंवा ' ब्रह्म ' असा मराठी उच्चाराप्रमाणे असा दोन्ही प्रकारांनी लिहिला जाण्याची शक्यता निर्माण होते. कालांतराने तो फक्त ' ब्रह्म ' असा लिहिला गेला असता ' ब्रह्म ' च्या आशयाशी निगडित समजला जातो.

भाषा एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे संक्रान्त होताना जसा परिवर्तनाचा प्रभाव पडतो तसाच लेखनपद्धती एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे संक्रान्त होत असताना पडत असतो. मात्र हे परिवर्तन अत्यंत मंद किंवा हेतुतः केले गेल्याने अचानकही होऊ शकते. भाषेच्या इतिहासात डोकावण्याचे लिखित वाङ्मय हेच आधारभूत साधन असल्याने व त्या लिखित वाङ्मयात त्या त्या काळची भाषा पकडून ठेवली जाण्याची शक्यता असल्याने, शुद्धाशुद्धविषयक चर्चा तीव्र स्वरूपात लेखनपद्धतीसंबंधीच होताना आढळते. बोलण्यातील अशुद्धतेला, चांगला समाजव्यवहार न होण्याची प्रतिक्रिया ताबडतोब मिळणार असल्याने व्यक्ती बोलताना जागरूक राहू शकते. अशी जाणीव लेखनाबाबत कमी राखली जाण्याची शक्यता त्यामानाने जास्त असते. त्यामुळे लिखित भाषेबाबत शुद्धाशुद्धविचार अधिक काटेकोरपणे करणे जरुरीचे असते.

लिखित भाषा ही समाजाचा इतिहास, त्याच्या वाङ्मयीन परंपरा, त्याचे विचार-धन सांभाळीत असते. त्यामुळे समाजाचे स्थैर्य टिकण्यात लिखित भाषेचा वाटा फार मोठा असतो. ऐतिहासिक व भौगोलिक एकता टिकवण्यात लिखित भाषा फार मोठे कार्य करीत असतात. लिखित भाषेचे हे कार्य लक्षात घेतल्यानंतर भाषेच्या लेखनपद्धतीबाबत योग्यायोग्यविवेक किंवा शुद्धाशुद्धविवेक का करावा लागतो हे अधिक स्पष्ट होईल. उच्चारण, लेखन व आशय यांचा सुयोग्य मेळ, उत्कृष्ट अभिव्यक्ती आणि परंपरागतता या सर्वांचा विचार करून लेखनपद्धतीवर संस्कार केले जातात किंवा लेखनपद्धतीचे नियम सांगितले जातात, तेव्हा भाषेच्या शुद्धलेखनाचा ऊहापोह होतो.

मुद्रणकला ज्या वेळी अस्तित्वात नव्हती व शाळाखात्याची जोपर्यंत स्थापना झाली नव्हती तोपर्यंत समाजातील जाणता वर्ग आपल्याला पटेल परंतु परंपरागत पद्धतीशी जास्तीत जास्त सुसंगत पद्धतीने लिहीत होती किंवा मर्यादित अर्थाने असेही विधान करता येईल की काही प्रमाणात संस्कृतची लेखनपद्धती वापरून मराठी लेखन केले

जात होते. परंतु मुद्रणकला अस्तित्वात आल्यावर व विशेषतः शाळाखाते स्थापन झाल्यावर सर्वमान्य लेखनपद्धती ठरविण्याचा प्रश्न निर्माण झाला. त्या काळी व्याकरणाचा प्रश्न जसा सोडविला गेला तसाच त्या व्याकरणाच्या अनुषंगाने लेखनाचा प्रश्न सोडविला गेला. भाषेचे व्याकरण, लेखन व मुद्रण यांचा परस्पर संबंध अत्यंत निकटचा आहे. व्याकरणाला मान्य अशी भाषा लेखनासाठी वापरली तर ती 'शुद्ध' असते, परंतु त्याचबरोबर भाषेचे लेखन व उच्चारण यांचा योग्य मेळ दाखवणारी ती असेल तेव्हाच 'शुद्ध' ठरते. या 'शुद्धत्वासाठी' मुद्रणाची सोय-गैरसोयही लक्षात घ्यावी लागते; व ही सोय स्वीकारताना लिखित भाषेत 'अशुद्धत्वाचा' धोका स्वीकारावा लागतो. उदाहरणार्थ, 'च' या वर्णाचा उच्चार मराठीत दन्त्य व तालव्य अशा दोन प्रकारचा आहे. तो दाखविण्यासाठी तालव्य 'च' आणि दन्त्य 'च़' अशी चिन्हे पूर्वी सुचविली गेली होती.[1] परंतु सन १८३६ पासून ही सुचविली गेलेली दुरुस्ती, मुद्रणाच्या सोयीकडे लक्ष देऊन, आजपर्यंत उपेक्षित राहिली. म्हणजे 'च' या वर्णाने दन्त्य व तालव्य दोन्ही उच्चार दाखवून भाषेच्या लेखनातील अशुद्धपणा स्वीकारला गेला. 'च, च़' साठी एकच वर्ण लिहिण्याने निर्माण होणाऱ्या उणिवांसकट, तशाच प्रकारच्या इतर काही उणिवा स्वीकारूनही, बाकी भाषा 'शुद्ध' लिहिली गेल्यास, ते सर्व लेखन 'शुद्ध' समजले जाते, कारण तशा प्रकारच्या लेखनास शिष्टमान्यता लाभल्याने 'प्रामाण्य' मिळालेले असते. भाषेचे वास्तविक स्वरूप, त्या स्वरूपाचे लिखित स्वरूपाशी संवाद, त्यासाठी मान्य अशी मुद्रण किंवा लेखनपद्धती या सर्व विचारातून भाषेच्या लिखित स्वरूपाला काही 'प्रामाण्य' मिळते; व या 'प्रामाण्या' नुसार भाषा जेव्हा लिहिली जाते तेव्हा ती 'शुद्ध' लिखित भाषा म्हणजेच 'प्रमाणभाषा' या स्वरूपाने ओळखली जाते.

'शुद्ध कसे बोलावे व शुद्ध कसे लिहावे' हे व्याकरण शिकल्याने समजते अशी भूमिका दादोबांनी आपले व्याकरण लिहिताना स्पष्ट केली होती. बोलभाषा ही स्वैर व व्यक्तीनुसार बदलणारी असते पण सर्वांच्या लेखनपद्धतीत सारखेपणा येण्यासाठी ग्रांथिक लेखनाची भाषा बोलभाषेहून निराळी परंतु शिष्टमान्य अशी असली पाहिजे असे आपले मत दादोबांनी मांडले. त्यामुळे मराठीच्या विशिष्ट स्वरूपाला 'प्रामाण्य' मिळण्याचा पहिला टप्पा जसा तयार झाला तसाच त्या प्रामाण्याप्रमाणे असणारे ते 'शुद्ध' व नसणारे ते 'अशुद्ध' असा शुद्धलेखनासंबंधीचाही पहिला पाया घातला गेला.

लोकव्यवहारापेक्षा लेखनात व्याकरणनियम महत्त्वाचे आहेत असे मेजर कँडी यांचे मत होते. मराठी लेखकांनी इंग्रजीचे वळण न स्वीकारता मराठी वळण पाळले पाहिजे यासाठी त्यांनी मराठी लेखकांना प्रोत्साहन दिले. कृष्णशास्त्री चिपळूणकर यांनी मराठीचे लेखन, विशेषतः र्‍हस्वदीर्घांच्या संदर्भात मराठीच्या प्रकृतीनुसार व्हावे अशी

---

१. मराठीतील भाषिक विचारांची वाटचाल-जोगळेकर-पृ. ३८२.

भूमिका घेतली होती. त्यांच्या मते वायु, रवि, कवि यांसारखे शब्द उच्चाराप्रमाणेच दीर्घान्त लिहावेत असे होते. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनीही आपल्या निबंधात भाषेतील उच्चारपरिवर्तनाप्रमाणे लेखनपरिवर्तनालाही सिद्ध असले पाहिजे असे आपले मत नमूद केले आहे.

सन १८९८ मध्ये का. ना. साने, रा. प. गोडबोले व शं. रा. हातवळणे यांनी लेखन सुधारणेसंबंधी एक पत्रक काढले. सन १९०४ मध्ये श्री. हातवळणे यांनी 'मराठी भाषेची लेखन पद्धती' हे पुस्तकही प्रकाशित केले. त्यात व्यक्त केलेल्या मताविरुद्ध 'इंदुप्रकाश' व 'ज्ञानप्रकाश' या वृत्तपत्रांनी आपली मते नोंदविली. लोकमान्य टिळकांनीही 'केसरीत' चार अग्रलेख लिहून मध्यममार्ग स्वीकारला. या काळात वरील प्रकारे मराठीच्या लेखनासंबंधीच्या बऱ्याच उलटसुलट चर्चा झाल्या, शेवटी गव्हर्नरांच्या राजकीय हस्तक्षेपानंतर त्या वेळी सुचविल्या गेलेल्या लेखनविषयक सुधारणांस 'अमान्यतेचे' शिक्कामोर्तब झाले. परिवर्तन सुचविणाऱ्या लोकांनी झोंप, शेंपूट इत्यादी शब्दातील अकारण अनुस्वार काढून टाकावेत, विद्वान्, भगवान् इत्यादी शब्द स्वरान्त लिहावेत, संस्कृतातून मराठीत आलेल्या अन्त्य 'इ, उ' ना दीर्घ किंवा ऱ्हस्व लिहिण्याचा विकल्प ठेवावा, इत्यादी गोष्टी सुचविल्या होत्या. यांवर जी प्रतिक्रिया व्यक्त झाली त्यापैकी महत्त्वाचे मुद्दे[1] व्युत्पत्तिदर्शक लेखन असावे, कोणत्यातरी एका प्रकारच्या लेखनाला 'प्रामाण्य' किंवा 'शुद्धत्व' मानावे, संप्रदायाने ठरलेल्या लेखन पद्धतीमुळे जोपर्यंत अडचण निर्माण होत नाही तोपर्यंत ती बदलू नये, इत्यादी विचारांशी निगडित होते. दामले यांच्या लेखनपद्धतीत बदल होत जाण्याची शक्यता तत्वतः अमान्य होती असे नव्हे पण त्यासाठी त्यांचे 'व्युत्पत्ति' व 'उच्चार' ही तत्त्वे कशा प्रकारे वापरायची या संदर्भात इतरांशी मतभेद होते. शिवाय राजसत्तेच्या आश्रयाने सुधारणा लादणे त्यांना सर्वस्वी अमान्य होते.

दामले यांच्यासारखी परंपरावादी मंडळी व हातवळणे यांच्यासारखी परिवर्तन-वादी मंडळी यांच्या वादाचा पाया–संस्कृत भाषेचा मराठीवरील प्रभाव किती मानावा व किती नाही, भाषा जर केवळ विद्वानांसाठी नाही तर भाषेचा विचार करताना विद्वा-नांची सोय-गैरसोय किती जपावी, किंवा आवड-निवड किती जपावी, बोलण्याची भाषा व लेखन यांचा मेळ जास्तीत जास्त कसा साधावा, भाषेच्या कोणत्याही रूपाला 'प्रमाण' ठरविण्यासाठीचा निकष 'व्यापकता' हा असावा की नाही, किंवा आणखी काही वेगळा असावा; अनुस्वारांची आवश्यकता व अनावश्यकता कशी ठरवावी, ऱ्हस्व दीर्घान्त लेखनासाठी पायाभूत निकष कोणता असावा, संस्कृत व्यंजनान्त शब्दांचे मराठीतील लेखन व्यंजनान्त असावे की स्वरान्त असावे, इत्यादी प्रमुख गोष्टींवर आधारलेला होता.

१. मराठीतील भाषिक विचारांची वाटचाल–जोगळेकर पृ. ३८६.

१९२८ साली श्री. केळकर यांनी लोकमान्य टिळकांचे जे चरित्र प्रसिद्ध केले त्यात अनुच्चारित अनुस्वारांना फाटा दिला गेला. त्यामुळे मराठीची लेखनपद्धती पुन्हा एकदा वादाचा विषय बनला. अनेक नियतकालिकांतून उलट-सुलट चर्चा झाल्या. त्याचा शेवट १९२९ साली बेळगाव येथे भरलेल्या मराठी साहित्य संमेलनात, शुद्धलेखनात सुधारणा करण्यासाठी सात जणांची एक कमिटी नेमण्यात झाला. तिने शुद्धलेखनाचे नवे नियम तयार केले व ते सन १९३० मध्ये भडगाव येथील साहित्य संमेलनात प्रसिद्ध केले. या वेळी मराठीचे लेखन कोणत्या तत्त्वानुसार व्हावे, संस्कृत शब्दांचे लेखन मराठीत कसे करावे, लेखन उच्चारानुसारी असावे की नाही, ऱ्हस्वदीर्घांबाबत कोणती भूमिका असावी, अनुस्वार व अनुनासिके यांच्याबाबत कोणते धोरण असावे, परसवर्ण लिहावेत की नाहीत, लिपीमध्ये नवीन चिन्हांची भर घालावी किंवा नाही इत्यादी मुद्द्यांवर चर्चा झाली.[१] उच्चारांप्रमाणे लेखन करावयाचे तर कोणाचे उच्चार प्रमाण मानावयाचे व ते कोणत्या वेळेचे, गंभीर प्रसंगातील किंवा इतर वेळेचे अशा प्रकारचे प्रश्न या चर्चेच्या अनुषंगाने उपस्थित झाले. तसेच अनुच्चारित असूनही अनुस्वारामुळे सामान्यरूपाचे अनेकवचन दाखवणे यासारखी व्याकरणिक कार्ये घडू शकतात ते निदर्शनाला आणले गेले. अर्थभेद दाखविण्याच्या अनुस्वाराच्या कार्याकडे लक्ष वेधून लिपी ही इतिहासबोधनासाठी नसली तरी जर लिपीमुळे इतिहासबोधन होत असेल व खास अडचण निर्माण होत नसेल तर ती का टाळावी असा प्रश्न विचारला गेला. लेखन पद्धतीत सुधारणा करताना परंपरा, भाषाशास्त्र, व्याकरण, रूढी व उपयुक्तता ही तत्त्वे मार्गदर्शक ठरावीत असे सुचवले गले. उच्चारानुसारी लिपी असावी या तत्त्वांचे पर्यवसान शेवटी ' व्यक्तिनिष्ठ उच्चाराप्रमाणे लेखन ' करण्यात होते म्हणून ते भाषेच्या दृष्टीने अनिष्ट होय अशीही सूचना दिली गेली.

वरील सर्व विचारांना अनुसरून महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या शुद्धलेखन मंडळाने नवे नियम सुचवले. ते महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या पत्रिकेतून व अन्य काही प्रकाशनातून अवलंबिले गेले. तरीही सर्वसाधारणपणे इतर नियकालिकातून, पुस्तकातून जुनी लेखन-पद्धतीच वापरली गेली. लेखन पद्धतीत हेतुतः बदल करवून आणण्याचा हा दुसरा टप्पा सन १९०४ नंतर सन १९३० साली अस्तित्वात आला. लेखनपद्धतीतील बदलाचा स्वीकार हा भाषेतील बदललेल्या व्याकरणिक अंगाची नोंद दाखवितो. उदाहरणार्थ, संस्कृत ऱ्हस्वान्त शब्द दीर्घान्त लिहावेत असे ठरले तर व्याकरणाच्या दृष्टीने अशा शब्दांची मोडणी दोन प्रकारे करण्याचे काम उद्‌भवते.[२] एक तर प्रथमेला मूळ शब्द म्हणजे प्रकृती ऱ्हस्वान्त मानून स्वराचे दीर्घीकरण हा प्रत्यय सांगावा लागतो नाही तर सामासिक शब्दात काही नामांचे दीर्घ स्वर ऱ्हस्व होतात अशा प्रकारचे नियम देणे भाग

१. मराठीच्या भाषिक विचारांची वाटचाल–जोगळेकर, पृ. ३९४.
१. ' मराठीच्या लेखनातील ऱ्हस्वदीर्घासंबंधीचा विचार ' लहू–' युगवाणी. '

पडते. कोशामध्ये दिल्या जाणाऱ्या शब्दांच्या लेखनात फेरबदल दाखविणे अटळ असते. लेखनपद्धती, व्याकरण व लिखित भाषा यांच्यामध्ये कोणत्याही एका ठिकाणी बदल केला तर त्याचा परिणाम दुसऱ्या ठिकाणी बदलाची नोंद करण्यात अपरिहार्य ठरतो.

साहित्यपरिषदेने १९३० साली संमत केलेल्या शुद्धलेखनाच्या नियमांबाबत पुन्हा ज्या चर्चा झाल्या त्यांत अनेक प्रकारचे मुद्दे उपस्थित केले गेले – लेखनाचे शुद्धीकरण व्याकरणाच्या शुद्धीकरणाशी संबद्ध असते हे दाखवून दिले गेले, पुणेरी भाषेला प्रमाण मानावयाचे कारण काय असा प्रश्न उपस्थित केला गेला, दन्त्य चकारांसाठी ' नुक्त्या 'ची खूण सुचवली गेली, जोरयुक्त व जोरविहीन उच्चारांचे लेखन (पुण्याचा, पुण्ण्याचा यातील फरकासारखे) भिन्न हवे ही मागणी मांडली गेली, व्याकरणकार्यार्थ येणारे अनुस्वार राखले जावेत असे म्हटले गेले. वरील प्रकारची अनेक मते मांडली गेल्यावर सन १९५७ साली महाराष्ट्र साहित्य परिषदेने आणखी एका शुद्धलेखनसमितीची स्थापना केली. परंतु या मंडळाचे नियम प्रसिद्ध होऊन ते अंमलात येण्याच्या आतच महाराष्ट्रात व वृहन्महाराष्ट्रात काम करणाऱ्या साहित्य संस्थांचे एकत्रीकरण होऊन साहित्यमहामंडळ स्थापन झाले. या मंडळाने शुद्धलेखनाचा प्रश्न नव्याने विचारात घेतला. २० सप्टेंबर १९६२ रोजी महाराष्ट्र सरकारच्या परिपत्रकाने महामंडळाने दाखवून दिलेल्या लेखनविषयक नियमांस मान्यता मिळाल्यानंतर मराठीच्या प्रमाणभाषेला राज्यकर्त्यांच्या शिफारशीमुळे एक नवे वळण मिळाले. या नव्या नियमांनी मराठीच्या लेखनपद्धतीसंबंधी अनेक विचारवंतांचे समाधान झालेले नसल्याने वरील नियमांचा फेरविचार झाला पाहिजे असे म्हणणारा एक नवा ' शिष्ट ' वर्ग निर्माण झाला आहे. या वर्गातील व्यक्ती व नवीन नियम मान्य असणाऱ्या व्यक्ती यांच्याकडून पुन्हा भिन्न भिन्न मते प्रकट केली जात आहेत. संस्कृतच्या दडपणातून मराठीचे लेखन मुक्त झाले पाहिजे, ऱ्हस्वदीर्घांसाठी एकाच प्रकारचे लेखन मोडी लिपीद्वारा केले जात असे ते बालबोध लिपीने दाखवणे शक्य आहे व त्यामुळेच ह्रस्वदीर्घत्व दर्शविण्यास वेगळ्या चिन्हांची जरूरी नाही, मराठी जनसाधारण जसे बोलत असेल तसे मराठीचे लेखन असावे, ब्राह्मणांची कठीण बोली ब्राह्मणेतरांवर लादली गेली असे म्हणणे भ्रममूलक आहे. अनुच्चारित ठरवले गेलेले कित्येक अनुस्वार आजही प्रत्यक्ष बोलींत अस्तित्वात आहेत. उच्चारानुसारी लेखन हे तत्त्व कितीही शास्त्रशुद्ध असले तरी ते व्यवहारात निरुपयोगी ठरते इत्यादी मते प्रकट केली गेली. साहित्यमंडळाने लेखनविषयक नवीन नियम घालून दिले असले, ते नियम सरकारने सक्तीचे करून त्या नियमांनुसार लिहिलेल्या मराठीला एक प्रकारचे प्रामाण्य मिळवून दिले असले तरी या नियमांबाबत मराठीच्या बऱ्याच प्रतिष्ठितांचे, जाणकारांचे, शिष्टांचे समाधान झालेले नसल्याने हे नवे प्रामाण्य खऱ्या अर्थाने प्रस्थापित झालेले नाही. मराठी लेखनाची शिष्टमान्य भाषा विशिष्ट पद्धतीची असावी ही मागणी अजूनही शिल्लक राहिलेली आहे.

मराठीच्या लेखनाविषयी ज्या ज्या अनेक चर्चा झाल्या, जे नवे नवे नियम

लेखनासाठी वापरले गेले त्या सर्वांचा विचार अजूनही कित्येक तात्त्विक गोष्टींच्या दृष्टीतून व्हावयास पाहिजे हे दिसून येईल. लेखनाचा प्रमुख उद्देश काय, लिखित व उच्चारित भाषा यांतील संवाद किती प्रमाणात साधला गेला असता भाषेच्या कार्याच्या दृष्टीने पुरेसा असतो, लेखनविषयक नियम बदलले परंतु त्यांची दखल व्याकरण पुस्तकांनी घेतली नाही तर जी अव्यवस्था निर्माण होईल ती टाळण्यासाठी कोणती उपाययोजना करावयाची, लेखनासाठी जे स्वरूप वापरले जाते ते तशाच प्रकारे बोलण्यात दिसून आले तरी त्याचा स्वीकार कशा स्वरूपात करावयाचा, लेखनात गुंतलेली भाषा व इतिहास किंवा परंपरा यांच्या संबंधांना कितपत महत्त्व द्यावयाचे, संस्कृतप्रचुर किंवा संस्कृतनिष्ठ भाषा असणे व नसणे यातील नेमका फरक काय, ज्यांना 'देशी' असे शब्द मानले जाते त्यांची व्युत्पत्ती लक्षात घेतली जाते काय, ज्यांना तद्भव किंवा तत्सम शब्द समजले जाते त्यांची व्युत्पत्ती लक्षात घेण्याचे प्रयोजन काय, व्याकरण व लेखन यांचा नक्की संबंध काय, इत्यादी प्रकारचे अनेक प्रश्न आजही समाधानकारकपणे सोडविले गेलेले नाहीत. भाषाशास्त्राच्या दृष्टीतून मराठी भाषेचा अभ्यास जसा जसा वाढत चालला, तसे तसे मराठीच्या शुद्धलेखनासंबंधीचे प्रश्न अधिकाधिक गुंतागुंतीचे होत चालले आहेत.

शुद्धलेखनविषयक विविध अभ्यासातून मराठीच्या 'प्रमाण' स्वरूपाचा एक इतिहास उपलब्ध होतो. 'प्रमाणस्वरूप' देण्याचे पहिले कार्य दादोबांच्या व्याकरणाने केले. त्यानंतर सन १९०४ मधील विविध भाषाविषयक चर्चा दादोबांनी दाखवून दिलेल्या प्रमाणस्वरूपावर अनुकूल प्रतिकूल मते दाखवून देतात. त्यांवरून त्या वेळी किमान दोन प्रमाणस्वरूपे अस्तित्वात होती हे दिसून येते. सन १९०४ मधील सरकारी हस्तक्षेपामुळे दादोबाप्रणीत मराठीचे 'प्रामाण्य' पुन्हा मानले गेले. सन १९३० मधील साहित्यपरिषदेच्या लेखनविषयक नियमांमुळे पुन्हा मराठीची प्रमाणस्वरूपे दोन राहिली. एक दादोबांच्या व्याकरणाने स्पष्ट होणारे, राजाश्रय असलेले व दुसरे साहित्य परिषदेच्या शुद्धलेखन समितीने स्पष्ट केलेले, परंतु राजाश्रय नसलेले. सन १९६२ मध्ये साहित्यमहामंडळाने नवीन लेखनविषयक नियम केले. त्यांना सरकारमान्यता मिळून ते सरकारी लेखनात, शाळाखात्यात वापरले जाऊ लागले. या नियमांनी दर्शविलेले सध्याचे मराठीचे प्रमाणस्वरूप हे एक स्वरूप होय. परंतु हे नियम सर्वस्वी मान्य न करता १९३० च्या नियमांना मान्यता देणारा एक वर्ग, त्या नियमांच्या आधीच्या म्हणजे जुन्या नियमांना मान्यता देणारा एक वर्ग, असे अनेक 'शिष्टांचे' वर्ग आज अस्तित्वात आले असून मराठीची 'प्रमाणभाषा' खऱ्या अर्थाने आज अस्तित्वातच नाही असे म्हणण्याची वेळ आली आहे. सर्वांना बव्हंशी समजणारी, लिखित स्वरूपात वापरली जाणारी, औपचारिक प्रसंगी बोलताना वापरली जाऊ शकणारी, शिष्टमान्य किंवा प्रतिष्ठितमान्य अशी जर प्रमाणभाषेची व्याख्या केली तर त्या व्याख्येची सर्व कलमे पाळणारी मराठी भाषेची अनेक स्वरूपे आज उपलब्ध आहेत. याचाच

अर्थ आज अनेक गटप्रमाणभाषा, म्हणजे पोटभाषा लिखित स्वरूपात अस्तित्वात असून मराठीला सर्वमान्य अशी प्रमाणभाषा नाही असे विधान करावे लागत आहे. तसेच भाषेच्या अभ्युदयासाठी व मराठी समाजाच्या एकसंधपणासाठी भाषेच्या अनेक शिष्ट-जनांना एकत्रित आणून सर्वांना बव्हंशी मान्य असे प्रमाणस्वरूप निश्चित करण्याची गरज निर्माण झाली आहे. हा कृत्रिम उपाय शक्य नसेल तर, आज शाळेतून ज्यांना भाषा शिकवली जात आहे ती मुले वयाने, अनुभवाने समृद्ध होऊन ' शिष्ट ' या पदवीला प्राप्त झाल्यानंतर त्यांना मान्य अशी भाषा आपोआप अस्तित्वात येणाऱ्या कालखंडाकडे पाहात राहणे क्रमप्राप्त आहे.

३.३. (३) भाषाशुद्धी :

मराठी भाषेच्या प्रमाणस्वरूपाचा विचार करताना मराठी भाषेबाबत झालेल्या भाषाशुद्धीच्या विचाराला नजरेआड करून चालणार नाही. भाषेच्या प्रकृती व प्रत्यय या अंगभूत घटकांवर जेव्हा परभाषेचे आक्रमण होते तेव्हा भाषेचे रूप त्या त्या क्षेत्रात पालटते. एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे संक्रांत होताना नैसर्गिक रीत्या भाषेचे स्वरूप पालटत जातेच परंतु विशिष्ट सामाजिक, राजकीय इत्यादी क्रांतीमुळे भाषेच्या स्वरूपावर परिणाम होत असतो. अशा परिणामांनी भाषेच्या स्वरूपात जे बदल होतात ते जेव्हा विचारवंतांच्या मनात अस्मितेला धोका निर्माण झाल्याने चिंताविषय बनतात तेव्हा भाषाशुद्धीचा विचार होतो. या भाषाशुद्धीमागे काही वेळा परभाषेचा तिरस्कार असतो. स्वभाषाभिमानही असू शकतो तर काही वेळा राजकीय हेतू असतात. समाजा-तील सर्वसामान्य व्यक्तीच्या भाषेवर न कळत परिणाम होत असतातच, परंतु त्याचे दूरवरचे परिणाम जपण्याची दृष्टी सामान्य व्यक्तीला नसते, किंवा परभाषेच्या स्वीकाराने एक प्रकारे भाषेच्या आडून आपण कोणत्या पारतंत्र्यात गुंतले जात असतो याची पुसटशी जाणीवही सामान्य व्यक्तीला नसते. स्वभाषा, स्वराष्ट्र व स्वसमाज यांविषयीचे अभिमान एकमेकांशी वस्तुतः निगडित असतात. त्यामुळे भाषेपाठोपाठ आपोआप छुपेपणाने परकीय संस्कृती जनसामान्यात शिरू शकत असते, याची जाणीव असणारे परभाषेच्या आक्रमणाची वेळीच दखल घेऊन भाषाशुद्धीचे प्रयत्न करून भाषेवरील परकीय प्रभाव कमी करण्याचा प्रयत्न करतात. अशा भाषाशुद्धीविषयक प्रयत्नात मराठी भाषेच्या जीवनात वेगवेगळे टप्पे दिसून येतात. यादवकालातील मराठी भाषा बहामनीकालात मुसलमान राज्यकर्त्यांच्या प्रभावामुळे फारसीमय झाली.

फारसी भाषा व मुस्लिम धर्म आणि मराठी भाषा व हिंदू धर्म यातील निकटत्वाचे नाते लक्षात घेऊन हिंदुपदपादशाहीची स्थापना करणाऱ्या शिवजीराजांनी ' प्रतिष्ठा ' दर्शविणारे फारसी शब्द काढून संस्कृतोद्भव मराठी शब्द वापरण्यास सुरुवात करण्या-साठी ' राज्यव्यवहारकोश ' तयार केला. मुस्लिम राजवटीत चांगली सामाजिक प्रतिष्ठा असणाऱ्यांना फारसी भाषा उत्तम अवगत असणे व ती उत्तम वापरता येणे आवश्यक

असल्याने त्या काळी फारसीमय मराठीला प्रतिष्ठा लाभली असल्यास नवल नाही, कारण जे त्यांचे सांस्कृतिक व भाषिक अनुकरण हे 'जितांच्या' प्रतिष्ठा प्राप्तीस साह्यभूत होत असल्याने 'प्रतिष्ठे'चे लक्षण ठरू शकते. याचा परिणाम म्हणून जेत्यांच्या भाषेतील अनेक शब्दांची त्यांच्या प्रत्ययांसह किंवा प्रत्ययविरहित 'उचल' न कळत किंवा जाणीवपूर्वक जितांच्या भाषेत होत राहते. काही वेळा तर अशा 'उचल' शब्दांचा जास्तीत जास्त वापर हे जित लोक आपल्या प्रतिष्ठाप्रदर्शनाचे लक्षण मानू लागतात. जेत्यांना विरोध करावयाचा असेल तर राजकीय आक्रमणाबरोबर चालत आलेले सांस्कृतिक अथवा भाषिक आक्रमणही हटवले पाहिजे याची जाणीव स्वातंत्र्यप्रेमी व्यक्तीला होते. या जाणिवेला प्रयत्नपूर्वक काही स्वरूप दिले जाते तेव्हा भाषाशुद्धीची चळवळ उभी राहते. अशा चळवळीचे मूळ कितीही घट्ट रोवले तरी सर्वसाधारण माणसाच्या हाडीमांशी खिळलेले शब्द तसेच राहतात व कालांतराने ते जितांना 'आपले, स्वतःचे' शब्द वाटू लागतात. कोणत्यातरी कालखंडात या शब्दांची किंवा शब्दरचनांची नोंद लिखित भाषेकडून घेतली जाते व ते जितांच्या भाषेचे घटक बनून राहतात. विशिष्ट हेतू मनात धरून राजा शिवाजीने भाषाशुद्धीची चळवळ केली तरी फारसी भाषेची मगरमिठी मराठी भाषेला फारशी सोडविता आली नाही.

पेशवेकाळातील उत्तरेकडच्या राजकारणामुळे मराठी भाषेवरील फारसीचा प्रभाव लक्षात घेण्याइतका मोठा राहिला. ही पकड इंग्रजांच्या राजवटीत हळूहळू शिथिल होत गेली परंतु मराठी भाषा इंग्रजीच्या विळख्यात सापडली. दुसरे महायुद्ध, यंत्रयुग, धार्मिक विचारातील क्रांती, शाळाखाते, इत्यादी कारणांमुळे इंग्रजांची पकड हळूहळू घट्टच होत गेली. हिंदू समाजाच्या अस्मितेच्या जागृतीचे एक अंग म्हणून सावरकरांनी भाषाशुद्धीची चळवळ उभी केली. परंतु या चळवळीने संस्कृतनिष्ठ मराठी भाषा टीकास्पद मात्र ठरली. इंग्रजी किंवा फारसी शब्द मराठीत नकोत हे तत्त्व मान्य करूनही त्यांची जागा भरून काढू शकणाऱ्या संस्कृत शब्दांना स्वीकारून संस्कृत भाषेचे प्रभुत्व मानणे म्हणजे ब्राह्मण वर्गाच्या प्रतिष्ठेला मान्यता, असा अन्वयार्थ लावला जाऊन समाजातील जातीयवादाच्या वृत्तींतून विरोध केला गेला. काही वेळा तर या भाषाशुद्धीविषयक चळवळीची टर उडवली गेलेली दिसून येते. इंग्रजी किंवा फारसी शब्दांच्या जागी मराठी शब्दांच्या अभावी किंवा संस्कृतच्या घटनाविषयक ताकतीमुळे स्वीकारलेले पर्यायही अमान्य केले गेले. या संस्कृत विरोधाची धार स्वातंत्र्यप्राप्तीनंतर मुळातच वाढली परंतु सन १९६२ मध्ये संयुक्त महाराष्ट्राची स्थापना झाल्यानंतर ती आणखीच तीव्र झाली.

राज्यकारभाराची भाषा व शिक्षणाचे माध्यम म्हणून मराठीचा महाराष्ट्रात सर्व थरांवर वापर सुरू झाल्यावर विविध शास्त्रे मराठीतून लिहिण्यासाठी व राज्यकारभार मराठीतून चालविण्यासाठी पूर्वीच्या इंग्रजीच्या वापराऐवजी मराठी भाषेचा वापर करताना अनेक इंग्रजी शब्दांना पर्यायी शब्द शोधण्याची गरज निर्माण झाली. हे काम

करताना जेथे मराठी शब्द नसेल तेथे मराठी भाषेची संस्कृत-कुलोद्भवता लक्षात घेऊन संस्कृत शब्द शोधण्याचे प्रयत्न झाले. इंग्रजीच्या उच्चाटनाच्या प्रयत्नात पुन्हा एकदा मराठीचे संस्कृतीकरण अस्तित्वात येऊ लागले. त्याचा परिणाम मराठीचे प्रमाणस्वरूप ठरविताना ' सु-संस्कृत ' मराठी प्रमाण मानावयाची की ' अ-संस्कृत ' मराठीला प्रामाण्य द्यावयाचे हा प्रश्न, ' भाषिक अभ्यासाच्या ' किंवा ' भाषाशास्त्रीय ' निकषांच्या आधाराने न सोडविता ' सामाजिक ' निकषांनी सोडविण्यात दिसून येत आहे. मराठीच्या प्रामाण्याला ' सामाजिक ' किंवा ' राजकीय ' प्रतिष्ठा बाळगणारे संस्कृत भाषेसंबंधी अज्ञान असणारे किंवा संस्कृतचे ज्ञान असूनही ती परंपरेने ब्राह्मण या जातीने जपली म्हणून ' राग ' असणारे प्रतिष्ठित मराठीच्या विशिष्ट बोलीला प्रामाण्य प्राप्त व्हावे असा सामाजिक किंवा राजकीय कारणांनी प्रयत्न करताना दिसत आहेत. ही मराठीची एक प्रकारची ' भाषांतर्गत ' भाषाशुद्धीचीच चळवळ आहे असे म्हणण्यास हरकत नाही. ' पाणी ' व ' पानी ' दोन्ही शब्द लिखित भाषेने मान्य करावे, किंवा त्यांपैकी फक्त ' पानी ' किंवा ' पाणी ' असा एकच शब्द मान्य करावा यासारख्या अनेक चर्चांमधून मराठीच्या ज्या स्वरूपाला राजाश्रय जसजसा मिळत जाईल तसतसे मराठीला तिच्या प्रकृती व प्रत्यय या दोन्ही अंगांमध्ये नवे प्रामाण्य मिळत जाईल. अनेक विद्वानांना मान्य नसूनही साहित्य महामंडळाचे नियम सरकारमान्य झाल्याने मराठीच्या विशिष्ट स्वरूपाला जसे नवे प्रामाण्य लाभले, तसेच ' संस्कृत नको ' अशी किंवा अशा प्रकारची दुसरी एखादी भाषाशुद्धीची चळवळ विशिष्ट दिशेने गेल्यास, नजीकच्या भविष्यात सध्याचे मराठीचे महामंडळमान्य प्रमाणस्वरूपही बदलल्याशिवाय राहणारच नाही असे म्हणता येणार नाही.

३.३. (४) आढावा :

व्याकरणविषयक लेखांचा उद्देश एखाद्या व्याकरणाने दर्शविलेल्या भाषेच्या स्वरूपाच्या विशिष्ट मुद्द्याबाबत खंडनमंडन करण्यासाठी असतो; या लेखामध्ये विशिष्ट व्याकरणात समाविष्ट न केलेल्या गोष्टींबद्दलही चर्चा आढळते. त्यामुळे या विशिष्ट काळातील व्याकरणविषयक विचारांची दिशाही लक्षात घेता येते. शुद्धलेखन व व्याकरण या गोष्टी भाषेच्या शुद्धाशुद्धत्वाच्या बाबतीत परस्पराश्रयी असतात. व्याकरणाने ज्याला ' शुद्ध ' मानले त्याचे लेखन व्याकरणानुसार ' शुद्ध ' व्हावे लागते व जे लेखन ' शुद्ध ' असते ते लेखन व्याकरणदृष्ट्याही ' शुद्ध ' असणे अभिप्रेत असते. उदा०, सर्कारी हा शब्द व्याकरणदृष्ट्या शुद्ध असला तरी लेखनदृष्ट्या अशुद्ध आहे, तसेच ' जाऊयात ' हा शब्द लेखनदृष्ट्या शुद्ध असला तरी व्याकरणदृष्ट्या अशुद्ध आहे. व्याकरण व लेखन यातील शुद्धत्वाबाबत असणाऱ्या परस्पराश्रयी संबंधामुळे भाषेच्या व्याकरणिक अभ्यासाबरोबरच भाषेच्या लेखनपद्धतीचा विशिष्ट प्रकारे केलेला ऐतिहासिक अभ्यास भाषेच्या प्रामाण्याच्या शोधासाठी आवश्यक ठरतो. शुद्धलेखनाच्या बाबतीत विद्वानांची वैयक्तिक मते, लेखनाचे शास्त्र, व्याकरणाची दिशा व सरकारी आश्रय या गोष्टी एकमेकांवर फार प्रमाणात

परिणामकारक होताना दिसून येत आहेत. भाषेचा स्वतंत्ररीत्या अभ्यास करून आलेले निष्कर्ष, कित्येक शिष्टजनांना मान्य नसूनही, शासकीय धोरणांमुळे सामान्य भाषिकाला अंमलात आणावे लागल्याची उदाहरणे आढळून येत आहेत. भाषेच्या दृष्टीने शासनाची मध्यस्थी काही विद्वानांना अनुकूल तर काहींना प्रतिकूल आढळून आलेली आहे. यादव-कालीन किंवा बहामनीकालीन मराठी अशा प्रकारची मराठीची स्वरूपे मांडताना त्या त्या राजवटीचे भाषेवर प्रभाव जसे आढळून येतात तसे स्वातंत्र्योत्तर काळात राजांची राजवट नसूनही, लोकशाही अस्तित्वात असूनही, प्रभाव पडताना दिसतात. राजाचे शासन असो किंवा समाजाने निवडून दिलेल्या प्रतिष्ठितांचे शासन असो, भाषेच्या स्वरूपावर शासकीय धोरणाचे परिणाम होत राहाताना दिसतात. भाषेच्या बाबतीत परंपरावादी व परिवर्तनवादी शिष्टजन यांच्यातील संघर्ष न संपण्याचीच शक्यता जास्त आढळून येते. कारण परंपरावादी भाषेच्या इतिहासाकडे अधिक नजर ठेवतो तर परिवर्तनवादी भाषेच्या इतिहासापेक्षा वर्तमानाकडे जास्त लक्ष पुरवतो. दोघेही भाषेच्या भविष्यकाळाचा विचार करू शकणार नसतात कारण इतर कोणत्याही गोष्टीच्या भविष्य-काळाप्रमाणे भाषेचा भविष्यकाळही बराचसा धूसर, बराचसा अचिन्त्य असतोच. तरीही काही गोष्टींची शक्यता नजीकच्या भविष्यासाठी वर्तविता येणारच नाही असे नाही. ‘ उद्याच्या काळात स्फोटापेक्षा घर्षकाकडे झुकत जाणारे ‘ फ ’ या वर्णाने दाखवले जाणारे व्यंजन कदाचित केवळ घर्षकच राहील ’ इतपत केवळ काहीशी सूचक विधाने करणे काही वेळा शक्य होते. मात्र अशी विधाने म्हणजे केवळ ‘ मर्यादित अनुभवांवर आधारलेले तर्क ’ असतात हे विसरून चालणार नाही. भाषेचा इतिहास किंवा परंपरा यांना पूर्वीच्या काळात कोठे व किती महत्त्व दिले गेले, ते कितपत योग्य ठरले, भाषा-शुद्धीच्या विचाराने कोणत्या काळी काय साध्य झाले, लेखनपद्धतीत बदल केल्याने भाषेच्या स्वरूपात केव्हा व कसे बदल होत गेले इत्यादी गोष्टी व्याकरणेतर निबंधांच्या अभ्यासातून ‘ प्रामाण्य ’ ठरविताना विशिष्ट प्रमाणात मार्गदर्शक होत आहेत.

३.४. मराठीचे प्रामाण्य :

मराठी भाषेची व्याकरणे व मराठीचा भाषिक अभ्यास यांचा इतिहास पाहताना एक प्रमुख गोष्ट लक्षात येते, ती म्हणजे इंग्रजी व्याकरणाचा मराठी व्याकरणांवर झालेला परिणाम. याचे प्रमुख कारण म्हणजे मराठी व्याकरणे लिहिण्यामागे असलेला उद्देश, प्रथम इंग्रजी भाषिकांना मराठी व मराठी भाषिकांना इंग्रजी असा भाषा शिकणे किंवा शिकवणे असा होता. यासाठी मराठी भाषेची इंग्रजीशी तुलना इंग्रजी भाषेच्या तयार व्याकरणाच्या माध्यमातून झाली. हा तुलनात्मक पाया जेथपर्यंत दोन भाषांच्या व्याकरणात साम्य होते तेथपर्यंत सहज स्वीकारण्याजोगा राहिला, जेथे जेथे भेद होते तेथे तेथे चर्चिला गेला. परंतु भेद असूनही जेव्हा भाषेच्या वर्तनाच्या स्पष्टीकरणासाठी जेथे आड आला नाही तेव्हा तेथे लक्षातही आला नाही. आजसुद्धा शब्दयोगी अव्ययांचे

वर्तन प्रत्ययांसारखे असूनही त्यांना ' शब्दयोगी अव्यय ' या शब्दांच्या जातीत अथवा प्रकृति-प्रकारात गणले जात आहे यावरून इंग्रजी व्याकरणातील ' Prepositions ' या शब्दाच्या जातीची मराठी व्याकरणावर पकड किती घट्ट असेल हे लक्षात येईल. भाषा शिकत असताना मनुष्य न कळत आपल्या भाषेच्या संदर्भात शिकत असतो यामुळे ' मी जात आहे ' या वाक्यातील ' जात आहे ' ही शब्दरचना आपल्या ' Present imperfect ' प्रमाणे आहे असे इंग्रजी भाषिकाने समजणे सहज शक्य आहे. इंग्रजी जाणकाराने एकदा अशा प्रकारचा,' जात आहे ' या मराठी रचनेला Present imperfect ' चा शिक्का दिला की मराठीचा भाषाभ्यासक ' जात आहे ' याला Present imperfect construction ' म्हणून रिकामा होतो, भाषा शिकताना किंवा शिकवताना त्यामुळे सोय होत असली तरी मराठीच्या ' काळांकडे ' पाहण्याची एक विशिष्ट दिशा व्याकरणकाराला लागून जाते व मराठी व्याकरणात इंग्रजी काळांच्या पद्धतीवर धातूंचे काळ वर्णन केले जाऊ लागतात. इंग्रजी व्याकरणांच्या अस्तित्वामुळे व इंग्रजी-मराठी तुलनात्मक भाषाभ्यासामुळे वास्तविक पाहता मराठीच्या व्याकरणाचे स्वरूप स्वतंत्रपणे मांडले जायला पाहिजे होते. परंतु इंग्रजी ही जेत्यांची भाषा, इंग्रजी म्हणजे वाघिणीचे दूध, विज्ञानाची ओळख करून देण्यास प्रभावी ठरलेली इंग्रजी भाषा, अल्पश्रमात त्या काळी सामाजिक प्रतिष्ठा प्राप्त करून देणारी इंग्रजी भाषा, असे इंग्रजी भाषेबद्दलचे इंग्रज अमदानीच्या सुरुवातीस दृष्टिकोन असल्याने मराठी भाषेच्या व्याकरणावर इंग्रजी भाषेच्या व्याकरणाची जी चौकट बसली ती आजतागायत.

मराठी भाषेच्या भाषिक अभ्यासामधून दृष्टोत्पत्तीस येणारी दुसरी गोष्ट म्हणजे या अभ्यासाचे एक प्रमुख प्रयोजन ' शाळाखात्यास उपयोग ' हे होते. मराठी भाषा शिकण्यासाठी प्रथम इंग्रजीतून व्याकरणे प्रसिद्ध झाली. नंतर मराठी भाषा शिकण्यासाठी मराठीची मराठीतून व्याकरणे प्रसिद्ध झाली. ही व्याकरणे ज्यांनी लिहिली त्या व्यक्ती पुणे भागातील रहिवासी असल्याने पुण्यातील शिष्टजनांची भाषा या व्याकरणासाठी ' प्रमाणभूत ' किंवा ' पायाभूत ' धरली गेली. पुणे व मुंबई येथे प्रथम सरकारी शाळा सुरू झाल्या व त्यांच्या पाठोपाठ खाजगी शाळाही उघडल्या गेल्या. महाराष्ट्रातील इतर गावांपेक्षा पुणे व मुंबई येथे शैक्षणिक सोयी त्वरेने व उत्तम दर्जाने उपलब्ध होऊन शालेय व महाविद्यालयीन शिक्षणाची पायाभरणी झाली. मुंबईला अनेक प्रांतांची व अनेक जातींची माणसे रहात असल्याने तेथील मराठी संमिश्र स्वरूपाचे समजले जाऊन पुण्याच्या भाषेला प्राधान्य मिळाले. शिक्षणावरच ब्राह्मणजातीचा उदरभरणाचा प्रपंच बराचसा आधारलेला असल्याने व शिवाय ' शिकणे ' या क्रियेसाठी कष्ट घेण्याची या वर्गाला शारीरिक सवय असल्याने शाळाखाते चालू होताच त्याचा फायदा ब्राह्मणवर्गाने अधिक घेतला. हे ब्राह्मण लोक इंग्रजी व संस्कृत जाणणारे असल्याने व त्यांना परंपरा-प्राप्त मराठी लेखनवाचनाची सवय असल्याने त्यांनी आपल्याला मान्य अशा मराठीचे स्वरूप व्याकरणात विवरण केले. ब्राह्मण लोकांना जुन्या मराठी वाचनाचा संपर्क असल्याने

परंपराप्राप्त लिखित मराठी, संस्कृत भाषेच्या मदतीने जोपासून त्यांनी वाढविली. तिलाच कालांतराने ' ब्राह्मणी मराठी ' या संज्ञेने कधी सत्यदर्शक वृत्तीने तर कधी तिरस्काराने संबोधले जाऊ लागले.

शाळाखात्याच्या स्थापनेबरोबर जी मराठी ' प्रमाण ' स्वरूपाने वावरू लागली ती बहुशः ब्राह्मणवर्गाकडून लिहिली गेल्याने, व ब्राह्मणवर्गाचा संस्कृतशी परिचय असल्याने संस्कृतातील शब्दांची उचल करून ती समृद्ध झाल्याने पुढील काळात ' मराठीतील संस्कृत ' हा प्रदीर्घ चर्चेचा विषय होऊन बसला. मराठीमधील संस्कृतच्या वापरावर टीका करणाऱ्या मंडळींकडून ' संस्कृतचे आक्रमण ' या विषयावरोबरच समाजजीवनाशी निगडित ' ब्राह्मण ब्राह्मणेतर ' वाद भाषेमध्ये शिरला. यांमधून मराठीचे संस्कृतशी नाते किंवा संस्कृत भाषेच्या निकषावर मराठीच्या व्याकरणासंबंधींचे निर्णय घेणे याचा अर्थ ' परंपरावादी ' बनणे असा होऊ लागला. मराठी संस्कृत नातेसंबंधाच्या सुस्पष्ट रेषा आजही ठरल्या जाऊ शकत नाहीत यावरून मराठीच्या व्याकरणकाळापासून आजपर्यंत अस्तित्वात असणाऱ्या वादाचे स्वरूप लक्षात येईल.

सन १८६३ मध्ये दक्षिणा प्राइज कमिटीच्या वतीने विशिष्ट पद्धतीने लिहिलेल्या व्याकरणाची जाहिरात दिली गेली, त्यामध्ये ' इंग्रजीच्या धर्तीवर ' व्याकरण असावे अशी स्पष्ट सूचना होती. यावरून इंग्रजीचा तत्कालीन प्रभाव व्यक्त होतोच. याच सुमारास एका नियतकालिकात प्रसिद्ध झालेल्या लेखात[1] ' जीत अनेक शास्त्रांविषयी जगन्मान्य ग्रंथ आहेत....इत्यादी ' भाषेसंबंधी विचार मांडले गेले. यातून अनेक शास्त्रांचे ज्ञान देणाऱ्या भाषेसंबंधी, ती श्रेष्ठ असल्याचे तत्कालीन विद्वानांना वाटत असल्याचे दिसून येते. इंग्रजीशिवाय दुसरी श्रेष्ठ भाषा त्या काळी संस्कृतच होती. त्या काळी अनेक विषयांचे ज्ञान संस्कृतमधून उपलब्ध असल्याने संस्कृतच्या जाणकाराला मोठी प्रतिष्ठा होती. हा वर्ग बहुशः ब्राह्मण होता, यामुळे त्याच्या भाषेला आपोआपच प्राधान्य मिळाले. सुशिक्षित विचारवंत प्रामुख्याने पुणे-मुंबई सारख्या शहरी मोठ्या संख्येने असल्याने, ही शहरे शासनाची प्रमुख ठिकाणे असल्याने प्रमाणभाषेचा किंवा शिष्टमान्य भाषेचा वापर महाराष्ट्रात किंवा मराठी भाषिक समाजात सर्वांत अधिक असण्याची शक्यता होती. यात मुंबईची भाषा ' नकल ' करण्याच्या दुर्गुणामुळे धड मराठी नव्हे व धड इंग्रजी नव्हे अशी होत असल्याने पुण्याच्या भाषेला प्रामाण्य मिळाले. संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनेनंतर ' पुणेरी भाषे 'च्या प्रामाण्याचा निकष असण्याबद्दल मतभेद सुरू झाले, त्यात या मराठी भाषेची वैशिष्ट्ये—ब्राह्मणांनी जोपासलेली असणे, पुणे प्रांतींची असणे व संस्कृतनिष्ठता—ही प्रामुख्याने आजतागायत वादविषय झालेली आढळून येतात.

---

१. पहा—जीत शब्द भरणा फार आहे, जिची प्रौढी, सुरसता, शब्दलालित्य व अर्थगांभीर्य मोठी आहेत व जी चालू आहे अशा इंग्रजीला भाषा म्हणावे—जोगळेकर, पृ. २२.

पारमार्थिक कल्याण साधणारे, साधुसंतांनी लिहिलेले अनेक ग्रंथ सन १८०५ पूर्वीच्या काळी उपलब्ध होते. त्यांची भाषा राजदरबारी वापरल्या जाणाऱ्या भाषेहून भिन्न होती. या ग्रंथांचे लेखक सर्व जातीजमातींचे असून ग्रंथात वर्णिलेली अनुभूती किंवा विचार त्यांचे स्वतःचे होते. त्यातील काहींना संस्कृत भाषा अवगत होती तर काहींना नव्हती. परंतु आध्यात्मिक विचारपरंपरा संस्कृत भाषेतून परंपरागत वारसा हक्काने मराठी समाजाला प्राप्त झालेली असल्याने त्यातील विविध कल्पना किंवा विचार व्यक्त करणाऱ्या शब्दांचे संस्कृत शब्दांशी तत्सम भावाने किंवा तद्‌भव भावाने साधर्म्य असणे स्वाभाविक होते. ज्या शास्त्री पंडितांनी मराठी भाषेचे व्याकरण लिहिले त्यांना वरील ग्रंथांचे ज्ञान असणे अपेक्षित आहे कारण त्याकाळी घराघरांतून धार्मिक ग्रंथ-पठणाची पद्धती होती तसेच देवळादेवळातून पुराण, कथा, कीर्तने चालत असण्याची पद्धती होती. तसेच वरील मंडळींचा पेशवाईच्या काळातील शाहिरी वाङ्मयाशी परिचय नसेलच असे म्हणवत नाही. वरील सर्व परिस्थितीचा विचार करता करता, शास्त्री पंडितांनी सर्वसामान्य व्यक्तींना अवगत नसलेल्या, संस्कृतप्रचुर भाषेचा आपल्या व्याकरणासाठी उपयोग केला किंवा ब्राह्मणांनी आपल्या भाषेचे व्याकरण लिहून ती बहुजन समाजाला वापरावयाला लावली अशा प्रकारची जी विधाने केली गेली किंवा केली जातात ती वस्तुस्थितीला धरून कितपत आहेत याचाही फेरविचार केला पाहिजे.

मराठी व्याकरण निर्मितीच्या सुरुवातीच्या काळात शाळांमधून जी मुले शिकली त्यांनाही ज्या भाषेतून क्रमिक पुस्तके लिहिली ती भाषा समजत नसेल असे म्हणवत नाही. मराठी भाषेच्या नैसर्गिक रीत्या असणाऱ्या संस्कृतप्रचुर किंवा संस्कृतनिष्ठ स्वभावावर मात्र तत्कालीन परिस्थितीच्या संदर्भाचा विचार न करता आक्षेप घेतलेले दिसून येतात, व आजही पारिभाषिक शब्दांच्या संदर्भात मराठीच्या संस्कृतच्या गुलामीबद्दलची जी टीका केली जाते तिचा तत्कालीन समाजजीवनाच्या व वाङ्मयाच्या संदर्भात जसा विचार होणे आवश्यक आहे तसाच 'इंग्रजी नको, मराठीत तर नाही, मग पर्याय काय ?' या दृष्टीतूनही होणे जरुरीचे आहे. मराठी भाषा जर संस्कृतोत्पन्न नसती, मराठी भाषेत शास्त्रीय विषयांचे ग्रंथ भरपूर उपलब्ध असते तर इंग्रजी राजवटीत विज्ञानविषय मराठी भाषेतून समाजापर्यंत पोचविताना मराठीमध्ये संस्कृत शब्दांची जी भर घालावी लागली ती घालावी लागली नसती. पर्यायाने आज ज्यावर टीका होते ते मराठीचे 'संस्कृतीकरण' त्या काळीही घडलेच नसते.

आधुनिक भाषाशास्त्राचा मराठीच्या अभ्यासासाठी वापर होण्याच्या पूर्वीच्या काळीही म्हणजे सुमारे सन १९४० पूर्वीही तर्खडकर, जोशी, दामले इत्यादी भाषाभ्यासकांनी भाषेतील भिन्न भिन्न प्रकारची शब्दसंपदा, उच्चारभिन्नता किंवा प्रत्ययभिन्नता लक्षात घेतलेली आहे. तरीसुद्धा तर्खडकरांना 'भाषेच्या विविधतेतून एकता शोधावी, तिचे निश्चित असे एक रूप असावे व त्या रूपाचा आदर्श लोकांसमोर ठेवावा' ही गरज वाटली. आपल्या प्रत्येक आवृत्तीच्या वेळी त्यांनी भाषेतील परिवर्तने लक्षात घेऊन

' विविधतेतील एकता ' राखण्याची वृत्ती कायम ठेवूनही आवश्यक तेथे बदलही केले, ही गोष्ट लक्षात घेण्याजोगी आहे. दामले यांनी ' भाषाभेद जेव्हा सहज दिसण्याइतक उत्कट होतो तेव्हा त्या भाषेच्या व्याकरणातही बदल होतो ' असे सांगून ' सूक्ष्म रूपांतरास मात्र नसते महत्त्व देऊ नये ' असे सुचविले व आपल्या व्याकरणात प्रचलित शिष्ट व नागरिक मराठीच्या गद्य स्वरूपाचाच विचार केला असल्याचे स्पष्टपणे सांगितले. वरील इतिहासावरून शिष्ट व नागरिक[1] लोकांना मान्य असे मराठी किंवा मराठीचे एक निश्चित व नियामक स्वरूप ग्रंथलेखनास वापरावे असे मत दादोबांपासून दामले यांच्या काळापर्यंत व्यक्त केलेले दिसून येत आहे.

दामले यांनी मान्य केलेली व व्याकरणाद्वारे स्पष्ट केलेली मराठी भाषा शुद्ध-लेखनासंबंधीच्या विविध विचारांनी बदलते स्वरूप घेत घेत, आज सरकारी मान्यता लाभलेल्या साहित्यमहामंडळाच्या नियमांनी लिहिलेली ती शुद्ध व ते नियम नसतील तर अशुद्ध समजली जाण्याच्या स्थितीला प्राप्त झाली आहे. सरकारमान्य शुद्धलेखन नियमांच्या काही क्षेत्रांत मराठीच्या अभ्यासकांना अशास्त्रीयता जाणवत असल्याने, दामले यांच्या वेळच्या व आजच्या समाजजीवनात बदल घडलेला असल्याने, जातीय व पक्षीय अस्मिता जागी झाल्याने, वैयक्तिक अभिनिवेश वाढल्याने, समाजातील व्यक्तिव्यक्तींच्या संपर्काची क्षेत्रे विस्तृत झाल्याने, सरकारमान्य प्रमाणभाषेपेक्षा वेगळ्या वळणाची शिष्ट-मान्य लिखितभाषा आज पुष्कळ प्रमाणात वापरली जात आहे. दादोबांनी व्यक्त केलेला ' विविधतेतील एकता ' हा दृष्टिकोन आज सर्वमान्य होत नसल्याने, तशी एकता आव-श्यक आहे काय या मूलभूत प्रश्नाच्या विचाराबरोबरच, मराठीच्या प्रमाणभाषेचे नक्की स्वरूप कसे ठरवावे, कसे मांडावे, यांचाही विचार करणे जरुरीचे ठरत आहे.

* * *

१. पहा—' नागरिक ' – ' प्राचीन भारतीय साहित्य मीमांसा ' या अशोक रा. केळकर यांच्या ' परामर्श ' मधील लेखामध्ये.

४
आजच्या काळातील मराठीच्या प्रामाण्याचा प्रश्न

४.१. प्रास्ताविक :

व्याकरणकार दामले यांच्या व्याकरणाने त्यांच्या काळातील प्रमाण मराठीचे स्वरूप मांडले गेले. त्यानंतर मराठीच्या लिखित स्वरूपात भाषेच्या परिवर्तनशीलतेमुळे जसा बदल पडला तसाच स्वातंत्र्यप्राप्ती व भाषावार प्रांतरचना या दोन राजकीय घडामोडींमुळे पडला. शाळाखात्याचा खेडोपाडी प्रसार, शैक्षणिक पात्रतेवर पोटापाण्याची सोयं सुखकारकपणे होण्याची शक्यता, दळणवळणाची वेगवान साधने असल्याने संपर्काच्या मोठ्या क्षेत्राची उपलब्धी, धार्मिक वाङ्मयाच्या जोडीने ललित व शास्त्रीय वाङ्मयाची निर्मिती, आकाशवाणी व दूरदर्शन यांसारखी प्रचाराची साधने, मतदानाच्या हक्कामुळे मिळणाऱ्या वैयक्तिक स्वातंत्र्याची जाणीव, यंत्रयुगामुळे बदललेली कुटुंबव्यवस्था, सिनेमांचा वाढता प्रभाव, नाटक-तमाशे यांना मिळणारे उत्तेजन, व यांच्यापेक्षाही अधिक महत्त्वाची गोष्ट म्हणजे वाढलेली लोकसंख्या, या सर्वच गोष्टींनी झालेल्या सामाजिक परिवर्तनामुळे भाषिक दळणवळणाची घनता वाढली. याचे परिणाम मराठी भाषेच्या एकूण ' हालचाली 'वर जसे झाले तसेच बदलत्या राजकीय जीवनामुळेही झाले. ' राजा बोले, दळ हाले ' अशी प्रवृत्ती असणाऱ्या मराठी माणसाला राजेशाही जाऊन जेव्हा लोकशाही प्राप्त झाली तेव्हा त्याच्या ज्या प्रतिक्रिया विविध क्षेत्रात उमटल्या त्याचे पडसाद भाषेसंबंधीच्या विचारातही उमटले. त्यामध्यें विशिष्ट अभिनिवेश किंवा आग्रह वाढणें, भाषेकडे वैयक्तिक दृष्टिकोनातून पाहणे इत्यादी गोष्टीही झाल्या. या बदलत्या राजकीय जीवनाचे पडसाद, ' ब्राह्मणांनी आपली भाषा आमच्यावर लादली, तिचे उच्चाटन झाले पाहिजे, ' ' मराठा लोक राज्यकारभार चालविणार, त्यांचीच भाषा इतरांनी वापरली पाहिजे.' ' अस्पृश्यांचा तिरस्कार आता सहन केला जाणार नाही, त्यांची भाषाही कमी दर्जाची नाही, ' ' इतउप्पर संस्कृत भाषेचे प्रभुत्व आम्ही सहन करणार नाही ', इत्यादी स्वरूपाच्या मतप्रदर्शनांमधून उमटू लागले. त्यामुळे समाजजीवनातील ब्राह्मण-ब्राह्मणेतर वाद, स्पृश्य-अस्पृश्य वाद, शोषक शोषित वाद, उच्चवर्णीय-नीचवर्णीय वाद, ग्रामीण-शहरी समाजातील वाद, सुस्थित-दलित समाजातील तेढ, इत्यादी अनेक धुमारे मराठी भाषाविषयक विचारात शिरले. भाषेच्या स्वरूपाचा विचार काही वेळा तर वैयक्तिक थरावर आणला गेला. अनेक वेळा व्यक्तिगत भाषा

' प्रतिष्ठेचे ' रूप घेऊन भाषेत उतरू लागली तर काही वेळा अशा भाषेने दामले-प्रमाणीत भाषेचा काहीसा तिरस्कार करण्याची वृत्तीही दिसून येऊ लागली. त्यातच शासनाने मराठी भाषेला राजभाषेचे स्थान दिले. त्यामुळे मराठीच्या प्रमाणभाषेला जरी वेगळी प्रतिष्ठा लाभली तरी, मराठी-भाषा-विषयक वैयक्तिक विचार ' इंग्रजाळलेले मराठी ', ' संस्कृतचे आक्रमण झालेले मराठी ', ' मराठीवरील हिंदी भाषेचा प्रभाव ', ' तळातल्या लोकांची भाषा म्हणजेच खरी मराठी ' इत्यादी उद्‌गारांतून बाहेर पडू लागले. मराठी भाषेला स्वतःच्या मार्गाने जाता जाता वरील प्रकारच्या ' कृत्रिम ' परिवर्तनांतून जावे लागण्याची परिस्थिती निर्माण झाली.

महाराष्ट्र शासनाने मराठी भाषेला राजभाषा म्हणून केवळ जाहीर केले असते तरी मराठी भाषेच्या प्रामाण्याची फारशी चिकित्सा झाली नसती. परंतु शासनाने ' भाषा सल्लागार मंडळा 'ची स्थापना करून त्या मंडळाने मान्य केलेल्या भाषेला जणू काही विशिष्ट ' प्रतिष्ठा ' प्राप्त करून दिली. त्याची प्रतिक्रिया उमटत असतानाच साहित्य महामंडळाने मान्य केलेल्या लेखनविषयक नियमांचा वापर शासनाने आवश्यक केल्याने, भाषाविषयक विचारात अनेक आवर्ते निर्माण झाली. अनुकूल-प्रतिकूल शास्त्रीय चिकित्सांबरोबरच विविध सामाजिक थरांतील व्यक्तींकडून व्यक्तिसापेक्ष विधानेही प्रकट केली जाऊ लागली.

मराठी समाजाच्या बदलत्या राजकीय व सामाजिक जीवनाचा भाषा-विचारावर जसा परिणाम झाला तसा अलीकडील काळात, विशेषतः सन १९५० नंतर, डेक्कन कॉलेज, पुणे, या संस्थेने चालविलेल्या भाषाभ्यासविषयक अभ्याससत्रांमुळे सन १९५५ पासून प्रामुख्याने, पाश्चात्य भाषाशास्त्राशी मराठीच्या अभ्यासकांचा जो परिचय झाला त्यामुळे मिळालेल्या भाषेकडे पाहण्याच्या वेगळ्या दृष्टिकोनांमुळेही परिणाम झाला. व्याकरणे आदेशात्मक असावीत की नसावीत यासंबंधी विविध कल्पना प्रसृत झाल्या. ऐतिहासिक भाषाशास्त्र, बोली भाषांचे स्वरूप, भाषेचे प्रामाण्य, व्याकरणाचे कार्य, भाषेतील शुद्धाशुद्धतेचे निकष, भाषेच्या उच्चारणाच्या पद्धती, भाषा आणि लेखन, ध्वन्यनुसारी लेखन, ध्वनिकुले, रूपकुले या कल्पना इत्यादी भाषाविषयक अनेक क्षेत्रांत विचार करण्यास उद्युक्त करणारे अनेक नवे दृष्टिकोन अनेक भाषिक विचारवंतांना मिळाले. या सर्व विचारांचा एक चांगला परिणाम असा झाला की भाषा ही कोणा एका व्यक्तीच्या मालकीची असत नाही. ती सर्व समाजाची असते, किंवा भाषेचे ' नियमन ' करावयाचे म्हटले तरी ते तसे सोपे नसते, इत्यादी गोष्टी स्पष्ट झाल्या. पण त्यातून पुन्हा भाषेच्या स्वरूपाबाबत ' व्यक्तिगत निकषांचे ' महत्त्व अधिक वाढले. भाषेच्या प्रामाण्यासंबंधीच्या या गोंधळाच्या अवस्थेने भाषेचे शिष्टमान्य स्वरूप स्पष्ट करणारे व्याकरण, भाषेची लेखनपद्धती, शब्दांचे कोश इत्यादी भाषेशी संबंधित अशा गोष्टींच्या पुनर्विचाराची वेळ निर्माण केली आहे.

४.२. वर्तमानपत्रे व मराठीचे प्रामाण्य :

सन १९६२ मध्ये महाराष्ट्रातील व बृहन्महाराष्ट्रातील अनेक मराठी साहित्य संस्थांचे एकत्रीकरण झाले व साहित्यमहामंडळाची स्थापना झाली. या मंडळाने दामले यांच्या व त्यानंतरच्या काळातील मराठीच्या लेखनपद्धतीमध्ये सुधारणा सुचविल्या व विशिष्ट प्रकारचे लेखन 'प्रमाण' ठरविले. या लेखनपद्धतीला महाराष्ट्र सरकारच्या परिपत्रकाने मान्यता मिळून 'शासकीय प्रामाण्याचा' निकष मिळाला. हे प्रामाण्य मराठीच्या सर्व 'प्रतिष्ठितांना' मान्य होणारे नसल्याने मराठीची 'सरकारी', 'ग्रामीण', 'शहरी', 'जुन्या प्रतिष्ठितांची', 'लेखकांची व्यक्तिगत' इत्यादी अनेक रूपे मुद्रित स्वरूपात समाजापुढे आली. या विविधरूपी मराठीसंबंधीचे वर्तमानपत्रातून जे पडसाद उमटले त्यांचा मागोवा घेतल्यास भाषिक प्रतिष्ठितांच्या विचारांची दिशा लक्षात घेता येईल यासाठी प्रातिनिधिक म्हणून 'सकाळ' व 'महाराष्ट्र टाइम्स'चे सन १९७९ चे अंक निवडले.[१] सन १९७९ हे वर्ष 'राजभाषा वर्ष' म्हणून जाहीर झाल्याने प्रामाण्यासंबंधीच्या चर्चा या अवधीत अधिक प्रमाणात अपेक्षित होत्या. 'सकाळ' हे पोरांपासून थोरापर्यंत वाचले जाणारे, सर्वांना समजले पाहिजे हा हेतू प्रधान ठेवून चालविले गेलेले, भरपूर खपाचे वर्तमानपत्र आहे. तर 'महाराष्ट्र टाइम्स' हे बहुशः सुशिक्षित वर्गाच्या आवडीचे, काहीशी प्रौढ भाषा असणारे वर्तमानपत्र आहे. या गोष्टी वरील वर्तमानपत्रे निवडताना लक्षात घेतल्या.

ह्या दोन वर्तमानपत्रांचा उपयोग भाषेचें प्रामाण्य शोधण्याच्या दृष्टीने त्यातील लेखांचा परामर्श घेण्यासाठी जसा करून घेतला तसाच प्रस्तुत लेखिकेच्या स्वतःच्या मराठीपेक्षा 'वेगळेपणा' दाखवणाऱ्या रूपांच्या, रचनांच्या अस्तित्वाची दखल घेण्यासाठीही केला आहे.

जनसंपर्काच्या दृष्टीने पाहता वर्तमानपत्रे समाजाच्या फार मोठ्या क्षेत्रात पोचली जातात. आपल्या वर्तमानपत्रांच्या खपाची व्यावहारिक दृष्टी वर्तमानपत्रकारांना लक्षात ठेवावी लागते. त्याबरोबरच वर्तमानपत्र हे सामाजिक प्रबोधनाचे, राजकीय क्षेत्रात दबाव आणण्याचे, सरकारी कामकाजावर साधकबाधक टीका करण्याचे प्रमुख शस्त्र आहे याचीही जाण त्यांना ठेवावी लागते. त्यामुळे वर्तमानपत्रांत सर्व समाजाला सारखी समजेल अशी किंवा सर्व समाजाला बहुतांशी समजू शकेल अशी भाषा वापरणे जरुरीचे असते. या दृष्टीने वर्तमानपत्राच्या प्रसाराचे क्षेत्र जितके व्यापक तितकी अधिकाधिक मान्य भाषा त्यात वापरली जाण्याची शक्यता राहते. जाहिराती, मनोवेधक लिखाण व बातम्या यांना वर्तमानपत्रात महत्त्वाचे स्थान असते. कशा भाषेत काय लिहिले असता आपल्या वर्तमानपत्राच्या धोरणानुसार आपले म्हणणे प्रभावीपणे मांडता येईल याचाही

१. प्रस्तुत प्रबंध स्पर्धेसाठी लिहिला जात असल्याने व त्यासाठी डिसेंबर १९७८ मध्ये स्पर्धा जाहीर झाल्याने, विशिष्ट कालमर्यादेने कालखंड मर्यादित झाला.

दृष्टिकोन वर्तमानपत्रात राखावा लागतो. हे सर्व लक्षात घेता प्रमाणभाषेच्या स्वरूपाचा एक ' वापर ' म्हणून वर्तमानपत्रांचा उपयोग करून घेता येतो. तसेच ताज्यातल्या ताज्या घडामोडींची नोंद वर्तमानपत्रे जास्तीत जास्त ताजेपणाने करतात. या त्यांच्या प्रयत्नातून जास्तीत जास्त चालू काळाची म्हणजे ' आज 'ची भाषा अतिशय ताजेपणाने त्यात पाहायला सापडते. त्याशिवाय अनेक विचारवंत आपले विचार, समाजाच्या मोठ्या क्षेत्रात पोचावेत म्हणून वर्तमानपत्रांचा आधार घेतात. हा विचारवंतांचा वर्ग समाजातील प्रतिष्ठितांच्या वर्गात मोडणारा असतो. त्यांची भाषा त्यांच्या लेखांच्या माध्यमातून पाहण्याची संधी वर्तमानपत्रातून उपलब्ध होऊ शकते. हे लेखन म्हणजे प्रचलित वाङ्मयीन भाषेचा एक नमुना म्हणून मानायला हरकत नाही. सर्वसामान्य व्यक्तीपर्यंत सहजपणे पोचू शकणारी आणि विद्वानांच्या अभिव्यक्तीचे साधन होऊ शकणारी वर्तमानपत्रे, मराठीच्या वर्तमानकाळातील प्रामाण्याचा शोध-आधार म्हणून उपयोगी ठरू शकतात, म्हणून येथे विचारात घेतलेली आहेत.

१० जून १९७९ च्या ' केसरीत ' अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे अध्यक्ष श्री. नारायण गजानन आठवले ऊर्फ अनिरुद्ध पुनर्वसु, यांच्या भाषणाचा संक्षेप दिलेला आहे. त्यात त्यांनी, ' मराठी वृत्तपत्रांनी लोकशिक्षणाबरोबरच भाषा-शिक्षणाचे काम केले आहे. मराठी पत्रकारांनी मराठीची परिभाषा निश्चित करण्यास सहभागी व्हायला हवे....मराठी पत्रकारांनी या दृष्टीने परिभाषेच्या प्रश्नात लक्ष घातले तर काहींच्या मनात या परिभाषेच्या रूपाने ब्राह्मणी मराठी लोकांवर लादली जात असल्याचे जे भय आहे तेही दूर होऊ शकेल, ' अशी भाषेच्या जीवनातील वर्तमानपत्रांच्या कार्याची दिशा व्यक्त केली आहे. वर्तमानपत्रे लोकशिक्षणाबरोबरच भाषेचे शिक्षण आपोआप देतात. आपल्याला अभिप्रेत अर्थ व्यक्त करण्यासाठी सुयोग्य भाषा पत्रकाराला वर्तमानपत्रात वापरावी लागते, त्यामुळे अशा भाषेचे एक स्वरूप म्हणून वर्तमानपत्रांकडे पाहणे, प्रमाणभाषेच्या अभ्यासाच्या संदर्भात, आवश्यकच ठरते.

४.३. वर्तमानपत्रीय भाषाविचार :

सन १९७९ च्या ' सकाळ ' व ' महाराष्ट्र टाइम्स ' या वर्तमानपत्रांत राजभाषा वर्ष व मराठी भाषा, मराठीचे मराठीपण, सोपे आणि अवघड मराठी, मराठीवरील इंग्रजी, संस्कृत किंवा हिंदीचा प्रभाव, पारिभाषिक शब्द, मराठी भाषेचा वापर व विकास, ग्रामीण व दलित साहित्यातील मराठी, ब्राह्मणी व अब्राह्मणी मराठी, विशिष्ट शब्दांवरील चर्चा, कोकणी भाषा, काही शब्दांचा ऐतिहासिक दृष्ट्या अभ्यास, वगैरे अनेक विषयांसंबंधी लेखकांनी किंवा पत्रलेखकांनी आपले विचार व्यक्त केले आहेत. तसेच पत्रकारांनी काही शब्दप्रयोग जाणूनबुजून केलेले आढळून येत आहेत. या सर्वांचा विचार, मराठीत भाषेच्या प्रमाणस्वरूपाची चिकित्सा करताना, केला असता वरील अनेकविध विषयांपैकी अभ्यासिण्याजोगे विषय पुढीलप्रमाणे दिसून येतात.

(अ) परिभाषा
(ब) मराठीचे शब्दभांडार
(क) व्याकरणिक – व्याकरण व लेखनविषयक काही बाबी.

४.३. (अ) परिभाषा :

शासनाने राज्यकारभाराची भाषा म्हणून मराठीचा स्वीकार करावयाचा ठरल्यानंतर आतापर्यंत इंग्रजीतून चाललेला व्यवहार मराठीत कशा प्रकारे करता येईल हा प्रश्न उपस्थित झाला. तो सोडविण्यासाठी या काळापर्यंत जवळजवळ चेतनाशून्य झालेल्या, विस्मरणात गेलेल्या, शासकीय कारभारातील अनेक शब्दांचे पुनरुज्जीवन करणे जसे जरुरीचे ठरले, तसेच इंग्रजांच्या पूर्वीच्या कारभारांच्या वहिवाटीत नसलेल्या व इंग्रजी राजवटीमुळे प्रसारात आलेल्या अनेक संकल्पनांना मराठी शब्द तयार करण्याची वेळ आली. ज्या काळात मराठी भाषा राजदरबारात वावरत होती त्या वेळी मराठीत शिरलेले फारसी, उर्दू भाषांतील कित्येक शब्द पेशवे काळातही वापरात आलेले होते. फारसी, उर्दू शब्दांपेक्षा संस्कृत शब्दांची जवळीक वारसाहक्कामुळे केव्हाही अधिक होती; याचा परिणाम–परिभाषा तयार करताना, इंग्रजी शब्दांसाठी प्रथम मराठी रूढ शब्द शोधावयाचा–मग तो महसूल सारखा यावनी असला तरी चालेल; तो सापडत नसेल तर नवीन पारिभाषिक शब्द तयार करावयाचा–अशा ' प्रवृत्तीत ', किंवा ' धोरणात ' झाला. एका मूळ रूपापासून अनेक शब्दांची जडणघडण करायला, अनेक प्रत्यय अस्तित्वात असल्याने, शासनाच्या व्यवहारकोशासाठी संस्कृत भाषा अधिक उपयोगी ठरली व तिचा वापर करून शासनान आपला ' व्यवहार कोश ' प्रसिद्ध केला.

राज्यकारभारात मराठीचा वापर एकसूत्रीपणाने करण्यासाठी शासनाने आपला व्यवहार कोश प्रसिद्ध करताच अनेक बाजूंनी टीकेचे मोहोळ उठले. परंतु मराठी भाषेचा शासनात संपूर्णपणे वापर सुरू न झाल्याने व तो होईपर्यंत इंग्रजीचा वापर चालू राहिल्याने या टीकेची तीव्रता तितकी जाणवली नाही; मात्र सन १९७९ हे राजभाषा वर्ष म्हणून जाहीर होताच शासकीय परिभाषेची चिकित्सा पुन्हा एकवार तीव्रतेने चालू झाली; परिभाषेतील दुर्बोधता व क्लिष्टता पुनःपुन्हा उल्लेखिली जाऊ लागली, त्यातच भर, शिक्षणक्षेत्रातील विविध पाठ्यपुस्तकात शास्त्रीय विषयांवरील शासनमान्य परिभाषा वापरली जाऊ लागल्यावर निर्माण होणाऱ्या विविध अडचणींची पडली. शासनाने सुचविलेली परिभाषा वापरून लिहिलेल्या मराठीला, ' सरकारी मराठी ', ' शासकीय मराठी ' अशा प्रकारची नामाभिधाने मिळायला लागली.

परिभाषा आणि क्लिष्टता ' (१३ जून ७९, सकाळ) या लेखात डॉ. शं. आ. परांडेकर यांनी परिभाषा बनविणारांची अडचण दाखवून दिली आहे. तत्त्व म्हणून ' मातृभाषेतून शिक्षण आणि सामान्य व्यवहार ' या गोष्टी मान्य केल्यावर, येणाऱ्या अडचणींवर मात करणे क्रमप्राप्त ठरते. या अडचणींवर मात करीत असताना पुष्कळदा

असे दिसून येते की प्रत्यक्ष व्यवहारात पारिभाषिक संज्ञांना सोपे मराठी पर्याय शब्द वापरणे शक्य होतेच असे नाही. सर्वच विषयांत खालच्या पातळीवर (कोणत्याही ढोबळ स्वरूपाच्या) पारिभाषिक संज्ञा फार मोठ्या प्रमाणात वापरून विचार व्यक्त करणे फारसे कठीण जात नाही. परंतु त्याच विषयाच्या वरच्या पातळीवरची, म्हणजे अधिक तपशीलवार, चर्चा सर्वसाधारणपणे समजल्या जाणाऱ्या, ढोबळ स्वरूपाच्या किंवा रूढ, सोप्या शब्दांनी सर्वच वेळी करणे शक्य नसते. अशी चर्चा विशिष्ट पारिभाषिक संज्ञांचा वापर न करता करणे अशक्य असते. विशेषतः वैज्ञानिक विषयांच्या बाबतीत त्या त्या विषयातील तांत्रिक संज्ञांचा वापर केल्याशिवाय निश्चित बोध होत नाही. यासाठी पारिभाषिक संज्ञा बनविताना, जर मराठीत पर्याय नसेल व तो संस्कृतमधून घेण्यासारखा असेल तर तेथून घेऊन व तसा बनवणे अशक्य असल्यास रूढ असा परकीय भाषेचा पर्याय ठेवणे जरुरीचे असते असे वस्तुस्थितिनिदर्शक मत मांडले आहे. शिवाय वैज्ञानिक संज्ञांबद्दल त्यांनी असेही विधान केले आहे – ' पाश्चात्य देशात ज्या संज्ञा वापरात आहेत त्या सामान्यांच्या दृष्टीने क्लिष्टच आहेत; त्यांचा वापर संबंधितांनी सतत केल्यामुळे परिचय वाढून त्यांची सवय झाल्याने शब्दांची क्लिष्टता कमी होते असा अनुभव आहे. ' परिभाषा क्लिष्ट वाटली तरी जर अर्थाचा गोंधळ दूर होणार असेल व निश्चित अर्थबोध होणार असेल तर तशा शब्दांचा स्वीकार करणे ' सूज्ञपणाचे ' होईल असे त्यांचे मत आहे. त्याचबरोबर एखाद्या वनस्पतीचे किंवा प्राण्याचे इंग्रजी नाव भारतीय भाषेत जसेच्या तसे घेऊन धेडगुजरीपणा आणण्यापेक्षा सरळ अर्थवाही भाषांतर करून घेण्यात भाषेची हानी न होता उलट संपन्नताच वाढणार नाही का ? असा त्यांनी सवालही केला आहे.

' मराठी भाषा ' (म. टा. २० मे १९७९) या लेखात डॉ. कालेलकर यांनी, ' भारतीय भाषांतील शब्द आणि पारिभाषिक संज्ञा यांची आपापसांत देवाणघेवाण करून एक आंतरराष्ट्रीय परिभाषा निर्माण करण्याचे स्वप्न जे लोक पाहतात त्यांनी वस्तुनिष्ठ होऊन असले निरर्थक खटाटोप सोडून दिले पाहिजेत ' असा इशारा दिला आहे. ' ज्ञान मिळविण्याची क्रिया तळमळीने चालू आहे, फक्त पारिभाषिक संज्ञांच्या अभावामुळे काम अडून राहिले आहे, असे कुठेच आढळून येत नाही ' असे ठामपणे सांगून ते म्हणतात, ' परिभाषेचा विचार करताना आपली या क्षणाची गरज, आपल्या भाषेची घडण आणि कुवत, आपली बौद्धिक पातळी आणि तिची झेप, ज्ञान शोधून काढण्याची तळमळ ' इत्यादी गोष्टींचा विचार झाला पाहिजे. ' एकाच पारिभाषिक कल्पनेला प्रारंभीच्या प्रयोगकाळात अनेक पर्याय वापरले जाणे शक्य आहे ' असे सांगून ' कालांतराने प्रत्यक्ष वापरानंतर त्यांतला सोयीचा वाटणारा एकच पर्याय रूढ होणे इष्ट असते ' असे आपले मत दिले आहे.

डॉ. उमाशंकर जोशी यांनी वाई येथील ' मराठी विश्वकोश ' खंड ६ व ७ यांच्या प्रकाशन समारंभाच्या आपल्या भाषणात ' आधुनिक ज्ञानविज्ञानातील पारिभाषिक संज्ञा-

साठी भिन्न भिन्न भारतीय भाषांमध्ये वापरल्या जाणाऱ्या भिन्न भिन्न शब्दांऐवजी संपूर्ण भारतात एक परिभाषा रूढ झाली पाहिजे ' असे विचार व्यक्त केले आहेत (सकाळ १० मे १९७९). त्यांच्या मताने परभाषेतील ज्ञानाच्या संज्ञा आपापल्या भाषांत आणण्याच्या प्रयत्नात पुन्हापुन्हा होणारे परिश्रम व खर्च भारताला परवडणारे नाहीत. शिवाय सर्व क्षेत्रातील ज्ञानाचा विस्तार ही कोणाचीही प्रादेशिक मक्तेदारी नाही. डॉ. जोशी यांच्या मताशी प्रत्येक भाषेच्या विशिष्ट जडणघडणीच्या स्वभावाच्या दृष्टिकोनातून सहमत होणे डॉ. कालेलकरांना शक्य वाटत नाही.

३० मार्च १९७९ च्या ' महाराष्ट्र टाईम्स 'च्या अग्रलेखात, ' पारिभाषिक शब्द बनविणारांचे तोंड लोकांकडे वळलेले असावे, मूठभर विद्वानांकडे नसावे, ' महसूल ' सारखे रूढ शब्द डावलून ' राजस्व ' सारखे अपरिचित व बोजड शब्द वापरू नयेत ' अशी टीका केली आहे. तर १७ डिसेंबर १९७८ च्या ' रविवार सकाळ 'च्या अग्रलेखातही ' क्लिष्ट परिभाषेला पर्याय नाही असे समजून लोक तिचा वापर करू लागले आहेत तरीदेखील लोकव्यवहाराच्या दृष्टीने क्लिष्ट परिभाषा टाळावी ' असे आवाहन केले आहे.

श्रीधर निमकर, सं. कार्यवाह, मराठी भाषा अन्याय निर्मूलन परिषद, यांनी आपल्या पत्रात (म. टा. ९ एप्रिल १९७९), ' महाराष्ट्र सरकारने बनविलेली राज्यकारभाराची परिभाषा बोजड आणि कृत्रिम आहे ही तक्रार पूर्णांशाने रास्त नाही ' असे विधान करून, ' नव्या कल्पना स्वीकारताना नवे अपरिचित शब्द येणे अपरिहार्य आहे, सरावानेच ते अंगवळणी पडतात.... शासन मुद्दाम अधिक बोजड शब्द निर्माण करीत नाही. क्वचित तसा आल्यास त्याऐवजी दुसरा अधिक सोपा रूढ शब्द वापरण्यास शासनाला भाग पाडणे हे पत्रकारितेचे काम आहे' असे आपले विचार व्यक्त केले आहेत.

श्री. शरच्चंद्र बडोदेकर, ठाणे यांनी आपल्या पत्रात (म. टा. १३ मे १८७९) ' प्रशासकीय परिभाषा जर क्लिष्ट वाटत असेल तर राज्यसरकारनेच पु. ल. देशपांडे, अशोक केळकर, ना. गो. कालेलकर इत्यादी जाणकारांची समिती नेमावी आणि त्या समितीला (परिभाषेची क्लिष्टता) या प्रश्नाचा साकल्याने पुनर्विचार करण्यास सांगावे अशी सूचना केलेली आहे.

५ जून १९७९ च्या ' सकाळ 'मधील वार्तापत्रात पुण्यात महाराष्ट्र सरकारने आयोजित केलेल्या परिसंवादात पारिभाषिक प्रश्नावर दोन गट पडले, असे निदर्शनास आणले आहे. एका गटाच्या मताने हे पारिभाषिक शब्द दुर्बोध व बोजड ठेवून आतापर्यंत इंग्रजीपासून वंचित झालेल्या बहुजनसमाजाला मराठी ज्ञानापासून वंचित ठेवण्याचा डाव खेळण्यात येत आहे. तर दुसऱ्याच्या मते बहुजनसमाजाला ज्ञानाची सर्व कवाडे खुली करण्यासाठी हा सर्व खटाटोप आहे. मराठीत रूढ नसलेले शब्दच फक्त, संस्कृतमधून घेण्यात येत आहेत असे आहे.

परिभाषेसंबंधी विविध व्यक्तींनी प्रकट केलेला विचार एकत्रितपणे लक्षात घेता,

त्यांच्यातील मतभिन्नता-समाजजीवन व परिभाषा यांच्यातील संबंध कोठे व किती निकटचा असावा याबाबत, दिसून येतो. क्लिष्टता, बोजडपणा, इत्यादी विशेषणे एखाद्या शब्दाबाबत वापरणे वाटते तितके सोपे नाही. वस्तुतः 'कोश' हा शब्द उच्चारायला सोपा असूनही 'डिक्शनरी' असा जास्त वापरला जाताना आढळतो. 'वाचनालय' या शब्दाऐवजी 'लायब्री' हे लायब्ररीचे सोपे केलेले रूप सर्रास वापरले जाताना दिसते. या गोष्टी लक्षात घेण्याजोग्या आहेत. परिभाषेसंबंधी अनुकूल-प्रतिकूल मते मांडताना—परिभाषेचा शासकीय क्षेत्रातील वापर, ज्ञान, विज्ञान किंवा विविध भौतिक शास्त्रे यांच्या क्षेत्रातील वापर, कायदा, न्यायालये इत्यादी क्षेत्रांतील वापर अशा भिन्न भिन्न क्षेत्रांचा विचार स्वतंत्रपणे केला पाहिजे. ही परिभाषा भाषेत समाविष्ट होताना अशिक्षित—सामान्य माणसाच्या सर्वसाधारण संपर्काची क्षेत्रे व विशिष्ट संपर्काची क्षेत्रे, सामान्य शिक्षित किंवा प्रशिक्षित व्यक्तीची सर्वसाधारण संपर्काची क्षेत्रे व विशिष्ट संपर्काची क्षेत्रे लक्षात घेतली पाहिजेत. कोणत्या क्षेत्रातील कोणत्या प्रकारच्या व्यक्तीच्या कोणत्या प्रकारच्या संपर्कासाठी कोणता शब्द वापरला जाणार आहे हे लक्षात घेऊन पार्श्वभूमीवर परिभाषेची क्लिष्टता किंवा सुलभता ठरवली पाहिजे. तसेच प्रसंगी क्लिष्ट वाटणारी परिभाषा दुसऱ्या पर्यायाअभावी स्वीकारणे प्राप्त आहे काय हेही ठरवले पाहिजे. नाहीतर विशिष्ट परिभाषेला 'एकाने 'क्लिष्ट' म्हणावे, व दुसऱ्याने ती परिचयाने क्लिष्ट वाटणार नाही' असे म्हणत राहावे, या प्रकारचा मतभेद कधीही न संपणारा असा राहील.

४.३. (ब) शब्दभांडार :

'राज्यभाषा वर्षा'च्या निमित्ताने शासकीय व शैक्षणिक क्षेत्रे, वाङ्मयसेवा करणारे लोक, सामान्य मराठी माणूस, मराठी पत्रकार इत्यादींच्या मराठीच्या व्यवहाराची भिन्न भिन्न क्षेत्रे यांतील मराठीच्या विशिष्ट प्रकारच्या वापरासंबंधीच्या चर्चा वर्तमानपत्रातून पत्राच्या रूपाने किंवा लहानमोठया, दीर्घ प्रदीर्घ लेखांच्या साहाय्याने झाल्या. तसेच विशिष्ट शब्दरचना वर्तमानपत्रात दिल्या जाणाऱ्या बातम्या किंवा इतर लेख यांतून वापरलेल्या आढळून आल्या. या लेखनातून भाषेचे तात्त्विक स्वरूप, भाषेतील व्यवहारसुलभता, तिची जडणघडण, मराठी भाषिकांचे समाजजीवन इत्यादी अनेक विषयांना स्पर्श केला गेला. त्याचबरोबर मराठीत नव्याने वापरात येऊ पाहत असलेल्या स्वागतार्ह किंवा विरोधार्ह शब्दांसंबंधीही विचारविमर्श प्रकट झाले. समाजजीवन बदलले असता त्याचा भाषेवर परिणाम होत असतो, तो परिणाम योग्य दिशेने होत नसेल तर परिणामकारक उपाययोजना काय असावी याची दिशा दाखवून देतानाच अंमलात आणल्या गेलेल्या उपाययोजनांवर साधकबाधक टीकाही व्यक्त केल्या गेल्या; तसेच मराठीच्या शब्दभांडाराचा विशिष्ट भावांच्या संदर्भात काही प्रमाणात विचार केला गेला.

डॉ. कालेलकर यांनी आपल्या लेखात (म. टा १७ मे १९७९) भाषा व समाज-

जीवन यांचे नाते उलगडून दाखविले आहे. आणि ' प्रगतीमुळे समाजजीवन बदलते.... अनेक उपयुक्त भौतिक साधने, नवे विचार, नव्या सवयी, हितकारक अशा सामाजिक आणि सांस्कृतिक प्रवृत्ती यांनी ते समृद्ध होते. या सर्वांचा महत्त्वाचा परिणाम भाषेच्या रूपावर दिसून येतो कारण तीच त्या सर्व प्रवृत्तींच्या अभिव्यक्तीचे साधने असल्यामुळे तिलाही त्या प्रमाणात नवे रूप धारण करावे लागते....जे समाजात घडते ते वेगळ्या अर्थाने भाषेतही घडत असते.... भाषेच्या दुर्बलतेचा दोष केवळ लेखकांच्या, कोश-कर्त्यांच्या माथी मारता येणार नाही....कळत न कळत भाषा आपल्यावर पडलेली जबाबदारी पार प्रयत्न करीत असते. त्यासाठी ती परके शब्द स्वीकारते. कधी जुन्या शब्दांना नवे अर्थ देते तर कधी पूर्णतया नवे शब्दही निर्माण करते....भाषेच्या या नैसर्गिक जीवनात कधी कधी क्रांतिकारी बदल करण्याची वेळ येते त्या वेळी सरकार, शिक्षण संस्था, साहित्यसंस्था, इत्यादी सुसंघटित संस्थांना यात 'जाणीवपूर्वक' व 'योजनापूर्वक' लक्ष घालावे लागते असेही म्हटले आहे. मराठी भाषेच्या बाबतीत घडलेल्या क्रांतिकालाची कारणे देऊन त्यासाठी स्थापन झालेल्या ' महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति-मंडळ ' आणि ' भाषा सल्लागार मंडळ ' यांच्या कार्याचा परामर्श घेऊन, ' मराठीची साधनसंपत्ती काय आहे इकडे लक्ष न देता, लोकांच्या दृष्टीने राज्यकारभाराची भाषा कशी ठेवली तर ती झटपट रूढ होईल याचा विचार न करता, त्यांच्या माथी एक अगदी नवी बोजड भाषा मारण्याच्या जो प्रयत्न झाला तो फसला ' अशी टीका केली आहे. ' प्रचलित, सर्वांना कळणारे शब्द काढून टाकून वराह, मत्स्य, यांसारखे प्राचीन शब्द नवे म्हणून आणण्याचा अट्टाहास शुद्धीकरणाच्या हव्यासामुळे झालेला आहे. ' असाही आक्षेप डॉ. कालेलकर यांनी घेतला आहे. सामान्यांच्या प्रतिभेला वाव दिला तर, गोलंदाजी, फलंदाजी, दांडी, यष्टिरक्षक, इत्यादी क्रिकेटच्या क्षेत्रातील मराठी शब्द दाखवून, किती सुंदर शब्द बनू शकतात याचे त्यांनी उदाहरण दिले आहे. 'भाषेच्या व्यवहारात परंपरा सांभाळायची असते ती समाजात सुरळीतपणे चालू असलेला व्यवहार व्यवस्थित राहावा म्हणून. निष्कारण नवे शब्द आणून अशी परंपरा मोडण्याचा अट्टहास करणे हे प्रगतीचे लक्षण नव्हे ' अशी टीका करून जिज्ञासूंना वाचून समजणारे, ज्ञानलालसा वाढवणारे ग्रंथ ज्या भाषेत अजूनही अपवादानेच निर्माण होतात त्या भाषेच्या लोकांनी अधिक आत्म-संशोधन, अधिक अभ्यास आणि अधिक प्रयत्न केला तरच त्यांचे भवितव्य उज्ज्वल होईल ' असा इशारा दिला आहे.

मराठी समाजाच्या बदलत्या जीवनामुळे मराठी भाषेत बदल झाला तो प्रामुख्याने शब्दभांडारामध्ये झाला. राजभाषा म्हणून मराठीला मान्यता मिळाल्यावर व शैक्षणिक क्षेत्रात मराठीचा वापर अधिक प्रमाणात होऊ लागल्यावर, मराठीच्या वापराची जी नवी दालने उघडली गेली त्यात ज्या नवीन शब्दांचा वापर होऊ लागला व ज्या शब्दांचा वापर केला जाईनासा झाला त्याबद्दल जे विचार व्यक्त केले गेले त्यांच्या प्रमुख तीन धारा आढळून येतात – (१) मराठी-संस्कृत, (२) मराठी-हिंदी व (३) मराठी

इंग्रजी भाषिक संबंध. या तीन विचारधारांमध्ये मराठीने घेतलेल्या वरीलपैकी कोणत्याही एका किंवा सर्व भाषांतील शब्दांची 'घेवाण' खूपच चर्चिली गेली. आजपर्यंतच्या काळात संस्कृत, हिंदी व इंग्रजी या तिन्ही भाषांतील कितीतरी शब्द मराठीत सहजपणें रुळून गेलेले होते, त्यांच्याकडे समाजातील विचारवंतांचे फारसे लक्ष गेले नाही. तसें गेले असते तर मराठीत इतके शब्द रुळून गेलेच नसते. परंतु मराठी भाषा सरकारदरबारी जाताच, मराठीच्या शुद्ध स्वरूपाच्या इच्छेने म्हणा किंवा शासकीय वा शैक्षणिक क्षेत्रातील मराठी व्यवहारसुलभ असावे या हेतूने म्हणा किंवा इतर कोणत्याही वेगवेगळ्या प्रकारच्या कारणांनी, समाजातल्या विविध क्षेत्रांतील प्रतिष्ठितांचे लक्ष या तिन्ही भाषांतून मराठीत आलेल्या अथवा आणलेल्या शब्दांकडे गेले. याचा परिणाम म्हणून ज्या वेगवेगळया दृष्टिकोनांनी संस्कृत, हिंदी व इंग्रजी या भाषांकडे मराठीच्या संदर्भात पाहिले गेले त्याचे पडसाद वर्तमानपत्रीय लेखनातून उमटत राहिले.

(१) मराठी-संस्कृत :

'संस्कृत धातु, प्रत्यय, शब्द इत्यादींचा सर्रास वापर केला तर भाषा प्रगल्भ बनेल अशा सुप्त गंडांनी पछाडलेल्या मनोवृत्तीतून मंडळाचे बरेचसे काम झाले', अशी टीका डॉ. कालेलकरांनी भाषा सल्लागार मंडळाच्या कामकाजाबाबत केली. तर श्री. कानिटकर, भाषासंचालक, महाराष्ट्र शासन, यांनी-(म. टा. ५ जून १९७०)-शब्द निवडताना प्रचलित, मूळ वा अपभ्रष्ट शब्द शक्य तेथे स्वीकारून, त्यांच्या अभावी फारसी, अरबी व इतर देशी भाषांतीलही शब्द घेतले जात असल्याचे सांगितले संस्कृतचे विशेष प्रेम किंवा भाषाशुद्धीकरणाचा प्रयोग संचालनालयात होत नसून संस्कृतच्या एकट्या शब्दावरून तयार झालेले दहा-बारा मराठी शब्द आजही रूढ असल्याचे निदर्शनाला आणून दिले.

'महाराष्ट्र टाइम्स'च्या अग्रलेखात (३० मार्च १९७९) संस्कृतचा उपयोग मान्य करूनही 'रूढ मराठी शब्द काढून टाकून संस्कृत माथ्यावर मारणे म्हणजे राजभाषा ही फार थोड्यांसाठी आहे', असे म्हणण्यासारखे आहे, असे विधान केलेले आहे. प्रा. गुप्ते (सकाळ २७ मे १९७९) यांच्या लेखात, 'नवी परिभाषा तयार करताना संस्कृतचा उपयोग काही अंशी अपरिहार्य मानला तरी त्याचा अर्थ तिने.... मराठीला खाऊनच टाकावे असा नाही', असे म्हणून संस्कृतच्या समर्थनामागे, तिच्या प्रभावामागे असलेली कारणे 'आमच्या पंडितांना असलेली विद्वत्तेच्या प्रदर्शनाची हौस आणि मराठीविषयी असलेली तुच्छतेची भावना' अशी दिलेली आहेत. समास करताना संस्कृत शब्द सोयीचे जातात व मराठी शब्दांचे समास कानांना बरे लागत नाहीत ही काही अंशी वस्तुस्थिती असून, कानांना बरे न वाटणारे समास सरावाने रुळतील असेही त्यांनी म्हटले आहे. 'संस्कत शब्द घुसडण्यामागे इंग्रजी शब्दांचा अकारण द्वेष आहे' असेही त्यांना वाटत असल्याचे लिहितात. डॉ. शं. अ. परांडेकर यांनी, (सकाळ ३ जून

१९७९), संस्कृत-मराठी भाषांतील ' वारसा 'चे नाते दाखवून भारतातील अनेक प्रगत भाषांतून संस्कृत शब्द मोठ्या संख्येने वापरले आहेत याकडे लक्ष वेधले आहे. श्री. श्री. के. क्षीरसागर यांना (म. टा. ६ मे १९७९) शुद्ध मराठी लिहिण्यासाठी संस्कृतचे महत्त्व मान्य असूनही मराठीचें संस्कृतीकरण पटत नाही.

राजभाषा म्हणून शासकीय व्यवहारात, शिक्षणक्षेत्रात किंवा इतर संशोधनाच्या क्षेत्रात मराठी वावरत असताना मराठीमध्ये ' सरकारमान्य ' अशा संस्कृत शब्दांच्या योजनेबद्दल वरीलप्रमाणे मते आढळून येतात. या शब्दांच्या योगाने मराठीचे मराठीपण जात आहे असे काहींना वाटते तर त्या शब्दांमुळे येणारी दुर्बोधता कोणाकोणाला नकोशी वाटते. एका शब्दापासून अनेक शब्द घडविता येण्याची संस्कृतची कुवत मराठीपेक्षा जास्त असूनही काहींचा संस्कृतला विरोध दिसतो, तर श्री. माधव गडकरी यांना त्यामध्ये ' ब्राह्मणी ' जातीयवादाची खात्री वाटते (रवि. सकाळ, मुंबई, १ जुल १९७९).

संस्कृत भाषा ही मराठीची जननीपूर्व जननी आहे हे संस्कृत-मराठीचे परंपरेने आलेले नाते लक्षात घेऊन भाषाशास्त्राच्या दृष्टीतून, पूर्वग्रहदूषित न होता, लोक-व्यवहाराचे साधन असणे या भाषेच्या कार्याचा विचार करून संस्कृतकडे पाहणे जरुरीचे आहे. जनसामान्यांच्याबाबत बोलणाऱ्यांना पुष्कळदा जनसामान्यांची भाषा पुरेशा निश्चित स्वरूपात माहीत नसण्याची शक्यताही नाकारता येत नाही. बालपण खेड्यात किंवा अशिक्षित लोकांमध्ये घालवून शालेय किंवा महाविद्यालयीन, किंवा विश्वविद्यालयीन शिक्षण घेतलेल्या, स्वतःला सुशिक्षित म्हणणाऱ्या अनेकांचा संपर्क अशिक्षितांशी, स्वतःच्या खेड्याशी केव्हा दूरत्वाच्या भावनेने तर केव्हा परिस्थितीने सुटलेला असतो, अशांनी आपल्या बालपणाच्या आठवणीतून खेडेगावी राहणाऱ्या, शिक्षणास वंचित असलेल्या किंवा अशिक्षित अशा लोकांबद्दल निश्चित स्वरूपाची काही विधाने करणे पुष्कळदा धाडसाचे असू शकते. स्वतः सुशिक्षित असून खेड्याशी, अशिक्षितांशी किंवा जनसामान्यांशी सतत संपर्क ठेवणारेच जनसामान्यांबद्दल विधाने करण्यास खरे अधिकारी असतात. धार्मिक वाङ्मयाच्या वाचनात स्वतःला रमवणारे कित्येक जनसामान्य, सुशिक्षित वाचकापेक्षा अधिक प्रमाणात ज्ञानेश्वर, रामदास जाणू शकतात ही वस्तुस्थिती डोळ्यांआड करून चालणार नाही.[1] जनसामान्यांबाबत विधान करताना दोन गोष्टी लक्षात घेतल्या पाहिजेत – एक म्हणजे, जनसामान्यांचे आपण खरेखुरे प्रतिनिधी आहोत काय हे ठरविले पाहिजे व दुसरे, शब्दांची जडणघडण ज्या साम्यशोधनाच्या (analogy)

१. या संदर्भात लेखिकेला स्वतःला आलेला अनुभव नमूद करावासा वाटतो – बोली भाषेच्या अभ्यासासाठी सोलापूरजवळील खेड्यात गेले असता, आरसा दाखवून एका निरक्षर स्त्रीला प्रश्न विचारला, ' याला काय म्हणतात ? ' उत्तर आले ' दर्पण. ' याचा अर्थ कदाचित तिला दोन्ही शब्द माहीत असावेत पण तिने ' दर्पण ' शब्द शहरी समजून सांगितला, किंवा तिला फक्त ' दर्पण ' शब्द माहीत असावा.

प्रवृत्तीतून होते ती प्रवृत्ती कोणत्या क्षेत्रात ज्यांना आपण जनसामान्य म्हणतो ते वापरू शकतात व कोणत्या क्षेत्रात वापरत नाहीत याबद्दलची आपली स्वतःची जाण ओळखली पाहिजे. प्रत्येक मनुष्य सर्व भाषा आत्मसात करत नसतो, तो भाषेची जोडणी-मोडणी आत्मसात करतो व त्या तत्त्वांचा वापर करून स्वतःची भाषा समृद्ध करीत जातो. त्यामुळे संस्कृत शब्दांच्या मराठीतील वापरावर टीका करताना भाषा वापरण्याची ताकद किंवा कुवत लक्षात घेणे आवश्यक आहे दिसून येईल.

ज्यांचा संस्कृत भाषेशी थोडाबहुत परिचय आहे अशांना किंवा मराठी भाषेच्या सुशिक्षित अभ्यासकांनाही परिभाषेतील अनेक शब्द संस्कृत आहेत असे समजते, असे म्हणणेही काहीसे धाडसाचे होईल. उदाहरणार्थ, महाराष्ट्र राज्य भाषा सल्लागार मंडळाच्या 'भाषाशास्त्र' उपसमितीने निश्चित केलेल्या परिभाषेतील[1] 'काकल, कोटी, पूरक, वारंवारता, सुरावली, शिखर, अभ्यास, लय, गौण, प्रमाण', हे शब्द जर संस्कृतशी परिचय नसेल तर संस्कृत आहेत हे ओळखणे कठीण आहे. परिभाषा ही शेवटी बरीचशी 'कृत्रिम' असते. कारण परिचयाच्या शब्दांना विशिष्ट अर्थ देऊन ते वापरावयाचे, कमी परिचयाचे किंवा कोशगत शब्द नव्या संदर्भात वापरावयाचे किंवा नित्याच्या वापरातील प्रत्ययांचा अपरिचित किंवा परिचित संदर्भात वापर करून शब्द तयार करून ते वापरावयाचे म्हणजे परिभाषिक शब्द योजावयाचे असा अर्थ होतो. पारिभाषिक शब्दांकडे प्रामुख्याने त्यांच्या कार्याच्या दृष्टीतून पाहिले पाहिजे. मराठीत आलेल्या पारिभाषिक संस्कृत शब्दांबद्दल प्रामुख्याने टीका आढळते कारण मराठीत आपोआप वापरलेले 'अस्मिता, भावबंध, रंजन' सारखे कित्येक शब्द टीकाकारांच्या नजरेतून निसटलेले असतात, कित्येकदा असे शब्द संदर्भासह वापरात आल्याने अर्थ-निष्पत्तीला फारसे 'तापदायक' ठरत नाहीत म्हणूनही 'टीकास्पद' होत नाहीत, परिभाषा वापरण्याचे तंत्र वेगळे राहते, त्यामुळे तिच्या सोपेपणाची, अवघडपणाची, संस्कृत आक्रमणाची जाणीव निर्माण होत असते.

दैनंदिन जीवनात शास्त्रीय परिभाषा वापरण्याचे प्रसंग व्यक्तींच्या गटागटांनाच फक्त येत असतात. जी गोष्ट शास्त्रीय परिभाषेची तीच शासकीय परिभाषेची, दोन विती सुद्धा स्वतःच्या मालकीची जमीन नसणाऱ्या शहरी व्यक्तीला खेड्यातील प्रचलित भाषा 'शिकावी'च लागेल. 'सात बाराचे उतारे', 'सोळा आणे पीक', 'निंदणी, खुरपणी, तण काढणं' वगैरे शब्दप्रयोग त्याला अगम्य राहतील. माप घालताना म्हटल्या जाणाऱ्या 'लाभ'चा अर्थ समजूनच घ्यावा लागेल, तसेच, 'उगवत, मावळत, खालतं, वरतं' हे संदर्भाने ओळखावे लागेल. कोणालाही चटकन समजणारा 'शब्द' हा शब्द किंवा 'रूप' हा शब्द व्याकरणात 'व्याख्या करण्याचा विषय' किंवा 'पारि-भाषिक संज्ञा' असतो, '१४४ कलम पुकारले' असा सर्वांना समजणारा वाक्प्रयोग

१. मराठीचा भाषिक अभ्यास, संपादक कानडे, पृ. १९७ ते २०३.

असला तरी वर्तमानपत्रांनी ते कलम नेमके काय आहे हे छापले नाही तर कोणत्याही ' राजस्व, अभियंता ' इत्यादी शब्दांइतकाच, किंवा क्रिकेटचा खेळ न समजणाऱ्या व्यक्तीला ' यष्टिरक्षक ' किंवा ' फलंदाज ' इत्यादी शब्दांइतकाच दुर्बोध आहे हे लक्षात घेतले पाहिजे.

वरील प्रकारच्या अनेक गोष्टींचा विचार करून जनसामान्यांना समजणारी भाषा म्हणजे समाजातील कोणत्या थरातील लोकांना कोणत्या सामाजिक व्यवहारासाठी समजणारी भाषा याची निश्चिती केल्याशिवाय, भाषेत संस्कृत शब्दांमुळे ' सोपेपणा आला ' की ' दुर्बोधता ', संस्कृतचे आक्रमण भाषेवर झाले की मराठी भाषा प्रगल्भ व प्रौढ झाली या प्रकारची विधाने करणे उचित ठरणार नाही.

(२) मराठी–हिंदी :

मराठी भाषेवर, आज वापरात नसलेल्या संस्कृतचा, ' संस्कृतचे मराठीकरण ' किंवा ' मराठीचे संस्कृतीकरण ' करून होत असलेला प्रभाव जसा वर्तमानपत्रातून चर्चा-विषय झाला आहे तसाच हिंदी-मराठी शब्दसंबंध हाही एक चर्चा-विषय झालेला दिसून येत आहे.

मराठी व हिंदी या दोन्ही भाषा आर्यकुलातील असूनही त्यांची ' जननी ' एक नसल्याने काही संस्कृत शब्दांचा हिंदी भाषेतील अर्थ व मराठी भाषेतील अर्थ यात फरक पडतो. ' रक्षा, शिक्षा, दर्शक, यातायात ' वगैरे शब्द उदाहरणादाखल देता येतील. हिंदी भाषेला राष्ट्रभाषेचे स्थान असल्याने, सरकारी परिपत्रके हिंदीतून प्रसृत होत असल्याने, आकाशवाणी, दूरदर्शन व चित्रपट यांसारख्या संपर्कसाधनांच्या द्वारे हिंदी भाषा मराठी भाषिकांच्या कानावर पडत असल्याने, व भारतामध्ये हिंदी ही चांगली संपर्कभाषा म्हणून वापरात येत असल्याने, हिंदी भाषेचा प्रभाव मराठी भाषेवर पडण्याची प्रक्रिया ही नित्याचीच बाब ठरणार आहे. हिंदी भाषेचा मराठीवर पडत असलेला प्रभाव टाळणे शक्य आहे किंवा काय, तसे शक्य असल्यास तो कोणत्या मार्गांनी टाळावा, तसे शक्य नसल्यास त्याकडे कशा प्रकारे किंवा कोणत्या क्षेत्रांत, कोणत्या प्रमाणात पाहणे मराठीच्या दृष्टीने हिताचे ठरेल, अथवा हानिकारक ठरणार नाही, या गोष्टींचा विचार करून येणारा निर्णय ही योजनाबद्ध प्रयत्नाने अंमलात आणण्याची गोष्ट राहणार आहे. फ्रेंच भाषिकांना अशा प्रयत्नांची वेळ आली होती ही गोष्ट लक्षात घेतल्यास, योजनापूर्वक प्रयत्नांच्या जरुरीचे महत्त्व लक्षात येईल. [१]

भाषेमध्ये परभाषिक शब्द वापरले जातात तेव्हा ते काही वेळा खरोखरच ' घुसड-खोरीने ' किंवा ' मागील दाराने ' भाषेत येतात, म्हणजे जनसामान्यांकडून उचलले जाऊन प्रमाण भाषेत शिरतात, तर केव्हा ते ' उद्धटपणाने ' किंवा ' पुढील दाराने ' येत असतात. म्हणजे शासकीय वापरातून किंवा प्रतिष्ठितांच्या वापरातून येतात. प्रतिष्ठितांच्या

१ पहा – महाराष्ट्र टाइम्स, धावते जग सदर, ता. २३ जानेवारी १९७६.

वापरातून भाषेत शिरलेले शब्द टीका–क्षेत्रात येतात कारण ते वापरणारा वर्ग सुजाण किंवा शासकीय कारभाराशी संबंधित असतो. त्याला असे शब्द वापरण्यात, क्वचित पुढे-पुढे सहजपणा येत असला तरी, एक प्रकारची प्रतिष्ठेची जपणूक किंवा प्रतिष्ठेची जाणीव वाटत असते. त्यामुळे जाणीवपूर्वकतेने परभाषिक शब्द टाळणारा एक प्रतिष्ठित, प्रतिष्ठेसाठी परभाषिक शब्द, सवयीने अथवा हेतुतः वापरणाऱ्या प्रतिष्ठिताची त्याच्या परभाषिक शब्दांच्या वापराबद्दल टीका करीत असतो. मात्र याच वेळी सर्वसाधारण माणसाच्या भाषेत शिरलेल्या परभाषेतील शब्दांकडे स्वभाषाभिमानी प्रतिष्ठितांचे लक्ष जाण्याची शक्यता कमी असते. आज ज्यांना ‘ मराठी ’ समजले जाते असे ‘ परात, पातेले, साबण, नजर, शिरपेच, झुरळ, गुढी, उसळ, तूप, गजगा, जमाखर्च, मजला, यंदा, पेरू, बटाटा ’ यांसारखे अनेक शब्द ‘ मागील दाराने घुसलेले आहेत ’ असे म्हटले तर त्यावर मराठीचे मराठीपण शोधणाऱ्या कित्येक प्रतिष्ठितांचा विश्वास बसणे कठीण जाईल. पारिभाषिक शब्दात संस्कृतने केलेल्या आक्रमणावर टीका करणे जितके सोपे आहे तितके हिंदी (अरबी, फारसी, तुर्की मिश्र) च्या आक्रमणाबद्दल म्हणणे सोपे नाही; हे हिंदीचा राष्ट्रीय दर्जा लक्षात घेतल्यास स्पष्ट होईल. यासाठी वस्तुनिष्ठ दृष्टि-कोन घेणे जरूर आहे. ‘ पुरस्कार ’ हा शब्द हिंदीच्या मार्गाने मराठीत घुसला (म. टा. २२ एप्रिल १९७९) असे प्रा. गुप्ते म्हणतात. त्या शब्दाबद्दल ‘ इनाम ’ सारखा रूढ शब्द दूर सारला आहे असे म्हणून श्री. गुप्ते यांनी ‘ बक्षीस मिळालेले ’ असा शब्दप्रयोग ‘ पुरस्कारप्राप्त ’ बद्दल केला तर ‘ मराठी शब्द वापरलेला मथळा गावठी वाटतो का ’ असा प्रश्न केला आहे. येथे पुरस्कार, बक्षीस व इनाम या शब्दांचा स्वतंत्र विचार केला तर असे आढळून येईल की तिन्हींच्या अर्थामागील संकल्पना भिन्न वाटतात, निदान विशिष्ट संदर्भात भिन्न वाटतात – संस्था, समित्या पुरस्कार देतात, स्पर्धेमध्ये वर येणारांना ‘ बक्षिसे ’ मिळतात. किंवा शाबासकीदाखल बक्षिसे मिळतात, व वंशपरंपरा एखादी शेतीसारखी गोष्ट मिळाल्यास ते ‘ इनाम ’ समजले जाते तेव्हा ‘ पुरस्कार ’ बद्दल अर्थदृष्टया ‘ बक्षीस ’ हा शब्द बरोबर वाटत नाही. शिवाय संस्कृताळलेल्या हिंदीतून ‘ पुरस्कार ’ शब्द आला असेल तर ‘ यावनी ’ हिंदीतून ‘ बक्षीस ’ शब्द आला आहे हे लक्षात घ्यावयास पाहिजे. ‘ मराठी मराठींचे ठेवू या ’ म्हणताना प्रा. गुप्ते यांनी ‘ मराठी ’ ची व्याख्या निश्चित करणे आवश्यक होईल. मराठीचे ‘ मराठीपण ’ शोधताना अभ्यासकांनी, ‘ गरीब, पूल, गुन्हेगार, चादर, जमीन, किंमत, फजिती[1] ’ वगैरे अनेक शब्द मराठी नाहीत हेही ओळखले पाहिजे; ‘ पुरस्कार ’ यासारख्या शब्दांना आक्षेप घेताना तो योग्य कारणांनी अवश्य घेतला जावा.

श्री. क्षीरसागर (म. टा. ६ मे १९७९) यांनी, आज जी हिंदी निर्माण होत आहे ती लोकभाषाही होणे अशक्य आहे आणि राजभाषाही होणे अशक्य आहे असे

१. मराठीचा भाषिक अभ्यास, संपादक कानडे, पृ. ६५.

विधान केले आहे. हे विधान कितीही सत्य असले तरी, किंवा जे लोक अद्याप अंदाजपत्रकाला ' बजेट ' हाच शब्द वापरतात त्यांचा पगडा मराठी भाषेवर पडू देण्याचे कारण नाही अशी इच्छा (म. टा. अग्रलेख दि. ३० मार्च १९७९) कितीही प्रबळ असली तरी, ' दिल, दोस्त, कलिजा, आमने–सामने, शिकंदर ' सारखे कित्येक शब्द चित्रपटांसारख्या वेगवान प्रचारसाधनामुळे सर्वसाधारण माणसाच्या भाषेत केव्हाच घुसून रुजतील हे लक्षात घ्यावयास हवे.

राष्ट्रभाषा म्हणून हिंदीला जोपर्यंत स्थान आहे, संपर्कभाषा म्हणून भारतभर हिंदीचा जोपर्यंत उपयोग होऊ शकत आहे, महाराष्ट्राच्या सीमाप्रांताला लागून जोपर्यंत हिंदी भाषिकांचा प्रदेश आहे[1]. तोपर्यंत मागील किंवा पुढील दाराने मराठीत येणाऱ्या हिंदी शब्दांचे आक्रमण थोपवणे हा कष्टकारक मार्ग हेतुपुरःसर आचरला तरच साध्य होण्यासारखा आहे. त्यासाठी संस्कृत–वारशामुळे आलेले मराठी–हिंदीचे शब्दांतील साम्य तसेच शब्द सुनवण्याच्या पद्धतीतील साम्यही लक्षात घेतले पाहिजे. एका मूळ स्रोतापासून झालेले दोन शब्द समान असण्याची शक्यता जेव्हा असते तेव्हा कोणत्या भाषेने कोणत्या भाषेचे ऋण घेतले हे ठरविणे कठीण असते. ' प्रस्तुतीकरण ' किंवा ' प्रस्तुतिकरण ' यासारखा शब्द हिंदी–मराठी दोन्ही भाषांमध्ये स्वतंत्रपणे येणे–आणणे जितके शक्य आहे तितकेच एका भाषेत दुसऱ्या भाषेतून येणे–आणणे सहज शक्य आहे. शब्द उचलण्याची भाषेची प्रवृत्ती लक्षात घेतली तर आणि कानडी, तेलुगूसारख्या भिन्नवंशीय भाषांतूनही मराठीत शब्द येऊ शकले ही वस्तुस्थिती लक्षात घेतली तर, वरील विधान स्पष्ट होईल. मराठीवर हिंदीचे आक्रमण होणे आणि मराठीवर संस्कृत भाषेचे आक्रमण होणे या दोन गोष्टींतील फरक समजावून घेतला पाहिजे. कोणतेही आक्रमण ठरविताना, हिंदी, मराठीची समवंशीय वर्तमानकालीन व शिवाय राष्ट्रभाषेची प्रतिष्ठा पावलेली, भाषा आहे, व संस्कृत ही समवंशीय असून भूतकालीन भाषा आहे, या वस्तुस्थितीतील फरक स्पष्ट करून घेतला पाहिजे. हिंदीचे आक्रमण टाळण्यासाठी हिंदी-मराठीचा संबंध प्रथम स्पष्ट करून घेऊन नंतर मराठीचे ' मराठीपण ' ओळखायला पाहिजे. मराठीचे मराठीपण म्हणजे नेमके काय ? हे स्पष्ट झाल्यानंतर ते कसे राखायचे यासंबंधी प्रभावी उपाययोजना करणे आवश्यक होईल. या उपाययोजनांचा अवलंब करताना, मराठीला स्वतंत्र राखताना, ती भारतीय एकात्मतेपासून फार तुटणार नाही याचीही खबरदारी घेण्याची वेळ मराठीचा अभिमान असणाऱ्या विचारवंतांना आल्याशिवाय राहणार नाही. यामुळेच हिंदी-मराठी संबंध इतर कोणत्याही दोन भाषांपेक्षा वेगळ्या दृष्टीने पहावा लागेल.

---

१. जळगाव, नागपूर भागातील मराठी भाषिकांच्या बोलण्यात हिंदी शब्दांचा, वाक्प्रचारांचा भरणा आढळून येतो. शिवाय हे लोक गप्पांच्या रंगात आले असता पुष्कळदा मराठीमिश्र हिंदी बोलताना आढळून येतात.

(३) मराठी-इंग्रजी :

मराठीमध्ये होत असलेल्या शब्दभरणाबाबत हिंदी भाषेच्या ' आवकी 'संबंधी जी गोष्ट घडत आहे त्यापेक्षा कितीतरी पटींनी मराठीवर इंग्रजीचे आक्रमण झालेले आहे. ' सरंडर लिव्ह 'बद्दल ' सिलिंडर लिव्ह ', ' जॉईन 'बद्दल ' जॉइंट ', ' कोऑपरेशन 'बद्दल ' कॅारपोरेशन 'सारखे चुकीचे शब्द, किंवा सहज शक्य असताही मराठी शब्दांऐवजी, ' मॅरेज, व्हिजिट, इंटरेस्ट 'सारखे शब्द ' प्रतिष्ठेसाठी ' कसे वापरले जातात हे दाखवून देऊन श्री. देशमुख यांनी (तरुण भारत, १ जुलै १९७९), शासनाच्या आदेशांची इंजेक्शने देऊन इंग्रजीचा ' ताप ' जाईल असे आपल्याला वाटत नसून ' इंग्रजी कटाक्षाने टाळण्याचे पथ्य नेहमीसाठी पाळले पाहिजे. वृत्तपत्रांनीही ' मराठी 'चे महत्त्व समाजमनावर ठसवले पाहिजे ', असे नमूद केले आहे.

शिक्षणाचे माध्यम म्हणून प्रांतीय भाषेची पदोन्नती झालेली असली तरी इंग्रजीचा सर्वत्र संचार कसा झाला आहे हे प्रा. पी. डी. पाटील यांनी आपल्या लेखात, (म. टा. २६ ऑक्टोबर १९७९), दाखविले आहे. शालेय शिक्षण नसलेल्या शेतकऱ्याचे जग, दवाखाने, विद्यालये, कोर्टे, पोशाख, क्रिकेटसारखे खेळ, इत्यादी अनेक क्षेत्रात इंग्रजी भाषा सर्रास रूढ असून काही सोप्या शब्दांना उदा०, रबर, रॅाकेल, कप, मिल्कब्रेड वगैरे, मराठी प्रतिशब्द शोधूनही सापडत नाहीत असे दाखवले आहे. काळा पैसा (ब्लॅक मनी), सुवर्णसंधी (गोल्डन ऑपॉर्च्युनिटी), दुष्टचक्र (व्हिशस सर्कल) यांसारख्या अनेक मराठी शब्दांची उभारणी इंग्रजीच्या पायावर कशी आहे ते दाखवून श्री. पाटील म्हणतात, ' टेलर ' ची ऐट ' शिंप्याला ' येणार नाही; क्लॉथ मर्चंट आणि कापडाचा व्यापारी वेगळा असतो.' सुशिक्षितांचे बोलणे 'मिक्श्चर मेथड'ने कसे चालते त्याचे वर्णन करून आद्याक्षरे लिहिणे, ' गुड मॉर्निंग ', ' सॅारी 'सारखे शब्द वापरणे यासारख्या घटना पाहता, ' इंग्रजीशी आलेला संबंध भाषेच्या रूपाने टिकून राहिला आहे आणि आणखी काही काळ टिकून राहील, असे आपले मत मांडले आहे.

मराठी माणसाच्या शहरी किंवा खेड्यातील, शैक्षणिक किंवा घरगुती जीवनात इंग्रजी शब्द, इंग्रजी संकल्पना किंवा इंग्रजी वाक्प्रयोग प्रत्यक्ष इंग्रजी शब्दात, किंवा मराठी शब्दांच्या अवगुंठनात वावरत असताना इंग्रजी हटवण्याच्या प्रयत्नात मराठीच्या प्रेमापेक्षा इंग्रजीचा द्वेष वाढीला लागण्याची भीती महाराष्ट्र टाइम्सच्या अग्रलेखात (६ जून १९७९), व्यक्त केली गेली आहे आणि ' भाषाकारणात राजकारण व काही चळवळ्या प्राध्यापकांचे नोकरीकरण याचे मिश्रण झाले आहे त्यामुळे मराठी कशी संपन्न करावयाची याचा तपशीलवार विचार करण्याऐवजी इंग्रजीविरोधी भाषणबाजी अधिक होऊ लागली आहे.... (परंतु इंग्रजीचे) वाघिणीचे दूध प्यायल्यामुळेच आधुनिक जगाशी आपली ओळख झाली, नवे ज्ञान आत्मसात करता आले, राष्ट्रीय स्वातंत्र्य व लोकशाही या कल्पना आल्या व रूढ झाल्या. इंग्रजीने येथे वैचारिक क्रांती

केली....इंग्रजीची ही देणगी नाकारणे व विसरणे कृतघ्नपणाचे ठरेल ' असेही म्हटले आहे. याच अग्रलेखात डॉ. नारळीकरांचा विशिष्ट थरातील इंग्रजीचे महत्त्व मानण्याचा सल्ला उद्धृत करून, 'हा सल्ला व्यावहारिक असूनही चळवळये प्राध्यापक व राजकारणी यांना तो मानवत नाही ' असे म्हटले आहे. संपर्काच्या अधिक विस्तृत क्षेत्रात इंग्रजीची आवश्यकता कशी आहे, पत्रकारितेसाठी सुद्धा इंग्रजीची जरुरी कशी आहे हे दाखवून, मराठीची वाढ क्रमाक्रमानेच होणार व व्हावी, मराठीचे प्रेम म्हणजे इंग्रजीचा द्वेष नसावा असे विचार व्यक्त करून इंग्रजीला जे ज्ञानभाषेचे स्थान आहे ते मराठीला प्राप्त होण्यासाठी फार लोकांना एकनिष्ठपणे फार काळ काम करावे लागेल असे विधान करून त्यायोगे मराठीच्या अभिवृद्धीसाठी घ्याव्या लागणाऱ्या कष्टांची एक विशिष्ट जाणीव दाखवून दिली आहे.

या आधीच्या एका अग्रलेखात (म. टा. ३० मार्च १९७९) ' इंग्रजी ही परकी राज्यकर्त्यांची भाषा म्हणून आपण स्वीकारीत नसून ती ज्ञानविज्ञानाची भाषा म्हणून आपण उपयोग करीत आहोत. त्यामुळे ती स्वामिनी नसून मैत्रीणच आहे. पण ही मैत्रीण मातब्बर असल्याने तिचा प्रभाव पडतो. पण तो हळूहळू जेव्हा मराठी भाषा समृद्ध होईल तेव्हा कमी होईल....अज्ञानी लोकांची भाषा कधीही समृद्ध होत नसते.... सूर्य पूर्वेकड उगवत असला तरी ज्ञानाचा सूर्य पश्चिमेकडे उगवतो. त्याकडे खोट्या मातृभाषाभिमानापोटी पाठ फिरवणें हिताचे नाही ' अशा शब्दांत मराठी माणसाच्या समाजजीवनात इंग्रजी भाषेचे स्थान कोणत्या क्षेत्रात आवश्यक आहे ते दाखवून दिले आहे.

पुण्याला झालेल्या परिसंवादात (म. टा. ५ जून १९७९) डॉ. अ. रा. कामत यांनी इंग्रजी भाषेचे अवमूल्यन झाले तरी इंग्रजी जाणणाऱ्यांची सामाजिक प्रतिष्ठा वाढलेली आहे. असे म्हटल्याचा व ' तळच्या लोकांनी लोकांकडून सत्ता घेणे हे समाज-परिवर्तन आहे. अशा परिस्थितीत या तळच्या लोकांच्या तोंडी जी भाषा असेल ते ती (वापरात) आणतील. अर्थात ती मराठी काय व आज येणारी राजभाषा काय, ती इंग्रजीऐवजी आणू शकतील पण तेवढ्यानेही ती ज्ञानविज्ञानाची भाषा होऊ शकत नाही. ' असे आपले मत व्यक्त केल्याचा उल्लेख ' महाराष्ट्र टाईम्स 'च्या वार्तापत्रात आहे.

श्रीमती विजया देव (म. टा. १९ नोव्हेम्बर ७८) यांनी, ' काही ठिकाणी आपण इंग्रजी शब्द वापरतो. जवळजवळ त्याच अर्थाचा शब्द मराठीत असतो सुद्धा, पण तरीही तो डावलून शब्द वापरणे जास्त अर्थवाही वाटते. ' असे म्हणून या ' वाटण्या ' मागचे कारण शोधण्याचा प्रयत्न आपल्या लेखात केला आहे. प्रगत आधुनिक जीवन-पद्धतीचा एक भाग बनून स्टोव्ह, मॉन्टेसरी, बाथरूमसारखे शब्द भाषेत कसे येतात ते त्यांनी दाखवून दिले असून त्यावरील आलेल्या एका पत्राला दिलेल्या उत्तरात (म. टा. १७ डिसेंबर १९७८) ' ज्या शब्दावरून नेमका मतितार्थ प्रतीत होतो तोच शब्द

भाषेत स्वीकारला जाईल कारण शब्दाकडून मुख्य अपेक्षा अर्थवाहित्वाची असते. मग शब्द आपल्या भाषेत कुठून आला हा मुद्दा गौण आहे ' असे शब्दाच्या अर्थवाहित्वासंबंधी विधान केले आहे.

वरील सर्व लिखाणात विचारवंतांच्या इंग्रजी भाषेच्या मराठी भाषेशी असणाऱ्या नात्यासंबंधींच्या प्रतिक्रिया संस्कृत भाषेसंबंधी इतक्या 'तिखट' आढळत नाहीत ही गोष्ट लक्षात घेण्यासारखी आहे. ' संस्कृत नकोच नको. ' ' हिंदी उपेक्षिली पाहिजे ' अशा प्रकारे विचार मांडणारे लोक इंग्रजीबद्दल वेगळ्या भूमिकेतून बघताना आढळतात व त्यात श्री. द. ज. जोगळेकरांच्या पत्रासारखे एखादे पत्र अपवादभूत म्हणून आढळून येते (म. टा. २१ ऑक्टोबर १९७९). मुख्यमंत्री शरद पवार यांनी बोलून दाखवलेल्या ' इतर भाषांतून आलेले आणि जनमानसात रुजलेले शब्द वापरण्याचा वास्तव दृष्टिकोन ठेवला पाहिजे ' या विचारावर एक प्रतिक्रियारूप हे पत्र आहे. त्यात जोगळेकर म्हणतात, ' ज्या इंग्रजी शब्दांसाठी मराठी शब्दच नाहीत त्याबद्दल मुद्दाम अवघड शब्द पाडू नयेत हे ठीक आहे. परंतु मराठी सोपे शब्द असतानासुद्धा बोलताना, लिहिताना त्याऐवजी इंग्रजी शब्द बरेच " सुशिक्षित " (आणि अशिक्षितसुद्धा) वापरतात हे मात्र योग्य नाही. ' यासाठी त्यांनी रस्ता ओलांडणे म्हणण्याऐवजी ' क्रॉस करणे ' हे उदाहरण देऊन ' या प्रवृत्तीमुळें मूळ मराठी शब्दांची प्रचलित भाषेतून हकालपट्टी होऊ लागली आहे ' असे म्हटले आहे. पत्राच्या शेवटी, ' मराठी भाषा जिवंत ठेवावयाची असेल तर मराठी भाषिकांनी बोलताना–लिहिताना इंग्रजी शब्द शक्यतोवर टाळले पाहिजेत. मराठी नाटकांतून सुद्धा केवळ ' वातावरण निर्मिती ' या सबबीखाली पात्रांचे तोंडी इंग्रजी शब्द घालणे टाळले पाहिजे आणि मराठी पुस्तकांना आणि नाटकांना इंग्रजी नावे देता कामा नयेत ' असे काही उपाय सुचविले आहेत.

वरील सर्व लेखनावरून असे दिसून येईल की इंग्रजी भाषेचा मराठीवरील प्रभाव ही गोष्ट व ज्ञानभाषा म्हणून अटळ असणारे इंग्रजीचे स्थान ही गोष्ट मराठी भाषेच्या संदर्भात वेगवेगळ्या निकषांनी विचारात घ्यावयाची आहे. ' ज्ञानी ' माणसाला इंग्रजी भाषा येणे व इंग्रजी भाषा येणाऱ्याला विशिष्ट प्रतिष्ठा त्याच्या ज्ञानीपणामुळे मिळणे या गोष्टी ओघानेच आल्या. या विशिष्ट प्रतिष्ठेमुळे ' छाप पाडण्यासाठी ',' सरावाने ' किंवा दुसऱ्याला समजण्याची अडचण निर्माण होत नसेल तेव्हा सहेतुकपणे किंवा अहेतुकपणे, प्रतिष्ठितांचे अनुकरण करण्याच्या नैसर्गिक हव्यासापायी इंग्रजी वाक्प्रयोग–योग्य रूपाने अथवा अपभ्रष्ट स्वरूपात वापरात राहण्याची शक्यता जास्त आहे. शिवाय महाविद्यालयीन शिक्षणात जेथे जेथे इंग्रजी माध्यम आवश्यक आहे तेथे तेथे इंग्रजी भाषेचे महत्त्व राहणार हे उघड आहे. या माध्यमासाठी इंग्रजी काही प्रमाणात तरी समजले पाहिजे. म्हणून शाळांमधून इंग्रजी विषयही महत्त्वाचा ठरतो. शाळेत इंग्रजी माध्यम असल्याशिवाय कॉलेजचे विषय इंग्रजीतून आत्मसात करणे कठीण जाणार. यामुळे प्रामुख्याने शासकीय स्तरांवर किंवा इतरत्र मराठीची सक्ती केली तरी इंग्रजीच्या मगरमिठीतून

मराठीला सोडवायची असेल तर समाजजीवनाच्या विविध क्षेत्रांच्या संदर्भात अभ्यास करून कोठें इंग्रजीचे ज्ञान आवश्यकच आहे, व कोठे इंग्रजीचे ज्ञान अनावश्यकच आहे याचा प्रथम निर्णय करावा लागेल. ज्या क्षेत्रात इंग्रजी भाषेला अनावश्यक ठरवून सामान्य व्यवहार साधता येईल अशी परिस्थिती असेल तेथे मराठीची उत्कृष्ट जोपासना करून प्रतिष्ठितपणा व इंग्रजी भाषा यांची प्रथम फारकत घडवून आणली पाहिजे. ज्ञानभाषा इंग्रजी व प्रतिष्ठितांची भाषा इंग्रजी असे जे इंग्रजीचे दुहेरी स्वरूप इंग्रजी भाषेच्या मराठीतील सर्वत्र 'संचाराला' कारणीभूत होत आहे त्यापैकी ज्ञानभाषा इंग्रजीचे स्वरूप पालटून माध्यम इंग्रजी एवढेच स्थान तिला कसे राहील हे पाहिले पाहिजे. वेद, उपनिषदे, गीता वगैरे शिकावयाचे असेल तर संस्कृत आले पाहिजे. रशिया, जर्मनी या देशांना जायचे असेल तर रशियन किंवा जर्मन आले पाहिजे, या जशा अपेक्षा असतात तशीच अपेक्षा विशिष्ट क्षेत्रातील ज्ञान मिळवायचे असेल तर मराठी आले पाहिजें अशी निर्माण झाली पाहिजे. मराठी भाषेचा वापर इंग्रजी अनावश्यक क्षेत्रात भरपूर प्रमाणात राहिला. समाजातील विचारवंतांच्या व्याख्यानांत, लेखनात उत्कृष्ट मराठी वापरता आली, ज्ञानभाषा म्हणून मराठीला काही क्षेत्रांत तरी स्थान मिळवून देण्याचा प्रयत्न झाला, तर प्रतिष्ठितपणा व इंग्रजी भाषेचे ज्ञान यांचा अन्योन्य संबंध तुटून पडेल. सर्वच क्षेत्रांतील ज्ञान इंग्रजीतूनच घेतले पाहिजे अशी परिस्थिती जेव्हा पालटेल तेव्हा इंग्रजी शब्दांच्या अनुकरणाची 'खोड' कमी होईल. तसेच बहुभाषिक भारतात विद्वानांचा परप्रांतीयांशी संबंध इंग्रजीद्वारा ठेवावे लागणे ही एक गोष्ट व सामान्यजनांचा परप्रांतीयांशी संबंध इंग्रजीद्वारा ठेवावा लागणे ही दुसरी गोष्ट यांतील फरक उमगून राष्ट्रभाषेचा स्वीकार खुल्या मनाने केला तर इंग्रजीचे प्रभुत्व कमी होण्यास मदत होईल. इंग्रजी भाषेचा प्रभाव फक्त मराठी भाषेवरच आहे असे नसून भारताच्या प्रत्येक प्रांतातील राज्यभाषेवर आहे हे लक्षात घेतल्यास इंग्रजीचे महत्त्व, इंग्रजीची प्रतिष्ठा वेगळ्या संदर्भात स्पष्ट होईल. म्हणून इंग्रजीचे आक्रमण हटवणे ही प्रत्येक प्रांताची स्वतंत्रपणे जेवढी जबाबदारी आहे तेवढीच ती राष्ट्राच्या संदर्भात विचार करण्याची गोष्ट आहे. या दृष्टीने थोडया वेगळ्या संदर्भात 'महाराष्ट्र टाइम्स' मध्ये (६ जून १९७९) म्हटल्याप्रमाणे 'फार लोकांना एकनिष्ठपणे फार काळ काम करावे लागेल' हेच खरे.

४.३. (क) व्याकरणिके :

भाषा सर्वस्वी एकत्रित करून व्याकरणे लिहिणे शक्य नसल्याने व व्याकरणांतील नियम वाचून भाषा वापरली जात नसल्याने कोणत्याही भाषिकाला आपल्या भाषेतील प्रत्यय योजना भाषेत वरचेवर वापरात येणाऱ्या प्रत्यययुक्त शब्दांवरूनच समजत असते. तसेच त्याला प्रत्ययांचे कार्यही भाषा शिकण्याच्या प्रयत्नातून बरेचसे उमगून येत असते. समासांमुळे जोडणीची पद्धती लक्षात येते. कोणता अर्थ अभिप्रेत असता कोणत्या

शब्दांचा कसा समास करावा हे बहुशः अनुभवानेच समजत असते. भाषेच्या या मोडणी-जोडणीसंबंधीच्या ज्ञानाचा वापर करून जेथे आवश्यकता असेल तेथे भाषेत पूर्वी वापरात नसलेले, नवीन नवीन शब्द भाषेच्या वापरात उतरविता येतात. वर्तमानपत्रात लिहिल्या जाणाऱ्या मराठीत अलीकडच्या काळात काही नवीन शब्दप्रयोगांचा वापर आढळून येत आहे. भाषेच्या परिवर्तनशीलतेमुळे बदलत जाणाऱ्या किंवा विकल्पाने वापरात असणाऱ्या रूपांबद्दलची चर्चाही वर्तमानपत्रात काही वेळा केलेली दिसत आहे. लेखनविषयक चर्चाही वर्तमानपत्रात काही वेळा आढळते तर क्वचित वर्तमानपत्रे नवीन प्रकारचे लेखन रूढ करताना दिसतात. लेखनविषयक चर्चांचा समावेश, त्यांचा व्याकरणाशी असलेला संबंध लक्षात घेऊन, सोयीसाठी, याच मुद्द्यामध्ये केलेला आहे. वर्तमानपत्रांत दिसून येणारे, व्याकरणाशी निगडित असे शब्दविशेष पुढील या प्रकारात विभागता येतील (१) प्रत्यय, (२) रूपबंध,[1] (३) समास, (४) शब्दयोजना, (५) लेखन.

(१) प्रत्यय :

ज्या प्रत्ययांचा वापर जुन्या संदर्भाबरोबरच नवीन संदर्भात केला गेल्याने शब्द नवे वाटतात व त्यामुळे लक्ष 'वेधून' घेतात अशांची चर्चा येथे केली आहे.

(i) ई-भवन, ई-करण :

नाम किंवा विशेषण यांना 'इ' प्रत्यय लावून होणाऱ्या रूपबंधापुढे 'भवन' अथवा 'करण' जोडून जे नाम तयार होते, त्याचा अर्थ, 'पूर्वी जे जसे नव्हते ते तसे होणे किंवा करणे' असा होतो. 'स्थिरीभवन' म्हणजे 'जे पूर्वी स्थिर झालेले नव्हते ते आता झाले आहे' व 'विद्युतीकरण' म्हणजे 'जे पूर्वी विद्युतने युक्त नव्हते ते आता केले आहे.' 'ई-करण' व 'ई-भवन' यांचा वापर करून नवनवीन शब्द वापरलेले आढळून येत आहेत. दूरदर्शनवर प्रस्तुतीकरण व प्रस्तुतिकरण (यातील प्रस्तुतिकरण शब्दातून 'ई-करण' काढणे अवघड आहे कारण शब्दघटनेनुसार 'ई' दीर्घ पाहिजे); सरकारीकरण (म. टा. २१ मार्च १९७९). वनीकरण (म. टा. २३ मार्च १९७९), (सामाजिक वनीकरण हा मथळा), शहरीकरण (सकाळ २८ मार्च ७९), डांबरीकरण (सकाळ २३ एप्रिल १९७९), व्यवस्थीकरण (सकाळ १७ ऑगस्ट १९७९), नोकरीकरण (म. टा. ६ जून १९७९).

अकारान्त अथवा ई, इ-कारान्त शब्दांना 'इ' प्रत्यय लावताना होणारे रूपबंध परिचयाचे व भाषेतील इतर शब्दांनुसार वाटतात. पण काही शब्द असे आढळतात की

१. रूपबंध = इंग्रजीतील Form रूपे (morphs) एकापुढे एक ठेवून होतो तो.

त्यातील 'ई' प्रत्यय काढून टाकल्यावर उरलेला शब्द समजून घेणे कठीण जाते व जर असे शब्द शुद्ध मानायचे ठरवले तर व्याकरणकाराला शब्दघटनेत नव्या नियमांची भर घालावी लागेल. उदा०, व्यवस्थीकरण (सकाळ १८ ऑगस्ट १९७९) – व्यवस्था अधिक ई–करण असे सांगताना 'आ अधिक इ = ई' असा संधिनियम मान्य करावा लागेल.

पुढील शब्दांपैकी कोणते शब्द शुद्ध मानायचे व कोणते नाहीत, जे मानावयाचे नाहीत त्यांच्यासारख्या शब्दघटना का करू नयेत याची दिशा व्याकरणात द्यावी लागेल व त्यांना शुद्ध मानावयाचे ठरले तर त्याप्रमाणे नियम देऊन त्यांची व्यवस्था करणे भाग पडेल. उदा०, औद्योगिकरण (सृष्टिज्ञान मासिक, गर्गे यांचा लेख, जाने. ७९) – उद्योग अधिक ई अधिक करण की तेथे औद्योगिकीकरण शब्द आवश्यक आहे, औद्योगिकरण चूक आहे असे ठरवायचे? राष्ट्रीकरण (सकाळ ८ मे १९७९ – पत्र – 'पुन्हा राष्ट्रीकरणाचा वाद हा विचारांना चालना देणारा लेख वाचला' – येथे 'राष्ट्रीकरण' ऐवजी 'राष्ट्रीयीकरण' पाहिजे होते काय? कारण राष्ट्रीकरण – जे राष्ट्र नव्हते त्याला राष्ट्र करणे व राष्ट्रीयीकरण – जे राष्ट्रीय नव्हते ते राष्ट्रीय करणे, असे अर्थ होतात.

नोकरीकरण, रुंदीकरण सारखे शब्द दोन प्रकारे सोडवता येतील – 'नोकर अधिक ई अधिक करण किंवा नोकरी अधिक करण'. रुंद अधिक ई अधिक करण किंवा रुंदी अधिक करण. अशा परिस्थितीत नियमांची स्पष्टता आवश्यक राहील.

वनीकरण या शब्दाच्या सामान्य रूपासाठी 'आ' व 'या' अशा दोन प्रकारच्या प्रत्ययांचा वापर 'महाराष्ट्र टाइम्स' (२३ मार्च १९७९) मध्ये 'वनीकरणाचे व 'वनीकरण्याचे' या शब्दात वापरला गेलेला आढळला. यातील चूक-बरोबर ठरवणे आवश्यक आहे. वनीकरणाचे हा शब्द 'वनीकरण अधिक आ अधिक चे' असा घडलेला वाटतो तर 'वनीकरण्याचे' हा शब्द 'वनीकरणे अधिक आ अधिक चे' असा घडलेला वाटतो. 'वनीकरण्याचे' या शब्दात वनी अधिक करण्याचे अशा काहीशा समजुतीने चुकीचा शब्दप्रयोग झाला असावा.

(ii) इक,–ईक :

इक, ईक प्रत्ययांचा वापर केले गेलेले काही शब्द पुढीलप्रमाणे वर्तमानपत्रांत आढळून आले आहेत :

सामईक यादी (सकाळ ३ मे ७९), प्रायोगिक परीक्षा (सकाळ ५ मार्च ७९), सांख्यिकमध्ये (म. टा. ५ एप्रिल ७९), प्रात्यक्षिक परीक्षा (म. टा. १२ एप्रिल ७९), सामाजिक शाप (म. टा. २५ मार्च ७९), श्रमिक विद्यापीठ (म. टा. २७ मार्च ७९), सामुद्रिक शाळा (सकाळ २६ एप्रिल ७९), यांत्रिक गणपती (म. टा. १६ सप्टेंबर १९७८), पायिकाच्या (सकाळ १७ सप्टेंबर १९७९).

'सामईक' शब्दांतील 'ईक' प्रत्यय काढल्यावर मूळ शब्द कोणता हे स्पष्ट होत नाही. 'सकाळमध्ये 'यी' बद्दल 'अी' लिहिण्याचा–(उदा. सवयीबद्दल सवअी,

सोयीबद्दल सोअी असा) बराच प्रचात आढळतो तो लक्षात घेतला तरच सामअीक = समय अधिक ईक असा रूपबंध समजू शकेल. प्रायोगिक परीक्षा हा प्रायोगिकचा नवा संदर्भ, त्याची प्रायोगिक रंगभूमी या जुन्या संदर्भात तुलना केल्यास अपेक्षित अर्थ न दाखवता वेगळाच अर्थ दाखवील हे उघड आहे. सांख्यिक व पायिक ही नामे वापरली गेली असून ' पायिक ' शब्दाने लेखकाला नेमके काय म्हणावयाचे आहे हे वाच्यार्था-वरून किंवा शब्दघटनेवरून स्पष्ट होत नाही (' उपयुक्तता शिक्षणाचा गाभा असून सुसंस्काराच्या कवचातच तो पायिकाच्या पदरात पडावा '). प्रात्यक्षिक, सामाजिक व श्रमिक शब्दातील एक प्रत्यय वरील संदर्भात रूढ संदर्भापेक्षा (प्रात्यक्षिके, सामाजिक सुधारणा व श्रमिक कामगार) वेगळ्या अर्थाने वापरलेला आढळतो. त्यामुळे तो पुरेसा अर्थवाही नसण्याचा संभव उद्‌भवतो. यांत्रिक गणपती व यांत्रिक हालचाल, सामुद्रिक शाळा व सामुद्रिक हवामान या शब्दप्रयोगांची तुलना केल्यास यांत्रिक गणपती व सामुद्रिक शाळा हे शब्दप्रयोग योग्य अर्थ व्यक्त करीत नाहीत असे म्हणावे लागते, किंवा ' इक ' प्रत्यय रूढ अर्थाशिवाय आणखी काही अर्थ व्यक्त करतो असे म्हणणे भाग पडते.

(iii) **ईय,–ईन :**

संघीय, वर्तमानपत्रीय, न्यायालयीन, उच्चवर्णीय, राष्ट्रीय इत्यादी शब्द आज बरेच रूढ झालेले आढळून येतात. –आय, –इन या प्रत्ययांनी विशेषणे साधली जातात, त्यांचा –ईक, –इक या प्रत्ययांनी साधल्या जाणाऱ्या विशेषणांशी नेमका फरक कोठे पडतो ते लक्षात घेणे जरुरीचे आहे. ' य–कारान्त ' शब्द ' इन ' प्रत्यय घेतात व इतरत्र ' ईय ' प्रत्यय येतो का तेही पाहणे आवश्यक आहे, परंतु ' वर्तमानकालीन ' मध्ये ' ल ' नंतर ' ईन ' प्रत्यय आलेला आढळतो त्याचा खुलासा करणे आवश्यक होईल. प्रमाण मराठीच्या व्याकरणात अशा प्रकारच्या माहितीचा अंतर्भाव अपेक्षित राहीलच. ' राष्ट्रीय बचत योजना ', ' राष्ट्रीय बाणा व राष्ट्रीय संकटे ' या सर्व शब्द-प्रयोगात ' राष्ट्रीय ' शब्द एकाच अर्थाने वापरला गेला असल्यास तो अर्थ, भिन्न अर्थांने वापरला गेल्यास ते अर्थ सांगणे व्याकरणकाराला भाग पडेल. संघीय लोक व सांघिक लोक यात फरक कोणता, यांसारख्या गोष्टी स्पष्ट करून–इक, –ईक, –ईय व –ईन प्रत्ययांच्या वापरासंबंधी निश्चित विधाने करून त्यांच्या वापराची दिशा दाखवून दिली नाही तर त्या प्रत्ययांचे अर्थ संदर्भावरून जाणण्याची वेळ वाचकावर यावयाची. मराठीच्या अभिवृद्धीला अशा तऱ्हेने अर्थ संदर्भावर सोपवणे अनवस्थाकारक ठरण्याची भीती निश्चितच राहते.

(iv) **–ता :**

' –ता ' या प्रत्ययाने भाव दर्शवणारा शब्द तयार होतो; ' –पणा ' या प्रत्ययानेही भाव दर्शवणारा शब्द तयार होतो. आज भावुकता, नाजुकता, सुंदरता, समानता, ग्राहकता

अशा प्रकारचे शब्द वापरात आलेले दिसत आहेत. –ता व –पणा हे प्रत्यय अर्थाच्या दोन भिन्न छटा दाखवतात, सुंदरता–सुंदरपणा, चतुरता–चतुरपणा किंवा सौंदर्यशीलता–सौंदर्यशीलपणा या शब्दांवरून त्या स्पष्ट होतील. नवव्याकरणकाराने या छटा स्पष्ट केल्या नाहीत तर योग्य अर्थासाठी कोणता प्रत्यय वापरावा हे उलगडणार नाही, अर्थात व्याकरणकाराचे हे काम आहेच असे नव्हे, पण जाणीवपूर्वक भाषा वापरणाराला मार्गदर्शन करण्याचे व्याकरणाचे कार्य नाकारणे फार अवघड आहे.

(v) ' अ ' उपसर्ग :

' अ ' उपसर्गाने नकार दाखवल्या जाणाऱ्या संस्कृतमधील शब्दजोड्यांपैकी मराठीत पुष्कळदा एकच शब्द वापरात असलेला आढळून येतो. उदा०, भाव–अभाव मधील अभाव, असुंदर सुंदर मधील सुंदर, न्याय्य-अन्याय्य मधील न्याय्य. तसेच ' अ ' च्या वापराने नकारयुक्त शब्द तयार केलेले आढळून येतात, परंतु नकारयुक्त (मराठीत असलेला) शब्दातून ' अ ' वजा करून उरलेला शब्द मराठीत वापरण्याचा प्रकार पाहण्यात आला आहे. उदा०, अश्लीलपासून श्लील शब्द (तरुण भारत ६ मे, १९७९).

(vi) या अधिक त :

' ये ' या धातूच्या ' या ' या इच्छा व्यक्त करणाऱ्या रूपबंधापुढे ' त ' प्रत्यय वापरलेला आढळतो. ' आपण काय करूयात ', ' न्यू इंग्लिश स्कूलमध्ये सभा घेऊयात ' (ज्ञान प्रबोधिनीने पंतप्रधान देसाई यांच्या आगमनानिमित्त काढलेले पत्रक क्र. २). करूयात हा एक शब्द मानायचा की दोन ? ' त ' प्रत्ययाला प्रामाण्य द्यावे की नाही हा विचारात घेण्याचा प्रश्न राहील. ' करूयात, देऊयात ' सारखे शब्दप्रयोग शब्दच्छेदकाच्या दृष्टीने एका शब्दासारखे वाटतात. हा ' त ' प्रत्यय ' नको–नकोत ' सारख्या रूपातून अनेकवचनाचा निदर्शक आला आहे काय ?

(vii) सामान्यरूपाचे प्रत्यय :

– ' या ' या विशेषणाच्या सामान्यरूपाचा प्रत्यय आकारान्त विशेषणापुढे येतो. स्वामी शिवतत्त्वानंद यांनी आपल्या पुस्तकात ' लहान्या गच्चीवर ' असा शब्दप्रयोग केला आहे. ' लहान्या ' या शब्दातील मूळ रूप ' लहान ' मानावयाचे की ' लहाना ' यावर त्याचे व्याकरण आधारावे लागेल.

– सरकारमान्य शुद्धलेखनानुसार णे–कारान्त नामाचे सामान्यरूप–ण्याकारान्त करावे असे सांगितलेले असले, तरी ते प्रत्ययाने युक्त स्वरूपात काही ठिकाणी वापरलेले आढळते. उदा०, ती मिळणेबाबत....(सकाळ २२ मार्च ७९), यातील णे–नंतरच्या प्रत्ययाला मान्यता द्यावी की नाही ? कारण हा प्रत्यय महाराष्ट्राच्या काही भौगोलिक क्षेत्रात, वकीलवर्गाच्या भाषेत किंवा मुद्रणसुलभतेसाठी सकाळसारख्या वर्तमानपत्रात वापरात असलेला आढळून येतो.

– श्री. के. क्षीरसागर यांनी काही सामान्यरूपे अशुद्ध मानावीत असे म्हटले आहे. बियाणे शब्दाचे सामान्यरूप बियाणा–नको बियाण्या–पाहिजे; काकाकुवाचे काकाकुव्या-पाहिजे काकाकुवा–नको.

(२) रूपबंध :

काही शब्दांचे काही विशिष्ट रूपबंध लक्ष वेधून घेतात, त्यांना प्रमाण ठरवावे की नाही असा प्रश्न पडतो. अशा रूपबंधामध्ये व्याकरणाची वेगळ्या प्रकारची रूप–योजना असते असे नाही तर विशिष्ट शब्दांचा वेगळ्या प्रत्ययांच्या संदर्भात वापर आढळून येत असतो; अशा प्रकारचे काही शब्द पुढीलप्रमाणे :

– ' ही दोन जलाशये ' (गर्गे, सृष्टिज्ञान, जाने. १९७९) जलाशय हे पुल्लिंगी नाम, त्याचे अनेकवचन माणूस–माणसे या पद्धतीवरचे.

– ' जीनुसार ' (केसरी, १७ जून १९७७, पॅरिसचे वार्तापत्र) ' ज्यानुसार ' या शब्दाची अपेक्षा असते पण घरानुसार, मुलानुसार यातील ' अनुसार ' ऐवजी ' नुसार ' प्रत्यय वाटून शब्दयोजना होते.

– ' खाद्यालय ' (योगमाया, खानविलकर) ' खाद्य ' हा शब्द नाम समजण्याची सवय नसल्याने ' खाद्यालय ' हा शब्द ' मत्स्यालय ' या शब्दाच्या पद्धतीवर असूनही वेगळा वाटतो.

– ' सकारात्मक ' (तरुण भारत २५ मार्च १९७९) ' नकारात्मक ' या शब्दाशी सुसंगत असा स–सह या रूढ अर्थाने बनवलेला शब्द ' नकार ' शब्द जसा वापरात आहे तसा ' सकार ' शब्द नसल्याने योग्य वाटत नाही.

– ' गत आठवड्यात ' (सकाळ १० जुलै १९७९) ' आठवडा ' या शब्दाबरोबर ' गत ' या विशेषणाची सवय नसल्याने ते खटकते. साधारणपणे ' गत 'च्या योगाने सामासिक शब्दाची मनात कोठेतरी कल्पना असते—गतस्मृती, गतसाली वगैरे.

वरीलप्रमाणे अनेक शब्दांची उदाहरणे देता येतील. त्यांपैकी काही कर्तुकी (म. टा. ६ मे ७९), अंशदायी (सकाळ १२ एप्रिल ७९), मानसेवी (सकाळ २१ मार्च ७९), मधुमेही (नाम) (सकाळ १२ एप्रिल ७९), न कळत्याला (सकाळ २१ मार्च ७९) अशा अनेक शब्दांचे वापर जसे लक्ष वेधून घेतात तसेच शब्दांच्या विशिष्ट शब्दप्रयोगावरील मान्यामान्यताविषयक चर्चा लक्ष वेधून घेतात. त्यांपैकी काहींची उदाहरणे पुढीलप्रमाणे देता येतील :

– करेन, मारेन (नी. शं. नवरे, म. टा. २७ डिसेंबर ७८) ही रूपे अमान्य करावीत. भविष्यकाळात सकर्मकांना ईन व अकर्मकांना–एन प्रत्यय लावावा. याउलट श्री. खैरनार यांच्या मते ' एन ' प्रत्यययुक्त शब्द बरोबर मानावेत.

– ' भाषेत ' (श्री. के. क्षीरसागर, म. टा. ६ मे ७९) या शब्दाचा अर्थ एका भाषेत असा होतो. अनेकवचनात ' भाषेत ' न म्हणता ' भाषांत ' हा शब्द वापरावा.

'दोन्ही सीमेवर' असा शब्दप्रयोग चूक असून 'दोन्ही सीमांवर' असे पाहिजे (अरणकल्ले, म. टा. १३ जाने. ७९).

–'गोलने' हा प्रयोग चूक असून एकवचनी 'गोलाने' व अनेकवचनी 'गोलांनी' असे पाहिजे (अरणकल्ले, म. टा. १३ जाने. ७९).

–'दहा रुपयाला' हा शब्दप्रयोग चूक असून 'एक रुपयाला' व 'दहा रुपयांना' हे शब्दप्रयोग बरोबर आहेत (अरणकल्ले, म. टा. १३ जाने. ७९).

–'जाऊन, येऊन' ही शब्दयोजना बरोबर असून त्याऐवजी 'जावून, येवून' वापरण किंवा 'जेवून' ऐवजी 'जेऊन' वापरणे चूक आहे (अरणकल्ले, म. टा. १३ जाने ७९).

–'दोन्ही, तिन्ही' या शब्दांऐवजी दोनही, तीनही असा काही जण शब्दप्रयोग करीत असल्याचे श्री. के. क्षीरसागरांनी दाखवले आहे (म. टा. ६ मे ७९).

(३) समास :

दोन शब्द एकापुढे एक ठेवून समास होतो. समासात या शब्दांच्या विशिष्ट क्रमाला महत्त्व असते. या दोन शब्दांचा वाक्यात वापर केला असता ज्या प्रत्ययांची किंवा जोडणाऱ्या शब्दांची आवश्यकता लागली असती ते गाळून समासाची रचना होत असते. परंपरेने आलेले संस्कृतमधील सामासिक शब्द मराठीत अस्तित्वात राहतात, त्यांच्या अनुकरणानेही मराठीत नवीन समासांची भर पडत असते. मात्र हे नवे समास सोडविताना ज्यांच्या अनुकरणामुळे ते बनले असतील त्यांच्या विग्रहाप्रमाणे सोडविता येतीलच असे नाही. साम्याभासाने पुष्कळदा हे समास घडले जातात. त्यामुळे विग्रह त्या त्या समासानुसार करणे उचित ठरते.

–'फूटपूर्व' (सकाळ २२ एप्रिल ७९) हा समास 'भूतपूर्व'सारखा वाटतो परंतु 'पूर्व'च्या आधी येणारे 'भूत' व 'फूट' हे शब्द व्याकरणदृष्ट्या भिन्न आहेत. तरीही 'फूटपूर्व' हा शब्द 'भूतपूर्व' या शब्दाशी समांतररचनेचा वाटतो.

–'सर्पकातींची निर्यात' (म. टा. १२ एप्रिल ७९, मथळा). 'सर्प' संस्कृत शब्द व 'कात' मराठी शब्द असूनही, 'सापकात' असा दोन्ही मराठी शब्दांचा समास होणे शक्य असूनही, तसा खटकत नाही. उलट 'सापकात' कसातरी वाटतो याचे कारण शोधण्याजोगे आहे.

–'छन्दोवर्ग' (म. टा. २२ एप्रिल ७९) हा समास 'मनोरचना, मनोभूमिका' या पद्धतीचा असून मराठी समासाप्रमाणे 'छन्दवर्ग' व्हावयास पाहिजे परंतु 'छन्दोरचना' या परिचयाच्या शब्दातील 'छन्दो' या रूपावरून साधला गेलेला दिसतो.

–'महिनोमास' (सकाळ २८ मार्च ७९) हा समास 'महिनोन्महिने' (सकाळ १० एप्रिल ७९, प्रवीण मसालेवाले यांची जाहिरात) यातील 'महिनो' सारख्या रूपाशी परिचय असण्याच्या प्रवृत्तीतून किंवा 'दारोदार' मधील 'दारो' या

रूपाची सवय असण्यातून व ' आणि ' दर्शक ' न् ' शब्दाच्या वापरातून झालेला वाटतो. कदाचित ' वर्षानुवर्षे ' यातील ' अनु 'चा निदर्शक ' न ' असू शकेल. पण दोन तीन प्रकारच्या समासरचना व संस्कृतमिश्र मराठी असा काहीसा हा समास तयार झाला आहे. ' महिनोन्महिने ' यासारख्या शब्दातील ' न ' गळूनही ' महिनो ' (मराठी अधिक ' मास ' संस्कृत) असा पैसाअडका पद्धतीचा समास तयार झाला असावा. ' महिनेन्महिने, वर्षानुवर्ष, वर्षन्वर्ष, दारन्दार, दारोदार ' अशा अनेक शब्दांचे अकल्पित मिश्रण ' महिनोमास ' या समासात झालेले आढळते.

–' खेळकर '–' सुखकर, दुःखकर ' या शब्दातील ' कर ' व ' खेळकर ' मधील ' कर 'चे अर्थ भिन्न असल्याने ता. २२ फेब्रु. ७९ ला दूरदर्शनवर – ' अशा प्रकारचे खेळकर कार्यक्रम....आम्ही सादर करणार आहोत ' या निवेदनातील ' खेळकर ' शब्द खटकल्याशिवाय राहात नाही. तसेच दूरदर्शनवरील ' भाताची पुनर्लागण ' हा कार्यक्रमाचा मथळा ' लागण ' आपोआप होते, ' लावणी ' करावी लागते हे अर्थ लक्षात येताच अयोग्य वाटल्याशिवाय राहात नाही.

समास प्रक्रियेचा उपयोग करून अनेक नवीन समास वर्तमानपत्रीय मराठीत किंवा काही पुस्तकांच्या मराठीत उतरवले जात असताना आढळून येत आहेत. त्यांची काही उदाहरणे पुढीलप्रमाणे : ' पानगादी ' (सकाळ २३ मार्च ७९), तेलदर (सकाळ ७ मे ७९), शेतमाळ, अंशदायी (सकाळ ३० एप्रिल ७९), मदतरूप (म. टा. ३ जाने. ७९), लोकवर्गणी (सकाळ ११ एप्रिल ७९), बोलीदार (सकाळ २१ सप्टेंबर ७९), उपसासिंचन (सकाळ २१ सप्टेंबर १९७९).

काही मूळचे संस्कृत समास मराठी पद्धतीने–(संस्कृत संधिविरहीत) करण्याची अथवा लिहिण्याची प्रवृत्ती इतर वाङ्मयात आढळून येत आहे. उदाहरणार्थ, सत्शील, जगत्गुरू, चित्शक्ती, जगत्श्रम, मनावस्था वगैरे.

(४) विशिष्ट शब्दयोजना :

शब्दांची अयोग्य रचना किंवा त्यांचा अयोग्य ठिकाणी वापर यामुळे वास्तविक जो अर्थ व्यक्त व्हावयाचा तो अर्थ व्यक्त न होण्याचे प्रकारही वर्तमानपत्रांच्या भाषेत[1] आढळून येतात. या सदोष शब्दरचना वाक्यांशात किंवा क्वचित वाक्यातही शब्दाचा अचूक वापर न झाल्याने घडू शकतात याची काही उदाहरणे पुढीलप्रमाणे देता येतील.

– ' शुष्क पुष्परचना प्रदर्शन ' (जाहिरात, सकाळ १७ मार्च १९७९)– यातील ' शुष्क ' शब्द वस्तुतः ' पुष्प ' शब्दाचे विशेषण आहे, परंतु तो समासयुक्त न लिहिता सुटा शब्द लिहिल्याने ' प्रदर्शन ' या शब्दाचे विशेषण होण्याची आपत्ती

१. वर्तमानपत्रांच्या भाषेत म्हणजे वर्तमानपत्रात वापरल्या गेलेल्या भाषेत, मग ती भाषा पत्रकाराची असो वा इतर कोणाचीही असो.

ओढवली आहे.

–' मराठवाडा दंगलीची न्यायालयीन चौकशी आपोआप व्हावी ' (सकाळ १ मे १९७९) या वाक्यातील आपोआप शब्द संदर्भदृष्ट्या अयोग्य वाटतो. एखादे काम आपोआप होते. चौकशी आपोआप कशी होणार, हा प्रश्न पडतो.

–' पौष्टिक अन्नापायी निकामी बनलेले बैल....याऐवजी पौष्टिक अन्न न मिळाल्याने....असे पाहिजे होते ' (म. टा. २७ एप्रिल १९७९) या विधानाने ' पायी ' चा चुकीचा वापर निदर्शनास आणला गेला आहे.

–' तो सहा महिन्यांसाठी दिल्लीला गेला आहे ' व ' गेल्या बारा वर्षांपासून ही संस्था बंद आहे ' या दोन वाक्यांची उदाहरणे देऊन श्री. के. क्षीरसागर यांनी ' साठी ' व ' पासून 'चा अयोग्य संदर्भातील वापर दाखविला आहे (म. टा ६ मे १९७९), यातील ' –साठी चा उपयोग हिंदी ' के लिए 'च्या वळणावर गेला आहे व ' पासून ' या शब्दयोगी अव्ययाचा उपयोग जरूर नसताना केला आहे, ' बारा वर्षे संस्था बंद आहे ' असे लिहिणे अधिक अर्थवाही आहे असे निदर्शनास आणले आहे.

–' यामुळे केवळ अधिक प्रकाश पडणार असे नसून या भागाची शेतीही वाढणार आहे ' (सकाळ २२ मे ७९) यातील ' केवळ ' या शब्दाचा अर्थ ' फक्त अधिक प्रकाश पडणार आहे असे नसून ' शिवाय ' इतका घ्यावयाचा आहे.

अशा सदोष रचना, लेखनाकडे काटेकोरपणे पाहण्याची दृष्टी नसल्याने जशा होतात, तशाच शब्दांच्या वापरांच्या किंवा व्याकरणाच्या योग्य ज्ञानाअभावीही होत असतात. काही वेळा ' अर्थ समजला की झाले ' या वृत्तीतून होतात तर काही वेळा दुसऱ्या भाषेचा मनावर पगडा असला तरी होतात.

(५) लेखन :

वर्तमानपत्रातील लेखन बहुशः सरकारमान्य लेखनविषयक नियमांना धरून केलेले आढळते. त्यातील कित्येक चुकांबाबत, वर्तमानपत्रांचे रोजच्या रोज नवे जीवन घेऊन येण्याचे कार्य पाहता मुद्रणदोषांमुळे असण्याची शक्यता नाकारता येत नाही. परंतु ज्याला पत्रकार जबाबदार नसतात असे अनौपचारिक लेखन प्रामुख्याने जाहिरातींचे होय, त्यात ' इ, ई ' बद्दल त्यातील कोणतेतरी एक अक्षर व ' उ ऊ 'बद्दल त्यातील कोणतेतरी एक अक्षर वापरण्याची प्रवृत्ती आढळून येते. हीच प्रवृत्ती पुष्कळदा दूरदर्शन-वरील कार्यक्रमांच्या मथळ्यातही आढळून येते. हे पाहता ऱ्हस्वदीर्घ स्वरांपैकी कोणता-तरी एक स्वर लिहिणाऱ्या व्यक्तीच्या मनात ' ऱ्हस्वदीर्घ लेखनाचा भाषेचे व्याकरणिक अंग दाखविण्याच्या कार्यात काही हातभार असेल ' याची कल्पना तरी कधी येत असेल की नाही याची शंका आल्यावाचून राहात नाही. या ऱ्हस्वदीर्घ लेखनातील स्वातंत्र्याची काही उदाहरणे पुढीलप्रमाणे देता येतील. ' शरद वेलणकर संपादक, **गुढविद्या** ' (तरुण भारत २५ मार्च ७९), ' तुम्ही त्यांना तसेच **पिडीत** ठेवणार का ? ' (म. टा.

२६ नोव्हें. ७८), ' नववधुला पुर्वीचा अनुभव नसला तरी तीला.... ' (सकाळ २६ मार्च ७९), ' यमुनातिरी ' (तरुण भारत, १५ एप्रिल ७९), सिल्क म्युझिअमच्या अद्वितिय साड्या ' (सकाळ ६ एप्रिल ७९), ' दृष्टीकोन ' (दूरदर्शन १० एप्रिल ७९), ' भूईमूग ' (दूरदर्शन), ' सुचिचित्र ' (सकाळ २५ मे ७९).

लेखनविषयक सरकारी नियमांवर चर्चा करणारे लेख गेल्या वर्षभराच्या कालखंडात आढळून आले नाहीत. ता. २६ ऑगस्ट १९७९ च्या महाराष्ट्र टाइम्समध्ये द. भि. कुलकर्णी यांनी एक सविस्तर लेख लिहून या नियमांतील त्रुटी दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. अठरा वर्षांचा काळ उलटूनही हे नियम मराठी माणसाच्या अंगवळणी पडलेले नाहीत असे का ? अशी पृच्छा केली आहे. याचे उत्तर शोधताना ' शुद्धलेखनाचे नियम ' नजर सरावण्याने बरोबर वापरता येतात परंतु वृत्तपत्रातील घाईगर्दीतले स्वैर लेखन, जुन्या पोथ्यांतील नियमयुक्त लेखन, १९३० च्या आधीचे जुने लेखन आणि १९६१ च्या आधीचे नवे लेखन या साऱ्यांचा एक चमत्कारिक संमिश्र संस्कार वाचकांच्या ग्रहणशक्तीवर व धारणाशक्तीवर होत असतो, त्यात भर म्हणून सदोदित नजरेसमोर हिंदी मजकूर येतो, असे म्हटले आहे. तसेच महामंडळाचे नियम संदिग्ध व सदोष असल्याने लेखन करणारे नागरिक ते वापरू शकत नाहीत असेही म्हटले आहे. पहिल्या नियमात स्पष्टोच्चारित अनुस्वार द्यावे असे सांगायचे व लगेच पुढील दोन नियमांत त्याहून वेगळ्या अनुस्वाराची सूचना द्यावयाची यामध्ये एक प्रकारची विसंगती निर्माण होते, हे दाखवून दिले आहे. श्री. कुलकर्णी यांनी 'शीर्षबिंदु' या मथळ्याखाली नियम द्यावेत असे सुचविले आहे. या नियमांच्या अंमलबजावणीसाठी येणारी दुसरी अडचण, सामान्य नागरिकांच्या दृष्टीने तत्सम-तद्भवभेद जाणण्याची आहे, असे विधान करून श्री. कुलकर्णी म्हणतात, ' संस्कृतचे उत्तम ज्ञान असल्याशिवाय तत्सम-तद्भव हा भेद कसा करणार ? कारण तत्सम-तद्भव भेद स्पष्ट करणारा कुठलाही वस्तुनिष्ठ निकष महामंडळाने दिलेला नाही. एवढेच नव्हे तर संस्कृत-मराठीचे संबंध लक्षात घेता कोणी तो देऊ शकेल, असेही वाटत नाही. श्री. कुलकर्णी यांनी असा प्रश्न विचारला आहे, ' कीर्ती, प्रीती ' इत्यादी शब्दांतील पहिल्या अक्षरांना तत्सम शब्दांचा नियम व दुसऱ्या अक्षरांना तद्भव शब्दांचा नियम लागू करावा लागतो, याला सुसंगती कोण म्हणेल ?

श्री. कुलकर्णी यांच्या या लेखामुळे आजच्या काळातील मराठीच्या भाषिक प्रतिष्ठिताची लेखनविषयक नियमांबाबतची एक प्रातिनिधिक विचारसरणी व्यक्त झाली आहे असे म्हणायला हरकत नाही.

४.४. आढावा व भाषिक दळणवळणाचे प्रथम, मध्य, उच्च स्तर :

वर्तमानपत्रातील भाषाविषयक विचार व भाषेच्या वापराच्या विशिष्ट दिशा यांचा एकत्रित विचार करता असे दिसून येते की बऱ्याचशा चर्चा मराठीच्या शब्दभांडाराबाबत,

त्यातही प्रामुख्याने पारिभाषिक संज्ञा व मराठीवरील अन्य भाषांचे परिणाम या संदर्भात आढळतात. वर्तमानपत्रात विविध व्यक्तींनी वापरलेल्या भाषाविशेषांच्या व्याकरणिक अंगांच्या अभ्यासावरून मराठी भाषेच्या व्याकरणिक क्षेत्रातील नव्या प्रयोगांची किंवा हालचालींची कल्पना काही प्रमाणात मिळत असली तरी, तसेच मराठीतील प्रत्ययांच्या वापराच्या काही दिशा स्पष्ट होत असल्या तरी मराठी भाषाविषयक चर्चा बहुतांशी मराठीच्या शब्दसंपत्तीशी निगडित अशा आहेत. या चर्चा मूलतः भाषासल्लागार मंडळाच्या कार्यामुळे निर्माण झालेल्या असून शासन व मराठी समाज यांच्या भाषांत आकलनाची घनता कशामुळे दाट राहील व कशामुळे विरळ राहील या प्रश्नाशी निगडित अशा दिसून येत आहेत.

सामान्य माणसाचा दैनंदिन व्यवहार, सर्व समाजाचा सामाजिक व्यवहार आणि ज्ञानार्जनाचा व्यवहार हे सर्व परस्परांशी संलग्न असे भाषिक व्यवहार असले तरी त्यांचा सामान्य संबंध फार थोड्या क्षेत्रांत राहणार असतो. पोलीस खात्यातील ‘ पोलीस ’ या हुद्द्यामुळे वापराव्या लागणाऱ्या भाषेचा संबंध सर्वसाधारण माणसाशी फार थोड्या प्रमाणात असतो. हा जेथे जेथे येणार असेल तेवढ्यापुरतीच सर्वसामान्याला कळणाऱ्या भाषेची जरुरी असते. तसेच ‘ खांबाला टेकून उभे राहू नये. धोका ’ येवढे वाचता आले तरी सामान्य व्यवहाराला पुरेसे असते. वीजप्रवाहामुळे होणाऱ्या अपघातांच्या शास्त्रीय ज्ञानाची त्या वेळी त्याला किंवा त्याच्याकडून अपेक्षा नसते; उभे न राहण्याची क्रिया घडणे हे अधिक महत्त्वाचे असते. ‘ लिफ्ट नादुरुस्त ’ किंवा ‘ लिफ्ट चालू नाही ’ या पाटीमुळे लिफ्ट का चालू नाही हे पाहण्यापेक्षा ती केव्हा चालू होईल याच्याशीच सर्वसाधारण माणसाचा संबंध जास्त असतो.

अन्न, वस्त्र, निवारा, संरक्षण यांसारख्या मानवाच्या मूलभूत गरजांबाबतची किंवा इतर काही मोजक्या गोष्टींबाबतची भाषा ही एकभाषिक समाजातील सर्व माणसांना जास्तीत जास्त घन आकलनाची भाषा असावी लागते. याखेरीज वापरात येणारी भाषा पुष्कळशी व्यवसायसापेक्ष असते. सुतारकामासाठी लागणारी भाषा गवंडीकामासाठी लागणाऱ्या भाषेपेक्षा शब्दभिन्नतेने युक्त असते. भाषेचे व्याकरण भिन्न नसून प्रत्येकाच्या नित्य वापराच्या धंदाविषयक शब्दसंपत्तीत फरक राहतो. ‘ करवत, पटाशी, पाटी ’ सारखे अनेक शब्द सर्वसामान्य माणसाला माहीत असण्याची शक्यता असली तरी ‘ ओळंबा, थापी, बाटली, त्रिकोण, माल ’ यासारखे शब्द व्यवसायसापेक्षतेने वापरात राहतात. ‘ तुला चांगला इंगा दाखवला पाहिजे ’ या वाक्यातील ‘ इंगा ’ शब्दाचा अर्थ चर्मकाराला ज्या प्रकारे माहीत असतो त्या प्रकारे सर्वसामान्य माणसाला माहीत असण्याची शक्यता नसते. जीवनासाठी आवश्यक अशी किमान भाषा शिकल्यानंतर व्यक्तीच्या आयुष्यात होणारी भाषासमृद्धी ही व्यक्तिगत असते, मुद्दाम शिकण्याची गोष्ट असते हे लक्षात घेता भाषेचे, वापराच्या दृष्टीने काहीसे कृत्रिम असे, दोन भेद दाखवता येतील – एक, शिकली जाणारी भाषा आणि दुसरा, शिकावी लागणारी भाषा.

जन्मापासून वय जसजसे वाढत जाईल तसतशी जगण्यासाठी अत्यावश्यक असणारी, समाजजीवनासाठी अविभाज्य घटक बनू पाहणारी, प्राथमिक थरावरची भाषा ही शिकली जाणारी भाषा असते. ती अर्थातच ' सोपी ' असते. जेथे भाषेचा वापर भाषेची ' चाल ' पाहून काळजीपूर्वक किंवा काटेकोरपणे केला जातो ही उच्च-स्तरावरची भाषा असून ती नेहमीच ' अवघड ' असते. या दोन्ही स्तरांवरच्या भाषांची सांधेजोड करणारी भाषा ती मध्यमस्तरावरील भाषा. या मध्यमस्तरावरच्या भाषेतील शब्दांच्या बाबतीत सोपे-अवघड, कृत्रिम-सहज, अस्सल-उसने इत्यादी विशेषणे लागू पडू शकतात. सोपी, मध्यम किंवा अवघड भाषा यासंबंधी दळणवळणाच्या आकलन-घनतेच्या प्रमाणात असे म्हणता येईल की, समाजातील कोणत्याही माणसाशी सर्वांत घन असणारी भाषा तळाच्या किंवा खालच्या थरावरची, मध्यम घन असणारी भाषा मध्यथरावरची व विरळ आकलन असणारी भाषा उच्चथरावरची असे म्हणता येईल.

समाजजीवनातील भाषेच्या वापराचे हे तीन थर लक्षात घेतले तर भाषा सोपी की अवघड हा प्रश्न शालेय शिक्षण घेणारांसाठी किंवा सामान्यही नव्हे व विशिष्टही नव्हे असेच जीवन जगणाऱ्यांच्या बाबतीत निर्माण होतो. सर्वसाधारण शिक्षित व्यक्ती भाषेच्या पहिल्या किंवा दुसऱ्या थरातील जीवन जगत असते. यामुळेच गटप्रमाण बोलींचे अस्तित्व निर्माण होऊन त्यामागे दळणवळणाच्या आकलन-घनतेची व भाषेतील भिन्न क्षेत्रांची कारणे आढळून येतात.

भाषेला ' मराठीपण ' आहे किंवा नाही, ती संस्कृत, हिंदी, इंग्रजी सारख्या भाषांच्या प्रभावाखाली आहे काय, मराठीला ' मराठीच ' कसे ठेवायचे, मराठीचे मराठीपण कशामुळे ' हरवत ' आहे वगैरे विषय मध्यस्तरीय भाषेविषयी निर्माण होतात. उच्चस्तरीय भाषा शास्त्रीय विवेचनासाठी वापरली जात असल्याने किंवा तत्सदृश उपयोगासाठी वापरली जात असल्याने तेथे भाषेच्या लवचिकपणावर किंवा भाषेवरील परभाषिक आक्रमणावर निश्चित अशा स्वरूपाच्या मर्यादा पडलेल्या असतात. शब्दांच्या सोपेपणाबद्दल किंवा अवघडपणाबद्दल जेव्हा काही चर्चा चालतात त्या प्रामुख्याने भाषेच्या मध्यस्तरीय दळणवळणाबद्दल किंवा काही वेळा उच्चस्तरीय दळणवळणाबाबत असतात, असे दिसून येईल.

' रेशन ' हा शब्द ' रासन, राशन ' किंवा ' रेशन ' अशा कोणत्याही स्वरूपात जेव्हा वापरला जातो तेव्हा भाषिक दळणवळणाच्या तळाच्या क्षेत्रात ' सहज ' शिकला जातो व सहज वापरलाही जातो. त्यासाठी ' शिधा ' हा शब्द वापरता आला असता, नाही असे नाही परंतु ' रेशन ' हा परका शब्द असूनही दैनंदिन जीवनातील त्याच्या गरजे-मुळे तो अवघड वाटत नाही; त्याचा अर्थ समजावून घ्यावा लागत नाही. सहज समजलाच जातो. ' कॉपी ' हा शब्द शालेय विद्यार्थ्यांच्या जगात, टंकलेखनाच्या क्षेत्रात, अर्ज पाठविण्याच्या क्षेत्रात किंवा कचेरीमध्ये वापरावयाचा असेल तर तो ' रेशन 'सारखा जसा ' सहज ' समजलेला असेल तसा वापरून चालत नाही. तो समजावून घ्यावा

लागतो. ' आघात ' या शब्दाचे भाषाशास्त्र, संगीतशास्त्र किंवा भौतिकशास्त्र यातील अर्थ, त्या शब्दाच्या सर्वसाधारण अर्थाशी निगडित असले तरी ते त्या त्या शास्त्रानुसार निश्चित केलेले असतात. उच्चस्तरावर भाषा वापरताना ते शिकावेच लागतात.

काव्यप्रकाशात ' शब्दस्त्रिधा ' असे म्हणून एकच शब्द वाच्यार्थ, लक्ष्यार्थ व व्यंगार्थ यांनी युक्त असू शकतो असे जसे म्हटले आहे, तसेच दळणवळणाच्या कार्यानुसार एकच शब्द तळाच्या, मधल्या किंवा वरच्या थरावर वापरला जाऊ शकेल असे म्हणता येईल. उच्चस्तरीय भाषा मध्यस्तरावर जेथे मिसळली जाते तेथून त्या भाषेतील काही शब्द मध्यस्तरावर व तेथून पुढे ते तळाच्या स्तरावर जाऊन पोचू शकतात. सायकल, पंप, मशीन, बूट, रेडिओ यांसारखे शब्द प्रथम उच्चस्तरात वापरात असलेले, आवश्यकतेनुसार तळापर्यंत पोचलेले आढळून येतात. उच्चस्तरावरील भाषिक हालचालींची संधी माणसांच्या संदर्भात सर्वांत कमी, त्यापेक्षा मध्यस्तरावर जास्त व सर्वांत खालच्या स्तरावर सर्वाधिक असते. भाषेचा हा वापर लक्षात घेतला तर, ललितवाङ्मय, वर्तमानपत्रे, आर्थिक दृष्टया मध्यमवर्गीय लोक, शालेय शिक्षण घेतलेले लोक वगैरेंची भाषा मध्यमवर्गीय लोक, शालेय शिक्षण घेतलेले लोक वगैरेंची भाषा मध्यस्तरावरच्या भाषिक दळणवळणात समाविष्ट होते. येथे भाषेच्या लवचिकपणाचा जास्तीत जास्त वापर करून घेतला जातो तर काही वेळा हेतुतः वापर केलेला आढळतो. भाषेच्या दळणवळणाच्या गरजेनुसार तिन्ही, दोन्ही किंवा एकाच थरावर आपला भाषिक व्यवहार पार पाडीत असतो.

शब्दाचे सोपेपण किंवा अवघडपण याचा शोध भाषिक दळणवळणाच्या स्तरांच्या निकषांवर घेतला तर मराठीत आलेल्या किंवा येऊ घातलेल्या पारिभाषिक शब्दांबद्दल असे विधान करता येईल की, त्यांतील काही शब्द शिकले गेलेले असतील तर काही शिकावे लागतील. ज्या शब्दांचा उपयोग मध्य किंवा उच्चस्तरावर व्हावयाचा आहे ते ' अवघड ' वाटले तरी ' शिकले ' पाहिजेत, व ज्यांचा उपयोग उच्चस्तराबर फारसा होण्यासारखा नाही ते शब्द ' अवघड ' वाटले तर बदलले पाहिजेत. परंतु असे विधान करताना एक मोठा प्रश्न उपस्थित होतो की शब्दांचे सोपेपण किंवा अवघडपण कोणी ठरवायचे ?

शब्द उच्चारायला सोपा म्हणजे सोपा असेल तर ' सदिच्छा प्रकट केली ' बद्दल ' विश् ' केले; ' निमंत्रण केले ' म्हणण्यापेक्षा ' बोलाविले ' किंवा ' सांगोवा ' धाडला असे का म्हणू नये ? उच्चाराच्या सोपेपणाबरोबरच एखादा शब्द आपल्या परिचयाचा आहे किंवा नाही हा प्रश्न उद्‌भवतोच. ' मराठी 'पासून ' मराठीकरण ' किंवा ' वन ' पासून ' वनीकरण ' शब्द तयार करता येत असेल तर ' संघ 'पासून ' संघीकरण ' किंवा ' फूल 'पासून ' फुलीकरण ' का स्वीकारावासा वाटू नये ? ' लोकसभा ' या शब्दात जोडाक्षर नाही, ' संसदेमध्ये ' ही नाही मग काहींचा ' संसद ' या शब्दाला आक्षेप का आढळतो ? यांसारख्या प्रश्नांची उत्तरे शब्दाच्या उच्चाराशी जेवढी निगडित आहेत

तेवढीच त्याच्या अर्थवाहित्वाशी, व्याकरणदृष्टया शब्दघटनेशी किंवा स्वतःचा परिचय असण्या–नसण्याशी निगडित आहेत. त्यामुळे 'पुरस्कार' व 'बक्षीस' यांतील योग्य शब्द कोणता? 'वार्तापत्र' व 'बातमी' यातील सोपा शब्द कोणता, 'बाथरूमला' न्हाणीवर म्हणणे चूक का ठरते, किंवा 'सचिवालय' या शब्दापेक्षा 'सेक्रेटरिएट' शब्द लोकांना अधिक का समजतो यांसारखे प्रश्न नेहमीच उपस्थित होत राहतील.

भाषिक दळणवळणाच्या मध्यस्तरावर शाळेतील शिक्षक, सुशिक्षित वर्ग, प्राध्यापक, वर्तमानपत्रकार, ललितलेखक वगैरेंचा प्रभाव जास्त असतो. या प्रतिष्ठितांच्या बोलण्यातून, लेखनातून नवे नवे शब्द दळणवळणाच्या व्यवहारात ओतले जात असतात, रूढ करून दिले जात असतात, त्यामुळे पारिभाषिक संज्ञा किंवा अवघड वाटणारे शब्द या भाषिक प्रतिष्ठितांनी योग्य प्रकारे बदलून किंवा आवश्यकतेनुसार जसेच्या तसे वापरात उतरवले, तर सोपे–अवघड शब्द, परभाषेचे आक्रमण झालेले मराठी इत्यादी स्वरूपांच्या तक्रारींना वाव राहाणार नाही. काही अपवादात्मक गोष्टी सोडल्या तर मध्यस्तरावरचा भाषिक प्रतिष्ठित तळावरच्या लोकांना उच्चस्तरीय गोष्टींची अल्पस्वरूपात का होईना योग्य ओळख करून देऊ शकेल.

'पंडित' हा 'पंडितच' राहायचा कारण त्याला त्याच्या विधानाबद्दल काटेकोरपणाची सवय लागलेली असते. त्यासाठी तोलून मापून भाषा त्याला वापरावयाची असते, न्यायाधीशाला आपल्या भाषेतून एक आणि एकच अर्थ व्यक्त करावयाचा असतो, व्याकरणकाराला 'ध्वनि' व 'स्वन' असे 'ध्वनि' हा अर्थ दाखवणारे दोन शब्द त्यांच्या विशिष्ट व्याप्तींनी मर्यादित करून घेऊन मग वापरण्याशिवाय गत्यंतर नसते; 'ऑफिसरला' इनवर्ड, आउटवर्ड नीट वाचूनच सह्या करता येतात. आपल्या अशिलाचा बचाव मांडताना वकिलाला भाषा सैल ठेवून चालणार नसते, तर प्रतिनिधीला आपल्या प्रतिनिधित्वाला पोषक अशीच भाषा वापरावी लागते.

भाषेचा वापर तळाच्या थरावर असताना व्यक्तीला शब्द कोठून आला, कसा आला, इत्यादी प्रकारची उठाठेव करण्याचे कारण नसते, 'लाँड्री' हा शब्द वापरून कपडे धुऊन मिळणार असतील तर ती 'लाँड्री' हा शब्द वापरील,–'धोबी' शब्द वापरून मिळणार असतील तर ती 'धोबी' शब्द वापरील. कोण मर्चंट आहे, कोण व्यापारी आहे की कोण दुकानदार आहे याच्याशी तळच्या क्षेत्रातील भाषा वापरणाऱ्या भाषिकाला कर्तव्य नसते, त्याला जरूर असते, जे बोलण्याने वस्तू प्राप्त करून घेता येईल ते बोलण्याची–मग आपला शब्द अपभ्रष्ट आहे हे त्याला कळले तरी त्याचा उपाय नसतो.–वॉशर म्हणून त्याला स्टोव्हमध्ये 'तो' घालून मिळणार नसतो. 'व्हायसर' म्हटल्यानेच मिळणार असतो. त्यामुळे 'व्हायसर' शब्द हाच भाषेच्या तळातल्या क्षेत्रात वापरणे जरूर असते. चिकित्सेवाचून भाषा वापरली जाणे हे भाषेच्या दळणवळणाच्या तळाच्या थराचे लक्षण तर चिकित्सेशिवाय भाषा वापरता न येणे हे भाषिक दळणवळणाच्या उच्चस्तराचे लक्षण. मध्यस्तरावर मात्र भाषा चिकित्सेसह किंवा

चिकित्सेशिवाय अशा दोन्ही प्रकारांनी वापरली जाते.

भाषिक दळणवळणाच्या मध्यक्षेत्रात वापरल्या जाणाऱ्या भाषेच्या चिकित्सांमधून प्रमाणभाषा, बोलीभाषा, भाषेचे व्याकरण, परकीय शब्दांआडून येणारे परभाषिक आक्रमण, भाषेचा शुद्धाशुद्धविवेक, भाषेचे लालित्य, रसवाहित्व, प्रसाद, लवचिकपणा इत्यादी गुणविशेष, भाषिक परंपरा वगैरे गोष्टींचा ऊहापोह केला जात असतो. एकभाषिक समाजाच्या जीवनाला सरसकटपणे वळण लावण्याचे काम याच थरातील भाषेच्या वापराने होत असते. समाजाच्या सर्वांगीण प्रगतीच्या दृष्टीने मध्यस्तरीय भाषेचा विकास कसा घडेल याचा विचार करणे जरुरीचे राहते, कारण ही भाषा आपली शब्दसंपत्ती तळाच्या स्तरावर उतरवण्याचे कार्य करीत असते. मध्यस्तरीय भाषेचा हा विकास शब्दसंपत्ती व प्रत्यय-समृद्धता या दोन्ही बाजूंनी साधता येतो.

मराठीचा आपोआप होणारा वापर, त्या वापराला प्रामाण्याचे स्वरूप निश्चित केल्यामुळे मिळणारी दिशा, वाङ्मयसमृद्धीमुळे होणारा भाषेचा सहेतुक वापर, योग्य भाषांतराद्वारे भाषेत येणारी विविध संकल्पनांची समृद्धी इत्यादी गोष्टींनी भाषेचा विकास साधला जाणार असतो. या विकासासाठी निबंधलेखन, ललितलेखन, शास्त्रीय विवेचने, व्याकरणे व भाषेचा विविध अंगांनी अभ्यास करून भाषेला समृद्ध करावयाची असते. यासाठी घ्यावयाचे परिश्रम दोन प्रकारचे असावे लागतात. एक म्हणजे विविध उपायांनी विविध कल्पना आपल्या शब्दभांडारातून अभिव्यक्त करण्याचे सामर्थ्य भाषेला आणून देणे हा स्वयंप्रकाशी उपाय व दुसरा म्हणजे ज्यायोगे भाषा 'दूषित', 'दुबळी' होत असेल त्या गोष्टी शोधून काढून, त्यावर केवळ टीका न करता, त्या दूर करण्याचा प्रयत्न करणे. हा प्रयत्न विधायक स्वरूपाचा असू शकतो तितकाच 'कृत्रिम' ही राहू शकतो. या संदर्भात 'महाराष्ट्र टाइम्स' (२३ जाने. ७६) मधील 'धावते जग' या सदरात आलेला, 'आपल्या भाषेला निर्माण झालेला इंग्रजी भाषेचा धोका निवारण करण्यासाठी फ्रेंच सरकारने आता कायद्याची मदत घेण्याचे ठरवले असून तसे विधेयक नुकतेच फ्रान्सच्या विधिमंडळात मांडण्यात आले आहे.' हा मजकूर लक्षात घेण्यासारखा आहे; व इस्राईल देशाने हिब्रू भाषेचे पुनरुज्जीवन का केले याचा शोधही, व त्यावरून बोधही, घेण्यासारखा आहे.

* * *

५

प्रमाणभाषेची वाटचाल

५.१. प्रास्ताविक :

प्रमाणभाषेचे स्वरूप प्रतिष्ठित वर्गामुळे ठरले जाते. प्रमाणभाषेतील बदल हे प्रतिष्ठितांनी नोंदविलेल्या किंवा मान्यता दिलेल्या विविध परिवर्तनांमुळे होत असतात. बोलभाषेतील बदल बहुशः नैसर्गिक असतात तर प्रमाणभाषेतील बदल हे त्या नैसर्गिक बदलांना, व्याकरणाची पुस्तके किंवा लेखनविषयक नियम यांच्यामध्ये त्या बदलांचा अंतर्भाव करून, मान्यता दिली गेल्याने किंवा भाषिक प्रतिष्ठितांनी आपल्या लेखनात वापरून रुजवले गेल्याने वापरात येत जातात. प्रमाणभाषेचे स्वरूप ठरण्यात भाषेच्या नैसर्गिक दळणवळणाचा जसा वाटा असतो तसाच प्रतिष्ठितांच्या भाषाविषयक दृष्टिकोनाचाही वाटा असतो. प्रमाणभाषेचा इतिहास पाहताना बोलभाषेचे नियमन करून तिच्या विशिष्ट स्वरूपाला प्राभाण्य प्रस्थापित करणाऱ्या प्रतिष्ठितांचा इतिहास पाहणे आवश्यक असते.

५.२. भाषिक प्रतिष्ठित :

५.२. (अ) हस्तलिखितांच्या काळातील प्रतिष्ठित :

मराठी हस्तलिखित वाङ्मयातील बरेचसे वाङ्मय पद्यप्रधान आहे; व गद्यवाङ्मय त्यामानाने फार थोडे आहे. प्रमाणभाषेचे स्वरूप प्रामुख्याने गद्यवाङ्मयावरून ठरविता येते. हे वाङ्मय व तत्कालीन समाजजीवन यांचा अभ्यास करता असे दिसून येते की हस्तलिखितांच्या काळात संस्कृत ही ज्ञानभाषा असल्याने संस्कृत जाणणाराला तेव्हा प्रतिष्ठा होती. राजकीय क्षेत्रातही संस्कृतज्ञ व्यक्तीला महत्त्वाचे स्थान उपलब्ध होऊ शकत असल्याने संस्कृतच्या ज्ञानाचे प्रतिष्ठितपणाशी जवळचे नाते होते. त्या काळी संस्कृतमधील ज्ञान संस्कृत न समजणाऱ्यांना देण्यासाठी मराठी भाषा वापरली गेली. मराठी भाषेच्या लिखित स्वरूपाचा हेतू स्पष्ट असल्याने ती त्या समाजाला समजली जाणारी गटप्रमाणबोली असली पाहिजे. या काळातील काही व्याकरणे उपलब्ध असली तरी त्यांच्या योगाने भाषेची ' बांधणी ' झाल्याचे उल्लेख आढळत नाहीत, त्यामुळे प्रतिष्ठितांची औपचारिक प्रसंगी वापरली जाणारी भाषा प्रमाण समजली जात असावी. राजकीय क्षेत्रात फारसी भाषेला मान होता. फारसी-मिश्र मराठी हे तत्कालीन उच्च

मराठीचे एक स्वरूप होते. मात्र हे स्वरूप सर्वसामान्य थरावर प्रमाण मराठी नसून ते शासकीय वर्तुळात प्रमाण असावे. एकच प्रतिष्ठित व्यक्ती सामाजिक प्रमाण मराठी व राजकीय प्रमाण मराठी लिहू शकत असावी. धार्मिक वाङ्मयाचा पाया संस्कृत भाषेतील धर्मपर वाङ्मयात असल्याने संस्कृत भाषेला त्याही क्षेत्रात महत्त्व राहिले. त्यामुळे तत्कालीन समाजात भाषेच्या क्षेत्रात संस्कृत जाणणारा प्रतिष्ठित गणला जात असावा. फारसी भाषेला राजकीय वर्तुळात फक्त, म्हणजेच मर्यादित क्षेत्रात, प्रतिष्ठा असल्याने संस्कृत जाणकाराला सामाजिक दृष्ट्या अधिक प्रतिष्ठा असावी. त्या काळचे हे संस्कृतज्ञ लोक वापरीत असलेली भाषा ही एखाद्या विशिष्ट भौगोलिक क्षेत्रापुरती किंवा समाजाच्या विशिष्ट गटापुरती प्रमाणभाषा असावी. सर्व मराठी समाजाला सारखी समजणारी एकच भाषा अस्तित्वात असण्याऐवजी विशिष्ट गटप्रमाणभाषा म्हणजेच ‘ पोटभाषा ’ अस्तित्वात असाव्यात किंवा संस्कृतच्या जाणकाराची मराठी भाषा (लिखित स्वरूपात वापरण्याजोगी असणारी) प्रमाण म्हणजेच अनुकरणीय ठरत असावी.

५.२. (ब) स्वातंत्र्यपूर्व काळातील प्रतिष्ठित :

मुद्रितलेखनाच्या सुरुवातीच्या कालखंडापासून जवळजवळ स्वातंत्र्य मिळविण्याच्या कालखंडापर्यंत इंग्रजी भाषेचा ज्ञानभाषा म्हणून जसा जसा प्रसार वाढत गेला तसा तसा संस्कृतच्या ज्ञानामुळे येणारा प्रतिष्ठितपणा कमी कमी होऊ लागला. दादोबांच्या व्याकरणाला अनुसरून लिहिली जाणारी ती प्रमाणभाषा ठरली. त्यानंतर संस्कृत भाषेचा व्यासंग असणारे विद्वान, संस्कृतचा मराठीशी परंपरेच्या नात्याने संबंध राखणारा भाषाभ्यासी वर्ग व इंग्रजी भाषेचा व्यासंग असणारे विद्वान यांच्या भाषाभ्यासविषयक चिंतनातून व मतप्रदर्शनातून मराठीचे शुद्धाशुद्धत्व चर्चिले गेले. त्या सर्व चर्चांचा परामर्श घेऊन लिहिल्या गेलेल्या दामले यांच्या व्याकरणाने मराठीचे जे स्वरूप विशद केले ते स्वरूप तत्कालीन मराठीच्या प्रमाणभाषेचे स्वरूप समजले गेले. दामले यांना मान्य असणारी मराठीची घटनापद्धती किंवा रचनापद्धती प्रमाण ठरली, त्या वेळचे लेखन अमान्य ठरले. हे पाहता भाषेच्या बाबतीत तत्कालीन संस्कृत व इंग्रजी या दोन्ही अथवा कोणत्याही एका भाषेचा व्यासंगी वर्ग भाषिक प्रतिष्ठित किंवा भाषेच्या वापराचे मार्गदर्शन अथवा नियमन करणारा ठरला. त्यामुळे दामले यांच्या व्याकरणानुसार असेल ते शुद्ध व नसेल ते अशुद्ध असे समजले गेले. मराठी साहित्य परिषदेच्या लेखनविषयक नियमांनी लिहिणारा वर्ग भाषिक प्रतिष्ठित असला तरी तो खऱ्या अर्थाने ‘ प्रतिष्ठित ’ ठरू शकला नाही कारण दामले यांना मान्य अशी लेखनपद्धती अधिक विस्तृत क्षेत्रात वापरात राहिली.

५.२. (क) स्वातंत्र्योत्तर काळातील प्रतिष्ठित :

स्वातंत्र्योत्तर काळातील मराठी समाजाचे जीवन साधारणतः त्या सुमारास झालेल्या दोन महायुद्धांनी अकल्पितपणे बदलले गेले. यंत्रयुगाच्या निर्मितीबरोबरच

स्वातंत्र्यलढा, स्वातंत्र्यप्राप्ती, व भाषावार प्रांतरचनेमुळे मराठीला मिळालेले राज्यभाषेचे स्थान यामुळे या पूर्वीच्या कालखंडातील भाषिक प्रतिष्ठित वर्ग बदलला गेला. यापूर्वीच्या समाजात भाषिक प्रतिष्ठा व राजकीय प्रतिष्ठा यांची भाषेच्या संदर्भातील क्षेत्रें परस्परांना फार प्रमाणात छेदणारी नव्हती; परंतु स्वातंत्र्योत्तर काळात समाजातील प्रभावी व्यक्ती चार भिन्न विभागांत प्रामुख्याने विभागलेल्या दिसून येऊ लागल्या – (१) राजकारणी, (२) धार्मिक जीवनाचे मार्गदर्शक, (३) आर्थिक सामर्थ्य असणारे व (४) सेवाभावी. हे सर्व लोक निरक्षर, अल्पशिक्षित व उच्च शिक्षितही असल्याने पूर्वीच्या समाजाचे प्रतिष्ठेचे लक्षण बदलले गेले. शिक्षण, व्यासंग किंवा विद्वत्ता ही प्रतिष्ठेची लक्षणे बदलून विशिष्ट दर्जा, आर्थिक समृद्धी किंवा उच्च दर्जाचा त्याग ही प्रतिष्ठितेची लक्षणे मानली जाऊ लागली. त्यामुळे पूर्वी, शिक्षणाच्या किंवा व्यासंगाच्या समान पायावर प्रतिष्ठितपणा आधारलेला असल्याने भाषेत जो एकप्रकारचा एकसारखेपणा असे, त्या एकसारखेपणात आता समतोल राहिला नाही. निरक्षकांची, शिक्षितांची व व्यासंगी प्रतिष्ठितांची भाषा गटप्रमाण बोलींच्या स्वरूपात प्रतिष्ठित गणली जाऊ लागली किंवा विशिष्ट गटप्रमाण बोली बोलणाऱ्या प्रतिष्ठितांना दामले यांच्या काळापासून लेखनविशिष्ट असलेली भाषा 'आपली' न वाटण्याइतके अंतर जाणवू लागले. त्यामुळे भाषेच्या प्रमाणस्वरूपाची पुन्हा एकवार चिकित्सा करण्याची वेळ निर्माण झाली.

५.२. (ड) आजच्या प्रतिष्ठितांचे लेखन व प्रामाण्याची गरज :

बोली भाषेच्या प्रवाहाप्रमाणेच मराठी लेखनाचा प्रवाहही अखंडित राहिला. दामले यांच्या काळापासून चालत आलेल्या लेखनपद्धतीनुसार मराठी भाषेचे लेखन चालूच राहिले. परंतु जसे प्रतिष्ठितांचे वर्ग बदलले व 'भाषा' या परस्परसंपर्काच्या माध्यमाकडे पाहण्याचे दृष्टिकोन जसजसे कमी–अधिक प्रमाणात वैयक्तिक, जातीय, शैक्षणिक पातळीवरून बदलते राहिले तशी तशी लिखित मराठीची आपापली वैशिष्ट्ये दाखवणारी तीन सारखी स्वरूपे दिसून येऊ लागली : (१) ललित लेखनासाठी वापरली जाणारी, व्याकरणिक व शब्दक्षेत्रातील वैयक्तिक आविष्कार पद्धतीला महत्त्व देणारी भाषा, (२) सरकारी कामकाजासाठी, सरकारने नेमलेल्या मंडळाने मान्य केलेल्या नियमांनुसार वापरली जाणारी भाषा, व (३) विविध विषयांच्या शास्त्रीय अभ्यासासाठी, निबंध लेखनासाठी किंवा केवळ वैचारिक आविष्कारासाठी वापरात असलेली भाषा, यांपैकी कोणत्याही स्वरूपाची भाषा वापरली जाते त्या वेळी मराठीच्या अनेकविध बोली बोलणाऱ्यांना ती समजावी असा उद्देश असतोच, त्यामुळे या तिन्ही भाषांत साम्यस्थळे पुष्कळच असली तरी, किंवा शब्दघटना, वाक्यरचना इत्यादींमध्ये लिखित मराठीची मूळ चौकट कायम राहिली तरी, भाषेच्या लिखित स्वरूपात काही प्रमाणात भिन्नता दिसून येऊ लागली. तसेच भाषाविषयक दृष्टिकोन बदलल्यामुळे पूर्वी-

पेक्षा शुद्धाशुद्धत्वाला महत्त्व कमी द्यावे अशा प्रकारचा सूर भाषाभ्यासी किंवा प्रतिष्ठित यांच्या लेखनातून, चर्चांतून किंवा काही वेळा व्याख्यानातून येऊ लागला. याला एक प्रकारे उत्तर म्हणून मराठीच्या लेखनपद्धतीत जे बदल करावे असे साहित्य परिषद किंवा साहित्य महामंडळ यांनी सुचवले त्याचे परिणाम दोन झाले : भाषेचे लेखन साहित्य महामंडळाच्या नियमाप्रमाणे करणाऱ्या वर्गाचे, मराठीच्या प्रमाणभाषेचे स्वरूप एका विशिष्ट प्रकारचे राहिले; तर ते न मानणाऱ्यांच्या भाषेचे स्वरूप काहीशा वेगळ्या प्रकारचे राहिले. एकच व्यक्ती काही वेळा गरजेपोटी सरकारमान्य प्रमाणभाषा लिहू लागली. भाषा कितीही व्यक्तिसापेक्ष असली तरी तिला समाजमान्य पद्धतीनेच वापरावी लागते, तरच ती सर्वांना समजणारी ठरते, आणि व्यक्तीने प्रामाण्याच्या निकषांवर योग्य ठरणारी भाषा कितीही वापरली तरी ती कोठे ना कोठे व्यक्तिसापेक्ष होऊ शकते. असे जरी असले तरी प्रमाणभाषा ही बहुतांशी सर्वांना सारखी समजली जाणारी व सगळ्या-कडून (सर्व संपर्कासाठी) सारख्याच प्रकारे वापरली जाणारी असावी लागते. किंबहुना ती तशी असेल तरच ' प्रमाणभाषा ' समजली जाते.

तसे पाहिले तर कोणत्याही समाजातील सर्वसामान्य व्यक्ती आपल्या दैनंदिन जीवनात लिखित भाषेचा वापर फारच थोड्या प्रमाणात करीत असते. सरकारी काम-काज, विविध ऑफिसांतील कामकाज किंवा शैक्षणिक क्षेत्र यांखेरीज सामान्य व्यक्तीला दैनंदिन जीवनात प्रमाणभाषा लिहिण्याचे प्रसंग फार थोडे यत असतात. आजच्या यंत्र-युगातही घरादारांवरच्या पाट्या वाचणे, वर्तमानपत्रे, मासिके किंवा क्वचित काही पुस्तके वाचणे यापलीकडे प्रमाणभाषेचे वाचन फारसे होताना दिसत नाही. सर्वसामान्य माणसाला स्वतःच्या जीवनरहाटीसाठी प्रमाणभाषेशी संबंध फारसा ठेवावा लागत नाही. त्याच्या दृष्टीने प्रमाणभाषा कामापुरती लिहिता वाचता आली म्हणजे पुरेसे होते. कारण भाषा लिहिली जाण्याचा प्रसंग कोणत्याही प्रकारच्या राजकीय, सामाजिक किंवा शासकीय व्यवहारात व व्यक्तिगत वाङ्मयीन व्यवहारासाठी प्रामुख्याने येतो. त्यासाठी संपर्काचे क्षेत्र सर्व समाजाचे मिळून जेव्हा असते तेव्हा प्रमाणभाषेचा वापर उद्दिष्टाच्या दृष्टीने अनिवार्य असतो. औपचारिक प्रसंगी, शास्त्रीय विवेचने व तर्कशुद्ध विचारांची मांडणी करताना प्रमाणभाषेचा वापर करावयाचा असतो. अशा वेळी प्रमाणभाषेचे स्वरूप प्रतिष्ठित मंडळींनी निश्चित केलेले असेल तरच सर्वत्र सुसूत्रता राहू शकते. याच कारणाने भाषेतील शुद्धाशुद्धत्वाची कल्पना, चूक–बरोबरची कल्पना कितीही शास्त्रबाह्य वाटली तरी शेवटी ' व्यवहार्य ' ठरते. ' त्या झाडाच्या मुळाशी हे खत घालावे ' हे वाक्य ' त्या झाडांच्या मुळांशी हे खत घालावे ' या वाक्याहून भिन्न अर्थ दाखवीत असल्याने अनुस्वार लेखनाचे महत्त्व मानावे लागते, किंवा चुकून अनुस्वार न लिहिला जाणे क्षम्य ठरणारे नसते. म्हणूनच व्यवहार्यतेचे धोरण लक्षात घेऊन, भाषेचे उद्दिष्ट योग्य प्रकारे साधण्यासाठी कशा प्रकारची भाषा प्रमाण मानावी याचा विचार करून ती भाषा वापरू इच्छिणाऱ्यांना त्यानुसार व्याकरणाद्वारे मार्गदर्शन करणे आवश्यक ठरते.

प्रमाणबोली व प्रमाणभाषा यांतील अंतर फार वाढते तेव्हा, किंवा प्रमाणबोली ही समाजाच्या मोठ्या प्रतिष्ठित गटाची बोली न राहता समाजाच्या एका विशिष्ट थरातील प्रतिष्ठितांची बोली म्हणजे गटप्रमाणबोली राहते तेव्हा, निश्चित प्रकारच्या प्रयत्नांनी प्रमाणभाषेचे स्वरूप ठरवावे लागते. स्वातंत्र्यपूर्व काळापर्यंत भाषिक प्रतिष्ठेला उच्चशिक्षणाचा निकष आवश्यक असल्याने, शिक्षितांची बोली लिखित स्वरूपात, तत्कालीन विशिष्ट नियमांनी, वापरली गेल्यावर प्रमाणभाषा ठरत होती व त्यासाठी दामले यांच्या व्याकरणाचे मार्गदर्शन पुरेसे होते. सध्या प्रतिष्ठितांचे निकष बदलल्याने भाषिक प्रतिष्ठितांनी भाषेच्या अभिवृद्धीसाठी, योग्य वापरासाठी सर्व समाजाला ती उत्कृष्टपणे समजावी यासाठी गट प्रमाणबोली व दामलेप्रणीत प्रमाणभाषांतील भेदांची स्थाने कमी करण्याची आवश्यकता निर्माण झाली. त्याचा पहिला प्रयत्न साहित्यपरिषदेच्या शुद्धलेखनविषयक नियमांनी झाला, परंतु त्याला शासकीय पाठबळ नसल्याने त्याने फक्त भाषाभ्यासी लोकांना जाणवत असलेली भाषेतील परिवर्तनाची नोंद दाखवली गेली, परिषदेच्या कार्यक्षेत्रापुरती ती भाषा प्रमाणभाषा म्हणून वापरली गेली किंवा ते नियम मानणाऱ्या व्यक्तींकडून अथवा काही शिक्षणसंस्थांत प्रमाणभाषा म्हणून वापरली गेली. तसेच सन १९४७ मध्ये मुंबई विद्यापीठाने संमत केलेल्या नियमांमुळे मराठीचे आणखी एक प्रमाणस्वरूप मानले गेले परंतु त्याचेही क्षेत्र मर्यादित होते. यानंतर साहित्य महामंडळाचा प्रमाणभाषेचे स्वरूप ठरविण्याचा प्रयत्न झाला. हा शासनातर्फे अंमलात आल्याने अधिक विस्तृत क्षेत्रात काही भाषाभ्यासी लोकांना मान्य असो वा नसो, राबवला गेला.

जवळजवळ सर्व मराठी भाषिक प्रतिष्ठितांना मान्य अशी प्रमाणभाषा, जुन्या किंवा रूढ शुद्धलेखनाने नियमन केलेली, लिखित स्वरूपात असलेली सन १९३० पर्यंत अस्तित्वात राहिली. त्यानंतरच्या काळापासून, सन १९३० म. सा. प. चे नियम, सन १९४७ मुंबई विद्यापीठाचे नियम, सन १९५८ महामंडळाचे नियम, व सन १९६१ मराठी साहित्य महामंडळाचे नियम, यांनुसार मर्यादित क्षेत्रात प्रामाण्य असणाऱ्या भाषा लिखित स्वरूपात वापरात राहिल्या. आज सर्व भाषिक प्रतिष्ठितांना मान्य अशी प्रमाणभाषा अस्तित्वात नसून भाषेची काही विशिष्ट स्वरूपे प्रतिष्ठित वर्गाच्या गटागटांना मान्य स्वरूपात आहेत.

५.३. साहित्य महामंडळाची भाषा :

साहित्य महामंडळाने लेखनविषयक नियम दिले त्याचा अर्थ – ज्या काळातील भाषेकरता हे नियम दिले आहेत त्या काळापूर्वीच्या नियमन केलेल्या भाषेपेक्षा जेवढे वेगळे आहे त्यातील ज्याला प्रामाण्य दिले आहे त्याची नोंद केली आहे; ज्याची नोंद केली नाही असे घटक अप्रमाण मानावे अशी अपेक्षा आहे; जे या दोन्ही भाषांत समान आहेत ते वरील भाषिक प्रतिष्ठितांना मान्य आहेत; अशा प्रकारे लक्षात घेतला तर

महामंडळाच्या प्रतिष्ठितांना वाक्यरचना व शब्दघटना इत्यादी व्याकरणिक अंगांनी युक्त अशी भाषा कशीही लिहिली असता मान्य ठरेल ते महामंडळाचे नियम दाखवतात असे म्हणता येईल व त्यावरून महामंडळाला मान्य अशा भाषेचे स्वरूप जाणता येईल.

५.३. (अ) पायाभूत व्याकरण :

मराठी साहित्य महामंडळाने व्याकरण न देता फक्त लेखनविषयक नियम दिले आहेत, याचा अर्थ त्यांनी कोणते तरी व्याकरण पायाभूत म्हणून समजले असावे व या व्याकरणातील मंडळाने सुचविलेल्या नियमांनी सिद्ध होणाऱ्या व्याकरणिक अंगाखेरीज इतर जी रूपे व्याकरणाने मांडली आहेत ती मंडळाला मान्य असावीत.[1] दामले यांच्या व्याकरणानंतर मराठीत भाषाविषयक चर्चा पुष्कळ झाल्या तरी व्याकरणांच्या स्वरूपात मराठी भाषा मांडण्याचा प्रयत्न जवळजवळ शून्यच झाला. शिवाय शैक्षणिक क्षेत्रात मराठी भाषेच्या अभ्यासासाठी दामले यांचे व्याकरण किंवा त्या व्याकरणावर आधारलेली शालेय व्याकरणे वापरली गेली. अजूनही नव्या शुद्धलेखन नियमांबरोबर व्याकरण म्हणून दामले यांचेच व्याकरण उच्च शिक्षणासाठी वापरले जाताना दिसत आहे. काही ठिकाणी मात्र या व्याकरणाच्या जोडीने ग. ह. केळकर यांचे व्याकरण किंवा श्री. मंगरूळकर यांचे ' मराठी व्याकरणाचा पुनर्विचार ' हे पुस्तक वापरले जाताना आढळत आहे. अर्थात कोणतेही व्याकरण नेमले गेले तरी नव्या शुद्धलेखन नियमांनी जी मराठी लिहिली जात आहे तिचे ते यथायोग्य व्याकरण नाही हे उघड आहे. जिचे व्याकरण दामले यांनी लिहिले ती मराठी प्रमाणभाषा मानून त्यातील काही व्याकरणिक अंगांना शुद्धलेखनाच्या विविध नियमांनी अमान्यता दिली जाऊन नवी प्रमाणरूपे दाखवली गेली आहेत.

प्रमाण मराठीचे लेखन विशिष्ट प्रकारे व्हावे असे जेव्हा म्हटले जाते तेव्हा दिलेल्या नव्या नियमांत व आधीच्या नियमांनी होणाऱ्या व्याकरणिक अंगात काही बदल पडणार नसतील तर लेखन व व्याकरण यांचा मेळ बदलत नाही. परंतु या अंगात जेव्हा बदल पडतो तेव्हा नवीन व्याकरणाची म्हणजेच लेखन व व्याकरण यांचा मेळ असणाऱ्या व्याकरणाची आवश्यकता असते. उदाहरणार्थ, वर्तमानकाळ प्रथमपुरुष पुल्लिंगी एकवचनाचा प्रत्यय दामले यांनी ' तों ' असा अनुस्वारसहितचा दिला आहे. नवीन शुद्धलेखनाच्या नियमांनी हा अनुस्वार काढून टाकला आहे. याचाच अर्थ चालू मराठीत वर्त. प्र. पु. पुं. ए. व. प्रत्यय ' तो ' आहे असा होतो. ग. ह. केळकर यांच्या व्याकरणाची चौथी आवृत्ती डॉ. शं. गो. तुळपुळे यांनी संपादित करून सन १९६६ मध्ये प्रसिद्ध

---

१. महामंडळाने पायाभूत व्याकरण कोणते धरले होते याची चौकशी चार-दोन व्यक्तींकडे समक्ष भेटून करता निश्चित माहिती मिळू न शकल्याने, तर्काधिष्ठित ' असावे-नसावे ' स्वरूपाची विधाने येथे मांडावी लागत आहेत.

केली. त्यात मराठी साहित्य महामंडळाच्या लेखनविषयक नियमांनी मूळ पुस्तक योग्य तेथे बदलले आहे; त्यामुळे वर्त. प्र. पु. पुं. ए. व. चा प्रत्यय 'तों' ऐवजी 'तो' छापलेला आहे. तरी व अशा प्रकारच्या अनुस्काररहित प्रत्ययांची नोंद इतरत्र घेतली गेली असली तरी, ईकारान्त नामांच्या सामान्यरूपाच्या वर्णनात 'ऱ्हस्व इकारान्त स्त्रीलिंगी नामे' असा उल्लेख करून येणारी विसंगती टाळण्यासाठी कंसात 'मूळची संस्कृत' असे शब्द लिहून त्यांना स्पष्टीकरण द्यावे लागले आहे. मराठी व्याकरणाच्या पुनर्विचारातही लेखनविषयक नवे नियम अवलंबलेले आढळत नाहीत.

मराठी साहित्य महामंडळाने दामले किंवा केळकर यांची व्याकरणे पायाभूत धरून त्यांनी निर्देशिलेल्या भाषेपेक्षा सन १९६१ च्या मराठीत जे बदल करावेसे वाटले त्यांची नोंद नव्या लेखनपद्धतीने केली म्हणजेच जुनी प्रमाणभाषा नव्या नियमांनी युक्त करून नवी प्रमाणभाषा मानली किंवा सन १९६१ मध्ये मराठीला सरकारी प्रयत्नाने नवी प्रमाणभाषा मिळाली असे म्हणता येईल. या सरकारमान्य प्रमाणभाषेचे स्वरूप ठरविण्यासाठी दामलेप्रणीत भाषा व शुद्धलेखनाचे नियम यांचा एकत्रित विचार करणे आवश्यक आहे.

५.३. (ब) दामले यांचे व्याकरण व म. सा. महामंडळाचे नियम :

महामंडळाच्या नियमांद्वारे दामले यांनी वर्णन केलेल्या मराठीच्या व्याकरणात पुढील बदल दिसतात :

(१) अनुस्वारलेखनामुळे होणारे :

जेथे जेथे प्रत्ययातील अनुस्वार उच्चारित असतील तेथ ते दिले जाणार नाहीत त्यामुळे प्रत्ययांच्या बाबतीत किंवा व्याकरण देताना पुढील फरक आढळतील :

	दामले मराठी	नवे मराठी
(१) नामे[1]		
न. पुं. ए. व.	ऊं, एं, ईं	ऊ, ए, ई
	(गुरुं, मोतीं, तळें, दहीं, घोडें)	(गुरू, मोती, तळे, दही, घोडे)
न. पुं. अ. व. चा	एं	ए
प्रत्यय	(गुरुं-गुरें, मोतीं-मोत्यें, झाड-झाडें)	(गुरे, मोत्ये, झाडे)
	ईं	ई
	(तळें-तळीं, गाणें-गाणीं)	(तळी, गाणी)

१. येथून पुढील सर्व प्रत्यय संदर्भाने समजावून घ्यावेत.

	दामले मराठी	नवे मराठी
विभक्तिप्रत्यय		
तृतीया ए. व.	नें, एं, शीं	ने, ए. शी
अ. व.	नीं, हीं, इं, शीं	नी, ही, ई, शी
चतुर्थी ए. व.	तें	ते
अ. व.	तें, नां	ते, ना
सप्तमी ए. व., अ. व.	ईं, आं	ई, आ.
संबोधन अ. व.	नों	नो

(२) सर्वनामें

द्वितीय पुरुष	तूं	तू
तृतीय पुरुष	तें, हें, जें	ते, हे, जे
तृतीय पुरुष नपुं. ए. व., अ. व.	तीं, हीं, जीं	ती, ही, जी,
तृतीया विभक्ती	मीं, आम्हीं, तुम्हीं, म्यां, त्वां, कोणीं	मी, आम्ही, तुम्ही, म्या, त्वा, कोणी
सामान्यरूप (विशेषणासारखे वापरले असता)	आम्हां, तुम्हां	आम्हा, तुम्हा

(३) विशेषण

नपुं. ए. व.	एं (काळें, पिवळें)	ए (काळे, पिवळे)
नपुं. अ. व.	इं (काळीं, पिवळीं)	ई (काळी, पिवळी)
सामान्यरूप (काही विशेषणांचे)	आं (दोघां, तिघां)	आ (दोघा, तिघा)

(४) क्रियापदे

प्रथम लाख्यात		
प्र. पु. ए. व. अ. व.	तों, तें, तें, तों	तो, ते, ते, तो
द्वि. पु. (नपुं.) ए. व. अ. व.	तेंस, तां	तेस, ता
तृ. पु. ए. व. अ. व. (नपुं.)	तें	ते

	दामले मराठी	नवे मराठी
द्वितीय लाख्यात		
प्र. पु. ए. व. अ. व.	तों, त्यें, तें, तें, तों	तो, ते, ते, तो
द्वि. पु. ए. व. अ. व.	तेंस, तां, तींत	ता, तीत
तृ. पु. ए. व. अ. व. (नपुं.)	तें, तीं,	ते, ती
(४) क्रियापदें		
लाख्यात		
प. पु. ए. व. अ. व.	लों, लें, ल्यें, लें, लों	लो, ले, ले, लो
द्वि. पु. ए. व. (न.) अ. व.	लेंस, लां, लांत, लींत	लेस, ला, लात, लीत
तृ. पु. ए. व. अ. व.	लें, लीं	ले, ली
वाख्यात		
प. पु; द्वि. पु; तृ. पु.	आवें, आवीं	आवे, आवी
नपुं. ए. व. अ. अ. व	आवेंस, आवींत	आवेस, आवीत
ई आख्यात		
प. पु. ए. व. अ. व.	ईं, एँ, ऊं, ओं	ई, ए, ऊ, ओ
द्वि. पु. ए. व.	आं	आ
ऊ आख्यात		
प. पु. ए. व. अ. व.	ऊं, ओं,	ऊ, ओ
द्वि. पु. अ. व.	एं,	ए
ईल आख्यात		
प. पु. अ. व.	ऊं	ऊ
कांही विशिष्ट धातू		
प. पु. निदर्शक अनुस्वार	आहें, आहों	आहे, आहो
किंवा द्वि. पु. चे अनुस्वार	आहां, आहांत	आहा, आहात
किंवा तृ. पु. चे अनुस्वार	नाहीं, नाहींस, नाहींत	नाही, नाहीस. नाहीत
	नव्हें, नव्हों, नव्हां,	नव्हे, नव्हो, नव्हा
	नलगें. नलगों	नलगे, नलगो

काही कृदन्त किंवा तद्धित प्रत्ययांतील बदल पुढीलप्रमाणे बदलून लिहावे लागतील (उदाहरणातील लेखन पुढीलप्रमाणे केलेले आहे : प्रथम दामले–मराठी प्रत्यय, नंतर उदाहरण, नंतर नव्या मराठीतील प्रत्यय दिलेला आहे.)

– आणूं (जिवाणूं) – आणू, आवें (कृदन्त विशेषण, करावें) – आवे; – आं (अनुकरणवाचक, चळचळां) – आ; ऊं – (हंसूं) – ऊ; ए – (हंसें, रडें) – ए; – णें (बोलणें) – णे; तां (जातां) – ता; – तांना (जातांना) – ताना; – तें (गळतें)

– तें; – नें (उलथनें) – ने; – पें (जोडपें) – पे; – ळें (गाठळें) – ळे; – आं (मघां, मागां) – आ; – आडें (धुराडें) – आडे; – आळें (लाथाळें) – आळे; – एं (बाळंतें, मेंगें) – ए; – ओंळें (मेंडोंळें) – ओळे; – कें (पुडकें) – के; – रुं (मेंढरूं) – रू.

अनुस्वारलेखनातील बदलामुळे दामले यांच्या प्रकृतिरूपातील अनुस्वाराऐवजी नव्या मराठीच्या प्रकृतिरूपात व शब्दात अनुस्वाररहित प्रकृतिरूपे व शब्द दाखवावी लागतील. उदा०, येथे, तेथे, काही, हळू, आता, गावोगाव वगैरे.

(२) ऱ्हस्वदीर्घ लेखनातील बदल :

ऱ्हस्वदीर्घ लेखनासंबंधीच्या नियमांमुळे दामले मराठीत व नव्या मराठीत पुढील प्रकारचे बदल आढळतील.

दामले यांनी नामाच्या अंत्यस्वराच्या वर्णनात इकारान्त व उकारान्त नामे दिलेली आहेत. नव्या मराठीत या नामांचा समावेश इकारान्त व उकारान्त नामांत करावा लागेल.

अन्त्याक्षरानुसार दिलेल्या अनेकवचनाच्या प्रत्ययात पुढील फरक आढळतील. :

	दामले मराठी	नवे मराठी
ए. व.	अ. व.	अ. व.
इ	ई, इ, इ	प्रत्यय नाही किंवा ई
ई	ई, आ, एं	प्रत्यय नाही, आ, ए.
उ	उ, उ, उ	प्रत्यय नाही
ऊ	ऊ, आ, ए	प्रत्यय नाही, आ, ए.

अन्त्याक्षरानुसार दिलेल्या सामान्यरूपाच्या प्रत्ययात पुढीलप्रमाणे बदल दाखवावा लागल. इकारांत व उकारान्त नामाच्या सामान्यरूपांना दामले यांनी एकवचनासाठी ई व ऊ हे प्रत्यय व अनेकवचनासाठी ईं व ऊं हे प्रत्यय दिले आहेत. नव्या मराठीत ऱ्हस्वान्त नामे नसल्यानें हा नियम गाळून दीर्घान्त नामासाठी वेगळा नियम द्यावा लागेल.[1]

समासात ऱ्हस्वान्त शब्द तसेच राहत असल्याने दामले यांना काही विशेष नियम देण्याची आवश्यकता भासली नाही, परंतु नव्या मराठीच्या व्याकरणात, ' दीर्घान्त नामांपैकी काही नामे समासात पूर्वपद असताना ऱ्हस्वान्त होतात (उदा०, कविराज, गुरुवर्य, वायुपुत्र, गुरुदक्षिणा, वसतिगृहे वगैरे) ' असा नियम द्यावा लागेल.

(३) इतर बदल :

एकारान्त नामाचे सामान्यरूप दामले-मराठीत जेथे प्रत्यय न लावता किंवा 'या' प्रत्ययाने साधले जात होते, तेथे फक्त ' या ' हा प्रत्यय नव्या मराठीच्या व्याकरणात

१. पहा – मराठीच्या ऱ्हस्वदीर्घलेखनासंबंधी विचार– लद्दू– ' युगवाणी '.

द्यावा लागेल. उदा०, करणेंसाठी (दामले)-करण्यासाठी (दामले) करण्यासाठी (नवे) करणेंचे-करण्याचे (दामले)-करण्याचे (नवे मराठी).

५.३. (क) व्याकरणातील बदल :

नव्या नियमांमुळे व्याकरणात कोणते बदल पडतील व कोणत्या गोष्टी नोंदवाव्या लागतील याची स्थूल स्वरूपाची कल्पना पुढे दिली आहे.

(१) अनुस्वार-लेखन :

बरेचसे अनुच्चारित अनुस्वार काढून टाकल्यामुळे दोन भिन्न व्याकरणिक रूपे दाखविण्याची क्षमता लेखनात कमी होत आहे, उदा०, चांगली (स्त्री. ए. व. विशेषण) चांगलीं (नपुं. अ. व. विशेषण) आता चांगली अशा एकाच प्रकाराने लिहिले जाणार असल्यानें 'ई' हा एक प्रत्यय मानावयाचा की दोन मानावयाचे हे व्याकरणकाराला ठरवावे लागेल, तसेच पुढील प्रकारची काही विधाने करावी लागतील.

(१) शब्दाच्या अन्त्य स्वरावर अनुस्वार असत नाही.

अपवाद : शब्दान्तीच्या अ वरील अनुस्वार – हा अनुस्वार अनुनासिक निदर्शक नसून शब्दाचा उच्चार अकारान्त करावा असे दाखवतो. उदा०, 'ते जातं आहे' यातील 'जातं' शब्द अकारान्त उच्चारावा.

(२) शब्दमध्यात येणारे अनुस्वार काही वेळा अनुच्चारित असू शकतात. त्या वेळी ते सामान्यरूपाचे अनेकवचन दाखवतात.

उदा. : पक्षी झाडात लपले (एका झाडात लपले)

पक्षी झाडांत लपले (अनेक झाडांत लपले)

(३) शब्दमध्यात अनुस्वार असताना, तो शब्द सामासिक असेल तर अनुस्वार-युक्त वाचावा व सामासिक नसेल तर अनुस्वाररहित वाचावा.

उदा०, : देहांत शासनाची त्याला शिक्षा झाली. (देहांत – देह अधिक अंत), येथे अनुस्वारयुक्त वाचावा.

त्यांच्या देहांत बळ होते तोपर्यंत ते लढले. (देहात – देह अधिक सामान्यरूप अनेकवचनाचा प्रत्यय आं अधिक त). यथे अनुस्वाररहित वाचावा.

(२) ऱ्हस्वदीर्घलेखन :

(१) शब्दान्ती इ, उ हे स्वर येत नाहीत. अपवाद : यथामति, आणि वगैरे.

(२) नामे व्यंजनान्त असत नाहीत.

(३) नामांचे प्रकार दोन – तत्सम व तत्समेतर असून या दोन्ही प्रकारच्या नामांमध्ये इकारान्त व उकारान्त नामांखेरीज इतर नामांना समान नियम लागतात.

ईकारान्त व ऊकारान्त नामांपैकी काही नामांचे वर्तन पुढीलप्रमाण आढळते : इ व ऊ स्वर उपान्त्य स्थानी असताना पुढील गोष्टी दिसतात :

(i) समासात पूर्वपदी यांचा अन्त्य स्वर ऱ्हस्व होतो.
उदा०, बुद्धी – बुद्धिवैभव; मती – मतिमंद.

(ii) उपान्त्य दीर्घ ई किंवा ऊ सामान्यरूपांच्या प्रत्ययापूर्वी बदलत नाही.
उदा०, रीती – रीतीने; भीती – भीतीमुळे.

(iii) उपान्त्य दीर्घ ई किंवा ऊ सामान्यरूपांच्या प्रत्ययापूर्वी ऱ्हस्व होतो.
उदा०, : वकील–वकिलाने; गरीब, गरिबाला.

(iv) अंत्यस्थानी 'अ' स्वर असताना उपान्त्य स्थानी काही ऱ्हस्व किंवा दीर्घ स्वर येऊ शकतो.

उदा०. : गुण, विष, सून, नूप, पीठ, शुक, मंदिर, वकील, वगैरे.

(v) नादानुकारी पूर्णाभ्यस्त शब्दात दुसरा वर्ण दीर्घ असतो.

उदा. : हळूहळू, खुटूखुटू वगैरे.

(३) काही अशुद्धे :

(i) एकारान्त नामाचे सामान्यरूप एकारान्त ठेवणे अशुद्ध किंवा चूक आहे.

(ii) कोणचा, एकादा ही रूपे अशुद्ध असून कोणता व एखादा ही रूप शुद्ध आहेत.

५.३. (ड) सरकारमान्य नवमराठीचे व्याकरण लिहिण्यासंबंधी काही दिशा :

म. सा. महामंडळाच्या शुद्धलेखनविषयक नियमांनी जुन्या किंवा पूर्वीच्या प्रमाण मराठीच्या, म्हणजे दामलेप्रणीत मराठीच्या, व्याकरणापेक्षा नवमराठीत कोणते कोणते बदल अपेक्षित आहेत हे दाखवून दिले असले तरी त्या नियमांचा व दामले यांच्या व्याकरणाचा एकत्रित वापर आजच्या मराठीच्या अभ्यासकाला नवमराठीचे स्वरूप समजावून घेण्यास पुरेसा मार्गदर्शक ठरत नाही. मराठीचे व्याकरण करताना लेखन-नियमांशी ते सुसंगत राखण्यासाठी पुढील प्रकारच्या काही गोष्टी लक्षात घ्याव्य लागतील.

(१) व्ययी–अव्ययी शब्द :

व्याकरण करताना भाषेचा लहानात लहान घटक म्हणून वाक्याची घडण अभ्यासतात. वाक्य पदांचे किंवा शब्दांचे बनते. शब्द प्रकृतिरूपांना प्रत्यय लागून तयार होतात किंवा केवळ प्रकृतिरूपांचे असतात. प्रकृतिरूपे दोन प्रकारची आहेत : (१) व्ययी किंवा संपात[1] वाक्यात वापरली जाताना जी प्रत्यययुक्त असू शकतात ती व (२) अव्ययी किंवा निपात वाक्यात वापरली जाताना जी प्रत्यययुक्त असत नाहीत ती.

---

१. पहा–रूपविचार–लद्दू–' युगवाणी. '

निपातप्रकृतिरूपे वाक्यात शब्द म्हणून येतात. काही निपातरूपे वाक्यात संपात-रूपाप्रमाणे वर्तन करतात. उदा०, 'लाल' हे विशेषण प्रत्यययुक्त असत नाही, त्यामुळे शब्दघटनादृष्ट्या ते निपात प्रकृतीचे ठरते, परंतु त्याचे वाक्यातील वर्तन 'काळा, पांढरा' इत्यादी प्रत्यय घेणाऱ्या विशेषणांप्रमाणे (अर्थदृष्ट्या किंवा वाक्यातील स्थान-दृष्ट्या) असते. अशा वेळी 'लाल' या निपातप्रकृतीचा 'काळा, पांढरा' इत्यादी संपातप्रकृती प्रकारात समावेश करावयाचा किंवा नाही हे धोरण ठरवणे आवश्यक असते. निपात असूनही त्याचे वर्तन संपाताप्रमाणे असल्याने 'लाल'सारख्या विशेषणांची गणना संपातविशेषप्रकृतिरूपात केली तर वाक्यरचना सुसूत्रपणे सांगता येते व तर्कशुद्धता राखण्यासाठी त्यांना संपातप्रकृती मानून या प्रत्ययाची योजना करावी लागते. हा 'समझोता' नको असेल तर 'लाल' हे निपात प्रकृतीतील विशेष प्रकाराचे रूप सांगून निपातांच्या वर्गीकरणात विशेषणे हा वेगळा प्रकार काढावा लागतो. अशा प्रकारे व्याक-रणकाराला आपल्या सुसूत्रवर्णनासाठी आपली 'व्यावहारिक' अडचण प्रथम स्पष्ट करून घेऊन मग वास्तवांशी, वर्णनाच्या सोयीसाठी किंवा सुकरतेसाठी, कोठे कोठे फारकत स्वीकारावयाची, ती कशी मांडावयाची याची स्पष्ट कल्पना करून घेणे आवश्यक होईल.

(२) शब्द-प्रकृती :

महामंडळाच्या ऱ्हस्वदीर्घलेखनविषयक नियमांत वापरला गेलेला 'शब्द' हा शब्द काही वेळा 'पद' या अर्थी वापरला गेला आहे– नियम ५–तत्सम (ऱ्हस्व) इकारान्त व उकारान्त शब्द प्रथमेत दीर्घान्त लिहावेत. नियम ५–स्पष्टीकरण–परंतु, यथामति, तथापि इत्यादी तत्सम अव्यये ऱ्हस्वान्तच लिहावी. तर काही वेळा प्रकृती या अर्थी वापरला गेला आहे. नियम ५–सामासिक शब्दांतही तत्सम (ऱ्हस्व) इकारान्त व उकारान्त शब्द पूर्वपद असताना ऱ्हस्वान्तच लिहावे. शब्द हा वाक्याचा घटक असतो, तो कोशगतही असतो. तो केव्हा प्रकृती असतो तर केव्हा पद असतो. त्यामुळे व्याकरणात शब्द, प्रकृती व पद यातील व्याकरणिक भिन्नता लक्षात घेऊन त्याप्रमाणे त्याच्या त्याच्या विशिष्ट अर्थाने वरील शब्दांचा वापर करणे जरुरीचे ठरेल. कोणतेही वर्गीकरण करताना ते प्रकृतिरूपांचे वर्गीकरण आहे की शब्दांचे आहे याविषयींची स्पष्ट कल्पना देणे उचित ठरेल. तसेच तत्सम व तद्भव हे शब्द वापराव-याचेच झाले तर शब्द तत्सम, तद्भव की प्रकृति-तत्सम-तद्भव, हे स्पष्ट करणे फायद्याचे होईल.

(३) तत्सम-तद्भव :

लेखनविषयक नियमांवरून नामांचे वर्गीकरण तत्सम व तद्भव या दोन प्रकारांनी केलेले आढळते. असे वर्गीकरण केल्यास व्याकरणाचा मार्गदर्शक म्हणून उपयोग करू इच्छिणारावर नामांतील किंवा अव्ययांतील तत्सम-तद्भव असा फरक जाणून घेण्याची

जबाबदारी पडते. प्रस्तुत नियम पूर्वीच्या व्याकरणातील बदल थोडक्यात सुचवीत असल्याने (जरी त्या व्याकरणात तत्सम-तद्भव विभागणी तितकी आवश्यक नव्हती तरी) तत्सम-तद्भव शब्दांचा वापर अपरिहार्य ठरतो. नवमराठीच्या व्याकरणात या शब्दांचा अंतर्भाव करण्याची अपेक्षा राहू नये; कारण मराठीच्या अभ्यासकाला संस्कृतचे ज्ञान असणे हे व्याकरणकाराने अभिप्रेत धरणे योग्य ठरणार नाही. व्याकरणकाराचे काम भाषेचे वर्णन करण्याचे आहे. त्याला वाटले तर तो आपल्या पुस्तकात ऐतिहासिक कारणे किंवा संदर्भ देऊ शकतो; परंतु ती त्याने दिलेली अधिक माहिती किंवा स्वमतपुष्ट्यर्थ वा परमतखंडनार्थ वापरलेली कारणपरंपराच फक्त राहू शकते. ती व्याकरणाचा अविभाज्य भाग होऊ शकत नाही. व्याकरणास इतिहास उपयुक्त असला तरी तो आवश्यक नसतो. त्यामुळे नव्या व्याकरणात शब्दांचे किंवा प्रतिरूपाचे वर्गीकरण तत्सम-तद्भव या ऐतिहासिक तत्त्वांवर करणे अयोग्य ठरेल.

(४) संस्कृत इंग्रजी व्याकरण :

महामंडळाच्या नियमांवरून दामले यांनी वापरलेली, मराठीच्या व्याकरणासाठी इंग्रजी-संस्कृत-मिश्र चौकट मंडळाला मान्य तरी असावी किंवा मंडळाने गृहीत धरलेली असावी. आजच्या प्रगत भाषाशास्त्राच्या अभ्यासाच्या काळात एका भाषेच्या व्याकरणाची चौकट दुसऱ्या भाषेसाठी पायाभूत धरणे किंवा दुसऱ्या भाषेवर लादणे योग्य ठरणार नाही. यासाठी मराठी भाषेचे व्याकरण मराठीच्याच वास्तव स्वरूपाकडे लक्ष ठेवून मांडणे आवश्यक आहे. इंग्रजीत शब्दांच्या आठ जाती आहेत म्हणून मराठीत आठ जाती मानणे म्हणजे मराठीवर अन्याय करण्यासारखे आहे. मराठीचे व्याकरण करताना ते केवळ घटकांच्या रचनादृष्ट्या केले आहे की काही प्रमाणात का होईना अर्थाचा विचार केला आहे किंवा अर्थ व शब्दघटना यांचा परस्पर संबंध कोणत्या मर्यादेत विचारात घेतला आहे याची निश्चित कल्पना देणे योग्य ठरेल.

(५) व्याकरणकाराचे स्वातंत्र्य :

आजच्या व्याकरणकाराला (जुनी) तत्सम इकारान्त किंवा उकारांत नामे कोशगत शब्द समजून किंवा त्यांना प्रतिरूपे समजून, ही नामे प्रथमा विभक्तीसाठी अन्त्य स्वराची ‘ आवृत्ति ’[1] घेतात असे सांगणे जितके शक्य आहे तितकेच त्या नामांसाठी ‘ स्वरांचे दीर्घीकरण ’ हा प्रथमेचा प्रत्यय आहे असेही सांगणे शक्य आहे. हे शब्द दीर्घान्त प्रकृतीचे मानून ते प्रथमेला प्रत्यय घेत नाहीत असे विधान करून हे शब्द समासात ऱ्हस्वांन्त होतात असेही म्हणता येईल. एकवचनी नामांचे प्रथमेचे रूप ही जर प्रकृती मानली व प्रथमेला प्रत्यय नाही असे विधान करायचे ठरवले, तर इकारान्त व ऊकारान्त नामांपैकी समासांत ऱ्हस्व होणाऱ्या नामांचा वेगळा गट काढावा लागेल.

---

१. पहा : मराठीच्या ऱ्हस्वदीर्घ लेखनासंबंधी विचार – लद्दू – ‘ युगवाणी ’.

आपले विवरण सुसूत्र कसे करता येईल यासाठी वरील प्रकारच्या अनेक शक्यतांमधील कोणतीही एक शक्यता निवडून व्याकरणकार वास्तवाशी मिळतेजुळते करणारे स्वतःचे स्वातंत्र्य राखू शकेल. जी गोष्ट नामांच्या बाबतीत तीच गोष्ट इतरत्र त्याला वापरता येईल. ' मीं भात खाल्ला ' या वाक्यातील ' मी ' वरच्या अनुस्वार उच्चाटनामुळे तृतीया विभक्तीने युक्त मानावयाचा की प्रथमेत मानावयाचा, ' खाल्ला ' हे भूतकालदर्शक क्रियापद समजावयाचे की विधिशब्द म्हणून वर्तन करणारे विशेषण[१] म्हणावयाचे ही व्याकरण-काराची निवड असू शकते.

(६) काही विशिष्ट प्रामाण्ये :

रूढ मराठीत बदल सुचवून शासनाने जी मराठी रूपे प्रमाण ठरविली व दामले यांच्या व्याकरणात ज्यांचा परामर्श घेतला जाऊनही ज्यांना प्रामाण्य मिळालेले नाही, व जी तत्कालीन रूढ मराठीत प्रमाण नसावीत अशा रूपांची प्रामाण्याच्या दृष्टीने दखल घेणे नव्या व्याकरणकाराला आवश्यक ठरेल. ' त्यांना ' हे रूप प्रमाण असले तरी ' त्यान्ला '[२] हेही रूप प्रमाण मानावयाचे किंवा कसे ते स्पष्ट करावे लागेल. शुद्ध-लेखनाच्या नियमांनी भाषेचे एक स्वरूप जरी स्पष्ट होत असले तरी भाषेच्या सर्वांगीण स्वरूपातील कित्येक प्रयोग प्रामाण्याच्या कसोटीवर उतरतात किंवा नाहीत हे स्पष्ट करणे जरूर ठरते. यासाठी हल्लीच्या प्रतिष्ठितांच्या बोलीतील व लेखनातील कित्येक रूढ शब्दांचे स्थान प्रामाण्याच्या दृष्टीने नक्की करणे नवमराठीच्या व्याकरण-काराला आवश्यक ठरेल. ' आल्याली, गेल्याली ' सारखी विशेषणे, किंवा ' करतेला, बोलतेली ' सारखी रूपे प्रमाण मानावीत किंवा नाहीत हे त्याला सांगावे लागेल. ' तर मग ' या शब्दप्रयोगाच्या अर्थाने वापरात येणारा ' तशी ' हा शब्द प्रमाण माना-वयाचा असेल तर ज्या वाक्यरचनेत हा प्रयोग येत असेल ती वाक्यरचना स्पष्ट करणे जरुरीचे होईल.

वरील सर्व विवेचनावरून असे दिसेल की सरकारने मान्य केलेल्या लेखनविषयक नियमांनी दाखवून दिलेल्या प्रमाण मराठीचे व्याकरण करताना व्याकरणकाराला आपला व्याकरणविषयक दृष्टिकोन ठरवून घ्यावा लागेल. वर्तनावरून वर्गीकरण, शब्दघटनेवरून वर्गीकरण करावे किंवा नाही हे ठरविण्याबरोबरच वर्णनाच्या सोयीसाठी आपली विधाने ' शास्त्रपूत ' करून मांडावी लागतील व स्वतःला आढळून आलेल्या लेखनपद्धतींतील उणिवा जरूर तेथे स्पष्ट मांडाव्या लागतील.

५.४. काही व्याकरणे :

साहित्य महामंडळाने लेखनविषयक नियम प्रसिद्ध केल्यानंतर प्रा. अरविंद

---

२. पहा : विशेषणे, विधिशब्दांचा एक प्रकार – लहू – मराठी संशोधन पत्रिका.
३. शास्त्रीय मराठी व्याकरण – दामले पृ. ३९५ (करंदीकर प्रत).

मंगरूळकर यांनी पुणे विद्यापीठाच्या केळकर–स्मृतिदिनानिमित्त होणाऱ्या व्याख्यानमालेत जी व्याख्याने दिली ती सन १९६४ मध्ये ‘ मराठी व्याकरणाचा पुनर्विचार ’ या नावाने पुस्तकरूपाने प्रसिद्ध केली. या पुस्तकाच्या प्रस्तावनेत मंगरूळकर यांनी, ‘व्याकरणकोशादी प्रयत्न हे कधी आमूलाग्र परिपूर्ण अथवा सर्वांगांनी परिसमाप्त असू शकत नाहीत ’ असे विधान करून व्याकरणाच्या सर्वमान्य मर्यादा दाखवून दिल्या आहेत. या पुस्तकातील विषयविवेचनासंबंधी मंगरूळकर यांनी, मराठीच्या व्याकरणातल्या काही प्रचलित प्रश्नांची चर्चाचिकित्सा ’ (पृ. ७) अशी आपली मर्यादा स्पष्ट केलेली असल्याने यात मराठीचे पूर्ण वर्णन आढळण्यापेक्षा मागील व्याकरणकारांच्या विधानांवरील आपली मते प्रतिपादन करण्याचा प्रयत्न त्यांनी दाखवून दिलेला दिसतो. ‘ व्याकरण ही भाषेच्या घटनेची विशिष्ट दृष्टिकोनाने पाहिलेली यथार्थ, वास्तव, लाघवयुक्त आणि सुसंगत अभिव्यक्ती आहे (पृ. ८). या अभिव्यक्तीतील नियमावली ही अनेक लोक अनेक प्रकारांनी मांडू शकतील. त्या मांडण्यात मुख्य विचार करावयाचा तो दोन गोष्टींचा : (१) ती निबद्ध नियमावली भाषेच्या सर्व अंगांना स्पर्श करणारी आहे की नाही ? व (२) ती लाघवयुक्त आहे की नाही ? तशी ती असली म्हणजे वैय्याकरणाचे काम समाप्त होते; तसेच ‘ अर्थभेदवाहक ध्वनिविकृतींचा अभ्यास व्याकरणाच्या कक्षेपलीकडचा असतो. ’ (प. २०); ‘ वाक्यातील पदे, प्रत्यय, घटक इत्यादिकांचा विचार केल्यानंतर त्यांच्या पलीकडे व्याकरणाचे क्षेत्र ताणता येणार नाही. ’ हा व्याकरणासंबंधींचा आपला दृष्टिकोन स्पष्ट केल्यानंतर मंगरूळकरांनी मराठीच्या प्रमाणभाषेची चिकित्सा आपण करणार आहोत (पृ. ४०) व या चिकित्सेसाठी मराठीचे बोलण्यातले जे स्वरूप दिसते ते लक्ष्यभूत आहे असे म्हटले आहे.


मंगरूळकर यांच्या मते – मराठीमध्ये (पृ. ६२) :

अ, आ, इ, उ, ऋ, ए, ॲ, ओ, ऑ हे नऊ स्वर असून क्, ग्, ङ्, ही कण्ठय; ट्, ड्, ण् ही मूर्धन्य; च्, ज्, ञ् ही तालव्य; च्, ज्, ञ् ही दन्तमूलीय; त् द्, न् ही दन्त्य; प्, ब्, म् ही ओष्ठय अशी १८ वर्गीय व्यंजने, सघोष व अघोष ह्; य्, र्, ल्, व् ही चार अंतःस्थ, श्, ष्, स् हे तीन ऊष्म वर्ण, व ळ् हा मूर्धन्यताडित वर्ण अशी १० अ–वर्गीय व्यंजने आहेत.

मराठीतील शब्दांचे स्थूलमानाने वर्गीकरण (पृ. ९२) :

- शब्द
  - सव्यय
    - नाम
    - धातुसाधित
      - वचनविकारी (अलिंग)
      - लिंगवचनादी विकारी (सलिंग)
    - साधित
  - अव्यय

असे असून थोडया अधिक तपशिलाने ते पुढीलप्रमाणे येते (पृ. ९८)



मंगरूळकर यांनी नामाची व्याख्या वस्तूचा वाचक असा सहजलिंगी शब्द अशी केली असून नामाचे धर्मिवाचक, धर्मवाचक इत्यादी प्रकार व्याकरणाच्या दृष्टीने अनुपयुक्त असल्याने अमान्य केले आहेत. नामाची ' लिंग ' ही उपाधी यादृच्छिक असून (पृ. ९९) ती त्या त्या भाषिकांच्या भाषाप्रचारावरूनच समजून घेतली पाहिजे. नामाची ' वचन ' ही उपाधी प्रयोजनसापेक्ष आहे. मराठीत वचनें दोन आहेत, एकवचन आणि अनेकवचन. प्रायः सर्व नामांना या दोन वचनविकृती होतात. ' विशेषणे ' दोन प्रकारची असून त्यांची विभागणी पांढरगण व तदितर गणात करायला पाहिजे. सर्वनामांचे दोन प्रकार असून त्यांपैकी पहिला प्रकार इष्टलिंग सर्वनामे (मी, तू वगैरे यांचा समावेश विभवितकार्यतः नामांमध्ये करणे सयुक्तिक आहे–पृ. ११३) व दुसरा प्रकार सलिंग सर्वनामे (यांचा समावेश लिंगकार्यतः विशेषणात करणे जरूर आहे). नामाचा अथवा सर्वनामाचा वाक्यातल्या अन्य पदांशी संबंध जोडणारी उपाधी म्हणजे ' विभक्ती ' अशी व्याख्या करून मंगरूळकरांनी विभक्तिप्रत्यय पुढीलप्रमाणे दाखवले आहेत. (पृ. १४४)

	एकवचन	अनेकवचन
प्रथमा		आ, ई, ए
द्वितीया	ला, स	ना, ला, स
तृतीया	नें, शीं, एं	नी, शीं
संबोधन	आ, या, ई, ए	नो

मंगरूळकर यांनी धातूंच्या अकर्मक व सकर्मक अशा दोनच जाती मानल्या असून (पृ. १४८), ' ज्या धातूचा अर्थ एखाद्या वस्तूच्या ठिकाणी उगम पावतो आणि त्याच वस्तूला विषय करतो ' तो धातू अकर्मक व ' ज्या धातूचा अर्थ एखाद्या वस्तूच्या ठिकाणी उगम पावून दुसऱ्या वस्तूला विषय करतो ' तो धातू सकर्मक, अशी व्याख्या

केली आहे. वचन, पुरुष, लिंग व कालार्थ (पृ. १५५) अशा धातूंच्या उपाधी सांगून वर्तमान., भूत., व भविष्य, असे तीन काळ व आज्ञा, विधी आणि संकेत (किंवा क्रियातिपत्ती) असे तीन अर्थ दिले आहेत. तसेच धातूंचे वन्ध्य व जनक असेही दोन प्रकार मानले आहेत. आपल्या व्याख्यानांच्या अखेरच्या भागात प्रकृतीचे स्वरूप लक्षात घेऊन केलेले वर्गीकरण दिलेले आहे.

आपल्या व्याख्यानांच्याद्वारे प्रमाणमराठीच्या व्याकरण रचनेची नवी दिशा मंगरूळकरांनी दाखवून दिलेली आहे. संस्कृत किंवा इंग्रजी भाषेच्या व्याकरणाच्या दृष्टीतून मराठी भाषेकडे न पाहता मराठी भाषेचे मराठीच्या गरजेनुसार व्याकरणात कसे वर्णन करता येतील ते दाखवले आहे. मंगरूळकरांच्या या पुस्तकावरून मराठीच्या व्याकरणात दामले यांच्या व्याकरणापेक्षा ध्वनी, शब्दांच्या जाती, वाक्यप्रयोग या सर्वच थरांवर किती प्रकारे बदल करणे आवश्यक आहे किंवा शक्य होईल ते दिसून येते.

आपल्या पुस्तकात मंगरूळकर यांनी साहित्य महामंडळाच्या शुद्धलेखनविषयक नियमांचा वापर केलेला नाही ही गोष्ट लक्षात घेण्यासारखी आहे.

सन १९७२ मध्ये महाराष्ट्रातील सर्व माध्यमिक शाळांतून नवा सुधारित अभ्यासक्रम अंमलात आला. त्या अभ्यासक्रमावर आधारित अशा पाठ्यपुस्तकांची गरज निर्माण झाली. इयत्ता ८ वी, ९ वी व १० वी यांच्याकरिता तीन वेगळी पुस्तके लावण्याऐवजी या तिन्ही वर्षांच्या अभ्यासक्रमास अनुसरून एकच पुस्तक असणे सोयीचे होईल असे कित्येक शिक्षकांचे म्हणणे पडले. त्यांच्यासाठी आणि उच्चमाध्यमिक, पदवीपूर्व व पदविका अभ्यासक्रमांचा समावेश करून, विद्यार्थी व शिक्षक यांना उपयुक्त व्हावे म्हणून श्री. मो. रा. वाळंबे यांनी सन १९७४ मध्ये ‘ सुगम मराठी व्याकरण लेखन ’ या नावाचे पुस्तक प्रसिद्ध केले. सन १९७७ मध्ये याच पुस्तकाची सुधारून वाढवलेली आवृत्ती प्रसिद्ध झाली. यामध्ये ‘ भाषा म्हणजे विचार व्यक्त करण्याचे साधन ’ (पृ. १) अशी भाषेची व्याख्या देऊन, भाषेमध्ये भाषण व लेखन या दोहोंचा समावेश होतो असे सांगून, ‘ व्याकरण म्हणजे भाषेचे स्पष्टीकरण करणारे शास्त्र ’ (पृ. ३) अशी व्याकरणाची व्याख्या केली आहे व वर्णविचार, शब्दविचार, व वाक्यविचार या क्रमाने मराठीचे व्याकरण मांडले आहे. या व्याकरणासाठी पायाभूत व्याकरण म्हणून दामले किंवा ग. ह. केळकर यांची व्याकरणे वापरलेली असावीत. या आधारभूत व्याकरणात जो संस्कृत-इंग्रजी व्याकरणांचा प्रभाव होता तो वाळंबे यांच्याही व्याकरणात दिसून येतो; मात्र काही ठिकाणी वाळंबे यांनीही काही नवीन गोष्टींची चर्चा केली आहे. उदा०, पृ. २३ वरील मराठीचे काही विशेष संधी – ‘ काहीसा, केलेसे, खिडकीत, कितीक, सांगेन, दोन्ही, येतोय, गेलीय ’ वगैरे. वाळंबे यांनी दिलेली अकर्मक क्रियापदाची व्याख्या (पृ. ५७) मंगरूळकर यांच्या व्याख्येशी साधारणपणे मिळतीजुळती आहे. त्यांनी क्रियाविशेषण व क्रियाविशेषण अव्यय यात फरक केला असून (पृ. ७२) क्रियापदाबद्दल विशेष माहिती सांगून जी अविकारी रहातात त्यांनाच क्रियाविशेषण अव्यये असे म्हणतात अशी

क्रियाविशेषण अव्ययाची व्याख्या केली आहे. मात्र ' लाल ' वर्गातील अविकारी विशेषणे वाक्यात विधेयविस्तारात आली असता त्यांना काय म्हणावे हे त्यांनी स्पष्ट केलेले नाही. वाळंबे यांचा उद्देश ' शैक्षणिक ' असल्याने त्यांच्या लेखनाला मर्यादा आहेत हे मान्य केले पाहिजे. या लेखनासाठी प्रमाण म्हणून घेतलेली भाषा म्हणजे दामले यांनी आपल्या व्याकरणात वर्णन केलेली भाषा, शासनाच्या लेखनविषयक नियमांनी आवश्यक तेथे बदलून तयार झालेल्या स्वरूपाची आहे. डॉ. तुळपुळे यांनी केळकरांचे व्याकरण जसे संपादित केले तशा प्रकारे दामले यांच्या व्याकरणाचा मूळ गाभा लेखनाच्या नव्या नियमांनी संपादित करून वाळंबे यांनी व्यक्त केला आहे. शैक्षणिक क्षेत्रात या पुस्तकाचा वापर असल्याने यात वर्णन केलेल्या भाषेला शासकीय प्रामाण्य आहे असे मानण्यास हरकत नाही. या शासकीय प्रामाण्यावरून असे दिसून येते की आजच्या प्रमाणभाषेसाठी अजूनही दामले यांच्या व्याकरणाचे प्रामाण्य मानले जात आहे. मात्र ते वेगळ्या लेखनपद्धतीने लिहिणे अपेक्षित आहे. प्रमाणभाषा दामल्यांच्या व्याकरणाने दाखवलेली व लेखन मात्र त्या व्याकरणात असलेल्या पद्धतीपेक्षा भिन्न, ही एक प्रकारची विसंगती आहे. ही विसंगती दूर करण्याची आवश्यकता वाळंबे यांच्या पुस्तकामुळे तर अधिकच स्पष्ट झालेली आहे.

ऑक्टोबर १९७९ मध्ये प्रकाशित झालेल्या ' मराठीचा भाषिक अभ्यास ' या डॉ. कानडे यांनी संपादित केलेल्या पुस्तकात डॉ. कल्याण काळे यांनी ' पदविन्यास ' व ' वाक्यविन्यास ' या दोन लेखांत मराठीचा रूपविचार वर्णन केला आहे; तर प्रा. पुंडे यांनी मराठीचा ध्वनिविचार व स्वनिमविचार मांडला आहे. या दोन लेखांमधून आजच्या मराठीचे व्याकरण समजून घेता येईल. हे व्याकरण नवीन भाषाशास्त्राच्या म्हणजे वर्णनात्मक भाषाशास्त्राच्या दृष्टिकोनातून लिहिलेले आहे. प्रा. पुंडे यांनी मराठी स्वनिम पुढीलप्रमाणे दिलेले आहेत :

स्वर (पृ. १३९ : इ, ए, अॅ, आ, अ, ऑ, ओ, उ.)

व्यंजने (पृ. १४१)

		ओष्ठ्य	दन्त्य	मूर्धन्य	दन्त मूलीय	तालव्य	मृदू तालव्ये	कण्ठ्य
स्पर्श अघोष –	अल्पप्रमाण	प्	त्	ट्	च्	चॅ्		क्
	महाप्राण	फ्	थ्	ठ्	छ्	छॅ्		ख
स्पर्श सघोष –	अल्पप्राण	ब्	द्	ड्	ज्	जॅ्		ग्
	महाप्राण	भ्	ध्	ढ्	झ्	झॅ्		घ्
					स्पर्श संघर्ष			
अनुनासिक –	अल्पप्राण	म्	न्	ण्				ङ्
	महाप्राण	म्ह्	न्ह्	ण्ह्				

	ओष्ठ्य	दन्त्य	मूर्धन्य	दन्त मूलीय	तालव्य	मृदू तालव्ये	कण्ठ्य
कंपित अल्पप्राण सघोष		र्					
कंपित महाप्राण सघोष		ऱ्ह्					
पार्श्विक अल्पप्राण		ल्	ळ्				
पार्श्विक महाप्राण		ल्ह्	ळ्ह्				
अघोष घर्षक		स्	(ष्)	श्			ह्
सघोष घर्षक							ह्
अर्धस्वर	व्				य्		

डॉ. कल्याण काळे यांनी (पृ. १४९) पदाची 'व्याकरणाचा मूलभूत घटक' अशी व्याख्या करून ते वाक्यात कधी स्वतंत्रपणे येऊ शकते तर कधी इतर पदांच्या साह्याने येते असे म्हटले आहे. शब्द हा वाक्यातला स्वतंत्रपणे राहू शकणारा सर्वात लहान घटक असून त्याचे विघटन पदांमध्ये होऊ शकते. पदे, त्याचे प्रकार, त्यांच्या-पासून होणारी शब्दनिर्मिती इत्यादींचा विचार व्याकरणाच्या ज्या विभागात होतो तो पदविन्यास असून पदबंध, उपवाक्य, वाक्य इत्यादी विविध रचनांचा अभ्यास ज्या विभागात होतो तो वाक्यविन्यास होय असे म्हटले आहे.

काळे यांच्या पदविन्यासात त्यांनी पदिमाचे आशयबोधक पदिम व कार्यकर पदिम असे वर्गीकरण करून आशयबोधक पदिमांना धातू व कार्यकर पदिमांना प्रत्यय (पृ. १५९) असे म्हटले आहे. त्यांची इतर विधाने : प्रत्ययांचे साधक प्रत्यय व विभक्ति-प्रत्यय पृ. १६०) असे दोन प्रकार असून त्यांच्या योगाने साधितशब्द व विभक्तिरूप शब्द तयार होतात. साधक प्रत्ययांचा उपयोग करून भाषेत नवनवीन शब्द येत असतात व विभक्तिप्रत्ययांचा उपयोग करून शब्द व्याकरणिक संरचनेमध्ये भाग घेतात. पद-विन्यासाच्या दृष्टीने मराठी धातूंचे नाम, क्रियापद व अव्यय (पृ. १६२) असे तीन मुख्य प्रकार आहेत. वाक्यविन्यासाच्या दृष्टीने पडणाऱ्या प्रकारांचा पदविन्यासाच्या दृष्टीने पडणाऱ्या प्रकारांशी समन्वय साधून धातूचे–नाम, सर्वनाम, विशेषण, क्रियापद आणि अव्यय, असे पाच प्रकार मानले आहेत. नाम, सर्वनाम व विशेषण यांना वचन, लिंग, आणि सामान्यरूप यांचे विकार होतात आणि अव्ययांना कोणतेच विभक्तिरूप विकार होत नाहीत. समासाचे प्रकार (पृ. १७८) दोन – अन्यपदप्रधान व अंतःपद-प्रधान असून अंतःपदप्रधान समासाचे अव्ययीभाव, कर्मधारय, तत्पुरुष व द्वंद्व असे चार पोट प्रकार आहेत. वाक्यविन्यासाबाबत काळे म्हणतात (पृ. १८१) – 'पदविन्यास व वाक्यविन्यास हे दोन विभाग' विवेचनाच्या सोयीसाठी 'कल्पिलेले आहेत, त्यांना तात्त्विक आधार फारसा नाही.' मराठी भाषेचे व्याकरण अशा दोन विभागांत करणे

शक्य असल्याने ते मांडलेले आहे. इतर भावांच्या बाबतीत ते सर्वच ठिकाणी शक्य होते असे नाही. पारंपरिक व्याकरणात केले जाणारे वाक्यपृथक्करण आणि प्रथमोपस्थित संघटक पद्धतीने केलेले वाक्यपृथक्करण यांत तसा फारसा फरक नाही असे (पृ. १९२) नमूद करून वाक्यांचे प्रथमोपस्थित संघटक म्हणजे वाक्यातील उद्देश्य आणि विधेय होत; उद्देश्याचे प्रथमोपस्थित संघटक म्हणजे मूल उद्देश्य आणि उद्देश्यविस्तार आणि विधेयाचे प्रथमोपस्थित संघटक म्हणजे मूल विधेय (क्रियापद) आणि विधेयविस्तार असे म्हटले आहे. ' होय, नाही, अर्थात ' इत्यादी शब्दांना काळे यांच्या मते संरचनाच नसल्याने त्यांनी त्यांना वाक्यपृथक्करणातून वगळून इतर मराठी वाक्ये उद्देश्य व विधेय या दोन घटकांनी बनतात, यांपैकी कोणताही एक अध्याहृत असू शकतो किंवा दोन्ही स्पष्टपणे दिसून येतात असे म्हटले आहे. उद्देश्य म्हणजे कर्ता असून तो प्रत्यक्ष असतो. विधेय म्हणजेच क्रियापद किंवा क्रियापदबंध विधेयविस्तारकांशिवाय वाक्याच्या अर्थपूर्तीसाठी आधारपूरक, कर्मपूरक किंवा विधिपूरक अशी तीन प्रकाराची वाक्यपूरके कधी कधी वाक्यात वापरावी लागतात (पृ. १९४), त्याशिवाय विधान पूर्ण होत नाही. याशिवाय वाक्यात अतिरिक्त संघटकांचा वापर केला जातो असे काळे यांनी म्हटले आहे. वाक्याची रचना त्यांनी खालीलप्रमाणें दिली आहे (पृ. १९४).

वाक्य

उद्देश्य	विधेय				
	विधेयवाचक	विधेयविस्तारक	विधेयपूरक		
			आधार पूरक	कर्म पूरक	विधि पूरक

या व्याकरणातील लेखनपद्धती नव्या नियमांनुसार दिसते. त्यावरून काळे यांनी त्या लेखनपद्धतीने वापरल्या जाणाऱ्या व काळे यांना प्रमाण असणाऱ्या मराठीचे व्याकरण केले असावे असे म्हणायला हरकत नाही.

डॉ. श्री. न. गजेंद्रगडकर यांनी जिज्ञासू वाचकांना आधुनिक भाषाशास्त्राची प्रणाली व पद्धती यांची तोंडओळख करून द्यावी व प्रामुख्याने पदव्युत्तर विद्यार्थ्यांना भाषा व भाषाशास्त्र या विषयाच्या अभ्यासासाठी एखादे पाठ्यपुस्तक असावे या हेतूने सन १९७४ मध्ये ' भाषा आणि भाषाशास्त्र (वर्णनात्मक) ' हे पुस्तक लिहिले. यासाठी अनेक पारिभाषिक शब्द तयार करून त्यांना हे पुस्तक लिहावे लागले. त्याची दुसरी आवृत्ती १९७९ मध्ये प्रसिद्ध झाली. भाषा व भाषाशास्त्र या विषयासंबंधी लिहिताना गजेंद्रगडकर यांनी ठिकठिकाणी मराठी भाषेचे वर्णन केले आहे. उदाहरणे देण्यासाठी मराठी भाषेचा उपयोग झाला असल्याने या पुस्तकाकडे मराठीचे व्याकरण म्हणून पाहणे जरी शक्य नसले तरी मराठीच्या नव्या व्याकरणाला मराठीसंबंधी यात मांडलेल्या विचारांचा परामर्श घेणे किंवा उपयोग करून घेणे आवश्यक आहे. त्यांनी मराठीत

पुढील स्वर स्वनिम आहेत असे म्हटले आहे– (पृ. २८२) इ, ए, अॅ, आ, अ, ऑ. ओ, उ. त्यांच्या मतान मराठीत व्यंजन स्वनिम पुढीलप्रमाणे आहेत[1] :

प	त	ट	च	चॅ	क
फ	थ	ठ	छ	छॅ	ख
ब	द	ड	ज	जॅ	ग
भ	ध	ढ	झ	झॅ	घ
म	न	ण			ङ
	र				
	ल	ळ			
	स		श	ष	ह
व				य	

याशिवाय मुख्य व गौण असे बलाघात स्वनिम आहेत.

आपल्या पुस्तकात वाक्यांविषयींचे विवेचन करताना मराठी भाषेच्या स्वरूपाविषयी गजेंद्रगडकर यांनी काही विधाने केली आहेत. त्यांतील काही उदाहरणादाखल पुढीलप्रमाणे देता येतील : (पृ. ३७३), ' मराठीमध्ये नामांचे व सर्वनामांचे विभक्तिप्रत्यय तेच असल्यामुळे वाक्यरचनेच्या दृष्टीने पाहिल्यास त्यांचा स्वतंत्र विचार करण्याची मराठीला गरज पडत नाही ', (पृ. ३८४), ' मराठीमध्ये वाक्याचे मुख्यतः उद्देश्य व विधेय असे दोन खंड पडतात. उद्देश्याबरोबर अनुग असेल वा नसेल. वाक्यात विधेयाबरोबर अनुयोगी अव्ययासहित वा विना क्रियाविशेषण देखील वैकल्पिक आहे. त्याचप्रमाणे उद्देश्य व विधेय यांच्यामध्ये अन्विती असलीच पाहिजे ' (पृ. ३८५). (पृ. ४०५), ' प्रत्येक शब्दाला दोन मुखवटे असतात. (१) रूप (बोलभाषेत ध्वनी व लिखित भाषेत वर्णग्राम), (२) आशय (रूपातून व्यक्त केला जाणारा संदेश) यांच्यातील नाते अविभाज्य आहे. '– ' शब्द ' या शब्दाचा वापर करताना हे विधान उपयुक्त ठरण्याजोगे आहे.

' भाषा व भाषाशास्त्र ' या आपल्या पुस्तकात गजेंद्रगडकर यांनी भाषाशास्त्रासंबंधी माहिती निरनिराळया भाषांतील उदाहरणाद्वारा दिलेली आहे तिचा उपयोग करून मराठी भाषेकडे पारंपरिक विचारांबरोबर वेगळ्या दृष्टीने पाहणे कसे शक्य होईल हे लक्षात घेता येण्याजोगे आहे. मात्र गजेंद्रगडकरांचाही संस्कृत भाषेचा व्यासंग मराठीच्या विवेचनासाठी पायाभूत होत आहे की काय अशी शंका मनात आल्याशिवाय राहात नाही. मराठी संस्कृतचे नाते व संस्कृतचा व्यासंग या दोन्ही गोष्टी लक्षात घेता संस्कृत जाणणारा संस्कृतमधील पारिभाषिक शब्दांचा सहजपणे वापर का करतो हे

१. प्रा. पुंडे यांनी दिलेले स्वनिम डॉ. गजेंद्रगडकरांनी दिलेल्या ध्वनिलिपीशी पुष्कळसे साम्य दाखवतात.

लक्षात येईल. (पृ. ३३३) ‘ शब्दांचा मूलभूत अर्थ व्यक्त करणारे, शब्दांचा गाभा असलेले पदिम धातू म्हणून ओळखले जातात. धातूमध्ये नामिक व आख्यानिक असे दोन्ही प्रकार सामावले जातात ’ या विधानातील ‘ धातू ’ शब्द गजेंद्रगडकर जेव्हा वापरतात तेव्हा त्यांनी ‘....शब्दयोनिश्च धातवः ’[1] या अमरकोशातील पंक्तीवरून घेतला असावा असे म्हणण्याला पूर्ण वाव राहतो.

५.५ वाटचाल :

वेगवेगळया कालखंडातील भाषिक प्रतिष्ठितांच्या बदलत्या सामाजिक, शैक्षणिक, व राजकीय स्थानांनुसार भाषेचे प्रामाण्य बदलत बदलत सन १९६२ च्या भाषिक प्रतिष्ठितांच्या विशिष्ट भाषेपर्यंत आले असता, असे दिसते की या प्रामाण्याने व्यक्त होणारे स्वरूप व आधीच्या मराठी प्रमाणभाषेचे स्वरूप यात आता ज्यांची नोंद घेतली पाहिजे असे बरेच बदल पडलेले दिसून येतात. काही प्रत्यय वापरातून लुप्तप्राय होत आहेत, तर काही नवे प्रत्यय ‘ मी बसतोय ’ मधील ‘ तोय् ’ च्या ‘ य् ’ सारखे वापरात येऊ लागले आहेत. ‘ य् ’ ला प्रत्यय मानले तर ‘ बसतो ’ मधील ‘ तो ’ प्रत्ययाचे वर्णन बदलावे लागणार आहे. नाहीतर ‘ बसतो अधिक आहे ’ हा समास ठरवायचा की संधी ठरवायचा, आहेचे पदान्तर ‘ हे, य् ’ असे मानायचे किंवा बसतो हा विधि–शब्द मानून त्याचा वापर काही वेगळया प्रकारचा दाखवायचा किंवा ‘ य ’ च्या रूपांना अप्रमाण मानावयाचे अशा प्रकारचा काही निर्णय घेणे जरुरीचे झाले आहे. अशा या बदलत आलेल्या मराठीचा स्थूल रूपाने काळे यांनी मराठीच्या दृष्टीतून परिचय करून दिलेला आहे, तसाच मराठीत ऱ्हस्वदीर्घ स्वरांना मान्यता स्वनांतर स्तरावर देऊन पुढे त्यांनी आपले स्वनिम रूढ वर्णमालेपेक्षा वेगळया प्रकारे मांडले आहेत. डॉ. अशोक रा. केळकर, डॉ. गजेंद्र-गडकर, प्रा. पुंडे, डॉ. काळे, प्रा. मंगरूळकर, डॉ. साऊथवर्थ, डॉ. आपटे वगैरे भाषा-भ्यासी आजच्या मराठीचा परंपरेपेक्षा वेगळया दृष्टीने इंग्रजी–संस्कृतच्या व्याकरणांच्या चौकटीबाहेर जाऊन अभ्यास करताना आढळत आहेत, तसेच काहींचे या मराठीचा मराठीच्या दृष्टीने, म्हणजेच भाषाशास्त्राच्या वर्णनात्मक शाखेनुसार, एककालिक स्वरूपांचे वर्णन करण्याच्या पद्धतीनुसार अभ्यास करून स्फुट लेखनही प्रसिद्ध होत आहे. यापैकी काहींच्या विवेचनामधून संस्कृत भाषेच्या व्याकरणाचा एक धागा गुंफलेला आढळून येतो, तो संस्कृत भाषेचा केवळ आहे म्हणून दोषास्पद ठरू नये, तर मराठी भाषा संस्कृतापासून बदलत बदलत ‘ मराठी ’ या स्वरूपाला पोचली असल्याने तो वास्तविक मराठीचेच स्वरूप संस्कृतच्या व्याकरणातील काही पारिभाषिक शब्द योग्य

१. अमरकोश ३.३.६५ : श्लेष्मादि रसक्तादि महाभूतानि तद्गुणाः ।
इंद्रियाण्यश्मविकृतिः शब्दयोनिश्च धातवः ॥
३ नानार्थवर्ग ६४–६५

वाटल्याने त्या शब्दांमार्फत दाखवीत आहे, असे समजणे अधिक उचित होईल. संस्कृत-मध्ये ' रामो राजा ' हे वाक्य होऊ शकत असेल तर एखाद्या भाषेत दोन प्रथमान्त पदे मिळून वाक्य होऊ शकते ही वस्तुस्थिती लक्षात घेऊन एखाद्या व्याकरणकाराने ' राम हाच राजा ' याला वाक्य म्हटले तर ते संस्कृतच्या प्रभावामुळे म्हटले की मराठीची तशी प्रवृत्ती आहे म्हणून म्हटले हे निश्चित करून, मराठीची तशी प्रकृती आहे म्हणून म्हटले व ते संस्कृतशी समान आहे, कारण मराठी संस्कृतपासूनच जन्मलेली आहे ही वस्तुस्थिती आहे असे ध्यानात घेतले पाहिजे आणि संस्कृत–मराठीचा नातेसंबंध नीटपणे उलगडून घेतला पाहिजे.

* * *

६

प्रमाण मराठीचे स्वरूप

६.१. प्रास्ताविक

६.१. (अ) भाषा व व्याकरणे :

प्रमाणभाषा व प्रमाणबोली यांमध्ये अतिशय साम्य असले तरी सर्वसाधारणपणे प्रमाणभाषा लिहिली जाते व प्रमाणबोली बोलली जाते. प्रमाणबोलीत व्यक्तिगत बोलीचे अंश जितके ऐकू शकतात त्या मानाने प्रमाणभाषेत कमीत कमी ऐकू शकतात, कारण प्रमाणभाषेत 'शुद्धाशुद्धविवेक' राखावा लागतो. बोलीसाठी तो मुद्दाम राखण्यापेक्षा आपोआप राखला जाण्याची किंवा काही वेळा काही प्रमाणात न राखला जाण्याचीही शक्यता असते. प्रमाणभाषेच्या वापरातही व्यक्तिव्यक्तींचे वैशिष्टय दिसून येत नाही असे नाही. असे वैशिष्टय दिसणे हा शैलीचा भाग राहतो, पण त्यातही व्याकरणशुद्धत असावी लागते. व्याकरणशुद्ध लेखन याचा अर्थ सरकारमान्य लेखनविषयक नियमांना धरून कोणत्यातरी व्याकरणाने दाखवून दिलेल्या पद्धतीने, परंपराप्राप्त लेखनपद्धतीने, म. सा. प. च्या नियमांना धरून अथवा मुंबई विद्यापीठाने मान्य केलेल्या नियमांनुसार लेखन करणे, अथवा भाषिक प्रतिष्ठिताने स्वतःची विशिष्ट नियमावली तयार करून त्य पद्धतीने लेखन करणे, स्वतःसाठी नियमावली तयार करणाऱ्या भाषिक प्रतिष्ठिताचा भाषाविषयक अभ्यासाचा व्यासंग असणे अपेक्षित आहे, तसेच कोणत्या प्रकारचे लेखन स्वीकारावे किंवा कोणते स्वीकारू नये या निर्णयासाठी त्याला तर्कशुद्ध विचारसरणीची पार्श्वभूमी व नियमांत सर्वत्र सारखेपणा वापरण्याचा काटेकोरपणा अंगी असणे आवश्यक आहे.

समाजातील अनेक विचारवंत, लेखक, विविध क्षेत्रांतील व थरांतील प्रभावी व्यक्ती जी बोली बोलतात ती गटप्रमाण बोली असते. या गटप्रमाणबोली अनेक असू शकतात; परंतु त्यांना जेव्हा नियमित अशा लेखनपद्धतीने लेखनासाठी वापरात आणले जाते तेव्हा त्यांचे रूपांतर प्रमाणभाषेत होते. वास्तविक एकभाषिक समाजाची एकच प्रमाणभाषा असणे हेच प्रमाणभाषेच्या व्याख्येनुसार अपेक्षित असते. समाजाच्या एकजिनसीपणासाठी ते अपेक्षितही असते. परंतु भाषेच्या जीवनात जेव्हा काही वैशिष्टयपूर्ण बदल घडून येतो, जेव्हा त्या समाजातील सर्व प्रतिष्ठितांच्या भाषेसंबंधीच्या विचारांत मतभिन्नता होते तेव्हा समाजाची प्रमाणभाषा एक

न राहता अनेक पोटभाषा गटागटाचे प्रामाण्य मिळवतात. या कालखंडातून बाहेर निघण्यास सर्वभाषिक प्रतिष्ठितांना मान्य अशा व्याकरणाची आवश्यकता निर्माण होते. ते जितक्या लवकरच्या काळात उपलब्ध होईल तितक्या लवकर हा पोटभाषांचा कालखंड संपून सर्वमान्य अशी प्रमाणभाषा अस्तित्वात येते व भाषिक संकुलतेचा काळ बदलला जातो. सध्या मराठी भाषेचा असा संकुलतेचा काळ आला आहे, या विधानाला पुष्टी देण्यास प्रा. मंगरूळकर यांचे ' मराठी व्याकरणाचा पुनर्विचार ' हे पुस्तक, डॉ. अशोक केळकर यांचा ' परामर्श ' मधील ' प्राचीन भारतीय साहित्य मीमांसा ' हा लेख, डॉ. शं. गो. तुळपुळे यांचे ' मराठी ग्रंथनिर्मितीची वाटचाल ' हे पुस्तक किंवा प्रा. लीला गोविलकर यांचे ' मराठी व्याकरण ' हे पुस्तक यांवर लेखनपद्धतीच्या दृष्टीतून ओझरती नजर जरी टाकली तरी पुरेसे होईल. वरील सर्व लेखक जुन्या-नव्या भाषाभ्यास पद्धतींचे अभ्यासक आहेत. हे लक्षात घेतल्यास भाषिक प्रतिष्ठित आपापल्या भाषेसंबंधी निश्चित दृष्टिकोन कसा राखतात हेही दिसून येईल. वरील सर्व लेखकांनी लिहिलेली भाषा दामलेप्रणीत मराठीपेक्षा फारशी भिन्न नसली तरी प्रत्येक लेखकानुसार ' भाषिक प्रामाण्य ' दाखविणारी आहे हेही खरे.

मराठी भाषेतील सध्याच्या काळातील अनेक ' प्रमाण ' लेखनपद्धतींना सुसूत्रता येण्यासाठी मराठी साहित्य महामंडळ व मंगरूळकरप्रभृती भाषिक प्रतिष्ठित (भाषाभ्यासाचे व्यासंगी लोक) यांच्यामध्ये ' भाषिक ' चर्चा होऊन, सर्वसामान्य माणसांसाठी मार्गदर्शक तत्त्वे स्पष्ट करून मराठीचे प्रमाणस्वरूप निश्चित करण्याची, म्हणजेच एक प्रकारे मराठीची नवी ' प्रमाणभाषा ' अस्तित्वात आणण्याची जरुरी निर्माण झाली आहे. तसे झाले नाही तर शाळा-कॉलेजांतून, सरकारी दप्तरांच्या क्षेत्रांतून किंवा आकाशवाणी, दूरदर्शनसारख्या संपर्कसाधनांद्वारे एक विशिष्ट प्रमाण-मराठी वापरात राहील व ज्यांना वरील भाषेला मान्यता द्यावीशी वाटत नाही असे लोक आपापल्या क्षेत्रात दुसऱ्या स्वरूपाची प्रमाण-मराठी वापरताना आढळतील. त्यामुळे मराठीची तीन प्रमाण-स्वरूपे (एका अर्थाने तीन पोटभाषा) अस्तित्वात राहतील (१) पुरातन मराठीचे (सन १९४७ च्या पूर्वीचे), (२) जुन्या मराठीचे (सन १९४७ ते १९६१ पर्यंतचे), व (३) नव्या मराठीचे (सन १९६१ नंतरची).

आज वरील तिन्ही मराठी भाषा वापरल्या जाताना दिसत आहेत. त्यांपैकी पुरातन मराठी वापरणारे लोक हळूहळू काळाच्या पडद्याआड जातील तेव्हा, त्यांनी लिहिलेली पुस्तके किंवा त्यांचें इतर साहित्य त्या मराठीचे अस्तित्व दाखवीत राहतील. सर्वमान्य अशा व्याकरणाची, भाषेचे प्रमाण स्वरूप निदर्शित करणाऱ्या पुस्तकाची, निर्मिती झाली नाही तर जुनी व नवी प्रमाण मराठी बऱ्याच काळपर्यंत अस्तित्वात राहण्याची शक्यता आज दिसून येत आहे. नवी मराठी शिकणारा आजचा विद्यार्थी प्रौढ होऊन ती सातत्याने वापरू लागेपर्यंत, जुनी मराठी लिहिणारा वृद्ध होऊन कालगतीनुसार नाहीसा होईपर्यंत ह्या दोन्ही भाषा अस्तित्वात राहातील. त्या तशा राहणे भाषेच्या

समृद्धीच्या दृष्टीने खरोखर योग्य नाही; कारण समाजाच्या एकसुरीपणासाठी प्रमाणभाषा एकाच स्वरूपाची असणे अत्यावश्यक असते. म्हणून जशा कृत्रिम मार्गांनी नवी मराठी अस्तित्वात आली तशा कृत्रिम उपायांचा अवलंब करून नवी अधिक जुनी अशी सर्वमान्य मराठी अस्तित्वात आणण्याची आज नुसती गरजच नव्हे तर निकड आहे.

मराठी भाषेच्या व्याकरणांबाबतही आज तीन वेगळ्या कालखंडांतील भाषा दाखवणारी आढळून येतात असे म्हणता येईल. (१) सन १८०५ नंतरची पण सन १९११ च्या आधीची प्राचीन व्याकरणे, (२) सन १९११ पासूनची जुनी व्याकरणे, व (३) सन १९४७ नंतरची वर्णनात्मक भाषाशास्त्र जाणणाऱ्यांनी लिहिलेली नवी व्याकरणे. व्याकरणांनी त्या त्या काळाच्या भाषेशी संवाद राखावा अशी अपेक्षा असते. प्राचीन व्याकरणे व प्राचीन मराठी याचा संवाद आढळून येतो. परंतु जुनी, नवी व्याकरणे आणि पुरातन, जुनी व नवी मराठी यांपैकी पुरातन मराठी व जुने व्याकरण यात संवाद आढळतो तो बऱ्याच प्रमाणात असला तरी जुने व्याकरण व जुनी मराठी किंवा नवे व्याकरण व नवी मराठी यांत म्हणावा तसा सुसंवाद आढळत नाही. याला एक कारण प्रमुख सांगता येईल ते हे की नव्या मराठीचे ' मान्य ' व्याकरण आज उपलब्ध नाही.[1] जी व्याकरणे आहेत ती एक तर जुनी व्याकरणे नव्या मराठीशी जमवून घेण्याच्या स्वरूपाची दिसतात. उदा०, ग, ह. केळकरांचे व्याकरण, चौथी आवृत्ती, किंवा बाळंबे यांचे ' सुगम मराठी व्याकरण ', किंवा नवी व्याकरणे मराठीच्या प्रमाणबोलीची आढळतात. त्या बोलीच्या लेखी स्वरूपाची म्हणजे प्रमाणभाषेची आढळत नाहीत.

६.१ (ब) व्याकरणाचे हेतू व व्याकरणाचे स्वरूप :

भाषेच्या स्वरूपावर व व्याकरणकाराच्या व्याकरण लेखनामागच्या हेतूवर व्याकरणाचे स्वरूप अवलंबून राहते. गटप्रमाणबोलीचे व्याकरण गटप्रमाणभाषेच्या व्याकरणापेक्षा काही ठिकाणी वेगळी वर्णने देऊ शकते, तसेच प्रमाणभाषेच्या व्याकरणात गटप्रमाणबोलीत वापरल्या जाणाऱ्या कित्येक पदबंधांचा समावेश नसण्याची शक्यता असते. गटप्रमाणबोलीच्या व्याकरणामुळे बोलीचे स्वरूप कळते, प्रमाणभाषेच्या व्याकरणाच्या अभ्यासाने भाषा कशी लिहिली असता ' प्रमाण ' समजली जाईल, म्हणजे ' शुद्ध ' समजली जाईल हे कळते. प्रमाणभाषेचे व्याकरण म्हणजे शुद्धाशुद्धविवेक करण्याचा एक प्रकारचा निकष. तसेच या व्याकरणाचा भाषेच्या लेखनाशी संबंध असल्याने व्याकरण हे भाषेच्या लिखित स्वरूपाशी संबद्ध राहत असतानाच उच्चारण-अंगाशी संवाद राखण्याचा उद्देश साध्य करून देत असते. प्रमाणभाषेच्या व्याकरणात ' अ ' स्वराचे वर्तन सांगताना, तो पदांती स्वर-व्यंजन-स्वर असा

१. व्याकरणे काही प्रमाणात उपलब्ध असली तरी ती प्रमाणभाषेची ठरू शकतीलच असे म्हणता येत नाही म्हणून ' मान्य ' शब्द वापरला आहे.

आल्यास अनुच्चारित असतो, स्वर–व्यंजन–व्यंजन–स्वर असा आल्यास उच्चारिला जातो, अशा प्रकारे द्यावे लागेल. तर गटप्रमाणबोलीच्या व्याकरणात ' अ ' या स्वराचे वर्तन सांगताना, तो उपान्त्यस्थानी व्यंजन असताना अन्त्य स्थानी येत नाही असे द्यावे लागेल. गटप्रमाणबोलीच्या व्याकरणात ' मन्द, फक्त, सिद्ध ' इत्यादी शब्द अकारान्त असून ' झाड, मन, माप ' इत्यादी शब्द व्यंजनान्त आहेत असे म्हणावे लागेल, कारण त्याशिवाय त्या विशिष्ट बोलीच्या वास्तव स्वरूपाचे वर्णन होणार नाही; उलट वरील सर्व शब्द प्रमाणभाषेत अकारान्त द्यावे लागून आवश्यक तेथे ' अ ' अनुच्चारित आहे अशी टीप द्यावी लागेल.

प्रमाणभाषेच्या व्याकरणाचा उपयोग भाषा कशी लिहावी हे सांगण्यासाठी प्रामुख्याने असतो तर बोलीच्या व्याकरणाचा उपयोग भाषा कशी आहे हे सांगण्यासाठी असतो. बोलीच्या व्याकरणावरून भाषेचे उच्चरण–अंग समजू शकते तर प्रमाणभाषेच्या व्याकरणावरून ते मुद्दाम समजावून घेण्याची बाब ठरते. उदा०, प्रमाणभाषेच्या व्याकरणात ' अ ' या स्वराचे वर्तन देताना तो उपान्त्य सुट्या व्यंजनानंतर अनुच्चारित (झाड), उपान्त्य जोड व्यंजनानंतर तोकडा उच्चार असणारा (भिंत), दोनावयवी शब्दांत अन्त्य स्वर ' अ ' असताना, पहिला अ दीर्घ (बस), तीन अक्षरी शब्दांत पहिला अवयव असताना ऱ्हस्व, दुसरा अवयव असताना पुढे दीर्घ स्वर नसेल तर दीर्घ (बसत), दीर्घ स्वर असेल तर अनुच्चारित (बस का), इत्यादी प्रमाणे वर्णन करावे लागते. अशा वर्णनामुळे उच्चार–अंगाचा लिखित पद्धतीशी संवाद स्पष्ट होतो, म्हणजेच गटप्रमाणबोलीचे प्रमाणभाषेशी नाते स्पष्ट केले जाते. हे नाते जितके जास्त स्पष्ट तितकी प्रमाणभाषा निर्दोषपणे वापरण्याची क्षमता जास्त वाढते. स्वतःची भाषा लिहायला शिकतानाच न कळत हे नाते व्यक्तीकडून शिकले जाते. त्यामुळे वास्तविक पाहता प्रमाणभाषा मुद्दाम शिकावी लागत असली तरी तसे वेगळेपण जाणवत नाही. ज्या काही ठिकाणी हे वेगळेपण जाणवते त्याला ' शुद्धलेखनाच्या नियमांच्या ' स्वरूपात, आवश्यक तेव्हा शब्दवर्णरचनेच्या (spelling च्या) स्वरूपात व्याकरणात, कोशात स्थान दिले जाते. ज्या वेळी लेखन हे व्याकरणाने दाखवलेल्या पद्धतीनुसार असत नाही त्या वेळी त्याला ' अशुद्ध ' किंवा ' अप्रमाण ' म्हटले जाते.

बोलीभाषेचे व्याकरण म्हणजे, बोली बोलणाऱ्याच्या दृष्टीने, त्याला जे माहीत आहे, जे दळणवळणाच्या किंवा विनिमयाच्या प्रामाण्यावर तो न कळत किंवा सहजपणे वापरात आला आहे, किंवा जे भाषा शिकत असतानाच त्याने जाणले आहे ते सुसूत्रपणे मांडून दाखवलेली व्यवस्था होय. या व्याकरणावरून बोली बोलणाऱ्या व्यक्तीला भाषा बोलण्यासाठी शिकण्यासारखे वास्तविक काही नसते. मात्र या व्याकरणाचा उपयोग जेव्हा ती विशिष्ट बोली न बोलणाऱ्या व्यक्तीसाठी केला जातो तेव्हा ते प्रमाणभाषा किंवा स्वतःची बोली त्या व्याकरणाने दाखवलेल्या बोलीच्या स्वरूपाने कशी बोलावी याचे निदर्शक होत असते.

दुसरी भाषा शिकावयाची झाल्यास व्यक्तीला भाषेची दोन स्वरूपे शिकावी लागतात, एक प्रमाणबोलीचे व दुसरे प्रमाणभाषेचे. फक्त गटप्रमाणबोली एखाद्याने शिकली तर त्या बोलीचा जेथे वापर आहे तेथे बोली शिकणारा निजीभाषिकासारखा बोलू शकून भाषिक विनिमय साधता येईल. त्याने प्रमाणभाषा शिकली तर शिकणारा ती भाषा वापरून आपला परस्परविनिमयाचा हेतू लेखनाद्वारे सर्व समाजाशी शुद्ध स्वरूपाने व बोलण्याद्वारे समाजाच्या भाषिकांपेक्षा काही थोड्याशा वेगळ्या स्वरूपाने साध्य करून घेईल. ज्याला भाषेची दोन्ही स्वरूपे आत्मसात करता येतील त्याने ती परभाषा पूर्णपणे जाणली असे म्हणता येईल.

प्रमाणबोली व प्रमाणभाषा यांच्यातील अंतर जेव्हा कमीत कमी असते तेव्हा उच्चारण व लेखन यातील संवादाचे प्रमाण जास्तीत जास्त राहते. परंतु भाषेची परिवर्तनशीलता प्रमाणबोलीत जे बदल घडवते त्यांची नोंद प्रमाणभाषेत होईनाशी झाली की हे अंतर वाढते. अर्थातच हे अंतर कमी होण्यासाठी कृत्रिम उपायांनी अथवा न कळत प्रमाणभाषेच्या लेखनात बदल पडतो व प्रमाणभाषेत बदल नोंदले जाऊ लागतात. कालांतराने पुन्हा प्रमाणबोलीशी सुसंगत अशी प्रमाणभाषा वापरात येऊ लागते. भाषांच्या बाबतीत बोली व लेखी भाषांतील सुसंगति–विसंगति–सुसंगती अशा गोष्टी कालमानानुसार अविच्छिन्नपणे चालत असतात. म. सा. मंडळाचे नवे नियम म्हणजे अशी सुसंगती साधण्याचा एक कृत्रिम उपाय होय; तर 'सुधारित' या शब्दाऐवजी 'सुधारत' किंवा 'दाखविले, पाठविले' यांच्याऐवजी 'दाखवले, पाठवले' हे शब्द लिखित भाषेत वापरले जाणे हे न कळत नोंदल्या गेलेल्या बदलाचे उदाहरण होय.

प्रमाणभाषेची व्याकरणे, लिखित भाषेची असल्याने व प्रमाणभाषा सर्वत्र सारखी वापरली जाणारी असल्याने, सर्वच सारखी असावीत अशी अपेक्षा वस्तुतः राहाते. परंतु व्याकरणकाराच्या दृष्टिकोनानुसार किंवा विशिष्ट तर्कपद्धतीनुसार त्यात भिन्नता आढळू शकते. भाषा जरी एकच असली तरी तिची व्याकरणे एकाच प्रकारची असतात असे नाही. उदाहरणार्थ, एका व्याकरणकाराने धातू हे वर्तमान, भूत व भविष्य या तीन काळांसाठीं प्रत्यय घेतात असे विधान केले, तर दुसरा याऐवजी धातू भविष्यकाळाचे प्रत्यय घेतात असे म्हणून वर्तमानकाळ म्हणजे अपूर्ण क्रिया व भूतकाळ म्हणजे पूर्ण क्रिया दाखवण्यासाठी वाक्यात धातुसाधित विशेषणे वापरली जातात असेही विधान करू शकतो. 'मुलाने पुस्तक वाचलें' या वाक्यात पहिल्या व्याकरणकाराच्या मताने 'वाचले' हे भूतकाळी क्रियापद असेल तर दुसऱ्याच्या मताने ते धातुसाधित विशेषण असेल.

प्रमाणभाषेची व्याकरणे भिन्न असणे म्हणजे भाषेच्या घटकासंबंधीची विवेचने किंवा घटकांची मांडणी काही प्रमाणात वेगळी असणे, असे असले तरी तिचे लिखित स्वरूप सर्वत्र एकच असल्याशिवाय भाषा 'प्रमाण' होऊ शकत नसते. भाषांच्या जीवनात अचानक एकापेक्षा अधिक प्रमाणभाषा अस्तित्वात येण्याची वेळ केव्हातरी येत असते; अशा वेळी सर्वत्र सुसूत्र असे प्रमाणभाषेचे स्वरूप लवकरात लवकर ठरवले गेले नाही तर

सर्व-संपर्काच्या प्रमाणभाषेच्या कार्यात हळूहळू विक्षेप वाढत जाऊन मराठीपासून दोन स्वतंत्र भाषा निर्माण होण्याची शक्यता नाकारता येणार नाही. कारण अशा घटनांची बीजे इतिहासात, एकाच वेळी, एकाच भाषिक समाजासाठी जेव्हा दोन वेगळया प्रमाण-भाषा वापरल्या जाऊ लागतात तेव्हा रोवली गेलेली आढळून आलेली आहेत.

वरील विवेचनावरून लक्षात येईल की आजच्या प्रमाण-मराठीचे स्वरूप चार प्रकारांनी मांडले जाण्याची शक्यता आहे; किंवा हेच विधान बदलून असेही म्हणता येईल की जिला प्रमाणभाषा म्हणावे अशा भाषेची नोंद घेणारी चार प्रकारची व्याकरणे मराठीत उपलब्ध होऊ शकतात.

(१) जुने व्याकरण अधिक जुने लेखनविषयक नियम;
(२) जुने व्याकरण अधिक नवे लेखनविषयक नियम;
(३) नवे व्याकरण अधिक जुने लेखनविषयक नियम;
(४) नवे व्याकरण अधिक नवे लेखनविषयक नियम.

जुन्या व्याकरणात वर्णनाच्या सोयीनुसार व भाषेच्या आवश्यकतेनुसार इंग्रजी व संस्कृतची व्याकरणे पायाभूत घेतलेली आहेत. नव्या व्याकरणात भाषाशास्त्र विषयाच्या आधुनिक दृष्टिकोनामुळे भाषेचा काहीसा तटस्थ वृत्तीने अभ्यास मांडलेला आढळतो. आजच्या काळात आदर्श व्याकरण म्हणजे नवे व्याकरण अधिक लेखनविषयक सुधारित नियम याचे होऊ शकेल. ज्यांनी नवे लेखनविषयक नियम तयार केले ते, ज्यांना हे नियम मान्य नाहीत ते, ज्यांच्यापाशी भाषिक प्रतिष्ठा किंवा व्यासंगामुळे प्रभावीपणा लाभलेला आहे असे, प्रतिष्ठित, तसेच समाजजीवन, इतिहास, भूगोल, संस्कृती इत्यादी संदर्भ जाणणारे काही प्रतिष्ठित, या सर्वांना मान्य असे नवे सुधारित नियम मराठीच्या लेखनाविषयी ठरवता आल्यास त्यांचा उपयोग करून लिहिले गेलेले व्याकरण, प्रमाण-भाषा कशी लिहावी यासाठी मार्गदर्शक ठरू शकेल, व अशा व्याकरणामुळे आज लोप पावू पहात असलेला भाषेचा एकसुरीपणा, भाषेच्या नैसर्गिक परिवर्तनशीलतेसह, अस्तित्वात येईल; त्याचा फायदा मराठी भाषेच्या अभिवृद्धीसाठी, नव्हे जीवनासाठी, फार मोलाचा ठरेल. मात्र लेखनविषयक समान नियम स्वीकारले तरी भाषेची जडण-घडण मांडण्याचा दृष्टिकोन सर्व व्याकरणकारांचा सारखाच राहील असे नव्हे. सर्वमान्य नियमांनी लिहिलेल्या या भाषेच्या वर्णनात व्याकरणकाराच्या विचारसरणीनुसार साम्यभेद आढळतीलच. उदाहरणार्थ, एखादा व्याकरणकार मराठीच्या आठ विभक्ती मानील, एखादा प्रथमा, तृतीया, चतुर्थी व संबोधन मानील तर एखादा प्रथमा, द्वितीया (प्रत्यय-युक्त व प्रत्ययरहित), तृतीया व संबोधन मानील तर एखादा जुन्या विभक्तिप्रत्ययांना (post-positions) पुढे येणारे प्रत्यय मानून 'सामान्य' ही एकच विभक्ती दाखवील. असे जरी झाले तरी प्रमाणभाषेच्या व्याकरणाचा व लेखनपद्धतीचा सुसंवाद कायम राहिल्याने, व्याकरणकाराच्या मांडणीत जर कोठे तर्कदुष्टता, विसंगती नसेल तर अशी सर्व व्याकरणे 'आदर्श'च ठरतील.

६.२. सरकारमान्य मराठीचे व्याकरण :

सरकारन्य नव्या शुद्धलेखन नियमांनी जी मराठी भाषा लिहिली जात आहे व सरकारी, शैक्षणिक, वाङ्मयीन, प्रचारकेन्द्रीय इत्यादी क्षेत्रांत जी प्रमाण मानली जात आहे त्या प्रमाण मराठीचे, इंग्रजी–संस्कृत इत्यादी व्याकरणांच्या प्रभावापासून अलिप्त राहून, आधुनिक भाषाशास्त्र पद्धतींचा वापर करून, पुढील प्रकारे व्याकरण मांडता येईल.[1] मराठीची रूपरेषा येथे बरीचशी स्थूल स्वरूपात मांडलेली आहे.

६.२. (अ) वर्णविचार :

स्वनिम व वर्ण आणि लिखित भाषेचा लहानात लहान घटक रेखिम यातील फरक लक्षात घेऊन वर्णविचार मांडणे आवश्यक आहे. मराठीत पुढील स्वरवर्ण व व्यंजनवर्ण आहेत.

स्वर : अ, आ, इ, ई, उ, ऊ, ऋ, ऌ, ए, ऐ, ओ, औ, अं, अः, अॅ, ऑ.

व्यंजने : क्, ख्, ग्, घ्, ङ्; च्, छ्, झ्, ज्, ञ्; ट्, ठ्, ड्, ढ्, ण्; त्, थ्, द्, ध्, न्, प्, फ्, ब्, भ्, म्, (च्, छ्, ज्, झ्, अनुक्रमे च़्, छ़्, ज़्, झ़्, या वर्णांनी दाखविले जातात.

य्, र्, ल्, व्; श्, ष्, स्, ह्, ळ्.

स्वरवर्ण व्यंजनांशी जोडून किंवा सुटे लिहिले जातात. व्यंजनांशी जोडून लिहिले जात असताना व्यंजनदर्शक खूण काढून टाकणे म्हणणे ‘ अ ’ स्वरयुक्त लेखन व बाकी स्वरांसाठी व्यंजनापुढे, वर, किंवा खाली जोडून पुढीलप्रमाणे खुणा दर्शविल्या जातात : (आ–पासून अनुक्रमे (ा, ि, ी, ु, ू, े, ै, ो, ौ, ं, ः, ॅ, ॉ. व्यंजवर्ण दुसऱ्या व्यंजवर्णाशी जोडून आले असता भिन्न प्रकाराने लिहिले जातात किंवा व्यंजनखूण शिल्लक ठेवून लिहिले जातात. उदा०, ‘ क् ’ बद्दल ‘ व ’ किंवा ‘ प् ’ बद्दल ‘ ८ ’, व ट् ‘ तट्टू ’ मधील, मराठी लेखनात काही तयार जोडाक्षरेही वापरली जातात. उदा०, क्ष्, ज्ञ्.

‘ अ ’ हा स्वर[2] त्याच्या असण्याच्या संदर्भानसार अनुच्चारित, तोकडा, ऱ्हस्व, मध्यम किंवा दीर्घ लांबीने उच्चारला जातो. इ, ई, व उ, ऊ, हे स्वर उच्चारांचे ऱ्हस्व-दीर्घत्व दाखवीत नसून तेही शब्दांतील आपापल्या स्थानानुसार ऱ्हस्वदीर्घ उच्चारले जातात. उदा०, ‘ भीति ’ मधील ‘भी’ ऱ्हस्व, ‘ वधूवर ’ मधीस ‘ धू ’ ऱ्हस्व, ‘ विष ’ मधील ‘ वि ’ दीर्घ उच्चारला जातो. ऐ व औ यांचे उच्चार काही वेळा ‘ अय् ’ व ‘ अव् ’ यांच्या उच्चाराप्रमाणे केले जाताना आढळतात.

---

१. ‘ Beginning Marathi Part I ’ या पुस्तकाची रचना या व्याकरणाच्या आधारे केलेली असून त्याच पुस्तकाच्या तिसऱ्या भागात हे व्याकरण लिहिण्याचा संकल्प आहे.

२. विस्तारभयास्तव स्वर व व्यंजने यांची उच्चारणे कशी होतात ते दिलेले नाही. तसेच त्यांचे विशिष्ट संदर्भातील वर्तनही दिलेले नाही.

व्यंजन व स्वर मिळून किंवा फक्त स्वरांच्या योगाने शब्दाचा अवयव तयार होतो. शब्दाचे उच्चारणदृष्टया पडणारे अवयव व लेखनदृष्टया पडणारे अवयव यांत फरक पडतो. ' सरकार ' या शब्दात लेखनदृष्टया चार अवयव आहेत, तर उच्चारणदृष्टया सर् अधिक कार असे दोनच अवयव होतात, व ' दिल्ली ' या शब्दात लेखनदृष्टया ' दि ' व ' ल्ली ' असे दोन अवयव होतात, व उच्चारणदृष्टया ' दिल् अधिक ली ' असे दोन अवयव पडतात. लेखनदृष्टया अवयवांना काही ठिकाणी अक्षर असा शब्द वापरलेला आढळतो, व एकापेक्षा अधिक व्यंजनांचा वापर होऊन स्वरमिलाफाने अवयव तयार झाला असल्यास ' जोडाक्षर ' असाही शब्द वापरलेला आढळतो. जोडाक्षरांतील व्यंजनांची फोड लेखनदृष्टया ज्या अवयवांत होते त्यापेक्षा भिन्न अवयवांत उच्चारणदृष्टया होऊ शकते, काही वेळा दोन्हीकडे एकसारखीही राहते, उदा०, ' भक्ति ' या शब्दात लेखनदृष्टया अवयव ' भ अधिक क्ति ', उच्चारणदृष्टया अवयव ' भक् अधिक ती '; सत्याला या शब्दात लेखनदृष्टया अवयव ' स अधिक त्या अधिक ला ', उच्चारणदृष्टया अवयव ' सत् अधिक त्या अधिक ला '; ' पाण्याला ' या शब्दात लेखनदृष्टया अवयव होतात ' पा अधिक ण्या अधिक ला ', तेच अवयव उच्चारणदृष्टयाही होतात.

ङ्, ञ्, ण्, न्, म्, यांचे लेखन अनुस्वाराने करता येते. ङ् व ञ् चा लेखनात वापर फारच कमी आढळतो. काहींच्या लेखनात देहान्त व देहांत याप्रमाणे न् व अनुस्वार यांचे लेखन दोन भिन्न गोष्टी सुचविण्यासाठी वापरलेले आढळते – देहान्त – देह अधिक अन्त, देहांत – देह अधिक सामान्यरूपाचा प्रत्यय आं अधिक त. अनुस्वार-लेखन सर्वच वेळी उच्चारित असते असे नाही.

वर्णांचे लेखन व त्यांचा उच्चार यांचे वर्णन दिले असता प्रमाणभाषा कशी वाचावयाची ते समजू शकते.[१]

६.५. (ब) रूपविचार व वाक्यघटक :

' रूप '[२] म्हणजे अर्थ व्यक्त करणारा, लहानात लहान अशा वाक्याचा घटक. एक किंवा एकापेक्षा अधिक रूपांनी शब्द बनतात. वाक्यांचे शब्दछेदकाने[२] छेद पाडल्यावर शब्द हाती येतात. जी रूपे वाक्यात स्वतंत्र शब्द म्हणून येऊ शकतात ती ' निपातरूपे ' होत. व जी रूपे वाक्यात दुसऱ्या एखाद्या रूपाबरोबर येऊ शकतात ती ' संपातरूपे ' होत. शब्दाच्या घटकभूत असणाऱ्या रूपांच्या संख्येवरून शब्दांचे दोन प्रकार पडतात – (१) एकरूपी शब्द आणि (२) अनेकरूपी शब्द. जी रूपे वाक्यात स्वतंत्र शब्द म्हणून येऊ शकतात किंवा दुसऱ्या रूपाबरोबर येऊ शकतात ती ' स्वतंत्रसंपात ' किंवा ' प्रकृति ' रूपे; व जी रूपे वाक्यात केव्हाच स्वतंत्र शब्द म्हणून येऊ शकत नाहीत ती

१. पहा : ' An Outline of Marathi Phonetics ' –Jha.

२. पहा : ' रूपविचार ' – लद्दू, ' युगवाणी, जून–जुलै १९७८.

'परतंत्र–रूपे' किंवा 'प्रत्यय–रूपे' होत.

मराठी शब्द पुढीलप्रमाणे तयार होताना आढळतात :

(१) निपातयुक्त (आणि, व);

(२) स्वतंत्र संपातयुक्त – प्रकृतियुक्त (झाड, चाल);

(३) प्रकृति अधिक प्रत्यय – (झाडी); क्ष

(४) प्रकृति अधिक प्रकृति (घरदार);

(५) प्रकृति अधिक एक किंवा अधिक प्रकृति अधिक शून्य, एक किंवा एकापेक्षा अधिक प्रत्यय.

या शब्दांचे प्रकृतिरूपांच्या संदर्भात तीन प्रकार सांगता येतील.

(१) निपात शब्द – (परंतु);

(२) प्रकृति शब्द – ज्यात एक प्रकृतिरूप असून शून्य, एक किंवा एकापेक्षा अधिक प्रत्यय आहेत असे (झाड, झाडे, झाडाला);

(३) सामासिक शब्द – ज्यात एकापेक्षा अधिक प्रकृतिरूपे असून शून्य, एक किंवा एकापेक्षा अधिक प्रत्यय आहेत असे (भाजीभाकरी, घरदाराने);

प्रकृतिरूपांचे त्यांच्यापुढे येणाऱ्या प्रत्ययांच्या स्वरूपावरून तीन प्रकार होतात :

(१) प्रातिपदिक – जी रूपे सामान्य रूपासाठी[1] प्रत्यय घेतात ती :

(२) धातु – जी रूपे काळाचे प्रत्यय घेतात ती :

(३) क्रियाविशेषणे – जी रूपे सामान्य रूपाचे किंवा काळाचे प्रत्यय घेत नाहीत ती :

सामान्य रूपांच्या प्रत्ययांच्या वर्तनावरून प्रातिपदिकांचे तीन प्रकार होतात :

(१) नामे – ज्यांच्यापुढे येणाऱ्या सामान्यरूपांच्या प्रत्ययांनंतर आणखी एखादा प्रत्यय येतो ती, म्हणजच सामान्यरूपाचा 'अंगी' प्रत्यय घेणारी रूपे;

(२) विशेषणे – ज्यांच्यापुढे येणाऱ्या सामान्यरूपांच्या प्रत्ययानंतर कोणताच प्रत्यय येत नाही, म्हणजेच सामान्यरूपाचा चरम प्रत्यय घेणारी रूपे;

(३) सर्वनामे – ज्यांच्यापुढे येणाऱ्या सामान्यरूपाच्या प्रत्ययांमुळे काही वेळा प्रत्यय येतो व काही वेळा येत नाही अशी, म्हणजेच सामान्यरूपाचे

---

१. सामान्यरूपासाठी प्रत्यय अशी शब्दयोजना सदोष आहे. परंतु 'सामान्य रूप' हा शब्द अतिशय रूढ आहे, त्यासाठी 'सामान्या'साठी प्रत्यय घेतात असे म्हणून अर्थ पुरेसा स्पष्ट होणार नाही म्हणून दुसरा चांगला पर्याय मिळेपर्यंत तो तसाच ठेवणे इष्ट वाटल्याने वापरला आहे.

'अंगी'[१] किंवा 'चरम'[२] प्रत्यय घेणारी रूपे.

निपातरूपांपैकी जी रूपे कार्यतः एखाद्या संपात प्रकृति-रूपाप्रमाणे वर्तन करतात ती निपात असूनही त्यांचा समावेश त्या त्या प्रकारच्या संपात प्रकृतिरूपात वर्णनाच्या सोयीसाठी केला असून क्वचित ती प्रत्यय घेतात असे विधान केले आहे तर क्वचित त, ती प्रत्यय घेत नाहीत असे म्हटले आहे. 'हे लाल फूल आहे' या वाक्यातील 'लाल' हा शब्द रूपदृष्ट्या निपातरूप आहे, परंतु त्याचे वर्तन 'हे फूल पांढरे आहे' या वाक्यातील 'पांढरे' या शब्दाप्रमाणे असल्याने 'लाल' या रूपाचा समावेश 'पांढरा' या शब्दाच्या प्रकृतिवर्गात केला आहे. असे करणे म्हणजे व्याकरणकाराने रूपांच्या विशिष्ट वर्तनामुळे, 'सुलभता, काटकसर' इत्यादी व्याकरण रचनेसाठी राखण्यात येणाऱ्या दृष्टिकोनामुळे मिळवलेली अथवा त्याला मिळालेली 'सवलत' आहे. वास्तविकांशी मांडणीच्या सोयीसाठी केलेली हातमिळवणी आहे.

लहानात लहान मराठी वाक्य दोन घटकांचे बनलेले असते — (१) उद्देश व (२) विधेय. उद्देशाच्या केंद्रस्थानी असणारा शब्द म्हणजे कर्ता. हा नाम किंवा सर्वनाम या प्रकृतिजातीचा असतो. विशिष्ट परिस्थितीत विशेषण जातीचा शब्द कर्ता म्हणून वापरला जातो तेव्हा त्याचे वर्तन इतर कोणत्याही नामाप्रमाणे असते. विधेयाच्या केंद्रस्थानी असणारा शब्द हा (१) निपात, (२) क्रियापद किंवा (३) विधिशब्द असतो. क्रियापद हा शब्द धातू अधिक काळाचा किंवा अर्थांचा प्रत्यय यांनी बनतो. विधिशब्द हा याखेरीज इतर प्रकारे तयार होतो. भाषाप्रवाहात जेव्हा 'अरेरे' हे निपातरूप वापरले जाते तेव्हा ते वाक्यातील विधेय असते. उदा०, 'त्याला अचानक अपघात झाला. अरेरे, आता काय करावे?' या भाषाप्रवाहात 'अरेरे' हा विधेय शब्द असून निपात रूप आहे. 'उद्या मी घरी जाईन' या वाक्यातील 'जाईन' हे क्रियापद असून विधेयकेंद्र आहे. 'मी भात खाल्ला' किंवा 'मला भात पाहिजे' यातील 'खाल्ला' किंवा 'पाहिजे' हे विधिशब्द आहेत.[२]

भाषिक दळणवळणाचे क्षेत्र तीन 'पुरुषांत' विभागले गेले आहे. (१) बोल-

१. शब्दांच्या संदर्भात प्रत्ययांचा क्रमदृष्ट्या होणारा वापर म्हणजे प्रत्ययांचे वर्तन. वर्तनाच्या दृष्टीने प्रत्ययांचे तीन प्रकार दिसतात : (१) चरम, (२) आदि व (३) अंगी. कार्यदृष्ट्या प्रत्ययांचे तीन प्रकार होतात : (१) शब्द तयार करणारे, (२) शब्दांग तयार करणारे व (३) शब्दप्रकृती तयार करणारे. अर्थदृष्ट्या प्रत्ययांचे दोन प्रकार होतात : (१) स्पष्टार्थक व (२) अस्पष्टार्थक. पहा : 'रूपविचार' – लद्दू – 'युगवाणी', जून-जुलै १९७८. व स्थानानुसार दोन प्रकार होतात : (१) पूर्वप्रकृतिप्रत्यय व (२) उत्तरप्रकृतिप्रत्यय.

२. पहा : 'विशेषणे', विधिशब्दांचा एक प्रकार' – लद्दू ० ' मराठी संशोधन पत्रिका वर्ष २५, अंक २, १९७८.

णाऱ्याचा स्वतःचा ' प्रथमपुरुष ', (२) ज्याच्याशी बोलणारा बोलतो तो ' द्वितीय पुरुष ', व याखेरीज इतर सर्वांचा तो ' तृतीय पुरुष ' या तीन नावांनी ही तीन क्षेत्रें ओळखता येतात. सर्वनामे तृतीय पुरुषी असून, शब्दघटना दाखवण्याच्या सोयीसाठी ' एक ' ही संख्या दाखविणारी नामे प्रकृतिरूपे समजली आहेत. सर्वसाधारणपणे सर्व नामे व सर्वनामे अनेकवचनांसाठी प्रत्यय घेतात, परंतु त्यातील काही नामे फक्त एकवचनी किंवा फक्त अनेकवचनी असतात. सर्वनामे प्रथम, द्वितीय, व तृतीय पुरुषात विभागलेली आहेत. पुंलिंग, स्त्रीलिंग व नपुंसकलिंग अशी तीन लिंगे असून ती नाम व सर्वनाम यांच्या बाबतीत यदृच्छया किंवा आपापतः आलेली आहेत. विशेषणे लिंगवचनासाठी प्रत्यय घेतात.

कोणत्याही प्रातिपदिकाचा वाक्यात वापर करण्यासाठी त्याच्यासंबंधींच्या पुढील गोष्टींची माहिती असणे आवश्यक असते :

(१) नाम व सर्वनामांचा अनेकवचनाचा प्रत्यय,
(२) सामान्यरूपाचा प्रत्यय,
(३) नाम व सर्वनामाचे लिंग,
(४) विशेषणांचे लिंगवचनाचे प्रत्यय,
(५) नाम व सर्वनामांचा पुरुष.

लहानात लहान वाक्यात नामे व सर्वनामे कर्ता, कर्म किंवा पूरक म्हणून येतात, विशेषणें पूरकशब्द किंवा विधेयकेंद्र म्हणून येतात. काही विशिष्ट रचनांत नामे व सर्वनामे ही विधेयकेंद्र म्हणून येऊ शकतात.

धातूंचे त्यांच्या वाक्यांतील वर्तनावरून पुढील प्रकारे वर्गीकरण करता येते.

धातू — पूर्ण
धातू — अपूर्ण — सकर्मक
धातू — अपूर्ण — सपूरक (किंवा अपुरे)

पूर्ण धातू वाक्यांत विधेयपद म्हणून एकाच शब्दाने येऊ शकतात. अपूर्ण धातू तसे येत नाहीत. म्हणजेच पूर्ण धातूंच्या साहाय्याने दोन शब्दांचे वाक्य होऊ शकते. तर अपूर्ण धातूच्या वापराने दोन शब्दांचे वाक्य होऊ शकत नाही. अशा वाक्यातील विधेयपदात धातूच्या विधेयकेंद्री असपक्षाबरोबरच आणखी एका शब्दाची जरुरी असते. सकर्मक धातूंना कर्मांची व सपूरक धातूंना किंवा अपुऱ्या धातूंना पूरकाची आवश्यकता असते.

वाक्याचा उद्देश्य हा घटक एकापेक्षा अधिक शब्दांचा असेल तर उद्देश्यपद असतो. उद्देश्यपदाच्या केंद्रस्थानी नामे किंवा सर्वनामे, काही अपवादात्मक परिस्थितीत विशेषणे येतात. वाक्याचा विधेय हा घटक एकापेक्षा अधिक शब्दांनी युक्त असेल तर तो विधेयपद असून त्यांच्या केंद्रस्थानी प्रामुख्याने धातू येतात. काही विशिष्ट रचनात

नामे, विशेषणे इत्यादी इतर जातीचे शब्द येऊ शकतात. जोडणीचा शब्द म्हणून निपात वाक्यांतर्गत येतात, किंवा विधेय म्हणून एकशब्दी वाक्यात वापरले जातात.

उच्चारणपद्धतीनुसार वाक्यांचे तीन प्रकार होतात – (१) विधानार्थी, (२) प्रश्नार्थी, व (३) उद्गारार्थी. वाक्याच्या रचनाप्रकारावरून वाक्ये दोन प्रकारची होतात – (१) एकविधेयी व (२) अनेकविधेयी, अनेकविधेयी वाक्यांतील उपवाक्यांच्या परस्परांशी असणाऱ्या गौणप्रधान संबंधांवरून वाक्यांचे (१) संयुक्त व (२) मिश्र असे दोन प्रकार होतात. गौणवाक्ये ही नामवाक्ये, विशेषणवाक्ये किंवा क्रियाविशेषण वाक्ये म्हणून वाक्यांगभूत असतात.

६.२. (क) प्रकृतिप्रकार व प्रत्यय :

(१) नामे :

नामांचे लिंग, त्यांना लागणारे अनेकवचनांचे प्रत्यय, सामान्यरूप एकवचनाचे व सामान्यरूप अनेकवचनांचे प्रत्यय यावरून नामांचे पुढील वर्ग[1] करता येतात :

नाम	लिंग	अ. व.	सा. रूप ए. व.	सा. रूप अ. व.
(१) वाघ	पुं	वाघ	वाघा	वा'घां'
(२) कपडा	पुं	कपडे	कपडया	कपडयां
(३) चेंडू	पुं	चेंडू	चेंडू	चेंडू
(४) कवी	पुं	कवी	कवी	कवीं
(५) पक्षी	पुं	पक्षी	पक्ष्या	पक्ष्यां
(६) बाग	स्त्री	बागा	बागे	बागां
(७) भिंत	स्त्री	भिंती	भिंती	भिंती
(८) शाळा	स्त्री	शाळा	शाळे	शाळां
(९) भीती	स्त्री	भीती	भीती	भीतीं
(१०) नदी	स्त्री	नद्या	नदी	नद्यां
(११) वाळू	स्त्री	वाळू	वाळू	वाळूं
(१२) सासू	स्त्री	सासवा	सासू सासवे	सासवां

१. सरकारमान्य मराठीचे व्याकरण. येथे दिले जात असल्याने या प्रकरणापुरते उदाहरणात वापरलेल्या मराठीचे लेखन नव्या लेखनपद्धतीप्रमाणे करावे लागत आहे व व्याकरणही त्याच लिखित भाषेचे आहे.

नामे	लिंग	अ. व.	सा. रूप ए. व.	सा. रूप अ. व.
(१३) झाड	नपुं	झाडे	झाडा	झाडां
(१४) पाणी	नपुं	पाणी	पाण्या	पाण्यां
(१५) तळे	नपुं	तळी	तळ्या	तळ्यां
(१६) बायको	स्त्री	बायका	बायको	बायकां

कांही नामे लिंगांसाठी प्रत्यय घेतात, (घोडा–घोडी–घोडे) तेव्हा त्यातील पुंल्लिंगी नाम प्रकृति समजलेले असते व बाकीची त्यापासून साधली असे म्हणावे लागते. नामांच्या पुढे शब्दप्रकृति तयार करणारे प्रत्यय (पहाट अधिक ए–पहाटे, क्रिया-विशेषण; झाड अधिक ई–झाडी, नाम; घर अधिक ई-घरीं, क्रिया विशेषण इत्यादी), प्रत्ययांप्रमाणे वर्तन करणारी क्रिया (घरापुढे), विभक्तिप्रत्यय (घराला, घराने) किंवा इतर काही परतंत्र संपातरूपे म्हणजेच काही प्रत्यय येतात (घरामुळे), मात्र शब्दप्रकृति तयार करणाऱ्या प्रत्ययाखेरीज, इतरत्र, वरील वेळी, नामाला सामान्यरूपाचे प्रत्यय लावून तयार झालेले शब्दांग येते.

विभक्ति चार असून लहानात लहान वाक्यांमध्ये नामाचा वापर होताना नाम त्यापैकी कोणत्यातरी एका विभक्तीने युक्त असते. नामाचे एकवचनी व अनेकवचनी बंध[1] वाक्यगत असताना प्रथमेत असतात. प्रथमेला प्रत्यय नाही. तृतीयेला एकवचनाला 'ने' व अनेकवचनाला 'नीं' हे प्रत्यय असून चतुर्थीचे एकवचनाला 'ला' अनेक-वचनाला 'ना' हे प्रत्यय आहेत, चतुर्थीला 'स' हा प्रत्यय एकवचनासाठी व अनेक-वचनासाठी वापरला जातो. संबोधन एकवचनाचा प्रत्यय असून अनेकवचनाला 'नो' हा प्रत्यय आहे. विभक्तिप्रत्ययाचे कार्य विधेयकेंद्र शब्दांशी संबंधित असता कारकार्थ दाखविण्याचे व इतर शब्दांशी संबंधित असता उपपदार्थ दाखवण्याचे असते.

(२) विशेषणे :

विशेषणे दोन प्रकारची आहेत. निपातविशेषणे व प्रत्यय घेणारी विशेषणे. प्रत्यय घेणारी विशेषणे लिंग, वचन व सामान्यरूप यांसाठी पुढील प्रत्यय घेतात.

	एकवचन	अनेकवचन
पुं.	आ	ए
स्त्री.	ई	या
नपुं.	ए	ई

१. बंध म्हणजे एकापुढे एक रूपे ठवून तयार झालेली रचना, याला जुना रूढ शब्द 'रूप' किंवा इंग्रजी शब्द 'form' असा आहे.

सामान्यरूपासाठी ' या ' हा प्रत्यय असून क्वचित ' ए ' हा प्रत्ययही वापरलेला अढळतो. पहिले दिवशी – पहिल्या दिवशी.

वाक्यांत विशेषणे पुढील प्रकारे येतात :

(१) नामाची विशेष माहिती सांगणारा शब्द– उदा०, चांगला – चांगला पक्षी उडून गेला.

(२) काही विशेषणे परतंत्र संपातात्रमाणे वापरली जातात – उदा०, सारखा ही वस्तु फुलासारखी हलकी आहे.

(३) विधेयपदांत विधिशब्द म्हणून काही विशेषणे वापरली जातात – उदा०, पळाला–तो मुलगा भरभर पळाला.

(४) काही वेळा विशेषणे विधेयपदांत वापरली जातात – उदा०, चांगला – मुलगा चांगला आहे.

(५) काही वेळा विशेषणे वाक्यांत नामाप्रमाणे वर्तन करतात – उदा०, मोठा–

(अ) तो मोठ्याने बोलतो. (ब) मोठ्यापेक्षा धाकटा हुषार आहे. (क) आंधळा चालतो. (ड) मला काळे दिसते. (ई) मला बरे वाटते.

(अ, ब–सामान्यरूपयुक्त, क–कर्ता, ड–कर्म, ई–पूरक).

(६) काही वेळा वाक्यात ते क्रियाविशेषणासारखे वापरले जाते – उदा०, सारखे–तो सारखे बोलतो.

विशेषणे ज्या नामाशी संबंधित असतात त्याच्याशी म्हणजे आपल्या विशेष्याशी लिंगवचन व सामान्यरूप यांच्याशी संवाद साधतात, व ज्या प्रत्ययांच्या योगाने क्रियाविशेषणे तयार होतात अशांशी संवाद साधताना विशेषणे सामान्यरूपाचे प्रत्यय घेतात. उदा०, ' चांगला मुलगा ' यात लिंग–वचन संवाद साधला आहे. ' चांगल्या मुलाने ' यात सामान्यरूपाचा संवाद साधला आहे, व ' चांगल्या घरी ' किंवा ' चांगल्या घरापुढे ' यात विशेषण नामप्रकृतीचे क्रियाविशेष असा संबंध असून विशेषण सामान्यरूपयुक्त आहे.

(३) सर्वनामे :

सर्वनामांचे पुरुष, वचन, लिंगवचनासाठीचे प्रत्यय, त्याचे कार्य इत्यादींवरून पुढीलप्रमाणे स्वतंत्रपणे वर्णन करावे लागते. सर्वनामांची संख्या मर्यादित असल्याने ते शक्यही होते :

सर्वनाम	पुरुष	वचन	लिंगवचनाचे प्रत्यय घेणारे	संबंधदर्शक	बंध तृतीया	चतुर्थी
मी	प्रथम	एक	—	—	मी	मला
तू	द्वितीय	एक	—	—	तू	तुला

सर्वनाम	पुरुष	वचन	लिंगवचनाचे प्रत्यय घेणारे	संबंधदर्शक	बंध तृतीया	बंध चतुर्थी
आम्ही	प्रथम	अनेक	—	—	आम्ही	आम्हाला
तुम्ही	द्वितीय	अनेक	—	—	तुम्ही	तुम्हाला
तो	तृतीय	—	०	०	त्याने, तिने	त्यांनी
हा	तृतीय	—	०	०	याने, ह्याने, हिने	ह्यांनी, यांनी
जो	तृतीय	—	०	०	ज्याने, जिने	ज्यांनी
कोण	तृतीय	कोणतेही	—	—	कोणी	कोणाला
काय	तृतीय	कोणतेही	—	—	—	—[1]
आपण	प्रथमा. द्वि.	कोणतेही	—	मर्यादित अर्थाने	आपण	आपणाला
स्वतः	कोणतीही	कोणतेही	—	मर्यादित अर्थाने	स्वतः, स्वतःने	स्वतःला

सर्वनामे वाक्यात नामांप्रमाणे अथवा विशेषणांप्रमाणे वर्तन करतात. जेव्हा ती नामांप्रमाणे वागतात तेव्हा त्यांच्या सामान्यरूपांपुढे प्रत्यय येतो. जेव्हा ती विशेषणां-प्रमाणे वागतात तेव्हा त्यांच्या सामान्यरूपांपुढे प्रत्यय येत नाही. सर्वनाम नामाप्रमाणे वर्तन करीत असताना ज्या नामाबद्दल सर्वनाम येते त्या नामाच्या लिंगवचनाशी संवाद राखते (मुलगा जातो, तो भरभर पळतो), व विशेषणाप्रमाणे वर्तन करताना ते लिंगवचन व सामान्यरूप यांच्या बाबतीत संवाद राखते (तो मुलगा पळतो, त्या मुलाला पुस्तक दे). सर्वनाम जेव्हा संबंधदर्शन नात्याने येते तेव्हा ते सामान्यरूपा-खेरीज वापरले जाऊन नामाशी लिंगवचन संवाद राखते. (जिला बक्षीस मिळाले आहे तिने उभे रहावे. ज्याला यावेसे वाटेल त्याने माझ्याबरोबर यावे) आणि ज्या वेळी एखाद्या उपवाक्यदर्शक वाक्यांशाचा किंवा उपवाक्याचा संबंध दाखवणारे सर्वनाम असते तेव्हा ते नपुंसकलिंगी एकवचनी असते (तो जाईल हे मला माहीत नव्हते—उपवाक्य त्याचे बोलणे, त्याचा चेहरामोहरा, वागणे हे सर्व पाहून ठेव – वाक्यांश).

(४) धातू :

धातूंचे विधेय, प्रत्यय, वर्णबदल या दृष्टीने व कर्त्याच्या विभक्तीवरून पुढील-प्रमाणे वर्ग पाडता येतात[2] : (पान १६९)

१. ' काय ' या सर्वनामाला प्रत्यक्ष प्रत्यय लागत नाहीत. ' काय ' पासून तयार होणाऱ्या ' कसा ' या बंधाला प्रत्यय लागून, तृतीया ' कशाने ' व चतुर्थी ' कशाला ' असे बंध मिळतात.

२. पहा : ' मराठी धातूंचे वर्गीकरण—लद्दू—' युगवाणी ' एप्रिल–मे १९७९, वर्ष ३५, अंक १–२.

धातु वाक्यात जेव्हा क्रियापद[1] म्हणून वापरले जातात तेव्हा ते भविष्यकाळाचे, रीतिकाळाचे किंवा आज्ञार्थाचे प्रत्यय घेतात. या प्रत्ययांनी युक्त क्रियापदांचा कर्त्यांशी पुरुष व वचन या बाबतीत संवाद राहतो. हे प्रत्यय सर्वलिंगी सारखेच वापरले जातात. धातूंपुढे येणारे प्रत्यय पुढीलप्रमाणे[2] : (पान १६९).

धातू	विधेयदृष्ट्या	अपूर्ण		प्रत्ययदृष्ट्या		वर्णबदलदृष्ट्या			कर्तादृष्ट्या	
	पूर्ण	अपूर्ण सकर्मक	सपूरक अपुरे	नियमित	अनियमित	स्थिर	नियम युक्त	नियम रहित	प्रधान	रहित
(१) उठ		०			०	०				०
(२) बस		०	०				०			०
(३) जा		०			०			०		०
(४) जेव		०	०		०					०
(५) घाल		०	०				०			०
(६) घे		०	०				०	०		०
(७) दिस		०	०				०		०	
(८) आवड		०	०			०			०	
(९) बसव	०		०			०			०	
(१०) ये (शक्यार्थक)				०		०			०	
(११) आहे	०			०	०			०	०	०

भविष्य काळ

	ए. व.	अ. व.
प्र. पु.	एन—ईन	ऊ
द्वि. पु.	शील	आल
तृ. पु.	एल—ईल	तील

रीतिकाळ

	ए. व.	अ. व.
प्र. पु.	ए—ई	ऊ
द्वि. पु.	अस	आ
तृ. पु.	ए—ई	अत

आज्ञार्थ

	ए. व.	अ. व.
प्र. पु.	ऊ—ओ—वो	ऊ—ओ—वो
द्वि. पु.	दीर्घस्वरता / — ϕ	आ—वा—या
तृ. पु.	ओ—वो	ओत—ओत

---

१. ' क्रियापद ' शब्द येथे विशिष्ट अर्थाने वापरला आहे.

२. अनियमित धातूंचे विवेचन येथे केलेले नाही.

धातू ज्या वेळी वाक्यात विधेयकेंद्रस्थानी ‘ विधिशब्द ’[1] म्हणून येतात तेव्हा पुढील प्रत्यय घेतात :

(१) अपूर्णस्थिति क्रियादर्शक –त–;
(२) पूर्णस्थिति क्रियादर्शक –ल–;
(३) अपेक्षा दर्शक –व–;
(४) –आय अधिक चा;
(५) –णार,

(१) अपूर्णस्थितिदर्शक प्रत्यय –त– :

या प्रत्ययाच्या पुढे क्रिया विशेषणासाठी ϕ, आ व आना हे प्रत्यय येतात (बसत, बसता, बसताना); विशेषणाचे लिंगवचनाचे व सामान्यरूपाचे प्रत्यय (बसता, बसती, बसते, बसते, बसत्या, बसती, बसत्या); किंवा दोन प्रकारचे प्रत्यय येतात : (१) अवलंबी उपवाक्यांत येणारे व (२) स्वतंत्र वाक्यांत येणारे.[2] हे प्रत्यय येण्यापूर्वी प्रथम लिंगवचनदर्शक विशेषणांचे प्रत्यय लागतात, व नंतर पुरुषदर्शक प्रत्यय आवश्यकतेनुसार येतात.

अवलंबी वाक्याचे (लिंग अधिक वचन) अधिक पुरुषदर्शक प्रत्यय :

	ए. व.			अ. व.		
	पुं	स्त्री.	नपुं	पुं.	स्त्री.	नपुं.
प्र. पु.	आ ओ	ए	ए		ओ	
द्वि. पु.	आस	ईस	एस	आ‿आत‿एत‿त		
तृ. पु.	आ	ई	ए	ए	या	ई

स्वतंत्र वाक्यांतील प्रत्यय :

	ए. व.			अ. व.
	पुं.	स्त्री.	नपुं.	
प्र. पु.	ओ	ए, ई	ए	ओ
द्वि. पु.	ओस	एस, ईस	एस	आ
तृ. पु.	ओ	ए	ए	आत

१. पहा : ‘ विधिशब्द ’– ‘ विशेषणे, विधिशब्दांचा एक प्रकार ’ – लद्दू – म. सं. पत्रिका, १९७८

२. बसतो – बस अधिक ता (पुं. ए. व.) अधिक ओ – बसतो.
बसते – बस अधिक ती (स्त्री. ए. व.) अधिक ए – बसते.
काही विशिष्ट प्रत्ययांपूर्वी विशिष्ट प्रकारचे स्वरसंधी झालेले दिसतात. असेही म्हणता येईल.

(२) पूर्णस्थितिदर्शक प्रत्यय -ल- ;

या प्रत्ययापुढे पुढील पुरुषवाचक व (लिंग अधिक वचन) दर्शक प्रत्यय येतात :

	ए. व.			अ. व
प्र. पु.	ओ (पुं)	ए, ई (स्त्री)	ए (नपुं)	ओ
द्वि. पु.	आस (पुं)	ईस (स्त्री)	एस (नपुं)	आ — आत — एत — त
तृ. पु.		ϕ		ϕ

या प्रत्ययांशिवाय -ल- या प्रत्ययापुढे -एला- हा विशेषणप्रत्यय व -ए- हा नाम-प्रयय येतो. (दिलेला – विशेषण, दिलेले – नाम – दिल्याने, दिल्यामुळे वगैरे).[1]

(३) अपेक्षादर्शक -व- प्रत्यय :

-व- प्रत्ययानंतर काही वेळा पुरुषसंवाद, फक्त द्वितीय पुरुषाचे बाबतीत विकल्पाने वापरलेला आढळतो, इतरत्र यांच्यापुढे लिंगवचनाचे प्रत्यय येतात व त्यांचा वाक्यात विधिशब्द म्हणून उपयोग केला जातो. उदा०, मी जावा, जावी, जावे; तूं करावा करावेस. त्याने भात खावा; मला पुस्तक आवडावे. ज्या वेळी विशिष्ट संवाद अभिप्रेत नसेल तेव्हा नपुं. एकवचनाचा ए प्रत्यय वापरतात.

(४) -आय-चा :

धातूंना -आय या योजनादर्शक प्रत्ययापुढे -चा हा विशेषणाचा प्रत्यय लावून ज विधिशब्द तयार होतात ते कर्त्याशी लिंगवचनाचा संवाद साधतात, प्रथमपुरुष व द्वितीय पुरुब यांच्याशी विकल्पाने संवाद साधणारे पुढील प्रत्यय घेतात.

पुरुषसंवादासाठी – प्रथमपुरुष एकवचन, पुल्लिंगी ओ (मी बसायचो); प्रथम-पुरुष अनेकवचनासाठी -ओ (आम्ही बसायचो); द्वितीय पुरुष एकवचनासाठी स, अनेकवचनासाठी त (तू बसायचा, बसायचास; तुम्ही बसायचे बसायचेत, तुम्ही बसा-यच्या बसायच्यात). -आय अधिक चा या प्रत्ययांच्या योगाने सातत्यही दाखवले जाते.

(५) -णार :

धातूंना -णार प्रत्यय लावून भविष्यकालीन क्रिया सुचवणारे क्रियाविशेषण तयार होते. ते विधिशब्द म्हणून वापरले जाऊ शकते. (मी जाणार, तो जाणार). -णार या प्रत्ययाला -आ प्रत्यय लावून विशेषण तयार होते : उदा०, जाणारा मुलगा. उडणारा पक्षी, वगैरे.

---

१. ' दिल्याने ' सारख्या शब्दांचे स्पष्टीकरण आणखीही एका प्रकारे देणे शक्य आहे – दिले अधिक याने – ' Beginning Marathi, Part III : Grammar या आगामी पुस्तकातून.

धातूंपासून –ता, –ला, –वा, आय अधिक चा या प्रत्ययांच्या योगाने विशेषणे साध्य करता येतात, त्यांचे वर्तन इतर कोणत्याही विशेषणाप्रमाणे असते.

याखेरीज धातूपुढे येणारे काही प्रत्यय पुढीलप्रमाणे आहेत :

(१) क्रियाविशेषण प्रत्यय –ऊन (करून), ऊ (करू). इ ए ईस अस एस (करीपर्यंत, बोलेपर्यंत, करीस्तवर, बोलस्तवर, बघेतो)

(२) धातु प्रत्यय –अव, अवव, (शिकव, येवव).

(३) नाम प्रत्यय –णे (करणे, देणे); –णी (सरणी, करणी,); –ती (गळती) वगैरे.

विशिष्ट शब्दयोजना असताना काही धातू दुय्यम अर्थाने वापरले जातात. त्या वेळी विधेयकेंद्र शब्दाच्या अर्थाला विशिष्ट अर्थाची आणखी एक छटा येते. उदा०, – आहे (तो चालत आहे); नाही – (हे काम होत नाही); जा – (पुस्तक वाचले जाते); घे – (तो काम करून घेतो); पाह – (तो जाऊ पहातो); चल - (मी काम करत चलतो; रहा – (मी काम करून रहातो); ये – (मला काम करता येते); शक – (मी आता बोलू शकतो) वगैरे.

(५) क्रियाविशेषणे :

क्रियाविशेषणांचे त्यांच्या वाक्यांतील वर्तनावरून, म्हणजे :

(१) ती प्रत्ययांप्रमाणे वागतात किंवा नाहीत.

(२) त्यांच्यापुढे प्रत्यय लागतो किंवा नाही.

(३) ती जोडणीचे काम करतात किंवा नाहीत, आणि

(४) ती स्वतंत्र वाक्यात येतात की फक्त अवलंबी वाक्यात येतात.

या दृष्टीने पुढील वर्ग पडतात :

क्रिया	प्रत्यय म्हणून		प्रत्यय		जोडणी		अवलंबी वाक्यात	
विशेषणे	येतात	येत नाहीत	घेतात	घेत नाहीत	करतात	करीत नाहीत	येतात	यंत नाहीत
१. वर,[1] खाली–		०	–	०	०	–	०	–
२. नंतर,– शिवाय		०	–	०	–	०	०	–

१. काही व्याकरणकार ' खाल ' अशी क्रियाविशेषण प्रकृती मानतात. वाक्यात वापरण्याजोगे रूप अधिक रूप, सोयीसाठी ' प्रकृति ' मानलेले आहे. उदा०, घोडा, चांगला, येथे वगैरे.

क्रियाविशेषणे	प्रत्यय येतात	म्हणून येत नाहीत	घेतात	प्रत्यय घेत नाहीत	जोडणी करतात	करीत नाहीत	अवलंबी येतात	वाक्यांत येत नाहीत
३. येथे	०	—	—	०	०	—	०	—
४. नीट, लवकर	०	—	—	०	०	—	०	—
५. मग	०	—	—	०	—	०	०	—
६. तेव्हा	०	—	—	०	—	०	—	०
७. म्हणून	०	—	०	—	—	०	—	०
८. जेथे	०	—	—	०	—	०	०	०
९. नक्की	०	—	०	—	०	-	०	—

क्रिया विशेषणांपैकी काहींच्या पुढे पुढील प्रत्यय येतात :

(१) क्रिया विशेषण प्रत्यय :– ती (खालती), –ला (उद्याला), –ऊन (वरून); –पर्यंत (वरपर्यंत);

(२) विशेषण प्रत्यय : –सा (फारसा); –चा (वरचा); –ला (येथला).

६.२. (ड) निपातरूपे :

जी निपातरूपे (त्यांच्या दुसऱ्यारूपांबरोबर न येऊ शकण्याच्या वर्तनामुळे निपात म्हटली जातात) वर्तनदृष्टया संपातप्रकृती रूपांप्रमाणे वर्तन करतात त्यांचा समावेश त्या त्या प्रकृति–जातींत करणे सोयीचे असते. व्याकरणकाराने विवेचनासाठी घेतलेली ही एक सवलत असते. ' लाल, वाईट, उत्तम ' सारखी निपातरूपे वर्तनदृष्टया विशेषणे असतात तर ' नक्की, सुद्धा, मात्र ' यांसारखी निपातरूपे वर्तनदृष्टया विशेषणे असतात. उरलेल्या निपातरूपांचे त्यांच्या वाक्यातील वर्तनावरून पुढील वर्ग घडतात.

(१) वाक्यात विधिशब्द म्हणून येऊ शकणारी–उदा०, अरेरे, वाहवा;

(२) वाक्यांत जोडणी शब्द म्हणून येऊ शकणारी–उदा०, आणि परंतु;

(३) कोणत्याही शब्दापुढे येऊ शकणारी–उदा०, च, ही.

६.२. (ई) सामासिक शब्द :

सामासिक शब्द हा कमीत कमी दोन प्रकृतिरूपे व त्यांना एकत्रित करणारी विशिष्ट रचनापद्धती म्हणजे समासपद्धती यांच्यामुळे साधला जातो. कोणतीही दोन रूपे केवळ एकापुढे एक ठेवली म्हणून समासरचना होत नसते तर त्या दोन रूपांमध्ये अर्थदृष्टया काही नाते असावे लागते व ते नाते विशिष्ट समासपद्धतीने व्यक्त व्हावे लागते. सामासिक शब्दांची रचना पुढील प्रकारच्या समासपद्धतींनी झालेली आढळते.

(१) दोन किंवा अधिक स्वतंत्र प्रकृतिरूपे एकापुढे एक येऊन :

उदा०, यंत्रयुग, आईवडिल, पशुपती;

(२) एक स्वतंत्र प्रकृती व दुसरे परतंत्र प्रकृतिरूप एकत्र येऊन :
उदा०, राजवाडा, महाकाव्य (येथे ' राज ' हे ' राजा ' या प्रकृतिरूपाचे ' सहरूप ' आहे तर ' महा ' हे ' महान ' या प्रकृतिरूपाचे ' सहरूप '[1] आहे. राज व महा ही रूपे परतंत्र आहेत);

(३) दोन किंवा अधिक परतंत्र प्रकृतिरूपे एकत्र येऊन :
उदा०, झटपट, पटपट (झट व पट ही परतंत्र प्रकृतिरूपे आहेत, ती स्वतंत्र शब्द म्हणून येऊ शकत नाहीत परंतु ' झटकन, पटकन, झटदिशी. पटदिशी ' इत्यादी शब्दांत आढळतात);

(४) दोन स्वतंत्र प्रकृतिरूपांच्या मध्ये समास करणारा प्रत्यय येऊन :
उदा०, घरनघर, दारोदारी (' न ' या प्रत्ययाने ' घरन् ' असे शब्दांग साधले आहे. तसेच ' ओ ' या प्रत्ययाने (दारो ' हे शब्दांग साधले आहे).

दोन प्रकृतिरूपे एकत्र ठेवल्याने जे साध्य होते ते तीच रूपे योग्य प्रत्ययांनी 'शब्द' बनवून ते शब्द एकापुढे एक ठेवून साध्य होतेच असे नाही. किंबहुना असे साध्य होत नाही म्हणूनच सामासिक शब्द अस्तित्वात येतात. 'राजाचा वाडा' या शब्दांनी 'राजवाडा' या शब्दाचा अर्थ किंवा ' घर आणि घर ' या शब्दांनी ' घरनघर ' या शब्दाचा अर्थ पूर्णपणे व्यक्त होत नाही. समासयुक्त रचना शब्दांची संख्या कमी करत नसून समास-पद्धतीने विशिष्ट अर्थांनी छटा व्यक्त करता येते. या विशिष्ट पद्धतीमुळे सामासिक शब्दांतील कोणत्या शब्दाला अधिक किंवा विशिष्ट महत्त्व येते हे ओळखणे म्हणजे समास सोडविणे. काही समासांचा विग्रह हा संदर्भावरून करावा लागतो (उदा०, नीलकंठ) तर काहींचा विग्रह निश्चित स्वरूपाचा असतो (उदा०, आईवडील).

सामासिक शब्दाचे वर्तन ज्या प्रकृति-जातीनुसार असेल त्याप्रमाणे समासांचे पुढील वर्ग होतात.

(१) अपुनरुक्त : ज्यांतील घटकरूपात ध्वनिसाम्य व अर्थसाम्य नसते असे :
उदा०, यंत्रयुग, वेळापत्रक.

(२) पुनरुक्त : ज्यांतील घटकरूपात ध्वनिसाम्य व अर्थसाम्य यांपैकी एक किंवा दोन्ही आढळते असा. उदा०, कधीकधी, शेजारपाजार. या समासांचे तीन उपप्रकार आढळतात.

(अ) तेच घटकरूप दोन वेळा वापरलेले असते (कधीकधी)

(ब) दुसऱ्या घटकरूपातील पहिल्या अवयवात विशिष्ट बदल असतो (घरबीर, उसनेपासने, वरतीबिरती)

---

१. रूपविचार, लद्दू-' रूपकुलाचा प्रत्येक घटक एकमेकाचा सहरूप असतो ' पृ. ८४, युगवाणी-वर्ष ३४ अंक ३-४, १९७८.

(क) घटकरूपात ध्वनिसाम्य नसते परंतु अर्थसाम्य बऱ्याच प्रमाणात असते (पैसाअडका, जवळपास).

सामासिक शब्दाचा विग्रह करण्याच्या पद्धतीमुळे त्या शब्दाच्या अर्थासंबंधी जी दिशा दाखवली जाते त्यावरून सामासिक शब्दाचे पुढील वर्ग होतात :

(१) अव्ययी भाव : यातील घटकरूपाचे अर्थ एकत्रित जाणावयाचे असतात, घटकरूपाचा वाच्यार्थ या शब्दाच्या संपूर्ण अर्थामध्ये विसर्जन पावतो. हे समास क्रियाविशेषणे असतात. ‘ आजकाल ’ या अव्ययीभाव समासाच्या एकंदर अर्थात ‘ आज ’ व ‘ काल ’ यांचे वाच्यार्थ विसर्जन पावलेले आहेत.

(२) द्वंद्व : यातील घटकरूपांचे अर्थ सामासिक शब्दाच्या अर्थामध्ये विसर्जन पावत नाहीत. तेथे त्या अर्थाची बेरीज होते (उदा०, आईवडील). शिवाय काही वेळा घटकरूपांच्या अर्थाशी निगडित अशा अर्थाचे सूचन त्यामध्ये होते. (उदा०, कांदाभाकरी).

(३) **तत्पुरुष** : यातील शेवटच्या घटकरूपाच्या अर्थाची व्याप्ती आधीच्या घटकरूपाच्या अर्थाने मर्यादित केली जाते. ‘ राजवाडा ’ या शब्दातील ‘ वाडा ’ या शब्दांच्या अर्थाची व्याप्ती ‘ राज ’ या शब्दाने मर्यादित केली आहे.

(४) **बहुव्रीहि** : यांतील घटकरूपाचे अर्थ अशा प्रकारे विसर्जित होतात की सामासिक शब्दाच्या अर्थामध्ये त्यांचा वाच्यार्थ शिल्लक उरत नाही. अव्ययीभाव समासात अर्थ एकत्रित आणावयाचे असतात, त्यात घटकरूपांच्या अर्थांना अल्प का होईना स्थान असते, परंतु बहुव्रीहि समासाच्या अर्थामध्ये घटकरूपाचे अर्थदृष्ट्या अस्तित्वच उरत नाही. चौकोन या शब्दाच्या अर्थामध्ये ‘ चार ’ व ‘ कोन ’ या रूपांच्या अर्थाचे अस्तित्वच शिल्लक राहत नसून त्यांच्या आधाराने तयार झालेली आकृती असा वेगळाच ‘ आकृतिनिदर्शक ’ अर्थ प्राप्त होतो. अव्ययीभाव समासातील घटकरूपांचा अर्थ विग्रहात मिसळून जातो तर बहुव्रीहि समासातील घटकरूपांचा अर्थ सामासिक शब्दाच्या अर्थाच्या घटनेस कारणीभूत होतो.

सर्वसाधारणपणे धातू या प्रकृतिजातीचे समास आढळून यत नाहीत. कोणत्याही समासाचे वर्णन वरील तिन्ही दृष्टिकोन एकत्र ठेवून करता येईल. उदा०, आजरोजी – अपुनरुक्त, क्रियाविशेषण, अव्ययीभाव, नीलकंठ – अपुनरुक्त, प्रातिपादिक, बहुव्रीहि किंवा तत्पुरुष (संदर्भानुसार); खालोखाल – पुनरुक्त, क्रियाविशेषण, अव्ययीभाव किंवा द्वंद्व (संदर्भानुसार); पैसाअडका – पुनरुक्त, प्रातिपदिक, द्वंद्व; जवळपास – पुनरुक्त, क्रियाविशेषण, अव्ययीभाव किंवा द्वंद्व (संदर्भानुसार).

६.२. (फ) प्रत्यय :

शब्दच्छेदकाने पाडलेल्या वाक्याच्या शब्द या घटकामध्ये जी परतंत्र संपात रूपे यतात त्यांना प्रत्यय असे म्हटले जाते. प्रकृतिरूपांना प्रत्यय लावले असता रूपबंध तयार

होतो. हा रूपबंध प्रकृतिरूपाप्रमाणे असू शकतो, शब्दांग होऊ शकतो किंवा शब्दही होऊ शकतो. जे प्रत्यय प्रकृतिरूपाच्या आधी व शब्दांच्या सुरुवातीला येतात किंवा ज्यांच्यापुढे प्रकृतिरूप येते ते प्रत्यय पूर्वप्रकृति प्रत्यय होत. सामान्यपणे रूढार्थाने यांना ' उपपद ' म्हटले जाते. या प्रत्ययांच्या वापरामुळे प्रकृतिरूपाची जाति बदलत नाही. ' स्थिती ' या नामाला सु-हा पूर्वप्रत्यय लावला असता तयार होणारा ' सुस्थिती ' हा रूपबंध नामजातीचा राहातो. उत्तरप्रकृतिप्रत्यय हे प्रकृतिरूपांच्या पुढे येतात. याच्यामुळे तयार होणाऱ्या रूपबंधाची जाति प्रकृतिरूपाच्या जातीप्रमाणेच राहते असे नाही. ' घर ' या नामाला ' ई ' हा उत्तरप्रत्यय लावल्याने तयार होणारा ' रूपबंध ' ' घरी ' हा क्रियाविशेषण होतो, ' सुख ' या नामाला ' ई ' हा उत्तरप्रकृतिप्रत्यय लावल्याने तयार होणारा ' सुखी ' हा रूपबंध विशेषण होतो. पूर्वप्रकृतिप्रत्ययामुळे ' प्रकृती 'चा अर्थ मर्यादित होतो. वाक्यरचनेसाठी हे प्रत्यय आवश्यक नसतात. उत्तरप्रकृति प्रत्ययांना रूढार्थाने ' प्रत्यय ' म्हटले जाते. प्रत्ययांपैकी अनेक प्रत्यय वाक्यरचनेसाठी आवश्यक असतात. उत्तरप्रकृतिप्रत्ययाचे, त्याच्या वापरामुळे तयार होणाऱ्या रूपबंधाच्या ' शब्द ' म्हणून वापरले जाण्याच्या शक्यतेवरून (१) शब्द तयार करणारे, (२) शब्दांग तयार करणारे व (३) शब्दप्रकृति तयार करणारे असे तीन प्रकार करता येतात. येथे शब्द हा शब्द मर्यादित अर्थाने लक्षात घ्यावयास पाहिजे. शब्द-एकरूपी प्रकृति अधिक प्रत्यय याच्यामुळे तयार होणारा, वाक्यात वापरण्याजोगा रूपबंध (उदा०, झाड अधिक ए – झाडे; जा अधिक ई-जाई; चांगला अधिक ई-चांगली). ' घरोघर ' मधील ' घरो-' हे शब्दांग आहे तर ' झाडी ' मधील ' ई ' हा शब्दप्रकृति (नामजातीची) तयार करणारा प्रत्यय आहे. स्त्रीलिंगी शब्दाच्या आवश्यकतेसाठी ' ईण ' हा प्रत्यय माळी शब्दाला लावला असता ' ईण ' हा स्पष्टार्थ प्रत्यय वापरला असे म्हणता येते, तर '-ला ' हा प्रत्यय लावता यावा म्हणून ' घर ' या शब्दाला ' आ ' प्रत्यय लावावा लागला म्हणजे ' आ ' हा अस्पष्टार्थ प्रत्यय वापरला असे विधान करता येते. ज्या प्रत्ययाच्यापुढे आणखी प्रत्यय वापरले जात नाहीत ते चरम प्रत्यय व ज्याच्यामुळे आणखी प्रत्यय वापरला जातो किंवा जाऊ शकतो ते चरमेतर प्रत्यय असे म्हणता येते. याप्रमाणे प्रत्ययाचे कार्यावरून, अर्थावरून व स्थानावरून वेगवेगळे वर्ग पाडता येतात.[1]

६.२. (ग) वाक्यविचार :

वाक्याचे मुख्य घटक दोन असतात – (१) उद्देश्य – ज्याच्याबद्दल बोलावयाचे ते व (२) विधेय – जे बोलावयाचे ते. उद्देश किंवा विधेय एका शब्दापेक्षा अधिक शब्दांचे बनलेले असेल तेव्हा ते उद्देश्यपद किंवा विधेयपद असते. वाक्यातील एका

---

१. रूपविचार-लद्दू- 'युगवाणी' – यांत उपपदाचा समावेश ' आदी ' प्रत्ययात केलेला आहे; वर्गीकरणासाठी थोडीशी भिन्न पद्धती वापरली आहे.

शब्दाचा उद्देश्य असणारा शब्द किंवा उद्देश्यपदातील केंद्रस्थानचा शब्द ' कर्ता ' असतो. वाक्यात नाम व सर्वनाम कर्ता म्हणून येतात. विशिष्ट वाक्यरचनांत विशेषणाचा वापर कर्त्याप्रमाणे होताना दिसतो. वाक्यात विधेय म्हणून येणारा शब्द, किंवा विधेयपदाच्या केंद्रस्थानी येणारा शब्द, वाक्यरचनेच्या पद्धतीनुसार पुढीलप्रमाणे असतो : (१) नाम– बाळ (हा आमचा बाळ); (२) विशेषण – लहान (आमचा बाळ लहान); (३) विधिशब्द – चालतो – (मी भरभर चाललो.); (४) क्रियापद – जाईल (मी उद्या घरी जाईन); (५) क्रियाविशेषण – जाणार (मी उद्या घरी जाणार); (६) निपात – अरेरे (अरेरे. येथे उद्देश्य अध्याहृत असतो, तो आधीच्या संदर्भात असतो).

वाक्य छेदकाने पडलेल्या एका वाक्यात उद्देश्य–विधेय संबंधाखेरीज, उद्देश्यपदात अथवा विधेयपदात, एकमेकांशी अर्थदृष्टया व विशिष्ट व्याकरणरचना दृष्टया संबंधित ' शब्द-बंध ' म्हणजे वाक्यांश; एका वाक्याच्या घटकभूत उद्देश्यपदात किंवा विधेयपदात एकमेकांशी उद्देश्य-विधेय संबंधाने राहाणारा शब्दबंध म्हणजे ' गौणवाक्य '; एका वाक्यात एकापेक्षा अधिक उद्देश्य-विधेय संबंधाचे शब्दबंध असतात तेव्हा ती ' उपवाक्ये ' असतात.

मिश्रवाक्यात गौणवाक्याचा अंतर्भाव असतो; संयुक्त वाक्यात उपवाक्याचा अंतर्भाव असतो व साध्या वाक्यात एकच उद्देश्यकेंद्र शब्द व एकच विधेयकेंद्र शब्द असतो.

' तो माझ्या भावाच्या घरात राहतो ' – साधे वाक्य; यात माझ्या भावाच्या घरात हा वाक्यांश आहे. ' जेथे मी जातो तेथे तो येतो ' हे मिश्र वाक्य असून ' तेथे तो येतो ' हे प्रधान वाक्य आहे व ' जेथे मी जातो ' हे गौण वाक्य आहे. ' तो बाहेर जातो आणि परत येतो ' हे संयुक्त वाक्य असून ' तो बाहेर जातो ' आणि ' (तो) परत येतो ' ही उपवाक्ये ' आणि ' या निपाताने जोडली आहेत.

मराठी वाक्यात शब्दक्रम विशिष्ट पद्धतीने अत्यावश्यक नसला तरी, व काही ठिकाणी आवश्यक असला तरी, सर्वसाधारणपणे वाक्यरचना पुढील प्रकारे आढळते (येथे विधेयकेंद्र व उद्देश्यकेंद्र एकेक शब्दाचे आहे) :

(१) कर्ता – विधेय (मी जाईन); (२) कर्ता – कर्म – विधेय (मी भात खाईन); (३) कर्ता – पूरक – विधेय (मी उभा आहे); (४) कर्ता अधिक तृतीयेचे प्रत्यय – कर्म – विधेय (मुलाने काम केले); (५) कर्ता अधिक चतुर्थीचे प्रत्यय – विधेय (मला बसवते); (६) कर्ता अधिक चतुर्थीचे प्रत्यय – कर्म – विधेय (मुलाला काम येते); (७) कर्ता अधिक चतुर्थीचे प्रत्यय – कर्म अधिक चतुर्थीचे प्रत्यय – विधेय (मला त्याला देववते); (८) कर्ता – कर्म अधिक चतुर्थीचे प्रत्यय – विधेय (मुलगा त्याला पाहतो); (९) कर्ता अधिक तृतीयेचे प्रत्यय – कर्म अधिक चतुर्थीचे प्रत्यय – विधेय (मुलाने त्याला पाहिले). कमीत कमी शब्दांच्या वाक्यरचना वरीलप्रमाणे मराठीत प्रामुख्याने आढळतात. ' बंडू मात्र शहाणा ' या पद्धतीच्या आणखीही काही रचना आहेत. वरील उदाहरणांवरून हे दिसून येईल की वाक्याचा कर्ता, साध्या

वाक्यात, प्रथमा, तृतीया किंवा चतुर्थी या विभक्तींनी युक्त असतो. त्या त्या वाक्याच्या विशिष्ट रचनेनुसार वाक्यात कर्ता, किंवा कर्म, किंवा पूरक यांचा विधेयकेंद्र शब्दाशी लिंगवचन, वचनपुरुष व लिंगवचनपुरुष असा संवाद राखला जातो. कर्ता प्रथमा विभक्तीने युक्त असेल तर विधेयकेंद्राचा व कर्त्याचा संवाद राहतो, कर्ता प्रथमेतर विभक्तीने युक्त असेल तर विधेयकेंद्राचा कर्माशी किंवा पूरकाशी संबंध राहतो, परंतु कर्म किंवा पूरक प्रत्ययाने युक्त असतील किंवा वाक्यात त्यांचा अभाव असेल तर विधेयकेंद्र शब्द नपुंसकलिंगी एकवचनी प्रत्ययाने युक्त असतो. उदाहरणार्थ, पुढे काही वाक्ये दिली आहेत

वाक्य	विधेयाचा कोणाशी संवाद	विधेयाचा कशासाठी संवाद
मी भात खातो.	कर्ता	लिंगवचन अधिक पुरुष
मी भात खाईन.	कर्ता	वचनपुरुष
त्याने भात खाल्ला.	कर्म	लिंगवचन
मला बरे वाटते.	पूरक	लिंगवचन
मुलगा मात्र शहाणा.	कर्ता	लिंगवचन
मुलाला भात आवडेल.	कर्म	वचनपुरुष

६.३. नवा प्रतिष्ठित वर्ग आणि मराठी भाषा :

स्वातंत्र्यपूर्व काळातील भाषेला महाराष्ट्र साहित्य महामंडळाच्या नियमांनी प्रमाणित केल्यानंतर भाषेचे जे स्वरूप झाले त्याचा नव्या व्याकरणशास्त्रानुसार म्हणजे एककालिक भाषाभ्यासपद्धतीने अभ्यास केला असता मराठी भाषेचे स्वरूप वर वर्णन केल्याप्रमाणे स्थूलदृष्टीने पाहता दिसून येते. या मराठीच्या प्रमाण स्वरूपाचा वापर करणारा मराठीचा भाषिक प्रतिष्ठित हा आजच्या काळातील भाषिक प्रतिष्ठितांचा केवळ एक भाग आहे. स्वातंत्र्योत्तर काळातील समाजजीवनात जे नवे प्रतिष्ठित उदयाला आले किंवा समाजात जो नवा प्रतिष्ठित किंवा प्रभावी, शिष्ट वर्ग तयार झाला त्याच्या बोलण्यात, लेखनात येणाऱ्या गटप्रमाणबोलींची वैशिष्ट्ये 'प्रामाण्यांच्या' दृष्टीने विचारात घेणे आवश्यक झाले आहे. ही वैशिष्ट्ये भाषेच्या ध्वनी, शब्द व वाक्य या तिन्ही अंगांत आढळून येत आहेत. भाषेच्या उच्चारण व लेखन अंगांतील या तिन्ही गोष्टींची साधकबाधक चर्चा होऊन, सर्वत्र एकसारखी म्हणजेच 'सर्वमान्य' किंवा 'प्रमाण' भाषा राहण्यासाठी कोणत्या गोष्टींना प्रामाण्य द्यावयाचे म्हणजेच व्याकरणशुद्ध मानावयाचे व कोणत्या नाही, याचे निर्णय, भाषेच्या विशिष्ट स्वरूपाला मान्यता देऊन शैक्षणिक, शासकीय किंवा वाङ्मयीन क्षेत्रांत भाषा वापरू इच्छिणाऱ्यांनी करणे आवश्यक झाले आहे. हे करत असताना, तरीही भाषा आपल्या मार्गाने जातच असते ही गोष्ट दृष्टिआड करून

चालणार नाही. आजच्या नव्या प्रतिष्ठित वर्गाला आपल्या बोलीचे श्रेष्ठत्व जपण्यासाठी प्रमाणभाषेत बोलीपेक्षा जेव्हा फरक असेल तेथे बोलीतील रूपांना प्रामाण्य, निदान पर्यायी प्रामाण्य (उदा०, पानी, वाणी दोन्ही शब्द शुद्ध मानावेत) असे वाटते.

प्रमाणभाषेच्या कार्याची व्यापकता लक्षात घेतल्यास नव्या प्रतिष्ठित वर्गाला दोन मार्ग राहतात : (१) आपले लेखन नित्य स्वतःला मान्य अशा लेखनपद्धतीने, ती स्वतःच्या बोलीशी जास्तीत जास्त जवळची राहील अशा प्रकारे करावयाचे, किंवा (२) ज्याला प्रामाण्य पाहिजे असे वाटत असेल अशा शब्दांचा, प्रत्ययांचा वापर मर्यादित प्रमाणाने सरकारमान्य प्रमाण मराठीत करून, कधीतरी त्यांना 'प्रामाण्य' मिळेल याची 'प्रयोगशरणाः वैयाकरणाः' या उक्तीवर विश्वास ठेवून वाट पहायची. कोणत्याही प्रतिष्ठित व्यक्तीला या गोष्टी फारशा जाणीवपूर्वक करावयास पाहिजेत असे नाही, कारण त्याच्या लेखनामागचे प्रयोजन त्याला विशिष्ट प्रकारे लेखन करावयास भाग पाडणार असतेच. आपल्या हेतूनुसार लेखक हा फक्त बोली, फक्त प्रमाणभाषा किंवा बोली अधिक प्रमाणभाषा अशी भिन्न भाषा वापरत असतोच.

सरकारमान्य प्रमाणभाषेच्या 'भावी' व्याकरणात प्रमाणभाषेच्या वर्णनाबरोबरच 'पर्यायी प्रामाण्य' द्यावे असा दर्जा असणाऱ्या अनेक रूपप्रकारांचा किंवा रूपबंधांचा साधकबाधक निष्कर्ष चर्चात्मक स्वरूपाने दिला जाणे आवश्यक आहे. दामले यांनी तत्कालीन अनेक शिष्टसंमत रूपबंधांचा आपल्या व्याकरणात केव्हा प्रामाण्य देऊन व केव्हा प्रामाण्य देण्यास ते रूपबंध अयोग्य का वाटतात याची चर्चा करून प्रामाण्य नाकारून परामर्श घेतला आहे. दामले यांच्या व्याकरणविषयक व्यापक दृष्टिकोनाप्रमाणे दृष्टिकोन ठेवून, परंतु मराठी भाषेच्या व्याकरणाला इंग्रजी किंवा संस्कृत भाषेच्या व्याकरणाची कृत्रिम चौकट न लावता, दामले यांच्या विवेचनात आढळून येणाऱ्या उणिवा दूर सारून[1] जास्तीत जास्त शास्त्रोक्त, भरपूर उदाहरणांनी युक्त, मराठी भाषा बोलली जात असलेल्या सर्व भौगोलिक क्षेत्रांतील मराठी भाषिकांना आपल्या बोलीशी जवळची वाटेल अशा प्रकारे 'प्रामाण्याचा' निकष वापरून, मान्यामान्यतेसंबंधींच्या भरपूर साधकबाधक चर्चा असलेल्या मार्गदर्शक व्याकरणाची मराठीला आज नितान्त गरज आहे. या प्रकारच्या व्याकरणात चर्चाविषयक होऊ शकणाऱ्या काही गोष्टींचा उल्लेख पुढीलप्रमाणे करता येईल.[2] या गोष्टी (अ) ध्वनि-वर्ण, (ब) प्रत्यय, व (क) रूपे व काही शब्द या तीन अंगांमध्ये विभागता येतील.

---

१. दामले यांच्या काही उणिवांसाठी पहा – 'शास्त्रीय मराठी व्याकरणातील काही शंकास्थळे' – लद्दू म. सा. पत्रिका, मार्च १९६४.

२. येथे निष्कर्ष देण्याचा प्रयत्न केलेला नसून विचारार्ह प्रश्नांचे फक्त स्वरूप मांडले आहे.

६.३. (अ) ध्वनि - वर्ण :

भाषेतील ध्वनींचे लेखन वर्णांद्वारे केले जाते, अवयवांचे निदर्शन अक्षरांद्वारे होते. कसे लिहिले असता कसे वाचावे किंवा वाचले जावे व कोणत्या रूपांचे लेखन कशा प्रकारे करावे इत्यादींची चर्चा भाषेच्या लिखित स्वरूपात किंवा लेखनपद्धतीन अपेक्षित राहते. सध्या निर्माण होणारे काही प्रश्न पुढीलप्रमाणे उदाहरणार्थ आहेत :

(i) ण-न लेखन :

बऱ्याच लोकांच्या बोलींत ' ण ' आढळत नाही, तेव्हा ' ण ' वर्णाऐवजी सरसकट ' न ' हा एकच वर्ण मानावा. यावर विचार करताना ' खून केल्यावर तो म्हणाला ' व ' खूण केल्यावर तो म्हणाला ' या दोन वाक्यांत ' खून ' व ' खूण ' या दोन शब्दांतील अर्थभेद न–ण या लेखनभेदाने दाखवला गेला आहे; अशा भेदांना महत्त्वाचे स्थान देऊन न–ण वर्ण दोन मानावेत की तसे महत्त्व न देता एकच ' न ' वापरावा.

(ii) श–ष–स लेखन :

बऱ्याच लोकांच्या बोलीत ' ष ' व ' श ' या वर्णांनी दाखविलेल्या उच्चारात फरक असत नाही. ' पोस्ट, पोश्ट, व पोष्ट, ' ' गोस्ट-गोश्ट व गोष्ट ' असे उच्चार आढळतात. त्यावरून काहींच्या उच्चारात स, श व ष या तिन्हींमध्ये फरक आढळत नाही असे आढळते. ही तीन अक्षरे ठेवण्याऐवजी स व श ही दोनच ठेवून ष हे अक्षर गाळून टाकावे; जेथे जेथे ' ष ' असेल तेथे ' श ' हा वर्ण लिहावा; त्याचे लेखन जोडाक्षरात ' श्, २ ' असे व्हावे काय ?

(iii) व्यं. अधिक यः व्यं. अधिक व्यं. अधिक य :

त्य या अक्षर लेखनाने त् अधिक य् अधिक अ् व त् अधिक त् अधिक य् अधिक अ असे उच्चार सुचवले जातात. 'लावण्यासाठी' यासारखा शब्द लावण्यासाठी उच्चारावयाचा कीं लावण्ण्यासाठी उच्चारावयाचा हे स्पष्ट होत नाही. त्यासाठी संदर्भावर अवलंबून रहावे लागते. ' य ' हे जोडाक्षरांतील अन्त्य व्यंजन असेल व त्याच्यापूर्वी व्यंजन असेल तर ते द्वित्व उच्चारावयाचे की एकेरी यासाठी काही नवी खूण (उदा०, सत्याचा, सत्त्याचा) वापरात आणून निदर्शन करावे काय ?

(iv) शब्दान्तींचा ' अ ' :

शब्दान्तींच्या उच्चारित ' अ ' ला अनुस्वाराची खूण वापरण्याएवजी दुसरी काही खूण वापरता येईल काय ? 'तुझं काय जातंय' असे लिहिण्याऐवजी ' तुझऽ काय जातऽ' अशा प्रकारे लिहिल्यास ' स्वराचे ' अस्तित्व व्यक्त करता येईल काय ?

(v) सामासिक शब्दांतील त् या पहिल्या रूपाच्या अन्त्य व्यंजनाचे लेखन :

महत् अधिक गान शब्दाचा समास किंवा संधी महत्गान करावा किंवा कसे, जगत् अधिक वंद्य हे शब्द जगत्वंद्य असे जोडून लिहावेत की जगद्वंद्य; चित् अधिक शक्ति हे शब्द चिच्छक्ति लिहावेत की चित्शक्ति; शरद् अधिक चंद्र शब्द शरश्चंद्र, शरद्चंद्र की शरच्चंद्र असा लिहावा ?

(vi) परसवर्ण लेखन :

समासान्तर्गत, अनुस्वारलेखनाऐवजी परसवर्ण लेखनाने दोन समान वर्णांच्या शब्दांत उच्चार फरक दाखवता येत असेल तर तसे लेखन प्रमाण का मानू नये ? उदा० देहांत – देहान्त – देह अधिक अन्त, येथे अनुस्वार उच्चारित आहे; देहांत – देह अधिक आं अधिक त, येथे अनुस्वार अनुच्चारित आहे.

परसवर्ण नेहमीच उच्चारित रहावा व अनुस्वार उच्चारित असेल किंवा नसेल, जेथे समान वर्णांनी युक्त भिन्न अर्थ दाखवणारे शब्द असतील तेथे परसवर्णाने उच्चारित वर्णांचे दर्शन का करू नये ?

६.३. (ब) प्रत्ययरूपे :

वरील उदाहरणांप्रमाणेच प्रत्ययरूपांची काही उदाहरणे, प्रामाण्याचा निकष देण्यासाठी विचारात घेण्याजोगी आढळून येतील, ती पुढे दिली आहेत – ही उदाहरणे देताना ज्या प्रत्ययरूपांचे उदाहरण द्यावयाचे ते प्रकृतिरूपासह दिले आहे.

(i) ‘ करून, करूनशान, करूनशानी, करूनी ’ यातील कोणते प्रमाण मानावे कोणते अप्रमाण मानावे ?

(ii) ‘ बाजारातून काही आणाचं का ? ’ या वाक्यातील ‘ आणाचं ’ या शब्दाच्या जागी ‘ आणायचं, आणायचे, आणावयाचे, आणाचे, आणावयाचं व आणाचं ’ यातील कोणते रूप बरोबर ठरेल ?

(iii) ‘ मी घेऊन येईल ’, ‘ मी घेऊन येईन ’ या दोन वाक्यांतील कोणते वाक्य प्रमाण मानावे ? भविष्यकाळ, प्रथमपुरुष एकवचन यासाठी दोन्ही (एन व एल, ईन व ईल) हे प्रत्यय मान्य करावेत काय ?

(iv) ‘ वांगं ’,‘ टमाटा ’,‘ भांडं ’ या शब्दांची अनेकवचने ‘ वांगे, टमाटे, भांडे ’ अशी वापरली जातात. या अनेकवचनांतील ‘ ए ’ प्रत्यय स्वीकारणीय आहे काय ?

(v) सामान्यरूपाचा ‘ ए ’ प्रत्यय त्याज्य का ठरवावा ? एक तर तो अनेक लोकांच्या वापरात आहे; शिवाय काही वेळा त्याने मुद्रणाची सोय होते. विशिष्ट जागेत मजकूर बसवावयाचा असेल तर याकारयुक्त सामान्यरूप लिहायला जेवढी जागा लागते त्यापेक्षा कमी जागेत – एकारयुक्त सामान्यरूप मावते. ‘ सकाळ ’ वर्तमानपत्रात या सोयीचा उपयोग करून घेतलेला बऱ्याच वेळा आढळून येतो.

(vi) वेंचिली वेंचली, दाखविला दाखवला यांसारखे धातूंचे रूपबंध आज वापरात दिसतात परंतु उच्चारणात मात्र ' ई ' प्रत्ययरहित किंवा ईकारान्त सहरूपे वापरात फारशी आढळत नाहीत. धातूंच्या वर्णनातील सारखेपणासाठी जेथे विकल्पाने दोन्ही रूपबंध वापरले जातात तेथे ' ई ' कारविरहितांना मान्यता द्यावी काय ?

(vii) भविष्यकाळी ' शील ' या प्रत्ययाशिवाय ' चील ' व ' आल ' या प्रत्ययांशिवाय ' चिला ' हेही प्रत्यय वापरात आढळून येतात.' चील ' व ' चिला ' या प्रत्ययांचा व्याकरणात स्थान द्यावे काय ?

(viii) ' पाहिजे ' नंतर काही ठिकाणी ' ल ' हा प्रत्यय वापरात आढळतो त्याचा समावेश लेखनात व्हावा काय ?

(ix) ' घेणारा ' सारख्या – णारा प्रत्ययान्त विशेषणाचे पुढे ' चा ' प्रत्यय येताना त्याचे सामान्यनामासारखे वर्तन होऊन ' घेणाऱ्याचा ' असे रूप आढळते किंवा ' घेणाराचा' असेही आढळते. ज्या वेळी ' णारा ' प्रत्ययान्त विशेषण नामाप्रमाणे वर्तन करीत असेल त्या वेळी कोणते सामान्यरूप प्रमाण मानावे ?

६.३. (क) रूपबंध, शब्द व वाक्यरचना :

प्रत्ययांच्या बाबतींत जशा अनेक गोष्टी विचारणीय ठरू शकणाऱ्या आहेत तशाच रूपबंध शब्द किंवा वाक्यातील विशिष्ट शब्दरचना यांच्यातील काहींचा विचार होणे आवश्यक आहे. उदाहरणार्थ, काही गोष्टी पुढे दिल्या आहेत.

(i) ' पाहणारा, राहणारा ' हे प्रमाण मानलेले शब्द प्रत्यक्ष बोलण्यात बहुतेक वेळा ' पहाणारा, रहाणारा ' असे आढळतात. त्यांना प्रामाण्य का देऊ नये ? ते उच्चारानुसारी आहेत, पूर्वीच्या लेखनात परंपरेने वापरातही आहेत व आजही ते अनेक प्रतिष्ठितांच्या लेखनात वापरले जात आहेत.

(ii) आहे हे क्रियापद आधीच्या धातूच्या रूपबंधाशी संधीने जोडून पुढीलप्रमाणे लिहावे काय ?

मी जाणार आहे – मी जाणारे, मी जाणाराय्, मी जाणाराए;
मी जातो आहे – मी जातोहे, मी जातोय्, मी जातोए;
मी गेलो आहे – मी गेलोहे, मी गेलोय्, मी गेलोए.

वरील सर्व प्रयोग वापरात आहेत. त्यांना प्रमाणभाषेच्या व्याकरणात मान्यता असावी काय ? या मान्यतेमुळे व्याकरणात येणाऱ्या ' ऍऽयऽए या प्रत्ययाची नोंद कशा प्रकारे घ्यावी ? की मराठीतील संधीचे उदाहरण म्हणून त्यांना नमूद करावे ?

(iii) ' तूं काम करता नये ' व ' तूं काम करता कामा नये ' या दोन वाक्यांतील ' कामा'चा वापर असणारे वाक्य शुद्ध की नसणारे वाक्य शुद्ध मानावे ?

(iv) 'तो माझा मित्र आलेला ना', 'तो माझा मित्र आला होता ना', 'तो माझा मित्र आल्ता ना' व 'तो माझा मित्र आलावता ना' यातील 'ये' या धातूच्या कोणत्या रूपबंधांना मान्यता असावी ?

(v) 'ती पाणी पियाली, ती पाणी पिली, तिने पाणी प्याले, तिने पाणी प्यायले' या वाक्यातील 'पी' या धातूचा कोणता रूपबंध बरोबर आहे ?

याप्रमाणे भाषेच्या लेखनाच्या व उच्चारणाच्या अंगातील आणि ध्वनि-वर्ण, रूप-रूपबंध-शब्द व वाक्य या क्षेत्रांतील अनेक प्रश्नांचे निष्कर्ष नव्या व्याकरणातून प्रामाण्यासाठी अपेक्षित रहातील.

६.४. नवी प्रमाणभाषा आणि काही तात्त्विक विचार :

भाषेच्या सध्याच्या संकुल अवस्थेत मराठीसाठी नवी प्रमाणभाषा अस्तित्वात येण्याची निश्चितच गरज निर्माण झाली आहे. प्रमाणभाषेचे स्वरूप कितीही कृत्रिम असले तरी कापसापासून वस्त्र निर्माण करावे किंवा सुवर्णापासून अलंकार निर्माण करावेत तशी भाषा निर्माण करता येत नाही, शिवाय मराठी भाषेला जन्मतः लिपी आहे. पूर्वंपरंपरा आहे. त्यामुळे मराठीची नवी प्रमाणभाषा सिद्ध करणे म्हणजे लिपी नसलेल्या भाषेला लिपी देऊन तिला काही आकार देणे नव्हे. मराठीची प्रमाणभाषा अस्तित्वात आहे, तिच्यात काही परिवर्तनाची गरज निर्माण झाली आहे, ती परिवर्तने घडवणे म्हणजे नवी प्रमाणभाषा तयार करणे; अशी परिवर्तने घडवणे म्हणजेच, भाषेच्या अंगभूत परिवर्तनशीलतेच्या गुणामुळे भाषेत आलेल्या नव्या (ज्यांना आतापर्यंत व्याकरणात स्थान मिळालेले नाही म्हणून ज्यांना नवे म्हणता येईल अशा) भाषेच्या अंगभूत ध्वनि, शब्द, वाक्यरचना इत्यादी क्षेत्रांतील 'आगंतुकांना' व्याकरणात स्थान देणे व भाषेत अल्प वापरात असणाऱ्या भाषिक अंगांना अप्रामाण्य देणे म्हणजे व्याकरणात त्यांचा समावेश न करणे. प्रमाणभाषेच्या व्याकरणाकडून आदेशात्मक कार्याची अपेक्षा असते. आदेशात्मक कार्यामध्ये भाषेच्या परिवर्तनशीलतेमुळे किंवा सामाजिक, राजकीय, इत्यादी कारणांमुळे जेव्हा 'अपूर्णता' जाणवू लागते तेव्हा त्या व्याकरणांचा फेरविचार करण्याची गरज निर्माण होते. अर्थातच नव्या प्रमाणभाषेचे स्वरूप पुन्हा एकवार मांडण्याची गरज होते; यालाच नवे प्रामाण्य प्रस्थापित होण्याचा कालखंड निर्माण होतो असेही म्हणता येईल.

प्रमाणभाषेचे नव्याने स्वरूप ठरविताना भाषिक प्रतिष्ठितांकडून भाषेला विशिष्ट दिशा लावून देण्याची अपेक्षा असते. ही दिशा लावून देणे म्हणजे आकाशातून विमानांना किंवा समुद्रातून जहाजांना मार्ग लावून देण्यासारखे काहीसे असले तरी त्याने जो मार्ग मिळतो त्यामुळे भाषेची अभिवृद्धी अपेक्षित असते. भाषेच्या अभिवृद्धीसाठी, सूक्ष्मांतील सूक्ष्म विषयांसाठी असो किंवा स्थूलांतील स्थूल विषयांसाठी असो, भाषेच्या अभिव्यक्तीची क्षमता कशी वाढेल हे पाहणे आवश्यक असते. भाषेचे स्वरूप कृत्रिमपणे

बदलणे हे काही मर्यादेपर्यंतच शक्य होते, कारण दळणवळणाचे भाषेचे कार्य खंडित होण्याची भीती त्यातून निर्माण होते. कोणत्याही परिस्थितींत भाषा आपले दळणवळणाचें कार्य खंडित करून घेऊ शकत नाही; कारण त्यामुळे भाषेच्या अस्तित्वालाच धोका निर्माण होण्याचा संभव असतो. हे सर्व लक्षात घेता, ' नवी प्रमाणभाषा अस्तित्वात येणे ' व ' नवी प्रमाणभाषा अस्तित्वात आणणे ' या दोन घटनांचा अर्थ अत्यंत मर्यादित स्वरूपात ध्यानात घ्यावा लागतो हे स्पष्ट होईल. मराठीची नवी प्रमाणभाषा अस्तित्वात आणण्याची आजची गरज भाषेतील पूर्वी प्रमाण नसलेल्या घटकांना ' प्रामाण्य ' देण्यापुरती म्हणजेच अल्पप्रमाणात आहे; तरीही ती अत्यावश्यक आहे; कारण भाषेतील सध्याची संकीर्णावस्था किंवा संकुलावस्था टाळण्याचे सामर्थ्य त्यामुळे मराठी भाषेला प्राप्त होणार आहे. नदीचे पाणी अनेक उतारांवरून वाहून गेले तर कामी येत नाही, परंतु ते उतार थोपवले तर नदी जशी समृद्ध होते तसे काहीसे भाषेचे आहे. भाषेच्या समृद्धीसाठी सध्या मराठीला नव्या प्रामाण्याच्या बांधबंदिस्तीची अशी गरज निर्माण झाली आहे की ज्यायोगे सर्वसामर्थ्यानिशी मराठी भाषा सर्व क्षेत्रात आपली अभिव्यक्ती करत राहील. मराठी भाषला हे वळण लावून देण्यासाठी भाषिक प्रतिष्ठितांनी काही गोष्टींचा तात्त्विक विचार पायाभूत धरणे आवश्यक आहे; तसेच काही गोष्टींकडे स्वतःचे लक्ष वेधणेही जरूरीचे आहे.

६.४. (अ) सरकारी लेखनविषयक नियमांचे आक्षेपक :

मराठीच्या नव्या प्रमाणभाषेचा विचार करताना सरकारी लेखनविषयक नियमांना ज्या व्यासंगी लोकांचे आक्षेप आहेत त्यांची मते विचारात घेऊन नियमांचा फेरविचार केला पाहिजे. सर्वमान्य नियम जरी करता आले नाहीत तरी तात्त्विक मुद्द्यांबाबत बराचसा समझोता झाल्यास कोणीही विचारी, व्यासंगी भाषिक प्रतिष्ठित आपली मते स्वीकारलीच पाहिजेच असा आग्रह धरू शकणार नाहीत; कारण त्यांनाही नव्या प्रामाण्याची निकड समजत असतेच.

६.४. (ब) परंपरा :

प्रमाणभाषा परंपरेने अस्तित्वात असल्याने तिचे स्वरूप कृत्रिम उपायांनी बदलणे सहजशक्य नसते; व लिखित वाङ्मयाशी परंपरेचे नाते टिकवायचे असेल तर योग्यही नसते. ज्या वेळी गटप्रमाणबोलींशी प्रमाणभाषेचे अंतर वाढत जाईल त्या वेळी ते कमी करणे जरुरीचे राहतेच, अनुस्वारविषयक नवीन नियम ही विसंगती कमी करण्यास निश्चितच उपयुक्त आहेत. मात्र ' जेव्हां, तेव्हां ' असे अनुस्वारसहित उच्चारण असणाऱ्या लोकांना ' जेव्हा, तेव्हा ' लिहिताना प्रमाणभाषेशी जसे ' जमवून ' घ्यावे लागते तसेच कोकण भागातील निरक्षराला भाषा शिकताना सानुनासिक उच्चारावयाचे व निरनुनासिक लिहावयाचे ही विसंगती पचवण्याची जबाबदारी येते हेही खरेच.

लेखन हेही संकेतावर आधारलेले असते. काही संकेत परिवर्तनक्षम असतात (उदा०, ' लौकर ' चे ' लवकर ', ' चौकशी ' चे ' चवकशी ') हेही परंपरेने आलेले असतात. परिवर्तनक्षम संकेतांतील परिवर्तन भाषेत सहजपणे होते, परंतु ' पुरता ' ऐवजी ' पुर्ता ', ' बसला ' ऐवजी ' बस्ला ', ' पुसका ' ' फुस्का ' असे लेखन भाषेच्या संकेतांना धक्का लावणारे असते. त्या परिवर्तनाला मान्यता द्यावयाची झाल्यास निश्चित स्वरूपाची तत्त्वे मार्गदर्शक म्हणून स्वीकारणे आवश्यक असते.

६.४. (क) बहुजनसमाज :

प्रमाणभाषेचे स्वरूप ठरविण्यापूर्वी बहुजनसमाज या शब्दाची व्याख्या निश्चित केली पाहिजे. भाषा मुळातच सर्व समाजाची असते. प्रमाणभाषा ही प्रत्येक भाषिकाला शिकावी लागते. आज रूढ अर्थाने ज्याला बहुजनसमाज म्हटले आहे त्यातील व्यक्तीला ' हाये, हायती, हंगासं ' वगैरे शब्दांऐवजी ' आहे, आहेत असेच ' हे शब्द शिकताना जी ' शिकण्याची जाणीव ' राहते तीच जाणीव, ज्याला बहुजनेतर समाज म्हणता येईल, अशा समाजांतील व्यक्तीला ' माला ' ऐवजी ' मला ', ' तिनं ' ऐवजी ' तिने ' किंवा ' वीश ' ऐवजी ' विष ' शिकताना राहते. मातृभाषा किंवा बोली शिकली जाते व प्रमाणभाषा शिकावी लागते. ही गोष्ट लक्षात घेतल्यास ' बहुजनसमाजाची ' भाषा अशी भाषाच अस्तित्वात नसते. खरे पाहिले तर ' प्रमाणभाषा ' होच बहुजनसमाजाची भाषा म्हणून कार्य करीत असते.

६.४. (ड) निरक्षर, साक्षर :

ज्या समाजात निरक्षरांचे प्रमाण खूप असल्याने, भाषा लिहायला–वाचायला शिकवताना ' बोली ' शिकवावी अशी कल्पना रूढ होते, त्या समाजात साक्षर–निरक्षर दृष्टीतून प्रमाणभाषेकडे पाहिले पाहिजे. जी व्यक्ती साक्षर आहे ती साक्षर होतानाच लेखनपद्धतीच्या महत्त्वाच्या गाभ्याशी परिचित होते. तिला कदाचित ' व्याकरणशुद्ध ' लिहिता येणार नाही, परंतु ती व्यक्ती ' ई ' स्वराबद्दल ' ओ ' नक्कीच करणार नसते किंवा ' क ' बद्दल ' प ' वर्ण लिहिणार नसते. तिचे लेखन तिच्या बोलीशी सुसंगत, मर्यादित क्षेत्रापुरते होणार असते, परंतु वाचन मात्र प्रमाणभाषेचे होण्याची शक्यता जास्त असते. त्यामुळे, मनात आल्यास, अशी व्यक्ती प्रमाणभाषा लिहू शकेल. जो निरक्षर आहे त्याच्यासाठी प्रमाणभाषेचे स्वरूप बदलावे का, किंवा बदलल्यास कोणत्या क्षेत्रात बदलावे ही, काही तत्त्वांच्या आधारे निश्चित करून घेण्याची गोष्ट आहे. भाषाभ्यासी व्यक्तीने केलेली शास्त्रीय पाहणी व इतरांनी केलेली भाषेची पाहणी यांत फरक पड शकतो. खेडयाचा किवा अशिक्षित मनुष्य ' ण् ' म्हणू शकत नाही, कारण तो ' पाणी ' न म्हणता ' पानी ' म्हणतो किंवा ' कोणी ' न म्हणता ' कुनी ' म्हणतो, असे साधारणपणे वाटते. बारकाईने पाहिल्यास असे आढळून येऊ शकते की त्याला ' ण '

म्हणता येत नाही अशी परिस्थिती नसून विशिष्ट संदर्भात ' ण ' म्हणता येत नाही अशी परिस्थिती असते[१] त्यामुळे प्रमाणभाषेचे स्वरूप ठरवताना विशिष्ट उच्चारणाबाबत ' बहुजनसमाजा ' बद्दल गैरसमज करून घेण्यापेक्षा वस्तुनिष्ठ दृष्टिकोन ठेवणे अधिक चांगले. शिवाय ण-न सारखे उच्चारभेद शिकवून भाषेतील लेखनात येणारे अर्थभेद शिकवावयाचे की केवळ विशिष्ट उच्चार नाकारायचे हे पाहिले पाहिजे; ण-न सारख्या श-ष, स, ड-र, ये-ए, ओ-वो अशा अनेक जोड्यांची दखल घेतली गेली पाहिजे.

६.४. (ई) संकेत आणि भाषिक आक्रमणे :

भाषेचा मुख्य गाभा जितका शब्दांचा असतो तितकाच ते शब्द जोडले जाऊन वाक्यात वापरले जाण्याच्या प्रक्रियेचा असतो. शब्दसंग्रह, व्याकरण व उच्चारण यांनी बोली बनत असते, तशीच विशिष्ट शब्दसंग्रह, विशिष्ट व्याकरण, विशिष्ट उच्चारण-पद्धतीसाठी वापरली जाणारी विशिष्ट लेखनपद्धती यांच्या योगाने प्रमाणभाषा बनत असते. या सर्वच गोष्टी ' संकेतां ' च्या पायावर उभ्या असतात आणि प्रमाणभाषेतील संकेत शिष्टमान्यतेने दुजोरा दिलेले असतात. हे सर्व लक्षात घेतल्यावर मराठी भाषेवरील संस्कृत, हिंदी, इंग्रजी भाषांच्या आक्रमणांचा विचार संकेतांच्या दृष्टीतून करणे आवश्यक ठरते. लग्नाचे ' रिसेप्शन ' चे निमंत्रण, दिवाळीच्या ' फराळाचे ' निमंत्रण, किंवा शाळेच्या ' अल्पोपाहाराचे ' निमंत्रण यांत संकेतभेदांमुळे अर्थभेद होतो. त्यामुळे रिसेप्शन, फराळ व अल्पोपाहार हे शब्द समानार्थी ठरू शकत नाहीत. ज्या वेळी विवरणात काटेकोर-पणा हवा असेल त्या वेळी यांपैकी एखाद्या शब्दाची निवड करण्याचे काम येते. जेव्हा अभिव्यक्तीत नेमकेपणा नको असेल त्या वेळी यांतील एखादा – जो ज्याच्या अधिक सवयीचा शब्द असेल तो, किंवा याहून वेगळा ' चहापाणी ' सारखा शब्द वापरला जातो. संकेतभेदांमुळे शब्दभेद येतात व काळजीपूर्वक शब्दयोजना करावयाची नसेल तर त्या शब्दभेदांसाठी सर्वसाधारणपणे वापरात असलेला, अधिक परिचयाचा शब्द वापरला जातो.

मराठी भाषेवर इतर भाषांची आक्रमणे होत आहेत किंवा झाली आहेत असे म्हणताना आक्रमणाची व्याख्या नक्की करणे आवश्यक आहे; तसेच अस्सल मराठी अशा शब्दप्रयोगाची मर्यादाही स्पष्ट ओळखली पाहिजे.

ज्ञानेश्वरीच्या अनेक अभ्यासकांनी ज्ञानेश्वरीतील मराठीतर शब्दांची उपस्थिती दाखवून दिली आहे. रामदास, तुकारामांच्या मराठीत यावनी शब्दांचा भरणा आढळतो. आजच्याच नव्हे, तर जुन्या मुंबईच्या मराठीत इंग्रजी शब्दांचा भरणा असल्याचे उल्लेख आढळतात. मराठीत आलेल्या, येऊ पाहत असलेल्या कोणत्या शब्दांना मान्यता

---

१. पुण्याजवळील औंध येथील ८–१० निरक्षर स्त्रियांना वाचायला शिकवताना लेखिकेने हा स्वतः अनुभव घेतला आहे.

द्यावयाची, कोणते शब्द पर्यायी किंवा वैकल्पिक म्हणून मान्य करावयाचे, कोणत्या शब्दांना आता मराठी समजावयाचे याचा 'काळा'च्या संदर्भात, शब्दांच्या अर्थांच्या विशिष्ट संकेतांच्या संदर्भात व भाषेच्या सोयीगैरसोयीच्या संदर्भात विचार करून काही मार्गदर्शक तत्त्वे ठरविली पाहिजेत.

'बस' या इंग्रजी शब्दाचे अनेकवचन 'बशी' किंवा 'बसा' व्हायला पाहिजे, त्याचप्रमाणे 'डिश'चे 'डिशा' व्हायला पाहिजे. परंतु तसे वापरले जात नाही. बसेस, डिशेस, ग्लासेस किंवा ग्लासं ही अनेकवचने प्रमाण मानली जातात कारण बस किंवा डिश शब्द अजून मराठीत पुरेसा रुळलेला नसतो, शिवाय बसा किंवा बशी शब्दाने मराठीत दुसरे काही संकेत आधीच अस्तित्वात असतात. त्यामुळे 'बस' हा इंग्रजी शब्द त्याच्या अनेकवचनासकट मराठीत शिरतो, आणि आपल्यासारख्या आणखी चारदोन शब्दांमुळे एस हा अनेकवचनाचा प्रत्यय मराठीत आणू पाहतो.

बेमुर्वतखोर, बेकिंमत, बेईमानसारख्या शब्दांतून मराठीत आलेला 'बे' हा उपसर्ग बेताल, बेभान सारख्या शब्दांतून काढून टाकणे एका विशिष्ट कालावधीनंतर शक्य नसते. भाषेत परभाषेचे आक्रमण नको असेल तर ते होण्यापूर्वीच टाळणे बरे, झालेले असल्यास वेळीच काढून टाकलेले बरे, व रुळले गेले असल्यास विशिष्ट निकषांनी सरळपणे स्वीकारलेले बरे ठरते.

६.४ (फ) देशी शब्द :

मराठी शब्दांचे तत्सम, तद्भव व देशी शब्द असे वर्गीकरण केलेले पुस्तकांतून आढळते. भाषेच्या कालखंडात पूर्वीच्या भाषेचे तत्सम व तद्भव शब्द व त्या विशिष्ट भाषेतील बोलीरूपातून आलेले शब्द आढळणे स्वाभाविक असते; कारण भाषा पुढील पिढीकडे संक्रान्त होत असते. ज्यांना बोली भाषेतून आल्याने किंवा अन्य कारणाने 'देशी' शब्द समजले जाते ते वस्तुतः तत्सम किंवा तद्भव असण्याची शक्यता नाकारता येत नाही, फक्त त्यांचा लिखित भाषेच्या इतिहासात वापर आढळत नाही म्हणून त्यांना 'देशी' हे लेबल चिकटविणे शक्य होते. तद्भव शब्दांबद्दल तक्रार असत नाही, मग तत्समांबद्दल का करावी ? ज्ञानेश्वरांना देखील अनेक संस्कृत तत्समांचा वापर करावा लागला ही वस्तुस्थिती विचारात घेण्याजोगी आहे. संस्कृत-प्राकृत भाषांच्या इतिहासात प्राकृतमध्ये द्विस्वरान्तर्गत व्यंजनांचा लोप होऊन कई-कपि, कवि; गअ-गज, गत अशा तऱ्हेने एकाच शब्दाचे अनेक अर्थ होऊ लागले तेव्हा भाषेच्या काटेकोरपणासाठी पुन्हा संस्कृत शब्दांचा वापर करण्याची गरज निर्माण झाली, हा इतिहास लक्षात घेऊन मराठीत येणाऱ्या तत्समांच्याकडे निश्चित दृष्टिकोनातून पाहिले पाहिजे. देशी शब्द म्हणजेच अस्सल मराठी शब्द, तद्भव शब्द म्हणजे मराठीच्या धाटणीने एक प्रकारे शुद्धीकृत केलेले शब्द आणि तत्सम शब्द म्हणजे जणू काही परके, नको असलेले शब्द अशा तऱ्हेच्या कल्पना काढून टाकून शब्दांकडे पाहण्याचा, भाषेचा इतिहास लक्षात

घेऊन एक निश्चित दृष्टिकोन ठेवला पाहिजे. मराठीतून तत्सम शब्द काढावेत, कानडी, यावनी, इंग्रजीसारखे परभाषी शब्द काढावेत, हिंदी-गुजराथी भाषांतून आलेले समकुल शब्द काढून टाकावेत आणि उरलेल्या शब्दांनी मराठी भाषेत एखादा सुंदरसा परिच्छेद लिहून पाहावा म्हणजे मराठी भाषेतील प्रत्येक भाषेचे स्थान उमगून येईल. मराठीत असलेला व मराठीत येऊ पाहात असलेला शब्द यांची व्युत्पत्ती कोणत्या काळापर्यंत मागे जाऊन पाहायची याचा निकष ठरविला पाहिजे. तसेच जो शब्द मराठीतून निघून जावा असे प्रतिष्ठितांना वाटत असेल त्यांनी त्या शब्दाचा संकेत दर्शवू शकेल असा पर्यायी शब्द भाषेत रुजवला पाहिजे. कालमानाने दोन्ही शब्दांपैकी समाजाला जो अधिक सवयीचा वाटेल तो आपोआप स्थिर होईलच.

६.४. (ग) भाषेची समज :

प्रमाणभाषेचे स्वरूप निश्चित करताना, प्रमाणभाषा सर्वांना सारखी समजू शकणारी असावी, या अपेक्षेच्या पूर्तीसाठी ' समजू शकणारी ' या शब्दप्रयोगाची व्याख्या निश्चित केली पाहिजे. एका समाजाच्या दोन भाषिकांत भाषा समजत नसने, ते ती भाषेच्या व्याकरण-भिन्नतेमुळे नसून, काही विशिष्ट शब्दांच्या अपरिचिततेमुळे. शेतकऱ्याची भाषा गिरणी कामगाराला समजत नसण्याचे क्षेत्र म्हणजे कामगाराचे अपरिचित क्षेत्र. अशा क्षेत्राच्या सहवासाने परिचय झाला किंवा शब्दार्थ सांगून परिचय करून दिला की भाषा समजू शकते. ' ते बंगईवरचं कांबरूण आण ' हे एखाद्याला अपरिचित वाटणारे वाक्य बंगई–झोपाळा व कांबरूण–पांघरूण, हे शब्दार्थ कळताच परिचयाचे होते. पुष्कळदा शब्दांचे अर्थ वापराच्या संदर्भावरून समजू शकतात. एका शब्दापासून दुसरा शब्द कसा तयार होतो हे पाहण्याची विशिष्ट दृष्टी असेल तरी भाषेची समज वाढू शकते. विमान-वैमानिक, सागर-सागरी यांतील वैमानिक व सागरी हे शब्द ' विमान ' व ' सागर ' या शब्दांच्या संदर्भाने सुरुवातीला काहीसे व नंतर योग्य अर्थाने कळू शकतात. साधित शब्द कळायला कठीण व सिद्ध शब्द सोपे असतात, असेही म्हणता येत नाही. कारण भाषा समजून घेणाऱ्याचे लक्ष शब्दाचा परिचय नसेल तेव्हाच सिद्ध-साधित भावाकडे जाते. ' लहरी ' शब्दाचा परिचय असणाऱ्या फारच थोडयांना तो ' लहर ' म्हणजे नदीवरील तरंग, लाट या शब्दावरून आला असा तर्क करावासा वाटेल. मराठीत बऱ्याच प्रमाणात वापरात असलेल्या प्रत्ययांनी नवे नवे शब्द घडवले गेले तर अपरिचित शब्दही समजायला कठीण जाणार नाहीत हे लक्षात घेऊन ' भाषेची समज ' कोणत्या तत्त्वांनी अपेक्षित ठेवायची हे ठरवणे जरुरीचे आहे.

संदर्भ, प्रत्यय, व्युत्पत्ती, परिचय इत्यादी अनेक कारणांनी भाषेतील शब्द समजायला सोपे होऊ शकतात व त्यांच्या अभावी अवघडही वाटतात. व्यक्तीच्या व्यासंगामुळे शब्दांचा अर्थ समजून घेण्याची एक विशिष्ट दृष्टी लाभते. प्रत्येक व्यक्तीच्या भाषिक सामर्थ्यानुसार व्यक्तीला शब्द सोपे, अवघड, बोजड, कठीण, साधे वाटू शकतात.

त्यामुळे कोणता शब्द कोणत्या क्षेत्रातील व्यक्ती कोणत्या कारणासाठी वापरणार आहे हे लक्षात घेऊन विविध शब्दांचे प्रामाण्य, जेव्हा ते ठरवायची वेळ येते त्या वेळी, ठरवले पाहिजे. मंगरूळकरांनी आपल्या 'मराठीच्या व्याकरणाच्या पुनर्विचारात' वापरलेला 'उजू' शब्द किती जणांना समजेल? शब्दाची ध्वनिसंख्या कमी, उच्चारणाचे कष्ट कमी असूनही 'उजू' सारखे शब्द अवघड वाटतात. आणि 'श्रीमंती', 'कार्टी' सारखे शब्द उच्चाराला अवघड असूनही अर्थाला सोपे वाटतात, हे 'भाषा समजण्याचे' निकष ठरवताना लक्षात घेतले पाहिजे.

६.४. (ह) मुद्रण :

प्रमाणभाषा प्रामुख्याने लिखित स्वरूपात वापरली जात असल्याने तिच्या लिखित स्वरूपाची निश्चिती करताना जेथे शक्य असेल तेथे मुद्रण, टंकलेखन यांच्या संदर्भात विचार करणे आवश्यक आहे. व्यंजननिदर्शक खूण, विसर्ग चिन्ह, अनुस्वारांची संख्या, ऱ्हस्वदीर्घ लेखन, विरामचिन्हे, द्वित्त अक्षरे, जोडाक्षरे, इत्यादींच्या, लिखित संकेतांच्या परंपरेने आलेल्या संदर्भात विचार करून, मुद्रण व टंकलेखन यांच्या सोयीसाठी आवश्यक तेथे बदल करण्यासाठी काही तत्त्वे निश्चित केली पाहिजेत.

६.५. भाषिक प्रतिष्ठितांचे कर्तव्य :

मराठीच्या आजच्या भाषिक स्थितीला निश्चित आकार देण्यासाठी मराठीच्या नव्या व्याकरणाची गरज भागवताना मराठीच्या भाषिक प्रतिष्ठितांना इतर क्षेत्रातील प्रभावी व्यक्तींशीही विचारविनिमय करून, त्यांच्या भाषेचे स्वरूप जाणून घेऊन, मराठीच्या अभिवृद्धीसाठी निश्चित स्वरूपाचे प्रयत्न केले पाहिजेत, ते अंमलातही आणण्याचा प्रयत्न केला पाहिजे. हे करताना व्याकरणाला आवश्यक अशी तटस्थ, काटेकोर परंतु लवचिक पूर्वग्रहरहित अशी वृत्ती त्याने स्वीकारली पाहिजे. मराठीतील गटप्रमाणबोलीतील एखादी बोली 'प्रबळ' होऊन, भाषिक कारणांच्या पांघरुणाखाली, राजकीय व सामाजिक स्वार्थाचे हत्यार होऊ पाहत असेल तर मराठी समाजाच्या एकात्मतेसाठी, अभ्युदयासाठी या भाषिक प्रतिष्ठितांनी जाणीवपूर्वक प्रयत्न केले पाहिजेत. 'यद्यदाचरति श्रेष्ठस्तत्तदेवेतरो जनः' हे श्रीमद्भगवद्गीतेत सांगितलेले वचन लक्षात ठेवून आपल्या लिखाणांतून, व्याख्यानांतून प्रसारयंत्रणेच्या सोयीसवलतींतून, मराठीच्या उत्कृष्ट रूपाचा आदर्श ठेवल्यास 'इतर जन' त्याचे अनुकरण केल्याशिवाय राहणार नाहीत ही वस्तुस्थिती लक्षात ठेवली पाहिजे. जे शब्द मराठी भाषेच्या प्रदूषणास कारणीभूत होतील असे वाटत असेल ते शब्द वापरातून कमी होण्यासाठी भाषिक विचारवंतांनी नवे शब्द तयार करून रुजवण्याची खबरदारी घेतली पाहिजे. त्याला समाजातील इतर प्रभावी व्यक्तींनी साथही दिली पाहिजे. समाजातील प्रभावी व्यक्ती जोपर्यंत 'मेडल्' शब्द वापरत आहे तोपर्यंत 'पदक' शब्द धुळीतच राहणार, आणि

' रिसेप्शन ' शिवाय भागत नाही म्हटले की ' स्वागत समारंभ ' होणारच नाहीत. ही वस्तुस्थिती जोपर्यंत राहील तोपर्यंत भाषिक आक्रमणावर टीका करण्यात अर्थ राहणार नाही. बोली आपली स्वतःची असते, प्रमाणभाषा सर्वांची असते ही भावना भाषिक प्रतिष्ठितांनी समाजात वेळेवर रुजवली नाही तर समाजाची छकले पडण्यास वेळ लागणार नाही. समाजाच्या उभारणीचे पायाभूत तत्त्व–सामंजस्य, उभेच राहणार नाही, हे लक्षात ठेवून भाषिक प्रतिष्ठितांनी, इतर प्रतिष्ठितांच्या हातात हात घालून, भाषेच्या अभ्युदयाची वाटचाल नव्या प्रमाणभाषेच्या रूपाने केली तरच भाषावार प्रांतरचनेच्या तत्त्वाने प्राप्त झालेल्या मराठी समाजाचा व महाराष्ट्र प्रांताचा एकसुरीपणा राहून उत्कर्षाच्या क्षेत्रातला आपला वाटा उचलण्याचे कर्तव्य पार पाडले असे होईल.

* * *

७

समारोप

सुसंघटित समाज आणि भाषा यांचे नाते अतूट आहे, ही गोष्ट कोणत्याही भाषेच्या किंवा समाजाच्या इतिहासात डोकावले असता दिसून येते; पंजाब प्रांताचे दोन तुकडे झाले आणि त्या एकभाषिक समाजाच्या भाषेची दोन स्वरूपे स्पष्टपणे अस्तित्वात येऊ लागली. मराठी व कोंकणी या दोन भिन्न भाषा आहेत असे ठरले, मराठी व कोकणी अशा दोन भिन्न समाजांचे अस्तित्व स्पष्ट झाले. समाज सुसंघटित राखण्यासाठी भाषेला स्थैर्य असणे ही एक आवश्यक बाब दिसते. अस्थिरता येऊ पाहात असलेल्या भाषेला स्थैर्य देण्याचे कार्य करणे म्हणजे एक प्रकारे समाज जीवनाच्या एका क्षेत्रातील फुटीर प्रवृत्तींना आवर घालण्यासारखे आहे. प्रसंगी वास्तवतेपासून थोडेसे दूर जाऊनही, समाजाच्या कल्याणासाठी, समाजातील विचारवंतांना या गोष्टी कराव्या लागल्या आहेत. भाषाशुद्धीच्या अनेक चळवळी म्हणजे आपल्या समाजापासून, जाणीवपूर्वक किंवा अजाणता, दूर जाणाऱ्या व्यक्तींना फुटीरतेपासून वाचवण्याचा एक प्रयत्नच होय. दोन माणसांना एकत्रित आणण्याचे कार्य इतर अनेक गोष्टींप्रमाणेच भाषा करीत असते. या कार्यांचा काव्यात्म आविष्कार दिलीप राजा व कामधेनूची मुलगी नंदिनी हिच्यावर झडप घालणारा सिंह (रघुवंश, द्वितीय सर्ग) यांच्या संवादातून कालिदासाने फारच सुंदर रंगवला आहे. ' शस्त्रेण रक्ष्यं यदशक्यरक्षं तद् ' अशा नंदिनीला सिंहाच्या तावडीतून सोडविण्यासाठी, राजाला स्वतःला क्षत्रिय म्हणवून घेण्यासाठी तरी सिंहान कृपा करावी अशी राजाने विनंती केली. ती विफल ठरल्यावर राजाने म्हटले, 'संबन्धमाभाषणपूर्वमाहुर्वृत्तः स नौ संगतयोर्वनान्ते ' आणि सांगितले की आपण आता संबन्धी झालो असल्याने माझी विनंती तूं नाकारणे योग्य होणार नाही, यावर काय झाले त्याच्याशी प्रस्तुत ठिकाणी आपल्याला कर्तव्य नसले तरी भाषेमुळे ' संबंध ' तयार होतो, संबंधामुळे समाज संघटित राहतो हे स्पष्ट होईल.

एका विशिष्ट समाजाला संघटित राहण्यास ज्या अनेक गोष्टी कारणीभूत होतात त्यांतील आचारविचारांच्या संस्काराप्रमाणेच भाषिक संकेतांचे संस्कार महत्त्वाचे असतात. आचारसाधर्म्यामुळे दोन भिन्नभाषी व्यक्तींना परस्परांबद्दल आपुलकी वाटते. उदा०, मकरसंक्रमण हे आपल्याप्रमाणेच कानडी भाषिक तीळ व गूळ यांच्या वापराने साजरे करतात ही गोष्ट मराठी भाषिकाला जेव्हा कळते, तेव्हा, भाषेचे आकलन शून्य असूनही, कानडी भाषिकाबद्दल त्याला कोठेतरी आपलेपणाची भावना निर्माण होते.

'अक्का, कडबू, उसळ, गुढी, झुरळ, पगडी' वगैरे शब्द आपल्यासारखे कानडीतही वापरतात असे, या शब्दांचा वापर कानावर आल्यावर, तो समजत असतो. वास्तविक, हे शब्द कानडीतून मराठीत आलेले असतात परंतु अशा प्रकारची माहिती असण्याची गरज सर्वसामान्य दैनंदिन जीवनात फारच कमी असते. भाषेचा वापर करताना माणसाला जाण हवी असते ती आपल्या भाषेतील, किंवा परभाषा शिकल्यास त्या भाषेतील, संकेत बरोबर समजण्याची व बरोबर वापरण्याची.

अनेक प्रकारच्या रूढी ही जशी एक संकेतप्रणाली आहे, तशीच भाषा हीही एक संकेतप्रणाली आहे. भाषा वापरावयाची म्हणजे ते संकेत बरोबर वापरावयाचे व भाषा शिकावयाची म्हणजे अपरिचित संकेत समजावून घ्यायचे. भाषिक संकेतही, इतर अनेक संकेतांप्रमाणे, का व कसे अस्तित्वात आले हे एका मर्यादेपलीकडे जाऊन सांगता येत नाही. संकेतांना समाजमान्यता असेपर्यंत ते अस्तित्वात राहतात, समाजमान्यता नाहीशी होताच ते लुप्त होतात. समाजाच्या गरजेनुसार भाषिक संकेतामध्ये वाढ, घट होत राहाते, परंतु त्याचा परिणाम भाषेच्या समाजाशी असणाऱ्या नात्यात फारसा पडत नाही, भाषेचा प्रवाह बराचसा अखंडितपणे चालू राहतो. त्याला कारण, भाषेच्या अंगी असणारा, 'वृक्षवल्लीं वेगे जाती, तेथें लव्हाळे वांचती' असा लव्हाळ्याच्या जातीचा चिवटपणा.

भाषा समाजात ध्वनिरूपाने अस्तित्वात असतेच, पण ती लिपिबद्ध रूपाने वर्तमान काळात व इतिहासकाळातही अस्तित्वात राहाते. भाषेचे लिपिबद्ध रूप लिखित वाङ्मयामध्ये उपलब्ध होते, हेच रूप भाषेला हरतऱ्हेने समृद्ध करीत असते. शिक्षणाचे माध्यम, भाषांतराद्वारे परभाषेतील ज्ञानार्जन करून ज्ञानप्रसार करण्याचे साधन, यासाठी भाषा वापरली जात असतानाच तिचे आत्मनिवेदन व आत्मप्रकटीकरणाचे प्रमुख कार्यही चालू राहते. या कार्याच्या अभिवृद्धीसाठी व तत्त्वचिंतनाच्या मानवी प्रवृत्तीनुसार, वाङ्मयपरंपरेचा जसा अभ्यास केला जातो तसाच भाषेची लेखन, व्याकरण, व्युत्पत्ती इत्यादींनी स्पष्ट होणारी अंगेही अभ्यासिली जातात.

लिखित वाङ्मयात समाजजीवनाचे प्रतिबिंब पडलेले आढळते तर भाषिक अभ्यासात भाषेच्या स्वरूपाचे प्रतिबिंब आढळते. ही दोन्ही प्रतिबिंबे पुरेशी स्पष्ट असत नाहीत. एखाद्या मंद झुळकीने उठणाऱ्या, जलाशयातील तरंगांवर पडणाऱ्या प्रतिबिंबासारखी ती कित्येक वेळा अस्पष्टाकृतिसुद्धा असतात. तरीही समृद्ध वाङ्मयपरंपरा लाभलेल्या भाषेला एक विशिष्ट प्रकारचे स्थैर्य, भाषेच्या परिवर्तनशीलतेमुळे कमी अधिक प्रमाणात बदल घडत असले तरीही, निश्चित रूपाने दिसून येते. कालमानानुसार वाङ्मयात प्रकट होणारे आशय बदलतात, कालमानानुसार भाषेतील रूपप्रक्रियेत बदल पडत जातात, परंतु या गोष्टी काळाच्या संदर्भात फार मंद गतीने चालतात; त्यामुळे भाषेचे स्थैर्य जास्त जाणवत राहाते. शिवाय लिखित भाषेच्या वाचनाचा व्यक्तीच्या बोलण्यालिहिण्यावर जो संस्कार होतो त्यानेही भाषेच्या परिवर्तनशीलतेच्या वेगावर एक प्रकारे 'आळा'

घातला जातो. अशा तऱ्हेचा ' आवर ' भाषेच्या वापराच्या दृष्टीने पाहता एकाच वेळी सर्व समाजावर सारखेपणाने घालण्याचे काम प्रमाणभाषेतील लेखनामुळे होत असते.

प्रमाणभाषेतील लेखन हे औपचारिक स्वरूपाचे असते. या लेखनाने समाजाशी सर्वाधिक संपर्क राखला जाणार असतो. प्रमाणभाषा वापरून बोलण्यानेही व्यक्तीचे समाजातील संपर्कक्षेत्र विस्तृत रहात असते. बोलीभाषेत एकभाषिक समाजाच्या लहान क्षेत्रात संपर्क साधला जात असतो. आपल्या संपर्काचा उद्देश लक्षात घेऊन व्यक्ती प्रमाणभाषा किंवा बोलीभाषा, संपर्कसाधन म्हणून वापरू शकते.

आत्माविष्कार व आत्मप्रकटीकरणाचे साधन असणाऱ्या भाषेचा उपयोग, समर्थपणे दैनंदिन जीवनात जसा केला जातो, तसाच विविध तऱ्हेच्या प्रकट चिंतनांतून, वाङ्मयांतून, व्याख्यानांतून केला जातो. या साधनाचा हेतुपुरस्सर वापर करून समाजाचे संघटन वाढवता येते; विघटनही करता येते. व्यक्तीव्यक्तीची वैशिष्टये टिकूनही सुसंवाद असणारे एकत्रित कुटुंब जसे अस्तित्वात राहू शकते, तसेच बोलीबोलीची वैशिष्टये टिकवूनही सुसंघटित समाज अस्तित्वात राहू शकतो. कोणत्याही सुसंघटनेला काही गृहीततत्त्वेही सर्वमान्य असावी लागतात. सर्वमान्य नसली तरी, संघटनेच्या स्थैर्यावर नजर ठेवून, व्यक्तिगत अभिनिवेशांना मुरड घालून मान्य करून घ्यावी लागतात. भाषेच्या बाबतींतही, त्या समाजाच्या सुसंघटनेसाठी, सर्वमान्य प्रमाणभाषा वापरताना, व्यक्तिगत अभिनिवेशांकडे, सर्वांना सोयीच्या ठरणाऱ्या भाषेपुढे, दुर्लक्ष करणे आवश्यक असते. याचा अर्थ असा नव्हे की व्यक्तीव्यक्तीच्या बोली उपेक्षिल्या जातात. उलट प्रत्येक बोलीची वैशिष्टये लक्षात घेऊन, त्या बोली बोलणाऱ्या व्यक्तींना सुखकारक अशी प्रमाणभाषा कशी राहील, तरीही ती आपले परंपरारक्षणाचे व सर्वांना समजली जाणारी असण्याचे कार्य कसे पार पाडील याकडे विचारवंतांनी लक्ष पुरविले पाहिजे, असा अर्थ लक्षात घेतला पाहिजे.

भाषा हे साधन आदिमानवाने एकदा प्राप्त करून, समाजबांधणीसाठी पुढील पिढीच्या हाती दिल्यानंतर आजच्या माणसाला तरी ते ' नैसर्गिक ' रूपाचे बनले आहे. हे ' नैसर्गिक साधन ' निसर्गतः वापरू दिल्यास, एखादे रान नापीक जमीन व थोडे पाणी यामुळे सुकून जावे किंवा सुपीक जमीन व भरपूर पाणी यामुळे वाटेल तसे फोफावावे तसे होणे शक्य आहे. योग्य वाङ्मय व तत्त्वचिंतनाअभावी भाषा नाममात्र जिवंत राहून नामशेष होऊ शकते, तर ज्याला जसे वाटेल तशी भाषा वापरली जाऊन भाषेमुळे साधला जाणारा अपेक्षित सुसंवाद नाहीसा होऊन गोंधळ निर्माण होऊ शकतो. प्राकृत भाषांचे उदाहरण, अपुरी जोपासलेली भाषा म्हणून देता येईल. तर आजच्या काळात वापरल्या जाणाऱ्या संस्कृत भाषेचे उदाहरण फोफावलेल्या भाषेचे देता येईल. संस्कृत वाङ्मयाची उत्कृष्ट फळे आज मिळत असली तरी ती बहुतेकांना दुर्लभ असल्याने ' संवाद ' साधण्याचे कार्य नाममात्रच करीत आहेत.

आपल्या समाजासाठी आपल्या भाषेचा योग्य वापर व्हावयास पाहिजे असेल तर

वाडवडिलार्जित आलेल्या या शेताची निगा निंदणी, खुरपणी वगैरे सर्व उपचार करून व्यवस्थित करणे जरूर आहे. तसे केले तरच त्यायोगे आलेल्या पिकावर समाजाच्या सुसंघटितपणाची गुजराण वर्षानुवर्षे नीट चालेल; यासाठी आपल्या कार्याचे ज्ञान सखोल असणारे दूरदर्शी शेतकरी पाहिजेत. जमिनीचा कस पाहून पीक कोणते लावावे याचा विचार करून कर्तव्यबुद्धीने भाषेची जोपासना केली पाहिजे. हे करताना समाजाचा यथायोग्य विचार करून, आवश्यकतेनुसार भाषेच्या प्रमाणस्वरूपाची निश्चिती वरचेवर केली पाहिजे.

प्रमाणभाषा ही बरीचशी कृत्रिम भाषा असली तरी ती सांकेतिक भाषेप्रमाणे पूर्णपणे कृत्रिम नसते. बोलीभाषेशी तिचे नाते तुटक नसते तर उलट ते अत्यंत खोल गुंतलेले असते, हे लक्षात घेऊन प्रमाणभाषेच्या कृत्रिमतेचा अभ्यास भाषिक प्रतिष्ठितांनी केला पाहिजे.

भाषेचा विचारपूर्वक वापर करणारी व्यक्ती ‘ भाषिक प्रतिष्ठित ’ असते. ती समाजातील प्रभावी व्यक्ती असून तिला भाषेची स्थिती व गती, भाषेचा इतिहास, भाषेचे साधन म्हणून समाजजीवनातील स्थान, भाषेचे समाजाला वळण लावण्याचे सामर्थ्य, समाजाला एकत्रित बांधून ठेवण्याचा भाषेचा गुणधर्म, भाषेचा लवचिकपणा, तिची नवनवोन्मेषशालीनता व परिवर्तनशीलता, भाषेची स्थिरता, विविधता व एकात्मता इत्यादी भाषागुणांचे ज्ञान असणे अपेक्षित असते. भाषिक प्रतिष्ठिताला भाषेबरोबरच आपल्या समाजाचे ज्ञान असणे अगत्याचे आहे; समाजाचा इतिहास, त्याची संस्कृती, त्याचा ध्येयवाद, त्याची घडण, त्याचा पिंड, त्याने ओळखला पाहिजे. त्याचबरोबर इतर समाजांचा थोडाबहुत अभ्यास त्याचा असला पाहिजे. स्वतःच्या भाषेकडून काही अपेक्षा करताना, स्वतःच्या भाषेचे प्रमाणस्वरूप ठरविताना इतर भाषांच्या किंवा इतर समाजांच्या संदर्भात काय घटना घडल्या याची भाषिक प्रतिष्ठितांनी काही प्रमाणात का होईना माहिती करून घेतली पाहिजे. केवळ आपल्या कल्पनाशक्तीवर विसंबून विशिष्ट ‘ भाषिक ’ अपेक्षा करणे योग्य होणार नाही; तसेच, केवळ आपण भाषा उत्तम वापरू शकतो म्हणून आपण भाषिक प्रतिष्ठित आहोत असेही समजून चालणार नाही. कारण, भाषा उत्तम वापरता येणे हा उत्तम वक्त्याचा, उत्तम लेखकाचा किंवा उत्तम विचारवंताचा विशिष्ट गुणधर्म असतो. परंतु ज्याला व्युत्पत्ती, व्याकरण, काव्यशास्त्र, भाषाशैली इत्यादी भाषाविषयक क्षेत्रांतील तात्त्विक ज्ञान नसेल त्याला ‘ भाषिक प्रतिष्ठित ’ किंवा जुन्या संकल्पानुसार ‘ शिष्ट ’ म्हणणे कठीण असते.

‘ शिष्टाने भाषेला आकार द्यावयाचा असतो; भाषेचा मूळचा आकार लक्षात घेऊन ‘ प्रमाण ’ स्वरूप ठरवायचे असते; भाषेची परिवर्तनशीलता लक्षात घेऊन भाषेत आपाततः येत असलेल्या बदलांची, भाषेच्या निगराणीच्या दृष्टीने, दखल घेऊन त्यातील योग्य त्यांना प्रमाणभाषेत वेळीच समाविष्ट होऊ द्यावयाचे असते; ज्या बदलांमुळे भाषेचा कणा दुखावला जाणार असतो त्यांना अमान्यत्व देऊन प्रमाणभाषेपासून

दूर राखावयाचे असते. भाषिक शिष्टजनांची प्रयोगशरणता दुहेरी असणे जरूर असते.– एक, भाषेच्या मूलभूत अंगाशी विरोध करणाऱ्यांची हकालपट्टी करणे; दुसरी, भाषेच्या मूलभूत अंगाशी मिळतेजुळते घेणाऱ्यांची स्वीकृती करणे. शिवाय त्यांनी हकालपट्टी करूनही राहणाऱ्या आगंतुकांबाबत प्रयोगशरणता स्वीकारली पाहिजे व नवागतांच्या स्वागतासाठी त्यांची ' व्यवस्था ' लावून दिली पाहिजे.

वरील सर्व गोष्टी करावयाच्या मनात आणणे व प्रत्यक्षात घडविणे यात फार अंतर राहते; कारण भाषा म्हणजे काही कच्च्या मातीचा गोळा नव्हे की ज्यास कलाकाराने आपल्याला पाहिजे तसा आकार द्यावा. तसे पाहिले असता भाषा अमूर्त असल्याने तिला आकार देणे कठीण असते, परंतु ती लेखनाचे रूप घेऊन जेव्हा मूर्त होते तेव्हा शुद्धाशुद्धविवेक राखून भाषा कशी वापरावयाची हे सांगणारा ग्रंथ म्हणजे लेखनविषयक नियमांसहित केलेले भाषेचे व्याकरण. लेखनविषयक नियम म्हणजे कसे लिहिले असता कसा उच्चार होतो हे सांगणारा व्याकरणाचा एक विभाग, प्रमाणभाषेचे कार्य लक्षात घेता, प्रमाणभाषेचे व्याकरण आदेशात्मक असणेच आवश्यक ठरते; नाहीतर प्रमाणभाषेने सर्वत्र सारखेपणा राखण्याचे कार्य सिद्ध होणे कठीण.

प्रमाणभाषेच्या स्वरूपाची निश्चिती भाषिक प्रतिष्ठितांनी केल्यानंतर तिचे स्वरूप मांडणाऱ्या व्याकरणकारांना त्यांचे मांडणीचे स्वातंत्र्य पूर्णपणे राहू शकते. मराठी भाषेच्या प्रमाणस्वरूपाच्या व्याकरणात एखाद्या वैयाकरणाने सात विभक्त्या मानल्या, तर दुसरा पाच, तीन किंवा फक्त दोन विभक्त्या मानू शकेल; एखाद्याने सात आख्याते मानली तर दुसरा दोनच मानील; किंवा एखाद्याने क्रियापदाशिवाय मराठी वाक्य होऊ शकत नाही असे विधान केले तर दुसरा ते तसे होते असे आपल्या व्याकरणात दाखवून देईल. वैयाकरणांच्या या मतभिन्नतेला कारण, भाषेच्या प्रमाणस्वरूपासंबंधींची वैयक्तिक मतभिन्नता नसून, भाषेकडे, व्याकरण करताना, पाहण्याच्या दृष्टिकोनातील बदल, हे असते. व्याकरणकाराने आपल्या व्याकरणपद्धतीनुसार भाषा कशीही मांडली तरी ती असायची तशीच असते. जसे एखाद्या इच्छित स्थळी जाताना रस्ता तोच असतो, जागा तीच असते पण वाहने भिन्न असू शकतात तद्वत.

भाषेला वळण देण्याची भाषिक प्रतिष्ठितांची जबाबदारी फार मोठी असते. त्यांच्याकडून भाषेचे मर्म ओळखून, सहनशील वृत्तीने, दूरदृष्टीने, समाजाच्या हितासाठी भाषेची जपणूक केली जाणे अपेक्षित आहे. हे करताना समाजाच्या कोणत्याही अंशाला आवश्यकतेपेक्षा जास्त सुखावले जाऊ देणे योग्य नसते किंवा आवश्यकतेपेक्षा जास्त दुखावले जाऊ देणेही योग्य नसते. भाषिक प्रतिष्ठित हा तटस्थ राहूनही लवचिक असला पाहिजे. त्याचा आग्रहीपणा भाषेच्या, पर्यायाने समाजाच्या, अभ्युदयासाठी असला पाहिजे, त्याचा मवाळपणाही त्याच कारणासाठी वापरला गेला पाहिजे.

काळ अखंड चालणारा आहे. समाज काळाबरोबर चालणारा आहे; व भाषा ही समाजाबरोबर जाणारी आहे. ही संततता लक्षात घेऊन बदलत्या काळाबरोबर,

समाजाच्या गरजेनुसार बदलते स्वरूप मान्य करीत करीत भाषेला समाजाबरोबर ' चालती ' ठेवणे, तरीही तिच्या स्रोताशी तिला ' अखंडित ' ठेवणे हे भाषिक प्रतिष्ठितांचे काम आहे. परंपरा व परिवर्तन यांचा सुयोग्य मेळ भाषिक प्रतिष्ठितांना जोपर्यंत घालता येईल तोपर्यंत त्यांचा समाज व त्यांची भाषा ' अभंग ' राहतील, ही जाण ठेवून मराठीच्या भाषिक प्रतिष्ठितांनी, एकत्रित रीत्या, संयमित वृत्तीने मराठी भाषेचे प्रमाणस्वरूप ठरवून, त्यासाठी आदेशात्मक व्याकरणे लिहून, समाजाला मार्गदर्शन करावे, व समाजानेही या प्रतिष्ठितांवर पूर्ण विश्वास टाकून नियमन केलेल्या भाषेचा, प्रमाणभाषा म्हणून लेखनात व औपचारिक प्रसंगी, जेथे व्यक्तिमत्त्व समाजात विरघळवायचे असते त्या क्षेत्रात, वापर करावा. यात मराठी समाजाच्या अभ्युदयाचा एक मार्ग लपलेला आहे.

व्याकरणे लिहून समाजाला प्रमाणभाषेचे स्वरूप सांगितले म्हणजे भाषिक प्रतिष्ठितांचें कर्तव्य संपते असे नव्हे. त्यांनी मान्य केलेली भाषा समाजासमोर योग्य त्या रूपाने कशी येईल हे कष्टपूर्वक पाहिले पाहिजे. भाषेतील प्रमाणस्वरूपासाठी अमान्य केलेली रूपे कोणत्या तत्त्वाने अमान्य केली ते सांगून कोणती रूपे का मान्य करावीत तेही सांगितले पाहिजे. केवळ टीका करणे हे विघातकपणाचे होऊ शकते. टीका करून उपाययोजना सुचवणे हे विधायक कार्य असते. असे विधायक कार्य केले नाही तर जे घडू नये म्हणून टीका केलेली असते, तेच घडण्याचा धोका निर्माण होतो.

भाषिक प्रतिष्ठित, लेखकवर्ग, विचारवंत वगैरे सर्वांनी भाषेची ' चाल ' ओळखून तिला चालविली पाहिजे. वैयक्तिक अस्मितांना आवर घालून उत्कृष्ट लेखनाचा आदर्श समाजासमोर ठेवला पाहिजे. असा आदर्श मिळाला तर बोलीभाषेचा आग्रह धरणारासुद्धा, समाजाशी अधिक संपर्क साधण्याच्या लोभाने, त्या आदर्शांचे अनुकरण केल्याशिवाय राहणार नाहीत. वैयक्तिक स्तरावर किंवा सामाजिक स्तरावर भाषाप्रेमी व्यक्तीने समाज अधिक संघटित कसा राहील याचा विचार करून, स्वतःच्या भाषेचा खोटा अभिमान समाजप्रेमात विसर्जित करून, आवश्यक तेथे स्वबोलीची वैशिष्ट्ये प्रमाणभाषेत अलगदपणे उतरवून भाषा वापरली पाहिजे. भाषेच्या लवचिकपणाचा फायदा आपल्या भाषेच्या सौंदर्यवर्धनासाठी, अर्थवाहित्वासाठी कसा करून घ्यावयाचा हे जाणणे हे लेखकाचे कौशल्य आहे. भाषेच्या स्थिर वृत्तीचा फायदा आपले विचार समाजापर्यंत पोचवण्यासाठी कसा वापरावयाचा हे जाणणे हे विचारवंतांचे काम आहे. प्रत्येक भाषाप्रेमीने समाजाशी घटकत्वाचे नाते लक्षात ठेवून, विधायक कार्याची जबाबदारी स्वीकारून, आपल्या समाजाचा वर्तमानकाळ, भूतकाळ व भविष्यकाळ लक्षात घेऊन, वाईटाचा विनाश व चांगल्याचा स्वीकार करीत करीत भाषा जोपासत गेल्यास, भाषेच्या प्रमाणस्वरूपाची निश्चिती व त्यानुसार त्याची समृद्धी होण्यात अडचण येणार नाही.

भाषेच्या समृद्धीमुळे समाजाच्या वैचारिक, सांस्कृतिक व भावनिक अंगांचेही पोषण आपोआप होत राहील ही गोष्ट आजच्या समाजांतील प्रतिष्ठित वर्गाने लक्षात घेऊन, भाषिक प्रतिष्ठितांच्या कार्याला हातभार लावून, पार पाडावयाची आहे. कारण

त्यामुळे सर्व मराठी समाजाच्या अभ्युदयाच्या एका विशिष्ट कार्याला दिशा लागली जाणार आहे. ही दिशा समाजाच्या अनेक उत्कर्षांशी अतूट नात्याने, मणिसूत्ररूपाने, अव्यक्तरूपाने स्थित आहे हे लक्षात घेऊन वागण्याची मराठी विचारवंतांपुढे आज विशिष्ट गरज निर्माण झाली आहे. अनेक आव्हानांना तोंड देणारा मराठी विचारवंतरूपी सह्याद्रीचा छात्रा, चुकीच्या वैयक्तिक अस्मितारूपी गजराजाचा निःपात करून, भाषेवर आपले अधिराज्य गाजवून आपल्या गर्जनेनें, मराठी समाजाला उत्कृष्ट वैभव प्राप्त करून देईल असा विश्वास बाळगायला, मराठी समाजाला ज्ञानेश्वरादिकांपासून उज्ज्वल परंपरा लाभलेला इतिहासच हमी देणारा आहे यात शंका नाही.

* * *

संदर्भ साहित्य

अर्जुनवाडकर, कृ. श्री.	महाराष्ट्र प्रयोगचंद्रिका	१९७०
कानडे, मु. श्री. (संपादक)	मराठीचा भाषिक अभ्यास	१९७९
कालेलकर, ना. गो.	ध्वनिविचार	१९५५
	भाषा : इतिहास आणि भूगोल	१९६४
	भाषा आणि संस्कृति	१९७२
कुलकर्णी, कृ. पां.	मराठी भाषा, उद्गम व विकास	
कुलकर्णी, श्री. रं.	प्राचीन मराठी गद्य : प्रेरणा आणि परंपरा	१९७०
केळकर, अ. रा.	' प्राचीन भारतीय साहित्य मीमांसा ' **परामर्श**, खंड १, अंक १–२, एप्रिल-जुलै	१९७९
	' भाषेचे नियमन ', **महाराष्ट्र साहित्य पत्रिका**, वर्ष ४१, अंक १६१	१९६७
केळकर, ग. ह.	मराठी व्याकरणाची मूलतत्त्वे (पुनर्मुद्रित)	१९७६
कोलते, वि. भि.	' समाजपरिवर्तन आणि भाषेतील शुद्धाशुद्ध ' **महाराष्ट्र साहित्य पत्रिका**, वर्ष ४१, अंक १६१	१९६७
गजेंद्रगडकर, श्री. न.	भाषा व भाषाशास्त्र (वर्णनात्मक)	१९७२
गोविलकर, लीला	मराठीचे व्याकरण	१९७४
ग्रामोपाध्ये, गं. व.	भाषा-विचार आणि मराठी भाषा (पुनर्मुद्रित)	१९७३
चाफेकर, श्री. ना.	साहित्य आणि समाज	१९६५
जोगळेकर, गं. ना.	मराठीतील भाषिक विचारांची वाटचाल (पीएच. डी. पदवीसाठी सादर केलेला अप्रकाशित प्रबंध)	१९७०
जोशी, प्र. न.	मराठी वाङ्मयाचा विवेचक इतिहास, प्राचीन काल (पुनर्मुद्रित)	१९७८
	अर्वाचीन काल	१९७९
जोशी, रा. भि.	प्रौढबोध मराठी व्याकरण (पुनर्मुद्रित)	१९११
तुळपुळे, शं. गो.	यादवकालीन मराठी भाषा (पुनर्लिखित)	१९७३
	मराठी ग्रंथनिर्मितीची वाटचाल	१९७४

दामले, मो. के.	शास्त्रीय मराठी व्याकरण [संपादक : करंदीकर ग. वा.]	१९६५
पानसे, मु. ग. (संपादक)	भाषा : अंतःसूत्र आणि व्यवहार	१९६९
भावे, वा. कृ.	पेशवेकालीन महाराष्ट्र	१९३५
	मुसलमानपूर्व महाराष्ट्र, भाग २, लोकजीवन	१९४७
मंगरूळकर, अ. ग.	मराठीच्या व्याकरणाचा पुनर्विचार	१९६४
' महाराष्ट्र टाइम्सचे अंक '		१९७९
लद्दू, सुहासिनी	' मराठीचे शुद्धलेखन ' रविवार सकाळ, १२ मे	१९६३
	' शास्त्रीय मराठी व्याकरणातील काही शंका-स्थळे ' **महाराष्ट्र साहित्य पत्रिका**, वर्ष ३७, अंक १४८	१९६४
	' विशेषणे–विधिशब्दांचा एक प्रकार ' **मराठी संशोधन पत्रिका**, वर्ष २६, अंक २	१९७८
	' रूपविचार, ' **युगवाणी**, वर्ष ३४, अंक ३-४, जून जुलै १९७८	१९७८
	' मराठी धातूंचे वर्गीकरण, ' **युगवाणी**, वर्ष ३५ अंक १, २	१९७९
	' मराठीच्या लेखनातील ऱ्हस्वदीर्घलेखना-संबंधीचा विचार ' **युगवाणी** वर्ष ३५, अंक ८-९, नोव्हें. डिसें. १९७९ (राजभाषा मराठी विशेषांक)	१९७९
वाळंबे, मो. रा.	सुगम मराठी व्याकरण लेखन (पुनर्मुद्रित)	१९७७
' सकाळ 'चे अंक		१९७९
Bloomfield, L.	Language, London (Reprint)	1957
Deshpande, M.	" Paninian Grammarians on Dialectal Variations ", **ब्रह्मविद्या** (*Adyar Library Bulletin*) Vol. 42	1978
Gleason, H. A., Jr.	An Introduction to Descriptive Linguistics, New York	1956
Hockett, C. F.	A Course in Modern Linguistics, New York	1959
Jha, Aparna	An Outline of Marathi Phonetics, Poona	1977

Kalelkar, N. G.	Marathi, New Delhi	1965
Laddu, Suhasini	Beginning Marathi (Part I : Reader), Poona	1978
	Beginning Marathi (Parts II, III : Grammar Vocabulary, Translation, etc.) (Unpublished)	
Lyons, J.	Introduction to Theoretical Linguistics, Cambridge	1971
Martinet, A.	Elements of General Linguistics (Translated by Palmer), London	1964
Robins, H.	General Linguistics : An Introductory Survey, London (Reprint)	1964
Sapir, E.	Language, New York	1921

* * *

लेखिकेचा अल्प परिचय

पूर्वाश्रमीच्या या **शशिकला गजानन अभ्यंकर.** यांचा जन्म सातारा येथील (कै.) गजानन विनायक अभ्यंकर (वकील) व शांताबाई अभ्यंकर या सदाचारसंपन्न व कर्तृत्ववान मातापित्यांच्या पोटी नासिक येथे श्रीगोकुळाष्टमी, २७ ऑगस्ट १९२९, या दिवशी झाला. बालपण व शालेय शिक्षण सातारा येथे झाले. नासिकच्या पोलिस ट्रेनिंग स्कूलमध्ये 'लँग्वेज टीचर' (पोलिस इन्स्पेक्टर) म्हणून ब्रिटिश अधिकाऱ्यांना मराठी शिकविण्यात हातखंडा असलेल्या (कै.) विनायक गोविंद अभ्यंकर या आजोबांकडून मराठी व्याकरणाची गोडी व शिस्तशीरपणाचे धडे बालवयातच मिळाले. निवडक इंग्रजी व मराठी वाचनाची जबरदस्त आवड वडिलांकडून मिळाली. कन्याशाळा (सातारा) येथून मॅट्रिक झाल्यानंतर पुण्याचे फर्गसन कॉलेज व सांगलीचे विलिंग्डन कॉलेज यात प्रा. रा. ना. दांडेकर व (कै.) प्रा. त्र्यं. गो. माईणकर यांसारख्या गुरूंचे अध्यापन लाभून संस्कृत व मराठीमध्ये पुणे विद्यापीठाची बी. ए. पदवी संपादन केली (१९४९). तसेच 'प्रवीण' (हिंदी) व 'साहित्य-विशारद' (मराठी) या पदव्याही घेतल्या. दि. २९ मे १९५० ला पुणे येथील श्री. सुरेशचंद्र ज्ञानेश्वर लद्दू यांचेशी विवाह झाल्यावर संस्कृत (वेद व तुलनात्मक भाषाशास्त्र) व अर्धमागधी या विषयात एम्. ए. पदवी प्राप्त केली (१९५२).

यजमानांच्या नोकरीच्या निमित्ताने डेक्कन कॉलेज संशोधन संस्थेत राहावयास आल्यावर, तेव्हा तेथे प्रारंभ झालेल्या भाषाशास्त्रीय प्रकल्पाचे द्वारा, भारतभर आयोजिलेल्या अनेक सत्रां (स्कूल्स) मधून त्या शास्त्राच्या विविध अंगांमध्ये प्रावीण्य संपादन करून डेक्कन कॉलेजात 'फॅलो' म्हणून काम केले (१९५७-५८). त्याचबरोबर, कौटुंबिक जबाबदाऱ्या सांभाळून, 'वर्णनात्मक भाषाशास्त्र' (Descriptive Linguistics) या शाखेमध्ये भारतात प्रथम सिद्ध झालेली पीएच्. डी. पदवी, मराठीच्या कोळी बोलीच्या पृथक्करणावर प्रा. म. अ. मेहेंदळे व प्रा. ग्लीसन यांच्या मार्गदर्शनाखाली संपादन केली (१९६१). लगेचच प्रथम पुणे विद्यापीठाच्या मराठी विभागामध्ये बोलींच्या सर्वेक्षण प्रकल्पासाठी संशोधन-साहाय्यक म्हणून (१९५९-६३) व नंतर श्री ना. दा. ठाकरसी महिला महाविद्यालयात संस्कृत व मराठीच्या प्राध्यापिका म्हणून (१९६३-७२) काम केले.

यानंतर, प्राध्यापकपदाचा स्वेच्छेने राजीनामा देऊन, नित्य नियमित दिनक्रमाने घरी राहून लेखन-अध्यापन-मार्गदर्शनाचे विविध कार्य केले.

भाषाशास्त्रीय दृष्टिकोनातून स्वतःच्या मुलींवर प्रयोग करून, लिपिपरिचयानंतर व लेखनाची सवय करण्यापूर्वी वापरण्याचे, शिशूंच्या वाचनामध्ये नैपुण्य व गती देणारे

प्रगत पाठांचे ' वाचनाची पाऊलवाट ' हे पुस्तक व त्यामागील तत्त्वांचे परिचयात्मक लेख लिहिले (१९६४–६६). या पुस्तकाच्या प्रयोगांना सार्वत्रिक व आश्चर्यकारक यश लाभले. प्रौढ साक्षरतेच्या कामात, केलेला याच पुस्तकाचा वापर अतिशय प्रभावी ठरला. भाषा शास्त्र विषयात संशोधनात्मक (व प्रथमतःच लालित्यपूर्ण असेही) सुमारे पंचवीस लेख व अभिप्राय (इंग्रजी व मराठी) Indian Linguistics, Poona University Journal, S. N. D. T. University Journal, Yuva-Bharati, सत्यकथा, महाराष्ट्र साहित्य पत्रिका, रविवार सकाळ, साधना, मनोरा, मराठी संशोधन पत्रिका (मुंबई), युगवाणी (नागपूर) इ. नियतकालिकांतून मराठीचे व्याकरण व शुद्धलेखन या विषयात अखंडपणे लिहिले. याच काळात, अमराठी भाषकांना मराठीचे प्रगत पाठ देणारे ' Beginning Marathi ' Part I (व अप्रकाशित Parts II, III) हे पुस्तक प्रयोगाअंती लिहिले. त्याच्या द्वारा त्यांच्या अध्यापनाचा लाभ घेणारे त्यांचे अनेक शिष्य भारतातील भिन्न भागांत व जगातील सातआठ देशांत विखुरलेले आहेत. पुण्याच्या महाराष्ट्र ग्रंथोत्तेजक सभेने ' मराठीच्या प्रमाण भाषेचे स्वरूप ' या विषयावर जाहीर केलेल्या प्रबंध-स्पर्धेत त्यांना प्रथम पारितोषिक मिळाले (१९८०), व सुदैवाने तोच प्रबंध नागपूरच्या महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळातर्फे पुण्याच्या काँटिनेंटल प्रकाशनाच्या देखरेखीखाली, प्रस्तुत ग्रंथाच्या रूपाने मुद्रित होत आहे. याच मंडळातर्फे ' मराठी भाषेचा इतिहास ' या ग्रंथाचे अंगावर घेतलेले लेखन लेखिकेच्या निधनामुळे अपुरे राहिले. तसेच, मराठी-उडिया यांचे तुलनात्मक व्याकरणाचे पुस्तकही निधनामुळे अपूर्ण राहिले. महाराष्ट्र राज्य भाषासंचालनालयाच्या भाषाशास्त्र-उपसमितीच्या बैठकांना त्या अभ्यागत तज्ज्ञ म्हणून वेळोवेळी उपस्थित राहून कामकाजात भाग घेत असत (१९७६–७९). तसेच, पुणे विद्यापीठाच्या मराठी विभागात व स्वाध्याय महाविद्यालयात त्यांच्या आवश्यकतेनुसार भाषाशास्त्रावर व्याख्याने देत असत.

याहून भिन्न अशा दुसऱ्या आवडीच्या क्षेत्रात, म्हणजे एकनाथमहाराज, ज्ञानेश्वर, नामदेव, समर्थ रामदास व रामकृष्ण परमहंस यांच्या वाङ्मयावर, व भगवद्गीता, रामायण, महाभारत या ग्रंथांवर, विपुल चिकित्सक लेखन (सुमारे छप्पन्न लेख) विविध नियतकालिकांतून (विशेषतः नागपूरच्या रामकृष्ण मठाच्या ' जीवन-विकास ' मधून) आणि काही ग्रंथांतून त्यांनी सातत्याने केले. इतरही फुटकळ लेखन ललना, मानिनी, अरुंधती, सासर-माहेर इ.तून व काही स्मरणिकांतून केले. मागणी आली की नाकारायची नाही व ती वेळेत पुरी करायची या नियमाने, प्रसंगी प्रकृतीने साथ दिली नाही तरी लेखन, भाषणे व प्रवचने केली.

वैयक्तिक अभ्यास-लेखनाचे जोडीला, आजकालच्या छोट्या घरांमुळे अनुभवसंपन्नतेच्या संस्कारविश्वाला आचवलेल्या तरुण पिढीला विविध अनुभवांचे जग परिचित व्हावे या उद्देशाने, तरुण मुलींची चर्चापूर्ण व प्रेरणादायी ' मोहोर मंडळे ' त्यांनी काही वर्षे उत्साहाने चालविली.

अशा या, जीवनात कोणत्याही पदाची, प्रसिद्धीची वा भौतिक लाभाची लालसा न धरणाऱ्या, लेखन, विद्यादान व अध्यात्मवाचन यांमध्ये निरंतर रत असलेल्या, योजनाबद्ध असे संपन्न गृहस्थजीवन उपभोगून शेवटी पतीसमवेत 'मर्यादित-अपरिग्रहव्रत' अंगीकारलेल्या, जीवनातील जयापजयांकडे तटस्थवृत्तीने पाहणाऱ्या, आईवडिलांच्या जीवनातून असीम धैर्य व कर्मयोगाचे आदर्श पाठ घेऊन कोणत्याही कौटुंबिक आपत्तीचे किंवा वैयक्तिक वेदनांचे प्रसंगी कसोटीला उतरणाऱ्या, कसल्याही प्रकृतिधर्माच्या व्यक्तीकडे प्रेम व मदतीला धावणाऱ्या, सर्वधर्मीय, सर्वदेशीय व सर्व वयातील विशाल मित्रपरिवारामध्ये प्रिय असलेल्या, गप्पाप्रिय व सदा हसतमुख अशा स्त्रीचे, वयाचे त्रेपन्नावे वर्षी अल्प आजारानंतर पुणे येथे रविवार दि. १३ डिसेंबर १९८१ रोजी निधन झाले. विविध अंगांनी बहरत असलेले लेखिकेचे जीवनपुष्प 'हा हन्त हन्त नलिनीं गज उज्जहार' अशा रीतीने अचानकपणे कायमचे पडद्याआड गेले. त्यांचे मागे पती, जावई, दोन कन्या, दोन नाती, वृद्ध मातोश्री इत्यादी परिवार आहे.

६, प्रोफेसर्स क्वार्टर्स,
पुणे विद्यापीठ,
पुणे-४११००७.
दि. २९-११-१९८२

सु. शा. लद्दू
(प्राध्यापक, संस्कृत प्रगत अध्ययन केंद्र,
पुणे विद्यापीठ)

30C

उल्लेखसूची

* * *

संग्राह्य अभ्यास ग्रंथ

भारतीय साहित्याचा इतिहास (भाग-१)
सिंधू स. डांगे

भारतीय धर्म आणि तत्त्वज्ञान
श्री. भा. वर्णेकर

धर्माचे तत्त्वज्ञान
ज. वा. जोशी

पाश्चात्त्य तत्त्वज्ञानाचा इतिहास (भाग १ ते ३)
ग. ना. जोशी

पाली साहित्याचा इतिहास
ग. वा. तगारे

बौद्ध धर्म व तत्त्वज्ञान
सिंधू स. डांगे

जैन धर्म व तत्त्वज्ञान
सिंधू स. डांगे